04-08-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

BGO/ 11:00

08-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1

BGO/ AKN/ KTG/ 11:00

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**सभागृहात मंत्री उपस्थित नसणे**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, कोकणातील आंबा व काजू पिकांचे झालेले नुकसान यासंबंधी एक महत्त्वाची अल्पकालीन चर्चा आता सभागृहापुढे आहे. या सभागृहाचे नेते कृषी खात्याचे मंत्री आहेत. त्यांनी ठरविले तर ते शासनाकडून आंबा व काजू उत्पादकांना मदत मिळवून देऊ शकतात. त्यामुळे कोकणातील सामान्य शेतकऱ्यांना न्याय देखील मिळू शकतो. आता सभागृहाचे नेते तसेच कोणीही मंत्री उपस्थित नाहीत म्हणून माझी विनंती आहे की, माननीय मंत्री येई पर्यंत सभागृहाचे कामकाज तहकूब करावे आणि माननीय मंत्री आल्यानंतर नियम 97 अन्वये वरील अल्पकालीन चर्चा सुरू करावी.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, या अल्पकालीन चर्चेमध्ये जो विषय नमूद केला आला आहे त्यास कृषी राज्यमंत्री या नात्याने सर्वतोपरी उत्तर देण्याची तयारी मी ठेवली आहे. तेव्हा आपण निर्णय घ्यावा.

**उप सभापती :** अधिवेशन संपण्याला आता दोन दिवसच शिल्लक आहे. माननीय कृषी राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. ते टिपणी घेतीलच. सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालविण्यासाठी माननीय मंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. तेव्हा माननीय मंत्र्यांना त्वरित बोलावून घेण्यात यावे. सभागृहाचे कामकाज सुरू करायला त्यांची आवश्यकता आहेच. माननीय मंत्री सभागृहात नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.02 ते 11.10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.जुन्नरे....

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.:** कोकणात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे आंबा व काजू पिकांचे झालेले नुकसान

**मु.शी.:** कोकणात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे आंबा व काजू पिकांचे झालेले नुकसान या विषयावर सर्वश्री.सुनील तटकरे, धनंजय मुंडे, श्रीमती विद्या चव्हाण,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उप सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"कोकणात फेब्रुवारी व मार्च, 2015 मध्ये झालेला अवकाळी पाऊस व गारपीट यात आंबा व काजू पिकांचे झालेले नुकसान, त्यातच हापूस आंबा निर्यात करण्यात येणे, तथापि निर्यात करण्यापूर्वी विविध देशनिहाय यावर हॉट वॉटर, रेडीऐशन व व्हेपर ट्रिटमेंट प्रक्रिया करण्यात येणे, हॉट वॉटर ट्रिटमेंट ही प्रक्रिया कोकणातील हापूस आंब्याच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम करु शकते, मोठ्या प्रमाणात आंबा निर्यात होत असल्यामुळे या प्रक्रिया फारच कमी आंब्यावर केली जात असणे, त्यामुळे आंबा बागायतदारांचे होत असलेले नुकसान, या आंब्यावर फळमाशीचा प्रादुर्भाव आढळल्यास विदेशात आंबा नाकारण्यात येणे, यावर राज्यात संशोधन करुन आंबा विदेशात पाठविण्यात आल्यास शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान टाळता येणे शक्य असणे, राज्य शासन व कोकण कृषी विद्यापीठाने यावर संशोधन करण्याची गरज असताना त्यांनी यांची गांभिर्याने दखल न

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

घेणे, त्यामुळे आंबा बागायतदारांचे होत असलेले लाखो रुपयांचे नुकसान, परिणामी आंबा बागायतदारांत पसरलेले चिंतेचे वातावरण, शासन व कोकण कृषी विद्यापीठाने याची गांभिर्याने दखल घेऊन व यावर संशोधन करुन उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 97 अन्वये कोकणातील एका महत्वाच्या प्रश्नावर या ठिकाणी चर्चा उपस्थित करण्याची आपण मला अनुमती दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. या चर्चेचा मसुदा न वाचता मी चर्चेला सुरुवात करतो आहे. या चर्चेच्या निमित्ताने या ठिकाणी सन्माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय मंत्री श्री. विनोद तावडे उपस्थित आहेत. या अगोदर सभागृहात कॅबिनेट मंत्री नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करावे लागले हे सरकारला शोभेस नाही. एक बाब निश्चित आहे की, या महत्वपूर्ण चर्चेसाठी महसूल मंत्री उपस्थित राहतील अशी आमची भावना होती परंतु ते या चर्चेसाठी उपस्थित राहू शकले नाहीत. या ठिकाणी कृषी राज्यमंत्री श्री. राम शिंदे उपस्थित आहे परंतु या उत्तराच्या संदर्भात त्यांना काही मर्यादा आहेत. ते आपल्या सर्वांच्या जवळचे असतील, ते राजकीय दृष्टया किती पॉवरफूल आहेत याची मला जाणीव आहे.परंतु या चर्चेच्या निमित्ताने उत्तराला न्याय देतांना त्यांचा किती उपयोग होईल यासंदर्भात माझ्या मनात गेल्या 25 वर्षाच्या राजकीय जीवनाच्या अनुभवातून शंका आहेत.

सभापती महोदय, कोकण हे निसर्गाला पडलेले एक सुंदर स्वप्न आहे. कोकणाचा कॅलिफोर्निया करणार अशा घोषणा राज्याच्या निर्मितीपासून झालेल्या आहेत. एका बाजूला सह्याद्रीच्या कोकण रांगा तर दुसऱ्या बाजूला अथांग अरबी समुद्र. निसर्गाने कोकणाला वरदान दिलेल्या भूमीत नारळ-पोफळीच्या, सुपारीच्या, काजूच्या बागांचे उपजीविकेचे साधन हे कोकणी माणसाचे राहिलेले आहे. स्वातंत्र्य पूर्व काळापासून आणि त्याच्या नंतरच्या कालावधीमध्ये सुध्दा कोकणी माणसाच्या उत्पादनाचे साधन म्हणून आंबा, काजू, फणस, नारळ,पोफळीवरच त्याचे जीवन अवलंबून राहिले आहे. राष्ट्राच्या आणि राज्याच्या उभारणीत कोकणाने खूप नवरत्ने दिलेली आहेत.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

देशाच्या स्वातंत्र्याची ज्योत सुध्दा कोकणातूनच पेटली गेली होती. त्याच बरोबर "खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे" ही विचारसरणी साने गुरुजींनी राष्ट्राला आणि उभ्या राज्याला दिली. सानेगुरुंजीचे जन्मस्थान हे कोकणातील दापोली तालुक्यातीलच आहे. अशा विचार धारेतून कोकण घडला असून कोकण प्रांत हा मुंबईच्या जवळ असल्यामुळे कोकणाचे एक वैशिष्टय राहिलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करीत असताना त्यांनी आरमाराला प्रमुख करुन सागरी किल्ले बांधले. आपल्या राज्याचे संवर्धन करावयाचे असेल, यवनांच्या तावडीतून आपला देश सुरक्षित ठेवावयाचा असेल तर आरमाराची कल्पना कान्होजी अंग्रेयांना नजरेसमोर ठेवून केली होती. कोकणाला ऐतिहासिक महत्व आहे. निसर्गाने दिलेल्या महत्वपूर्ण वरदानामुळे खूप मोठया प्रमाणात क्रय शक्ती निर्माण होण्याची शक्यता आहे. मुंबई हे त्या काळातील बंदर होते. नंतर मुंबई राज्याची आर्थिक राजधानी झाली. राज्याच्या चळवळीचे प्रमुख केंद्र मुंबई राहिलेले आहे. कापड उद्योगाचे केंद्र मुंबईत निर्माण झाले. कलकत्ता आणि अहमदाबादपेक्षा मुंबईमध्ये कापडधंदा मोठया प्रमाणात होता. मुंबईच्या उभारणीमध्ये कोकणी माणसाचे अनन्यसाधारण महत्व आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये सुध्दा कोकणी माणसाचे योगदान खूप मोठया प्रमाणात राहिलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये राहणारा कोकणातील माणूस हा मुंबईत आला आणि येथेच राहिला. कोकणी माणूस मुंबईमध्ये आज नाही तर चार पाच पिढयापूर्वी आलेला आहे. मुंबईपासून गोव्यापर्यंत जाणाऱ्या बोटीतून कोकणी माणूस अनेक वेळेला 40-40,50-50 तास सागरी मार्गातून प्रवास करीत आपापल्या गावी त्या कालावधीत जात होता. निसर्गाची वैशिष्ट एका बाजूला जपत आपल्या उपजीविकेचे साधन शोधण्याचा त्याने प्रयत्न केला. कोकणी माणूस मुंबईत आल्यानंतर तो गिरणी कामगार झाला, हॉटेलमध्ये काम करु लागला. कोकणी माणसाचे मुंबईच्या उभारणीमध्ये योगदान होत असताना तळकोकणापासून ते मध्य कोकण, ठाणे व रायगड पर्यंतच्या कोकणातील भूमीमधून खूप मोठया प्रमाणात साधन संपत्ती निर्माण करण्याची क्रयशक्ती राहिली आहे. आंबा, काजू, नारळ, सुपारी ही कोकणी माणसाची उत्पन्नाची साधने राहिली. महाराष्ट्रात पाच प्रादेशिक विभाग आहेत.

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

परंतु कोकण असा प्रादेशिक भूभाग आहे की, कोकणामध्ये प्रचंड प्रमाणात वरकस जमीन आहे, मोठया प्रमाणात पर्वत रांगा आहेत, एका बाजूला सह्याद्री पर्वत असल्यामुळे कोकणामध्ये सलग अशी जमीन नाही. कोकणामध्ये चार पाच एकर सलग जमीन असणे म्हणजे हे त्या माणसाच्या आयुष्यातील सर्वात मोठे भाग्य. अशी कोकणातील शेतकऱ्याची अवस्था आहे. कोकणातील शेतकरी हा भातशेतीवर जरी अवंलबून असला तरी भात शेतीतून त्याला मिळणारे उत्पादन हे त्याच्या उपजीविकेचे साधन म्हणून उपयुक्त ठरु शकले नाही. भातशेतीसाठी येणारा खर्च व भाताला मिळणारे दर याची सांगड कोकणातील शेतकऱ्याला कधीही घालता आली नाही. दुधासारखा पूरक व्यवसाय कोकणातील शेतकऱ्याला कधी भावला नाही. ऊस शेती करण्याच्या दृष्टिकोनातून कोकणी माणसाने प्रयत्न केले आणि त्याला त्यामध्ये यश लाभले अशी काही परिस्थिती नाही. त्यामुळे परंपरागत व्यवसाय म्हणजे आंबा, काजू, पोफळी, फणस या गोष्टीवरच कोकणी माणसाचे जीवन अवलंबून राहिले. कोकणाला निसर्गाने मोठया प्रमाणात वरदान दिलेले आहे. कोकणातील देवगडचा हापूस आंबा जगाच्या पाठीवर गेलेला आहे. जगात हापूस आंब्याचा गोडवा खूप मोठया प्रमाणात आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मग ती युरोपची असेल, अमेरिकेची असेल किंवा आफ्रिका खंडातील असेल या ठिकाणी देवगडच्या हापूस आंब्याला प्रचंड प्रमाणात मागणी आहे. एका बाजूला परकीय चलन उपलब्ध करण्याच्या दृष्टिकोनातून असलेली व्यवस्था, आपल्या कल्पकतेचा वापर करुन उत्पन्नाचे साधन वाढवण्यासाठी त्याने प्रयत्न केले. परंतु मुंबईच्याच भरवशावर अवलंबून राहिलेला माणूस म्हणून आतापर्यंत कोकणी माणसाची हेटाळणी केली गेली. या मानसिकतेतून कोकणी माणूस बाहेर आला पाहिजे ही विचारधारा निर्माण करण्याचा प्रयत्न आमच्या सरकारने केला होता. या चर्चेच्या निमित्ताने मी माननीय शरद पवार साहेबांचे आभार मानतो. हे आभार मी राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचा पक्षाध्यक्ष म्हणून नाही तर त्यांनी रोजगार हमी योजनेची सांगड फलोद्यान योजनेशी घातली त्यामुळे मानतो. आपल्या राज्यामध्ये 1972 सालात रोजगार हमी योजना आली. रोजगार हमी योजनेतून धरणे बांधली गेली, जायकवाडीचे धरण सुध्दा याच योजनेतून उभे करण्याचा प्रयत्न त्या कालावधीत झाला होता. अनेक कालव्यांची कामे रोजगार हमी योजनेतून केली गेली. छोट्या छोट्या बंधाऱ्यांची कामे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून निर्माण झाली.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

1992 ते 1995 या काळात माननीय शरद पवार साहेब मुख्यमंत्री असतांना त्यांनी रोजगार हमी योजनेची सांगड फलोद्यान योजनेशी घातली व कोकणी माणसाला न्याय देण्याच्या प्रक्रियेला एक चालना त्या कालावधीत मिळाली. रोजगार हमी योजनेची सांगड फलोद्यानाला दिल्यामुळे जवळपास 3 ते 3.5 लाख हेक्टर जमीन फलोद्यान फळबाग योजनेमध्ये 40 जिल्हयातील आली. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे तसेच इतर परिसरातील फलोद्यान फळबाग योजना यामध्ये आलेली आहे. एक तर कोकणी माणूस फारसा कोणावर अवलंबून राहिलेला नाही. कोकणी माणूस वडील, भाऊ यांच्यावर जरुर अवलंबून राहिला असेल परंतु कष्ट करुन आपल्या उपजीविकेचे साधन शोधण्यावरच भर दिलेला होता. परंतु अलीकडच्या काळात कोकणी माणसाने रोजगार हमी योजनेचा फायदा खूप मोठया प्रमाणात घेतलेला आहे. आपल्या राज्यात 4 कृषी विद्यापीठे आहेत. कोकणामध्ये कृषी विद्यापीठ व्हावे यासाठी स्व.बाळासाहेब सावंत यांनी खूप प्रयत्न केले होते. कोकणामध्ये मोठया प्रमाणात पाऊस पडतो त्यामुळे दुभत्या जनावरांना हिरव्या चाऱ्याचा खूप मोठया प्रमाणावर उपयोग होऊ शकेल यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले होते. आपल्या राज्यात दुधाचा महापूर योजना आली होती व योजनेचा फायदा कोकणाला होऊ शकतो की, काय यासंदर्भात स्व.बाळासाहेब सावंतानी प्रयत्न केले होते.

यानंतर श्री. अजित......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

दुर्दैवाने त्या प्रयत्नाला यश मिळू शकले नाही. त्या कालावधीमध्ये कृषी विद्यापीठ स्थापन झाले. त्या त्या विभागात हवामान कसे याचा अभ्यास त्या त्या विभागातीतल कृषी विद्यापीठे करतात. त्या भागातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये कशी भर पडेल त्या दृष्टीने कृषी विद्यापीठे संशोधन करीत असतात. कृषी विद्यापीठे नवनवीन प्रयोग व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्ये कशी भर घालेल अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती.

सभापती महोदय, कोकणात परंपरागत भडस आणि कोलम या दोन भाताच्या जाती लावल्या जात होत्या. त्यानंतर काही संशोधन झाले. भाताची काही नवीन बियाणे आली आणि त्यामध्ये फरक होत गेला. कोकणातील शेतकरी नाचणी आणि वरीसारखी पिके वरकस जमिनीमध्ये घेत होते. कोकणातील शेतकऱ्यांनी रोजगार हमी योजनेचा फायदा घेत उजाड आणि माळरानावर आंबा आणि काजूची लागवड करण्याच्या दृष्टीकोनातून खूप मोठ्या प्रमाणावर मानसिकता दाखविली.

सभापती महोदय, आज कोकणातील शेतकरी पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांप्रमाणे निर्यात करण्यासाठी खूप उत्सुकता दाखवीत आहे. नाशिक परिसरामध्ये शेती मालाचे खूप मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. शेतीवर प्रक्रिया करणारे चांगले शेतकरी त्या परिसरामध्ये आहेत म्हणून त्यांच्या उत्पादनामध्ये निर्यातीच्या माध्यमातून भर पडत आहे.

सभापती महोदय, कोकणातील मच्छिमार बांधव मत्स्य निर्यातीच्या माध्यमातून राज्य आणि केंद्र सरकारला 1 हजार कोटी रुपयांचे परकीय चलन मिळवून देतो. पण त्यालाही काही मर्यादा आहेत. अलीकडच्या काळात निसर्गाच्या झालेल्या अवकृपेमुळे माशांचा दुष्काळ अशातऱ्हेची एक परिभाषा कोकणामध्ये ऐकावयास मिळत आहे. त्यामुळे मच्छिमारांचे उत्पादन कमी होत गेले. निसर्गाचा समतोल मोठ्या प्रमाणावर बदलला गेल्यामुळे त्याचा परिणाम आंबा, काजू, नारळ, सुपारी या पिकांवर होत आहे. मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात कोकणातील हापूस आंबा मुंबईत येतो. परंतु आता नवनवीन प्रयोग होत असल्यामुळे आंबा बाजारात लवकर येतो. पण त्यादृष्टीने आवश्यक असलेली उपाययोजना करण्याच्या दृष्टीने मानसिकता दाखविली गेली नाही. कोकण कृषी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

विद्यापीठाने चांगले काम केले किंवा नाही यावर मी काही युक्तीवाद करणार नाही किंवा कोणतेही मत प्रदर्शित करणार नाही. कारण माझी बाबतीतील मते वेगळी आहेत. माननीय मंत्री श्री.विनोद तावडे त्या ठिकाणी भेट देतील तेव्हा त्यांना देखील तो अनुभव येईल. कोकण कृषी विद्यापीठाने कोणत्या प्रकारचे संशोधन करुन कोकणातील उत्पन्नामध्ये भर टाकण्यासाठी कोणते प्रयत्न केले ? आम्ही किती काळ सत्तेवर होतो असे प्रश्न उपस्थित करुन या प्रश्नांची उकल होणार नाही. काही वेळा काही गोष्टी जाणीवपूर्वक कराव्या लागतील.

सभापती महोदय, वाडवडिलांनी लावलेल्या आंबा व काजू पिकावर जगणारा कोकणातील शेतकरी अलीकडच्या काळात पुन्हा एकदा स्वयंपूर्णतेकडे जाण्याचे चित्र उभे राहिले. कालच एक प्रश्न चर्चेला आला होता. त्यावेळी सभागृहात माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे व श्री.विनोद तावडे उपस्थित होते. आता या ठिकाणी माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे उपस्थित नाहीत अन्यथा त्यांच्या संवदेना कुठे गेल्या असा मी त्यांना प्रश्न विचारला असता. काजूची 420 झाडे वणव्यामध्ये नष्ट झाली. त्या झाडांचे मूल्यांकन 4 लाख 20 हजार दाखविण्यात आले. म्हणजे एका झाडाचे मूल्यांकन एक हजार रुपये दाखविण्यात आले. काजूचे झाड लावण्यासाठी आणि जगविण्यासाठी किती खर्च येतो ? 40-50 वर्षाचे काजूचे झाड क्षणभरात वणव्यामध्ये उद्ध्वस्त होते त्या काजू झाडाचे मूल्यांकन शासकीय यंत्रणा एक हजार रुपये दाखविणार असेल तर ते कितपत योग्य आहे ? आयुष्यभर काबाडकष्ट करुन उभे केलेली बागायतीचे मूल्यांकन मेहरबानी म्हणून एक हजार रुपये दाखविण्यात येत असेल तर त्याचा देखील विचार करण्याची वेळ आलेली आहे. आज या सर्व गोष्टींवर विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपण शिरुर परिसरातील आहात. परंतु आपले जीवन ठाणे येथे गेले आहे म्हणजे कोकणामध्ये गेले आहे. वसई, विरार, डहाणूपासून ते सावंतवाडीपर्यंत पसरलेल्या चिंचोळया किनारपट्टीमधील माणसांचे जीवनमान कसे आहे याची आपणास निश्चितपणे माहिती आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

सभापती महोदय, कोकणातील देवगड येथील आंबा जगाच्या बाजारपेठेत आणण्याचा प्रयत्न सुरु झाला आणि त्यास यश देखील मिळाले. परंतु अलीकडच्या ग्लोबल वॉर्मिगंच्या परिणामामुळे ग्राहक चोखंदळ झाला. परकीय बाजारपेठा अधिक प्रमाणात चोखंदळ झाल्या आहेत. आपल्या देशाबद्दल असूया असणारे काही देश आपल्या देशातून चांगल्या प्रकारची फळफळावर निर्यात कशी कमी होईल यावरसुद्धा आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये भूमिका घेतली जाते की काय अशाप्रकारची भीती निर्माण होते. आज देवगडचा हापूस आंबा जगप्रसिद्ध आहे. परंतु त्या आंब्यावर प्रक्रिया केल्याशिवाय तो आम्ही घेणार नाही असे आयात करणाऱ्या देशांचे म्हणणे आहे. आंबा उत्पादनामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने कोकणातील शेतकऱ्यांनी काही प्रयत्न केले, ते चूक की बरोबर याचे उत्तर संशोधनाच्या माध्यमातून मिळेल. पण त्यावर कोणत्या ना कोणत्या मार्गाने हरकती घेण्यात आल्या. याचा परिणाम आंबा उत्पादक शेतकऱ्यांवर झाला. आंबा पिकावर साठा नावाचा रोग येतो. या रोगाच्या संदर्भात कोकण कृषी विद्यापीठाने कोणते संशोधन केले ? मी इतक्या गंभीर विषयावर बोलत असताना सन्माननीय सदस्य चर्चा करीत आहेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे हे महत्वाच्या विषयावर बोलत आहेत..

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे आंब्याच्या निर्यातीसंबंधी बोलत आहेत,त्यामध्ये अशी एक जोड दिली पाहिजे की, आंबा ठराविक वेळेपर्यंत उकळला पाहिजे, त्यानंतर तो आयात करण्यात येईल असे युरोपीयन देशांनी सांगितले आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी नियम 97 च्या सूचनेमध्ये हे सर्व विषय दिलेले आहेत. आपण ती सूचना कदाचित वाचली नसेल असे मला वाटते. मला या विषयाची पार्श्वभूमी सांगणे आवश्यक आहे. सरकारने या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. आज कोकणामध्ये गारपीट होऊन आंबा, सुपारी, काजू पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. यापूर्वी कोकणात कधी गारपीट झाली नाही. कोकणामध्ये जेवढा मोसमी पाऊस होतो तेवढा पाऊस

..4.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

राज्यातील उर्वरित भागात होत नाही. विदर्भापेक्षा जास्त मोसमी पाऊस कोकणात होतो. बिगर मोसमी पावसाने कोकणातील बागायती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केलेले आहे. अवकाळी पावसामुळे आंब्यांचा मोहर गळून पडला आहे. आता आंबा निर्यात करताना नवीन प्रकारचे बंधन घालण्यात आले आहे. Hotwater treatment is made compulsory for the export of mangoes. 48 डिग्री तापमानामध्ये 10 मिनिटे आंबा बुडवून ठेवायचा. 48 डिग्री तापमान म्हणजे जवळपास उकळलेले पाणीच आहे. अशा उकळत्या पाण्यात दहा मिनिटे आंबा ठेवला तर त्याची काय स्थिती होईल ? या उकळत्या पाण्यात आंबा सुरक्षित राहिला तर तो आंबा निर्यात करु शकतो अशाप्रकारचे बंधन आयात करणाऱ्या देशांनी घातले आहे. या संदर्भात कोकण कृषी विद्यापीठाने नेमके कोणते संशोधन केले आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. एका बाजूला निर्यात करणारे आंबा बागायतदार आहेत जे या नवीन संशोधनाचा उपयोग करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु त्यासाठी आवश्यक असणारे सहकार्य राज्य सरकारकडून मिळत नाही.

सभापती महोदय, आंब्यावर प्रक्रिया करण्यासाठी तो लासगावला पाठविण्यात येतो. सिंधदुर्गातील आंबा लासलगावला पाठवून तो निर्यातीसाठी पात्र आहे किंवा कसे या हे पाहण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केला तर आंबा तेर्थपर्यंत जाईपर्यंत त्या आंब्याची काय स्थिती होईल आणि पुन्हा तो सिंधुदुर्गमध्ये आणून तेथून तो परकीय देशात पाठवणार या काळात आंब्यावर काय परिणाम होईल याचा साकल्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

सभापती महोदय, नवी मुंबईच्या परिसरात प्रक्रिया केंद्र सुरु केले आहे. परंतु त्याची क्षमता अतिशय नगन्य आहे. त्या ठिकाणी दिवसाला केवळ 1500 किलोग्रॅम आंब्यावर प्रक्रिया केली जाते. एका बाजूला आंब्याची निर्यात टनामध्ये करणार असू तर दुसऱ्या बाजूला त्याच तुलनेत प्रक्रिया केंद्र उभारणे गरजेचे आहे. आंब्यावर प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने किंवा त्याची गुणवत्ता तपासण्याच्या दृष्टीने सुरु करण्यात आलेल्या प्रक्रिया केंद्राची इतक्या कमी प्रमाणात क्षमता असेल तर ते योग्य नाही. वास्तविक पाहता आंबा हे हंगामी पीक आहे. आंबा विशिष्ट कालावधीत उपलब्ध होत असतो. परंतु आज आंबा उत्पादक शेतकरी हा पूर्णतः धोक्यात आला आहे. या शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये काजूचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. पूर्वी बेदाण्यावर कर लावला होता. आता वित्त राज्यमंत्री म्हणून कोकणातील माननीय श्री.दीपक केसरकर आलेले आहेत. मी अर्थमंत्री असताना त्यांनी आणि माझ्या सहकाऱ्यांनी मला सांगितले होते की, काजूवरील कर कमी करावा. महोदय, हे खरे आहे की, काजू उत्पादनात सिंधुदुर्ग जिल्ह्याचा मोठा सहभाग आहे. त्यानंतर रत्नागिरी जिल्ह्याचा नंबर लागतो. ठाणे व रायगड जिल्ह्यात सुध्दा कमी-अधिक प्रमाणात काजूचे उत्पादन होते. काजूच्या बोंडापासून वाईन तयार करण्याच्या प्रकल्पांना भाग भांडवल पुरविले पाहिजे. शिवाय सहकार क्षेत्राच्या माध्यमातून छोटेमोठे उद्योग उभे करु शकतो. करवंदापासून आणि द्राक्षापासून सुध्दा वाईन तयार करु शकतो. नाशिकमध्ये द्राक्षापासून वाईन निर्माण करण्याचा प्रकल्प सुरु केल्यामुळे त्या भागात द्राक्षाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेण्यास सुरुवात झाली. महोदय, मी निदर्शनास आणून देतो की, या पिकांवर शेतकऱ्यांना वारंवार लक्ष ठेवूनच काम करावे लागते. कोकणात 200-250 इंच पाऊस पडतो. एका बाजूला आंबा पिकाची निगराणी ठेवणे, ते वाढविणे या गोष्टी करीत असतानाच दुसऱ्या बाजूला नैसर्गिक संकट येत असल्यामुळे आंबा आणि काजू उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले तर परकीय चलन मिळू शकेल.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

महोदय, आंब्याचा गोडवा आपल्या सर्वांना माहीत आहे. त्यातल्या त्यात देवगड आंब्याची चव वेगळीच आहे. आता नवीन संशोधन केल्यानंतर केसर, सिंधु आणि रत्ना अशा नावांचे आंबे आलेले आहेत. पण देवगड आंब्याची जेवढी चव आहे तेवढी चव इतर आंब्यांना येऊ शकत नाही.

सभापती महोदय, आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने राज्य सरकारने पावले उचलणे अत्यंत आवश्यक आहे. मी तर म्हणेन की, अजूनही वेळ गेलेली नाही. आपल्याकडे अजून दीड महिना आहे. असे असले तरी या कालावधीत कधीही पाऊस येऊ शकतो. 6 जूनला पाऊस पडतो अशी परिस्थिती आता राहिलेली नाही. काही वेळा मे महिन्यात पाऊस पडतो आणि जून महिन्याऐवजी जुलै महिन्यामध्ये पावसाला सुरुवात होते. अशा प्रकारे नैसर्गिक संकटे कधीही येऊ शकतात. त्यामुळे या पिकांवर प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माननीय कृषी राज्यमंत्री प्रा.राम शिंदे या ठिकाणी आहेत. त्यांनी काढणी पश्चात तंत्रज्ञानाची माहिती घेतली की नाही, मला माहीत नाही. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, आपल्या देशात पूर्वी काढणी पश्चात तंत्रज्ञानाचे शिक्षण देण्याची व्यवस्था नव्हती. या देशातील 60 हजार कोटी रुपयांचे अन्नधान्य वाया जाते. इस्त्रायल देशामध्ये मराठवाड्यापेक्षा कमी पाऊस पडतो. दुष्काळी तालुक्यांपेक्षा कमी पाऊस तेथे पडतो. मी अर्थमंत्री असताना इस्त्रायलच्या तंत्रज्ञांना बोलविले होते. त्यांच्याकडून सविस्तर माहिती घेतल्यानंतर कोकण कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून रोहा तालुक्यातील किल्ला परिसरात काढणी पश्चात तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण देणारे पहिले केंद्र सुरु केले. विद्यार्थी त्या तंत्रज्ञानाची पदवी/पदविका घेऊन बाहेर पडला तर त्याला वर्षाला 12 लाख रुपयांचे पॅकेज मिळते. त्यामुळे काढणी पश्चात तंत्रज्ञानाकडे अधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. या निमित्ताने मी मागणी करतो की, कोकण कृषी विद्यापीठांतर्गत चालविण्यात येणाऱ्या काढणी पश्चात तंत्रज्ञानाच्या कोर्ससाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा. अशा कोर्सेसना चालना दिल्यास तेथून नवी पिढी शिकून बाहेर पडेल आणि त्यांचा उपयोग राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांना होईल. हे पीक वर्षाचे 12 महिने टिकविले तर त्याचा फायदा मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. परंतु आज असे होते की, पीक हातात आल्यानंतर ते लगेच विकल्याशिवाय शेतकऱ्यांसमोर पर्याय नसतो. काही काळापर्यंत त्या मालाची साठवण

..3..

श्री.सुनील तटकरे....

आणि निगराणी केली तर त्या मालाला नंतरच्या कालावधीत जास्त किंमत मिळू शकते. शिवाय काही पिके विशिष्ट हंगामात येतात. पण तेच पीक बिगर हंगामात उपलब्ध झाले तर त्याच्या किंमतीमध्ये वाढ होऊ शकते. त्यामुळे या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे.

महोदय, आंब्याची निर्यात करण्याच्या दृष्टीने जी बंधने लादली आहेत ती योग्य नाहीत. युरोप, अमेरिका, आफ्रीका खंडात किंवा दुबईसारख्या परिसरात निर्यातीच्या बाबतीत वेगवेगळी बंधने आहेत. त्यामुळे या विळख्यात अडकलेल्या आंबा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने ठोस स्वरुपाची पावले उचलणे गरजेचे आहे. आज पावले उचलल्यानंतर त्याचा फायदा लगेच होईल असे नाही. पण पुढील वर्षात त्याचा फायदा होऊ शकेल.

माननीय श्री.विनोदजी तावडे, गेल्या कित्येक वर्षांपासून आपण कोकण महोत्सव भरवितो. आपण सुध्दा त्या महोत्सवाला गेला आणि मी सुध्दा गेलो होतो. तत्कालीन उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी अशा प्रकारचे महोत्सव आयोजित करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला होता. शिवाय आता आपण रायगड महोत्सव सुध्दा भरवित आहात. अशा वेगवेगळ्या माध्यमातून कोकणातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनियोग राष्ट्राच्या संपत्तीत भर टाकण्यासाठी केला पाहिजे. कारण कोकणात मोठ्या प्रमाणावर पोटँशियल उपलब्ध आहे. आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखणे गरजेचे आहे. त्यामुळे या बाबतीत संशोधन करणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टी करीत असतानाच कोकणातील शेतकऱ्यांच्या मनामध्ये असलेल्या शंकांचे निरसन करणे सुध्दा गरजेचे आहे. कारण कोकणी माणूस हा फार शंकेखोर असतो. त्यांच्या शंकांचे निरसन झाल्याशिवाय तो नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करणार नाही. आपण केलेले संशोधन खरोखर योग्य आहे की नाही, याची खात्री झाल्याशिवाय तो नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणार नाही. पीक आले नाही तरी चालेल, पण मनाची शांती जोपर्यंत होत नाही तोपर्यंत कोकणी माणूस नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करणार नाही. त्यामुळे यातून मार्ग काढण्यासाठी राज्य सरकारला सामाजिक चळवळ उभी करावी लागेल. असे केले तरच उत्पादनात भर पडेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महोदय, निसर्गाने दिलेल्या सर्व गोष्टींवर आम्ही आघात करणार आहोत का, हा प्रश्न सुध्दा यातून निर्माण होणार आहे. आपण वारंवार सांगतो की, कोकणचा कॅलिफोर्नीया करणार.

..4..



श्री.सुनील तटकरे....

परंतु आपण राजकीय इच्छाशक्तीच्या बळावर कोकणचा विकास केला पाहिजे. त्यानंतर कॅलिफोर्नीयालाच वाटले पाहिजे की, आपला कोकण झाला पाहिजे. अशा भावनेतून विचार केला तर कोकणची साधनसंपत्ती वाढविण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न होऊ शकतो. सभागृहामध्ये डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालावर चर्चा सुरु आहे. त्या चर्चेवर मी आता काही बोलणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित व इतर त्यावर बोलतील. परंतु योग्य वेळी मी या विषयावर बोलणार आहे. महोदय, मी ज्या गोष्टी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत त्यावर राज्य सरकारला लक्ष केंद्रित करावे लागेल. कारण या बाबी केल्या तरच राज्याला परकीय चलन मिळू शकेल. तसेच फळबाग उत्पादकांना न्याय मिळेल.

माननीय श्री.दीपक केसरकरजी, कोकणचा माणूस मुंबईच्या मनी ऑर्डरवर अवलंबून राहिला असे हेटाळवाणीने आपल्याला उद्देशून बोलले गेले. परंतु एक दिवस असा निर्माण करुन करु की, मुंबईमध्ये राहणारा कोकणातील माणूस गावाकडून येणाऱ्या मनी ऑर्डवर अवलंबून राहील. आपण प्रबळ राजकीय इच्छाशक्ती दाखविली तर कोकणात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करता येईल.

महोदय, गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आम्ही नुकसान झालेल्या आंबा उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी 10 हजार रुपयांची मदत केली होती. नुकसान झालेल्या एका एका झाडासाठी सुध्दा मदत केली पाहिजे. कोकणात लॅण्ड होल्डींग जास्त नाही. 10-20 एकर शेती असलेला शेतकरी सर्वात मोठा आहे. कोकणातील शेतकऱ्यांकडे दोन-अडीच, पाच एकर इतकीच जमीन आहे. शिवाय ती वरकस आणि खाजण जमीन असते. अशा वेळी कोकणातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने आधार देण्याची आवश्यकता आहे. आंबा उत्पादक शेतकऱ्यांवर आज संकट आलेले आहे. त्यांचा आंबा खरेदी करुन त्यावर प्रक्रिया करणे गरजेचे आहे. ही निर्यात जास्त कशी होऊ शकेल, आंबा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय कसा मिळू शकेल या दृष्टिकोनातून राज्य सरकारने धोरण आखावे अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, मध्यंतरी राज्यात आणि कोकणात अवकाळी पाऊस झाला. कोकणात एका झाडाला मिळणारी मदत 5-50-100 रुपयांच्या पलीकडे नाही. वास्तविक पाहता कोकणातील

..5..



श्री.सुनील तटकरे....

आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे चार वर्षाच्या पिकांचे नुकसान झाले. वणव्यामध्ये 40-50 वर्षांच्या बागा जळून खाक झाल्या. अशावेळी त्या शेतकऱ्यांना झाडामागे केवळ 100 रुपयांची मदत केली तर त्याला त्याचे जीवन पुन्हा उभे करण्याच्या दृष्टीने उपयुक्त होऊ शकत नाही.

महोदय, हवामानावर आधारित असलेल्या फळबागांसाठी योजना करणे आवश्यक आहे. माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे या ठिकाणी नाहीत. त्यांना आता संवेदना आली आहे. केळी पिकाचे उत्पादन कमी झाले तर ते संवेदना व्यक्त करतात. कारण केळी हे पीक प्रामुख्याने जळगांव जिल्ह्यात येते. मला वाटते त्यांनी अशाच प्रकारची भावना सर्व पिकांच्या बाबतीत संवेदना दाखविणे आवश्यक आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

सर्व पिकांच्या संदर्भात उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. कोकण कृषी विद्यापीठाने याबाबतीत अधिक संशोधन करणे गरजेचे आहे. काढणी पश्चात तंत्रज्ञानाचे विद्यालय सुरू केले आहे. परंतु ते परिपूर्ण कसे होईल, त्याला लागणारे नियतव्यय कसा उपलब्ध करता येईल याची व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक आहे. आंबा निर्यात करण्याच्या संदर्भात जागतिक बाजारपेठेने बंधने आणली आहेत. आंबा त्यातून सुखकरपणे चवीसहित परदेशात कसा जाऊ शकेल या संदर्भात शासनाने कालबध्द कार्यक्रम करावा आणि तत्संदर्भातील उपाययोजना जाहीर करावी. सदर बाबतीत 3 क्लिष्ट पध्दतीच्या उपाययोजना कराव्या लागतात. त्यामुळे आंबा पीक नकोसे वाटते. भीक नको पत्र कुत्रे आवर अशी स्थिती आज आंबा उत्पादक शेतकऱ्यांची झाली आहे. शासनाने या संदर्भात ठाम उपायोजना केली पाहिजे. आंबा, काजू उत्पादक शेतकऱ्यांना यावर्षी व भविष्यात कशी मदत देण्यात येणार आहे या संदर्भातील भूमिका शासनाने स्पष्ट करावी अशी मी विनंती करतो. आपण नोंद घेतली असेल अशी अपेक्षा आहे. उत्तरात त्याचा उल्लेख होईल असे वाटते. माननीय मंत्र्यांनी वजन वापरले तर माननीय मुख्यमंत्री उत्तराला येतील आणि कोकणाला न्याय मिळेल. माननीय मंत्री श्री. विनोद तावडे साहेबांनी उत्तर दिले तरी आमची काही हरकत नाही. परंतु न्यायाचे उत्तर द्यावे. परंतु ते बोलतील ते माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांना मान्य होईल असे त्यांना बोलावे लागेल. परंतु बोलल्यानंतर मान्य केले नाही तर पुन्हा कोकणावर अन्याय होईल, असा अन्याय होऊ नये. सदर बाबतीत गांभीर्यने विचार व्हावा.

सभापती महोदय, नियम 97 अन्वये कोकणातील महत्त्वाच्या विषयाच्या संदर्भात मला माझ्या भावना व्यक्त करता आल्या त्याबद्दल मी आपले आभार मानतो. सदर बाबतीत शासनाकडून ठाम उपाययोजना होतील अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझे विचार थांबवितो. धन्यवाद ! जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वयेच्या अल्पकालीन चर्चेवर माझे मत मांडण्यासाठी उभी आहे. अवकाळी पाऊस, गारपीट वगैरेसंबंधी चर्चा करताना राज्यातील इतर भागांकडे लक्ष देण्यात येते, विचार करण्यात येतो तसे लक्ष, विचार कोकणाबद्दलही करण्यात यावा. कोकणातील अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे झालेल्या नुकसानीचा विचार करण्यात आलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे साहेबांनी केलेल्या विवेचनाला अनुसरून मी पुढील काही गोष्टींकडे आपले लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, आंबा, काजू ही कोकणातील दोन पिके अशी आहेत की, ज्यामुळे परकीय चलन फार मोठ्या प्रमाणात मिळते. परंतु या दोन्ही फळांकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हेळसांड होत आहे. मागच्या शासनाने आंबा-काजू बोर्ड गठीत केले होते. बोर्डाच्या निर्मितीनंतर सदस्य निवडण्यात आले. दापोली येथे माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी बोर्डाची घोषणा केली आणि त्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केल्याचे जाहीर केले. परंतु बोर्डासंबंधी पुढे काहीही झाले नाही. आताच्या शासनानेही अर्थसंकल्पात यासंबंधी तरतूद केल्याचे आढळून आलेले नाही. आंबा, काजू या दोनच फळांसाठी आंबा-काजू बोर्ड गठीत झाले. परंतु ते केव्हा कार्यान्वित होणार आहे, शासनाने त्यासाठी तरतूद का ठेवली नाही, याकडे दुर्लक्ष का करण्यात येत आहे हा प्रश्न कोकणातील जनतेला पडला आहे. त्यामुळे आंबा-काजू बोर्ड तातडीने कार्यान्वित करावे. आम्ही मागणी केली होती की, त्याचे केंद्र रत्नागिरी येथे व्हावे. रत्नागिरी येथे केंद्र व्हावे अशी आमची पुन्हा शासनाकडे विनंती आहे. शासनाने याचा पुन्हा विचार करावा आणि 100 कोटी रुपयांची तरतूद करून आंबा-काजू बोर्ड कार्यान्वित करावे म्हणजे त्या संबंधी जे प्रश्न येत आहेत ते आंबा-काजू बोर्डामार्फत मार्गी लागतील.

सभापती महोदय, मघाशी आंब्याच्या नुकसानीसंबंधी चर्चा केली. मागच्या वेळी आंब्याला हेक्टरी 25 हजार रुपये नुकसानभरपाई जाहीर करण्याचे सांगितले. परंतु जी नुकसानभरपाई जाहीर करण्यात आली त्यात काजुचा कुठेही उल्लेख नाही. शासन काजूसाठी काय करीत आहे ? काजू फळाचे खूप नुकसान झाले आहे. आता तर त्यावर थ्रीट सारखा रोग आला आहे. कोकण कृषी विद्यापीठ त्यावर काय संशोधन करीत आहे हे समजत नाही. कारण रोग आधी येतो आणि



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती हुस्नबानू खलिफे ....

संशोधन नंतर होते, औषधे त्या नंतर बाहेर पडतात आणि तोपर्यंत पीक जाते आणि झाडांचेही नुकसान होते. रोग येताना किंवा आल्यावर किती वेगाने संशोधन झाले पाहिजे, किती लवकर शेतकऱ्यांना त्या संदर्भातील मार्गदर्शन झाले पाहिजे या संदर्भात फास्ट मूव्हमेंट सुरू केली पाहिजे. शासनाकडून त्याबाबत कोकण कृषी विद्यापीठाला सूचना द्यावा लागतील. मी या संदर्भात वारंवार मागणी करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे साहेबांनाही विनंती केली होती. आता सभागृहात माननीय पणन मंत्री उपस्थित आहेत. रत्नागिरी जिल्हा फलोत्पादन करणारा जिल्हा आहे. इकडे फळे होतात. मात्र आंब्याचे रिसर्च सेंटर नागपूरला आहे. मी मागे या संदर्भात मागणी केली होती. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब म्हणाले होते की, शासन त्याचे उप केंद्र रत्नागिरी येथे सुरू करीत आहे, या महिन्यात घोषणा केली जाणार आहे. मला असे सांगायचे आहे की, आपण उप केंद्र सुरू करीत असाल तर ते दापोली येथे न करता रत्नागिरी येथे करावे. जेणेकरून सिंधुदुर्गातील, रत्नागिरीतील फळबागायतदार तेथे येऊ शकेल. दापोली फार दूर होते. दापोलीला सिंधुदुर्गातील माणूस जाणे शक्य नाही. मी राजापूर येथून निघाले तरी मला अडीचशे कि.मी. जावे लागते. शासन ते केंद्र नागपूरहून हलवून रत्नागिरीला आणणार नाही याची खात्री आहे, ते नागपूरहून हलवू शकत नाही. मग आंब्याच्या रिसर्च सेंटरचे उप केंद्र तरी रत्नागिरी येथे सुरू करण्यात यावे.

सभापती महोदय, मच्छिमारीचाही प्रश्न आहे. सदर विषय यामध्ये नाही. परंतु कोकणी माणूस म्हटल्यावर मच्छिमारी आली. कोकणाला 720 कि.मी.चा किनारा लाभला आहे. मात्र मत्स्य विद्यापीठ नागपूरला आहे. ते तरी आम्हाला रत्नागिरी येथे आणून द्यावे. माशांपासुन परकीय चलन मिळते. त्यामुळे त्या संदर्भात रत्नागिरी येथे संशोधन होणे गरजेचे आहे. (अडथळा) आम्हाला नवीन विद्यापीठ दिले तरी चालेल. एका राज्यात दोन मत्स्य विद्यापीठ होत असतील तर सांगावे. आम्ही आज या संदर्भात मागणी करतो. आम्हाला ते विद्यापीठ हवे आहे. आम्ही मासे खाणारे आहोत. तुम्ही मासे खात नाहीत. तुम्हाला कशाला मत्स्य विद्यापीठ हवे आहे ? मासे न खाणारे असे करू

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती हुस्नबानू खलिफे ....

लागले तर कसे चालेल ? कोकणी माणसांवर अन्याय सुरू झाला आहे. फळे आमच्याकडे होतात, मासे आमच्याकडे आहेत, आमचा जिल्हा म्हणून घोषित करता आणि सर्व विद्यापीठे, रिसर्च सेंटर्स नागपूरला ठेवता हे योग्य नाही. आमच्यावर हा अन्याय आहे.

सभापती महोदय, आंबा परदेशी पाठविण्याचा विषय आहे. मागच्या वर्षी फार मोठा प्रसंग कोकणातील आंबा बागायतदारांवर आला. आंबा उत्पादनापैकी 5 टक्केही आंबा परदेशी जात नाही. मागच्या वर्षी युरोप बाजारपेठेने आंबा नाकारला अशी मोठी बातमी वर्तमानपत्रात आली, टीव्हीवर देखील दाखविण्यात आले. त्यामुळे आंब्याचे भाव एवढे गडगडले की ते जवळजवळ 40-50 टक्के खाली आले. दलालांची लिंक तयार होत आहे. त्यामुळे त्यांनी त्याचा फायदा करून घेतला. युरोपने आंबा का नाकारला याची कारणे आली नाहीत. युरोपमध्ये आंबा फक्त 5 टक्के जातो. 95 टक्के आंब्याचे भाव गडगडले याचा विचार पणन विभागाने केला नाही. मग आम्हाला पणनची कार्यालये काय उपयोगाची आहेत, ती कशासाठी आहेत ? फळ दलालावर अवलंबून आहे आणि त्यामुळे कोकणी माणसाला जास्त त्रास होत आहे. अवकाळी पावसाच्या संदर्भात राज्यातील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचे सांगितले. परंतु आमच्या भात शेतीला नुकसानभरपाई दिली नाही. आम्ही वारंवार मागणी करीत आहोत की, आणेवारी पध्दतीत बदल करावा. आणेवारीमध्ये माझा कोकण बसत नाही. कोकणात सर्व ठिकाणी हिरवेगार आहे. निसर्गानेच आम्हाला हिरवे करून ठेवले आहे. त्यामुळे तुमच्या भागासारखा सुखा रखरखाट कोकणात दिसत नाही. आम्ही आणेवारीत पुढे जातो. त्यामुळे आम्हाला नुकसानभरपाई मिळत नाही. आणेवारीची पध्दत बदलून कोकणातील शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे. दुष्काळाच्या संदर्भात शेतकऱ्यांना मदत जाहीर केली.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे........

कोकणी माणूस सावकारांकडून कर्ज काढत नाही. त्याच्या घरात जे पिकते, मग ते भात असेल किंवा अन्य काहीही असेल, ते खाऊन तो आपले दिवस काढतो. दर्यावर छोट्या होडीतून जातो, दर्याशी भांडतो आणि दर्याच्या पोटातील थोडी संपत्ती मिळविण्याचा प्रयत्न करतो. वेळप्रसंगी भाताची पेज पिऊन तो वेळ भागवून नेतो पण सावकाराकडून कर्ज काढत नाही. कोकणी माणूस मुलाच्या लग्नात हुंडा घेत नाही आणि मुलीच्या लग्नात हुंडा देत नाही. त्यासाठी देखील त्याला सावकाराच्या दाराशी जावे लागत नाही. कर्ज काढायचेच असेल तर तो बँकांकडून कर्ज काढतो. शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेली कर्जे फेडण्याचा निर्णय या शासनाने घेतला आहे. कोकणी माणसाने सावकाराकडे न जाऊन चूक केली आहे का, बँकांकडून कर्ज घेऊन चूक केली आहे का ? त्यामुळे माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, कोकणातील शेतकऱ्यांनी बँकांकडून काढलेली कर्जे शासनाने माफ केली पाहिजेत.

सभापती महोदय, शासनाने आंब्याच्या झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याची घोषणा केली आहे. मागील वर्षी कोकणाला मिळालेला 50 टक्के निधी परत शासनाकडे आला आहे. यामुळे मला असे विचारावयाचे आहे की, जाहीर केलेली हेक्टरी 50 हजार रुपयांची मदत केव्हापासून देण्यात येणार आहे, हे देखील शासनाने जाहीर करावे. शासनाचा निधी येण्यास जून किंवा जुलै महिना उजाडतो, योग्य पध्दतीने पंचनामे होत नाहीत, सर्वेक्षण होत नाही व त्यामुळे निधी परत पाठवावा लागतो. माझी अशी मागणी आहे की, हा निधी तातडीने शासनाने वितरित करावा. आज आंबा आणि काजू बागायतदार शेतकरी पूर्णपणे कोलमडलेला आहे. आंब्याचेही पीक गेले आहे आणि काजूचेही पीक गेले आहे. त्यामुळे फार मोठी समस्या शेतकऱ्यांसमोर निर्माण झाली आहे. अशी अवस्था झाली असली तरी कोकणी माणूस आंदोलनासाठी बाहेर पडत नाही, तक्रार करीत नाही. त्यामुळे शासनाचे त्यांच्याकडे लक्ष नाही. म्हणून माझी शासनाला अशी विनंती आहे की, शासनाने तातडीने कोकणी माणसाला मदत केली पाहिजे.

सभापती महोदय, कोकणातील फळे परदेशी पाठविण्यासाठी उच्च दर्जाचे तंत्रज्ञान बागायतदारांना कोकणातच उपलब्ध करुन दिले पाहिजे. कोकणातील आंबा परदेशी पाठवायचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असेल तर प्रथम तो लासलगाव येथे पाठवावा लागतो. कोकणातून लासलगावला आंबा पाठविणे

...2....



ॲड.हुस्नबानू खलिफे........

अत्यंत जिकिरीचे आहे. आंबा लासलगावला कधी पाठवायचा, त्यावर प्रक्रिया कधी व्हायची, तो परत कोकणात कधी यायचा आणि नंतर तो परदेशात कधी पाठवायचा, असा प्रश्न आंबा बागायतदारांपुढे निर्माण झाला आहे. आंबा आणि काजू बागायतदारांना निर्यातीच्या माध्यमातून परदेशी चलन मिळण्याची संधी असताना केवळ शासकीय अनास्थेमुळे आणि दिरंगाईमुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. आंबा बागायतदारांना आंबा इकडे पाठवा, तिकडे पाठवा, असे सांगितले जाते व त्यांना केवळ हेलपाटे मारावे लागतात. त्यामुळे आंबा बागायतदार आज हतबल झाला आहे. यामधून शासनाने लवकरात लवकर मार्ग काढावा, योग्य आणि चांगल्या उपाययोजना कराव्यात, अशा प्रकारची विनंती करते आणि थांबते.

-----------

...3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय गटनेते श्री.सुनील तटकरे व अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 97 अन्वये कोकणातील शेती संदर्भात उपस्थित केलेल्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे, अनेक वर्षानंतर सभागृहात एवढ्या सविस्तरपणे कोकणातील प्रश्नांची चर्चा होत आहे. त्यामुळे आवश्यकता वाटली तर या चर्चेला आपण वेळ वाढवून द्यावा, अशा प्रकारची विनंती मी सुरुवातीलाच आपल्याला करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांना माझा पाठिंबा आहे. कोकणातील सर्व लोकप्रतिनिधी एकत्र आले तर कोकणचा जलद गतीने विकास होऊ शकेल, असे माझे मत आहे. काल केळकर समितीच्या अहवालावर सभागृहात चर्चा झाली. त्यावेळी आपण पाहिले असेल की, पक्षभेद विसरुन विदर्भातील सर्व सन्माननीय सदस्य एकत्र आले आणि त्यांनी विदर्भहिताचे विषय सभागृहात उपस्थित केले. त्याप्रमाणेच आजच्या चर्चेच्या निमित्ताने कोकणातील सर्व सन्माननीय सदस्यांनी एक विचाराने, पक्षभेद विसरुन कोकणहिताचे विषय सभागृहात उपस्थित केले पाहिजेत, असे माझे विनम्र मत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सन 1983 पूर्वीची कोकणातील परिस्थिती आपल्यासमोर मांडली. सन 1983 पूर्वी कोकणी माणूस मुख्यत्त्वेकरुन गिरणी कामगार म्हणून मुंबईत चाकरी करीत होता. कोकणातील अनेक लोक गिरण्यांमध्ये जॉबर किंवा अन्य पदावर काम करीत होते. परंतु, गिरणी कामगारांचा संप झाला आणि कोकणातील हा गिरणी कामगार देशोधडीला लागला. गिरणी कामगारांबरोबरच मुंबईतील घरेलू कामगारांमध्ये कोकणातील लोकांची मोठी संख्या होती. दापोली, मंडणगड येथील अनेक तरूण त्या काळी घरेलू कामगार म्हणून मुंबईत नोकरीला होते.

सभापती महोदय, कोकणातील माणूस तसा अल्पसंतुष्ट. एका पुस्तकात मी तत्कालीन मुख्यमंत्री कै.वसंतदादा पाटील यांचा एक अनुभव वाचला होता. ते असे म्हणायचे की, "पश्चिम महाराष्ट्रातील एखादा व्यक्ती भेटायला आला की, मला भीती वाटायची. कारण, तो साखर कारखाना, दूध संघ किंवा सूत गिरणी मागायचा. कोकणातील माणूस मात्र एवढीच मागणी

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर.........

करायचा की, हा माझा मुलगा आहे, याला कुठे तरी चिकटवा. थोडा शिकलेला असेल तर क्लर्क म्हणून आणि शिकलेला नसेल तर शिपाई म्हणून कुठे तरी चिकटवा, अशा प्रकारची मागणी तो मुख्यमंत्र्यांकडे करायचा. कोकणातील माणूस येणार म्हणून फक्त नोकरी मागण्यासाठीच, अशी कोकणी माणसाची वृत्ती होती."

सभापती महोदय, काही टिकाकारांनी कोकणी माणसावर अशीही टिका केली आहे की, मनी ऑर्डरने कोकण चालतो. कोकणी माणूस मुंबई चाकरी करायचा आणि त्याचे आई-वडील, पत्नी, मुले हे सर्व कोकणात असायचे. दर महिन्याला हा माणूस आपल्या गावी मनी ऑर्डर करायचा आणि आपल्या आई-वडिलांना, पत्नीला असे लिहून पाठवायचा की, "मनी ऑर्डर पाठवीत आहे, जीव सांभाळून कामे करा." मग गावाकडील मंडळी एवढा जीव सांभाळून काम करायचे की, मनी ऑर्डरवरच आपले काम भागवायचे. अशा प्रकारची टिकाही कोकणी माणसावर झाली आहे.

सभापती महोदय, कोकणी माणूस मुंबईत चाकरी करण्यासाठी आल्यानंतर एका खोलीत 15-20 लोक एकत्र रहायचे. त्यांनी कधी झोपडपट्टीचा आसरा घेतला नाही. त्यामुळे कोकणी माणूस आपल्याला फार कमी प्रमाणात झोपडपट्टीत राहताना दिसून येईल. झोपडपट्टीत राहणे हे त्याच्यासाठी अप्रतिष्ठेचे लक्षण होते. त्यामुळे एकाच खोलीत रहावे लागले तरी 15-20 नोकरदार मंडळी कसेबसे त्यात रहात असत. परंतु, गिरण्यांचा संप झाल्यानंतर मात्र या कोकणी माणसांची दुर्दशा झाली, घरेलू कामगारांची दुर्दशा झाली आणि ते कोकणात स्थलांतरित झाले.

सभापती महोदय, पूर्वीच्या काळात मोठमोठे आंबा व्यापारी मुंबईहून कोकणात जायचे. त्यांचा कोकणाशी काही संबंध नसला तरी आंबा फळाशी आणि त्यामधून मिळणाऱ्या पैशांशी होता. हे व्यापारी कोकणातील आंबा झाडे विकत घ्यायचे आणि दलालांमार्फत मुंबईच्या बाजारपेठेत पाठवायचे. यामधून कोकणी माणसाला फार कमी उत्पन्न मिळत असे. परंतु, जसा संप झाला आणि चाकरी करणारा कोकणी माणूस कोकणाकडे परत फिरला तसा त्याने रोजगाराचे साधन म्हणून आंबा लावण्यास सुरुवात केली. कोकणात 5 एकर, 10 एकर किंवा मोठी जमीन एका व्यक्तिकडे नाही. कोकणात ज्याला 'कुणगे' म्हणतात अशा अर्धा गुंठा, पाव गुंठा यामध्ये तो आंबा झाडे लावायचा. पुन्हा पाणी अडविण्यासाठी या छोट्या छोट्या शेतजमिनींना चारही बाजूंनी दगड

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर..........

लावलेले असतात. कदाचित हे दगड जरी त्यांने काढले असते तरी जमिनीचे क्षेत्र वाढले असते, पीक जास्त मिळाले असते. परंतु, दुर्दैवाने तसे झाले नाही. लोकसंख्या जास्त, जमिनीचे क्षेत्रफळ कमी आणि पुन्हा पाणी अडविण्यासाठी वाया गेलेली जमीन, अशी सर्व परिस्थिती होती.

सभापती महोदय, देवगडच्या आंब्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. हा आंबा सुवासिक आणि अतिशय मधुर असतो. हा आंबा कातळकपारीत लावलेला असतो आणि बाजूने समुद्र असल्यामुळे खाऱ्या हवेने आंब्यात नैसर्गिकरित्या मीठ मिसळले जाते. त्यामुळे या आंब्याची चव अन्य आंब्यापेक्षा आगळीवेगळी आहे. रत्नागिरी आणि कुडाळच्या आंब्याची चव आणखी वेगळी आहे. देवगडचा आंबा मात्र कातळकपारीत लावलेला असल्यामुळे, खाऱ्या हवेमुळे आणि संशोधन झाले असल्यामुळे 'राजा' म्हणून गणला गेला आहे.

सभापती महोदय, कातळकपारीत आंबा लावण्यासाठी खूप खर्च येत असतो. यासाठी चार बाय चारचा खड्डा खणावा लागतो, सलग पाच वर्षे पाण्याने शिंपावे लागते आणि एका झाडाला शिंपण्यासाठी दरमहा 50 ते 60 रुपये खर्च येतो. एका माणसाकडे 8 ते 10 झाडे असतील तर त्याला महिन्याला 500 ते 600 रुपये खर्च येत असतो. अशा प्रकारे खर्च केल्यानंतर नैसर्गिक आपत्ती आली आणि आंबा पिकाचे नुकसान झाले तर शासन एका झाडामागे 50 ते 60 रुपये नुकसान भरपाई देते. एवढ्या अल्प मदतीत तो शेतकरी कसा उभा राहणार आहे ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.हुस्नबानू खलिफे यांनी आंबा व्यापारी, दलाल यांचा उल्लेख केला आहे आणि ती वस्तुस्थिती आहे. सन 1983 च्या गिरणी संपानंतर कोकणी माणूस थोडा जागरुक झाला आणि त्याने स्वतः आंबा झाडे लावण्यास सुरुवात केली. ज्याला जेवढे झेपेल आणि जेवढी जमीन उपलब्ध होईल, तेवढी 5, 10, 50, 100 झाडे त्याने लावली. पूर्वी आंबा केवळ व्यापाऱ्यांमार्फतच बाजारपेठेत पाठविता जात होता. अनेकांची झाडे व्यापाऱ्यांकडे गहाणवट होती. मात्र, कोकणी माणसाने नंतर ती झाडे स्वतः कसावयास आणि बाजारपेठेत पाठवावयास सुरुवात केली. मात्र, आजही शेतकऱ्याला वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फतच आंबा विकावा लागतो. आंबा थेट बाजारात विकायचा असेल तर त्याला विकता येत नाही.

...6.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर.........

त्यामुळे तेथील दलालांमार्फत त्याला नागवले जाते. एका आंबा पेटीसाठी त्याला दलालामार्फत 300 ते 400 रुपये मिळतात आणि तोच दलाल त्या पेटीमधून 3000 ते 4000 रुपये उत्पन्न मिळवितो. त्यामुळे या संदर्भात शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी फळ प्रक्रिया केंद्रांबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर....

कोकणात फळ प्रक्रिया करणारा एकही कारखाना उभारण्यात आलेला नाही. कोकणात आंबे असताना फळ प्रक्रिया करणारे कारखाने मात्र जळगाव आणि मराठवाड्यात आहेत. कोकणातून आंबे तेथे नेऊन त्या ठिकाणी फळ प्रक्रिया केली जाते. कोकणातील देवगड तालुक्यातील दाभोळ येथे माजी आमदार श्री.अजित गोगटे यांनी फळ प्रक्रिया केंद्र सुरु केले आहे. कोकणात फळ प्रक्रिया केंद्र नसल्यामुळे आंब्याचे फार मोठे नुकसान होते. कारण सर्व आंबे एकाच वेळी पिकत असतो. त्यावेळी बाजारात त्याचे भाव उतरलेले असतात. त्यामुळे या आंब्याचे काय करायचे असा प्रश्न निर्माण होतो. अशा वेळी आंब्यावर प्रक्रिया करुन त्याचा पल्प तयार केला तर त्याचा भाव जास्त मिळू शकतो व त्याचा शेतकऱ्यांना फायदा होऊ शकेल. त्यामुळे फळ प्रक्रिया केंद्र तालुका तालुक्यात उभारले गेले पाहिजेत. यासाठी सरकारने अनुदान दिले पाहिजे. कोकणातील शेतकऱ्यांचा आंबा निर्यात झाला नाही तर त्या आंब्याचा पल्प तयार करता येईल. गेल्या वर्षी युरोपने आंबा घेणार नाही असे सांगितले होते. त्यामुळे आंबा बागायतदारांचे फ्फार मोठे नुकसान झाले होते.

सभापती महोदय, एका बाजूला अवकाळी पाऊस व गारपीटमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. दुसरीकडे आंब्याला खरेदीदार न मिळाल्यामुळे ते आंबे सडून जातात. अशा प्रकारची परिस्थिती कोकणातील शेतकऱ्यांची निर्माण होते. शेतकऱ्यांची दुरवस्था झाल्यामुळे तो आंबा कॅनिंगला किलोवर विकला जातो. 60 रुपये किलो प्रमाणे आंबा विकला जातो. पाच डझन आंब्याच्या पेटीला 200 आणि 300 रुपये भाव मिळतो. यासाठी लागणारी दलाली, आंबा ठेवण्यासाठी लागणाऱ्या पेटीचा खर्च व वाहतूक खर्च अशा सर्व खर्चाचा विचार केला तर पाच डझन आंब्याच्या पेटीमागे शेतकऱ्यांना 100 ते 150 रुपये मिळतात म्हणून तो शेतकरी कंटाळून आंबे कॅनिंगला देतो. आंबा शेतकऱ्यांकडे शासनाने ज्या पध्दतीने लक्ष द्यायला पाहिजे ते आजपर्यंत दिले गेले नाही.

सभापती महोदय, माझी सरकारला विनंती आहे की, देवगड, कुडाळ, सावंतवाडी अशा सर्व कोकण प्रदेशात आता आंबा तयार झाला आहे. हे आंबे आता मुंबईला ट्रकच्या माध्यमातून आणले जातात. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी उल्लेख केला आहे. यापूर्वी आंबा मुंबईत आणण्यासाठी जलवाहतूक होती. बोटीतून आंबे मुंबईत आणले जात होते. आला कोल्हापूर,



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर....

सांगली येथून ट्रक मागविले जातात त्यातून हा आंबा मुंबईत आणला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी दूरवस्था होते. स्वतःला आंबा मुंबईत आणता येत नाही. वाहतुकीचे दुसरे कोणतेही साधन उपलब्ध नाही.

सभापती महोदय, मुंबई नंतर सर्वात चांगले बंदर कोकणातील विजयदुर्ग आहे. या विजयदुर्ग बंदरातून सातारा, सोलापूर, कोल्हापूर व कराड येथून मळी 200 टँकरद्वारे विजयदुर्ग येथे आणली जाते. तेथे एक टाकी आहे, त्या टाकीत ही मळी साठविली जाते. जर्मनीतून एक बोट येते ती मळी छोट्या बोटेतून तेथे नेली जाते. सातारा, सांगली, कराड व कोल्हापूर येथील मळी विजयदुर्ग बंदरातून निर्यात केली जाते. कोकणातून आंबा निर्यात व्हायला पाहिजे तो केला जात नाही. देवगड येथील आंबा देवगड बंदरातून निर्यात केला पाहिजे. दापोली येथे आंबा संशोधन केंद्र आहे, माझ्या भागातील गिर्ये येथे आंबा संशोधन उप केंद्र आहे. या केंद्राला कोणी वाली नसून त्याकडे कोणीच लक्ष देत नाही. अनेक लोकांना माहिती नाही की, गिर्ये येथे आंबा संशोधन उप केंद्र आहे. कोकणातील सर्व आंबा केंद्राना शासनाने मदत करायला पाहिजे. जलवाहतूकीच्या माध्यमातून आंबा निर्यात करायला पाहिजे. त्यासाठी आंबा मुंबईला आणावा लागणार नाही. देवगड, विजयदुर्ग व इतर सर्व बंदरातून आंबा निर्यात करता येऊ शकतो. त्यामुळे निर्यात करण्याचा खर्च कमी होईल व आंबा व्यापाऱ्याला त्याचा डायरेक्ट भाव मिळू शकेल. कोल्हापूर, सातारा, सांगली येथून 200 टँकर मळी विजयदुर्ग बंदरात एकत्र करुन ती निर्यात केली जाते. परंतु दुर्दैवाने ज्या भागात आंबा पिकतो तेथून निर्यात होत नाही. देवगड येथील आंब्याला फळांचा राजा म्हटले जाते. तो निर्यात करण्याची काहीच व्यवस्था नाही. त्यासाठी शासनातर्फे निर्यातीची व्यवस्था झाली पाहिजे. जलवाहतूकीचा पर्याच खुला झाला तर त्याचा जास्तीत जास्त फायदा शेतकऱ्यांना होईल.

सभापती महोदय, काजूबाबत देखील अशीच परिस्थिती आहे. काजू लावण्यासाठी खूप मोठा खर्च येतो. अवेळी पाऊस, दुष्काळ व गारपीट यामुळे काजू पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. आंबा, काजू, करवंद, फणस व इतर जी फळे आहेत, यावर प्रक्रिया केली तर कोकणाएवढा सुखी प्रांत कोणताही असणार नाही. आता कोकणातील लोकांची मनस्थिती बदलली आहे, ते सहकारी तत्वावर एकत्र येण्यास तयार आहेत. कोकणातील माणसाला खेकड्याची उपमा दिली गेली आहे. एक वर गेला की, दुसरा पाय ओढतो. त्या टोपलीला झाकण नसते. आता अशी परिस्थिती

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर....

राहिलेली नाही. कोकणातील लोकांना निरनिराळ्या प्रकारची दूषणे देऊन कोकणातील लोक असंघटित राहतील अशा प्रकारचे कट कारस्थान निरनिराळ्या ठिकाणी मागील काळात करण्यात आले होतो. आता नवीन सरकार कोकणात मंत्रिमंडळाची बैठक घेणार आहे. मागील काळात रत्नागिरी येथे कॅबिनेट झाली होती. कोकण पॅकेज देण्यात आले होते. नंतर त्या पॅकेजचे काय झाले सर्व पैसा मिळाला किंवा नाही. 720 किलोमीटर समुद्र किनारा कोकणाला लाभलेला आहे. तेथे मच्छिमारी व्यवसाय मोठ्या प्रमाणात आहे. तेथील कोळी बांधव मच्छिमारी व्यवसाय करतात त्यांच्याकडे छोट्या बोटी आहेत. केरळातील लोक यांत्रिक बोटी आणून देवगड व परिसरात मच्छिमारी करतात. कोकणी माणूस छोट्या बोटी घेऊन गेला की, तेथे मच्छी मिळत नाही व आपण म्हणतो की, मच्छीचा दुष्काळ पडला आहे. त्यामुळे यांत्रिक बोटीवर बंदी आणली पाहिजे. त्यामुळे मच्छिमार लोकांना मच्छिमारी करता येईल व मच्छी निर्यात करता येईल. कोकणात मच्छी, काजू, आंबा आहे, आता तेथे भात शेती देखील होते. यावेळी पाऊस कमी पडल्यामुळे सर्व भात शेती मरुन गेली आहे. काही भागात भात शेतीचे एकमेव पीक आहे. आमच्या भागात कातड कपारीतील भात शेतीची जमीन आहे. या ठिकाणी पाऊस व्यवस्थित पडला तर भात शेती जगते. पाऊस कमी पडला तर ही भातशेती मरते. पाऊस जास्त पडला तरी भात शेती मरते. निसर्गाच्या लहरीपणामुळे भात शेतीचे नुकसान झाले आहे. इतर प्रदेशात ओरड होत असल्यामुळे तेथे मदत दिली जाते. कोकणातील लोकांना जी मदत मिळायला पाहिजे ती मदत मिळत नाही.

सभापती महोदय, गोव्यापेक्षा दुप्पट पर्यटन स्थळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत, अतिशय सुंदर अशी पर्यटन स्थळे आहेत, यामध्ये समुद्र किनारे सुंदर आहेत, तेथे अनेक देवतांची देऊळे आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटन जिल्हा घोषित करण्यात आले आहे. यासाठी लागणाऱ्या मुलभूत सुविधा तयार करण्यात आल्या नाहीत. सरकारने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनावर लक्ष केंद्रीत केले तर गोव्या पेक्षा जास्त पर्यटक येथे येतील. त्यातून येथील लोकांना रोजगार उपलब्ध होईल. या ठिकाणी मूलभूत सोई सुविधा निर्माण करण्याची नितांत गरज आहे. निसर्गाने नटलेला कोकण प्रदेश आहे. याची दूरवस्था दूर करायची असेल तर आता मंत्रिमंडळाची बैठक कोकणात होणार आहे, या बैठकीत कोकणासाठी नुसते पॅकेज न देता या जिल्ह्यासाठी मुलभूत सोई सुविधा उपलब्ध करून दिल्या तर त्याचा फायदा होईल. कोकणातील माणसाने कधीही वेगळ्या कोकणाची मागणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

08-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G-4

VVK/ AKN/ AKN/ KTG/ MMP/ प्रथम श्री.रोझेकर... 12:00

श्री.भाई गिरकर....

केली नाही. कोकणातील माणसावर अन्याय होऊन देखील मुंबई, ठाणे, रायगड सह वेगळ्या कोकणाची मागणी कधीही केली नाही. कोकणातील लोकांच्या मनात वेगळी होण्याची भावना येता कामा नये. अशा प्रकारे शासनाने कोकणाकडे लक्ष द्यावे. मंत्रिमंडळाची बैठक घेताना पॅकेजची वल्गना न करता त्यासाठी मुलभूत सोई सुविधा निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा. कोकणाचा विकास करण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्यात याव्यात. अवकाळी पावसामुळे कोकणातील शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले त्याबाबत भरघोस मदत द्यावी अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण : (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांची अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी या संदर्भातील सर्व माहिती सभागृहात दिलेली आहे. कोकण हा प्रदेश नैसर्गिक साधन संपत्तीने नटलेला आहे. शिवाजी महाराज, संभाजी राजे यांच्या पराक्रमाची साक्ष देणारा कोकण प्रदेश आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.........

संपूर्ण महाराष्ट्रात प्रामाणिक, स्पष्ट बोलणारा आणि कष्टाळू माणूस कोणता असेल तर तो कोकणी माणूस आहे. म्हणून कोकणाविषयी सार्थ अभिमान असणे स्वाभाविक आहे. गौरी गणपती किंवा शिमगा हे सण कोकणात मोठ्या आनंदाने साजरे केले जातात. हे सण साजरे करताना तेथे वेगळेच वातावरण असते. कोकणामध्ये जगप्रसिद्ध फळांचा राजा म्हणजे हापूस आंब्याचे उत्पादन घेतले जाते. लंडनच्या राणीच्या डायनिंग डेबलवर हापूस आंबा असल्याशिवाय राणीला चैन पडत नव्हती, एवढे हापूस आब्याचे महत्व आहे. परंतु, दुर्दैवाने आज हापूस आंब्याला अवकळा आलेली आहे, हे सांगताना खूप वाईट वाटते. एकेकाळी हापूस आंबा बागायतदारांना कशाचीच कमी नव्हती. आंबा, काजू, फणस, मासळी यांची गणना वरच्या किंमतीमध्ये होते. बाजारातून आंबा, फणस, मासळी विकत घेणे म्हणजे श्रीमंतीचे लक्षण मानले जाते. आज आंबा, काजू, माशांचे भाव बघितले तर सर्वसामान्य माणसाला आंबा विकत घेणे न परवडणारे आहे. पूर्वी आंबा बागायतदार किती तरी श्रीमंत असेल, असे वाटत होते. परंतु, दुर्दैवाने आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. आंबा उत्पादकांना अवकाळी पावसाने वाईट दिवस दाखवायला सुरुवात केलेली आहे. आंब्याच्या झाडांना आलेला मोहर पावसामुळे गळालेला आहे आणि जे 10-15 टक्के आंब्याचे पीक हाती आलेले आहे त्यावर पावसाच्या पाण्यामुळे डाग पडलेले आहेत. आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी आंब्याचे पीक घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला आहे. आंब्याचे पीक वर्षातून एकदाच घेता येते. प्रत्येक झाडाला दरवर्षी आंबे येतीलच असे नाही. म्हणजे यावर्षी ज्या झाडाला आंबे आले त्या झाडाला दुसऱ्या वर्षी आंबे येत नाहीत. त्या झाडाला त्याच्या पुढील वर्षी आंबे येतात. म्हणजे तुमच्याकडे आंब्याची 500 झाडे असतील आणि त्यातील 250 झाडांना यावर्षी आंबे आले तर त्या झाडांना पुढील वर्षी आंबे येत नाहीत. त्या झाडांना एक वर्षाआड आंबे येतात. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आंब्याचे पीक घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कष्ट करावे लागतात, आंब्याच्या झाडांची निगा राखावी लागते आणि वर्ष-दोन वर्षांनी ज्यावेळी पीक हातात येण्याची वेळ येते त्यावेळी पावसाची अवकृपा झाली तर तो शेतकरी हिरमुसला होऊन जातो. त्या शेतकऱ्याच्या हातात पीक येत नाही.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.........

सभापती महोदय, दापोली येथे कोकण कृषी विद्यापीठ आहे. कोकण कृषी विद्यापीठात चांगले संशोधन केले जाते. परंतु, ते संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. आंब्याची निर्यात कशा प्रकारे करावी, याबाबत कोकण कृषी विद्यापीठामार्फत आंबा उत्पादकांना मार्गदर्शन केले जात नाही. आंबा बागायतदारांना, जे छोटे शेतकरी आहेत त्यांना असे वाटते की, आंब्याला चांगला भाव मिळात तर मी आंब्याची निर्यात करेल. परंतु, आंब्याची निर्यात करण्यासाठी जाचक अटी आहेत. आंब्याची निर्यात कशा प्रकारे करावी, याबाबत कोकण कृषी विद्यापीठाने आंबा उत्पादकांना मार्गदर्शन केले पाहिजे. आंब्याच्या झाडांना कोणती खते टाकावयास पाहिजे, फवारणी कशा प्रकारे करावयास पाहिजे, याबाबत देखील मार्गदर्शन केले पाहिजे. आज खते, किटक नाशके महाग झालेली आहेत. पूर्वी कोकणात सहजपणे मजूर उपलब्ध होत होते. परंतु, आज कोकणात मजूर मिळत नाहीत. नेपाळच्या बॉर्डरवरुन गुरखे लोक येतात आणि आंब्याच्या बागांची राखण करतात. पूर्वी कोकणातील माणूस रोजगारासाठी संपूर्ण महाराष्ट्रात फिरत होता. परंतु, आज कोकणात मजूर मिळत नाहीत, अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, कोकणात जो आंबा तयार होतो त्या आंब्यापासून आंबा पोळी तयार केली जाते. आपण आंबा कॅनिंग करतो, काजू प्रिझर्व्ह करु शकतो. आपण आंबा पोळी, फणस पोळी तयार करु शकतो. परंतु, त्यासाठी मार्केट उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आंबा पोळी, फणस पोळी तयार करण्याची प्रक्रिया कशी आहे, ते मोठ्या प्रमाणात कसे तयार करता येईल, याकडे देखील लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कोकणातील कोकम हे दुर्लक्षित पीक आहे. कोकणातील कोकम संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे. सोलकढी आणि मासे हे जेवण सर्वांच्या तोंडात पाणी आणणारे आहे. कोकणात नारळ आणि कोकम होते. आपल्या देशात परदेशातून पेप्सी, कोकाकोला येतो. परंतु, कोकम सरबत चांगल्या प्रकारे डेव्हलप केले तर आपण ते राज्यात नव्हे तर संपूर्ण देशात, विदेशात देखील पोहाचवू शकतो. मला असे वाटते की, कोकम सरबतावर चांगल्या प्रकारे प्रक्रिया

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण………

करुन ते पेप्सी, कोकाकोला सारखे झाले तर त्याला संपूर्ण जगात चांगले मार्केट मिळू शकेल. कोकणातील समुद्रात मोठ्या प्रमाणावर मासळी आहे. कोकणात ॲक्वा कल्चरचे प्रोजेक्टस आहेत. मासळी सुकविण्याचे प्राजेक्टस आहेत. परंतु, छोट्या मच्छीमारांना ज्या सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजेत त्या सुविधा आजही आपण त्यांना उपलब्ध करुन देऊ शकत नाही. कोकणी माणूस एवढा प्रामाणिक आहे, सन्मानाने जगणारा आहे की, तो शासनाकडून किंवा इतर कोणाकडून कोणत्याही प्रकारची अपेक्षा करीत नाही. कोकणी माणूस सकाळी कामावर जातो आणि सायंकाळपर्यंत त्याचा हातात जेवढे पैसे मिळतील त्यावर तो समाधान मानतो. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी सांगितले की, कोकणातील लोक पूर्वी मुंबईमध्ये काम करीत होते आणि त्यांनी केलेल्या मनी ऑर्डरवर त्यांच्या कुटुंबाची उपजीविका चालत होती. परंतु, आज परिस्थिती अशी आहे की, कोकणातील शेतकऱ्याच्या वाट्याला खूप निराशा आलेली आहे. कोकण कृषी विद्यापीठातील संशोधन फक्त विद्यापीठापुरते मर्यादित राहते. ते संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे, या दृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी पूर्वी देखील सांगितले होते की, सिंधुदुर्ग, देवगड आणि रत्नागिरी येथील आंबा वाशी बाजारपेठेत आणणे खूप खर्चिक आहे. त्यामुळे तेथे बाजारपेठ निर्माण केली आणि शेतकऱ्यांनी तो आंबा एका नाक्यावर आणला तर ते खूप सोईचे होईल. दलाली, वाहतूक, रिकामा खोका आणि मजुरी हे सर्व विचारात घेता एका आंब्याच्या पेटीमागे 300 ते 400 रुपये खर्च होतो. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना दलालांमुळे फायदा मिळत नाही. म्हणून शासनाने या संदर्भात देखील विचार केला पाहिजे. आंबा बागायतदारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. जास्त ऊन पडले तर आंबा भाजतो, जास्त पाऊस पडला तर आंब्यावर डाग पडतात. आंबा, नारळाची झाडे ऊंच असल्यामुळे त्यांना पॉली हाऊस करणे अशक्य आहे. या संदर्भात दुसरे काय करता येईल, याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपण पर्यटनाच्या दृष्टीने गणपती पुळे तीर्थक्षेत्राचा विकास केलेला आहे. आपल्याला कोकणात पर्यटनाच्या दृष्टीने चांगले काम करता येईल. दुसरे म्हणजे, कोकणात

..4…

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.........

वाहतूक व्यवस्था खूप कमी आहे. श्री.मधू दंडवते साहेबांनी कोकणात कोकण रेल्वे सुरु केली त्यावेळी आम्हाला खूप आनंद झाला होता. कोकणात रेल्वे प्रवासाची सुविधा उपलब्ध झालेली आहे. परंतु, रत्नागिरी, सिंधुदुर्ग भागातील लोकांना त्या सुविधेचा जास्त फायदा झालेला नाही. बाहेरच्या लोकांना त्या सुविधेचा जास्त फायदा झालेला आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग भागातील स्थानिक लोकांना रेल्वे सुविधेचा उपयोग कसा होईल, यासाठी देखील आपण काही तरी उपाययोजना केली पाहिजे.

सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. कोकण कृषी विद्यापीठाने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले पाहिजे. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना या संकटातून कसे बाहेर काढता येईल, यासाठी शासनाने प्रयत्न करावेत, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपविते.

---------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कोकणातील आंबा, काजू पिकांचे झालेले नुकसान या संदर्भात ही अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. कोकण पट्टयात फक्त रत्नागिरी, सिंधुदुर्ग किंवा रायगड येत नाही, तर कोल्हापूरचा पश्चिम भाग, सह्याद्रीचा काही भाग, राधानगरी, सातार्‍याचा पश्चिम भाग, सोलापूर, सांगली जिल्ह्यातील शिराळा तसेच, पुणे जिल्ह्यातील भिमा शंकर, भोर, वेल्हे, मुळशी हा भाग देखील कोकण पट्टयात येतो. आंबा, काजू, मासे, भात शेती आणि पर्यटन हे पाच फॅक्टर कोकणासाठी उपयोगाचे आहेत. त्या दृष्टीने संशोधन करण्यासाठी त्या भागात कृषी विद्यापीठे स्थापन करण्यात आलेली आहेत. कृषी विद्यापीठातील प्राध्यापकांना शासन भरपूर पगार देते. परंतु, कृषी विद्यापीठातील प्रोफेसर त्या भागाच्या विकासासाठी ज्या प्रमाणे संशोधन करावयास पाहिजे त्यात कोठे तरी कमी पडतात. म्हणून अशा कृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंना किंवा संशोधकांना समज देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, पर्यटनाच्या माध्यमातून कोकणाचा विकास करण्यासाठी चांगलया प्रमारे वाव आहे. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी साखरेसाठी अनुदान लाटतो, तसा कोकणातील शेतकरी कशासाठीच अनुदान लाटत नाही, याचा देखील शासनाने विचार करावा. ज्या शेतकर्‍यांनी बँकेकडून मोठी कर्जे घेतलेली आहेत, त्यांचे कर्ज माफ होते. कोकण पट्टयातील शेतकरी भाताची लागवड करतो. परंतु, त्याला सबसिडीचा फायदा मिळत नाही. शासन त्यासाठी त्यांना कोणती मदत करणार आहे ? शासनाने या दृष्टीने देखील विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, शासनाने नागपूर येथे फिशरी विद्यापीठाची निर्मिती केलेली आहे, ही चांगली गोष्ट आहे.

यांतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर......

त्या विद्यापीठाचे उपकेंद्र कोकणामध्ये काढण्याचा सरकारने प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो. कोकणातील शेतकऱ्यांना आंबा फळावरील हॉट वॉटर, रेडिएशन व व्हेपर ट्रिटमेंट प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्याबाबत विशेष प्रयत्न करावा. सभापती महोदय, सभागृहामध्ये मराठवाडा, विदर्भातील प्रश्नांबाबत नेहमी चर्चा होते. पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुक्यांच्या विकासाची भाषा बोलली जाते. परंतु त्या तालुक्यांचा विकास झालेला नाही. तीच अवस्था कोकणाची झालेली आहे. कोकणाला न्याय देण्याचा शासनाने प्रयत्न करावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

---------------

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे व इतर यांनी वि.प.स.नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी जे वक्तव्य केले त्याबाबत मी असहमत आहे. दापोली येथील कोकण कृषी विद्यापीठाच्या सिनेटवर मी सभागृहाचा सदस्य या नात्याने 5 वर्षे काम केलेले आहे. कोकण कृषी विद्यापीठाने आंबा, काजू, नारळ इ. फळ पिकांवर अनेक यशस्वी प्रयोग केले आहेत. करवंदापासून वाईन तयार करण्याचा यशस्वी प्रयोग झालेला आहे. त्या विद्यापीठामध्ये प्राध्यापकांची चांगली टीम कार्यरत आहे. कृषी विद्यापीठामध्ये काम करताना मला विशेष आनंद मिळाला आहे. पुन्हा जरी संधी मिळाली तर मी काम करण्यास तयार आहे.

सभापती महोदय, आंबा हे जगातील एक उत्कृष्ट फळ आहे. जगभरामध्ये आंबा फळाचे उत्पादन होते. परंतु कोकणातील हापूस आंब्याला अद्याप पर्याय निर्माण झालेला नाही. आंबा फळाची साठवणूक करुन तो वर्षभर कसा उपलब्ध होईल, त्याचा दर्जा कसा टिकेल यासाठी संशोधन झाले पाहिजे. कोल्ड स्टोरेजमध्ये आंबा फळाचा दर्जा टिकविण्यास आपण यशस्वी ठरलो तर हे फळ बाराही महिने ग्राहकांना उपलब्ध करुन देता येईल. त्या माध्यमातून आंबा उत्पादक शेतकऱ्यांचा भरघोस फायदा होईल. माझ्या तालुक्यातील हाशिवरे गावामध्ये मोकल नावाचे आंबा बागायतदार आहेत. त्यांच्या शेतातील आंबा फळाची पहिली पेटी डिसेंबर महिन्यात बाजारामध्ये विक्रीसाठी पाठविली जाते व 2 डझन फळाच्या पेटीला 5000 रुपये भाव मिळतो. आंबा फळ हंगामापूर्वी कसा उपलब्ध होईल यासाठी त्यांनी मोठया प्रमाणात संशोधन करुन वेगवेगळे प्रयोग केले आहेत. तसे प्रयोग शासनाकडून होण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत.

सभापती महोदय, केवळ कोल्ड स्टोरेजची व्यवस्था करुन भागणार नाही. आंब्याचा पल्प खाणे आणि प्रत्यक्ष आंबा फळ खाणे यात खूप फरक आहे. कोकणातील हापूस आंबा जगातील विविध देशांमध्ये निर्यात केला जातो. आंबा फळाचे पीक एप्रिल व मे या दोन महिन्यात मोठया प्रमाणात तयार होते. त्यावेळी या फळाचा भाव काही प्रमाणात घसरतो. डिसेंबर ते मे महिन्यापर्यंत आंब्याचे पीक कसे घेता येईल या दृष्टीने संशोधन करण्यात यावे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

08-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) I.3

SGB/ MMP/ AKN/ 12:20

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, कोलाड येथे मोठया प्रमाणात आंबा पिकाचे उत्पादन होते. परंतु त्या फळाला हापूस आंब्याची चव नाही. आंबा पिकाला खारा वारा आवश्यक असतो. डोंगरावर कलमांची लागवड केली तर समुद्राकडून येणारा खारा वारा कलमांना मिळू शकतो. देवगड, हाशिवरे, धोपवडे, खारेपाटण या भागाप्रमाणे कोकणातील इतर भागामध्ये आंबा कलमांची अधिकाधिक लागवड कशी होईल याकरिता प्रयत्न झाले पाहिजेत. आज आंबा पीक पूर्णतः हवामानाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. मोहोर आल्यानंतर त्याचे नुकसान होऊ नये म्हणून आच्छादन करता येईल का याचा विचार झाला पाहिजे. कारण गेली तीन चार वर्षे सातत्याने अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे कोकणातील आंबा पिकाचे नुकसान होत आहे. ग्लोबल वार्मिंगचा करता यापुढील काळात हे संकट टळेल असे वाटत नाही. त्या दृष्टीने कृषी विद्यापीठामार्फत संशोधन झाले पाहिजे. चर्चासत्राच्या माध्यमातून प्रगतीशील शेतकरी व शास्त्रज्ञ यांना सोबत घेऊन उत्पादन कसे वाढेल, वाढत्या उत्पादनाला मार्केट कसे मिळेल, उत्पादित मालाचा दर्जा, दर्जेदार पॅकिंग या बाबीकडे लक्ष दिले पाहिजे. आज आंबा फळ निर्यात करण्यासाठी कोरुगेटेड बॉक्सचा मोठया प्रमाणात वापर केला जातो. निर्यातीच्या काळात पॅकिंग डॅमेज होत असते. त्यामुळे सरकारने पॅकिंगसाठी प्रायोगिक तत्वावर मदत केली पाहिजे. पॅकिंग हे आधुनिक व आकर्षक असले पाहिजे, त्या दृष्टीने शासनाने शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे.

सभापती महोदय, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत आंबा उत्पादक शेतकऱ्यांना 40 कोटी रुपये कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्या शेतकऱ्यांकडून कर्जाची परतफेड वेळेवर व 100 टक्के केली जात आहे. या चर्चेच्या निमित्ताने मंत्री महोदय साचेबंद उत्तर न देता ठाम भूमिका घेऊन कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना अच्छे दिन दाखवतील अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : अल्पकालीन चर्चा संपली आहे. मंत्री महोदय उद्या सकाळी उत्तर देतील.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे सभागृहात उपस्थित नाहीत. विभागाचे प्रमुख अधिकारी सुध्दा गॅलरीमध्ये उपस्थित नाहीत. शासनाचे या विषयाकडे किती दुर्लक्ष आहे हेच यातून दिसून येते. तुम्हाला सगळ्यांना स्टूपिड म्हटले आहे. जबाबदारी दाखविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. हा विषय संवेदनशील आहे, महत्वाचा आहे, गंभीर आहे. सरकारला या विषयाचे गांभीर्य नाही. शासनाच्या अधिकाऱ्यांना गांभीर्य नाही. उप सचिव किंवा सह सचिव उपस्थित राहिले म्हणजे या प्रश्नाची व्याप्ती कळली असा अर्थ होत नाही. राज्याच्या व कोकणाच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे.

नंतर जे.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

त्यामुळे यासंबंधातील उत्तर माननीय मंत्र्यांनी द्यावे अशी आमची अपेक्षा आहे. माननीय कृषी राज्यमंत्र्यांना उत्तर द्यायचे असेल तर ते त्यांनी द्यावे. परंतु, ते उत्तर देणार असतील तर आम्ही बाहेर जाऊ.

**उप सभापती :** आता चर्चेची वेळ संपलेली आहे. या महत्त्वाच्या चर्चेवर उद्या सकाळी माननीय मंत्र्यांना पाचारण करण्यात येईल व या चर्चेवरील सविस्तर उत्तर देण्यात येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी येथे दोन विषय उपस्थित केले आहेत. काल केळकर समितीच्या अहवालावर चर्चा होत असताना कोणीही अधिकारी उपस्थित नव्हते. ते जरी अदृश्य असले तरी त्यांना विषयाचे गांभीर्य किती आहे हे यावरून दिसून येते. केळकर समितीच्या अहवालावर चर्चा होत असताना व आज देखील एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा होत असताना कोणीही अधिकारी उपस्थित नाहीत. एवढेच नव्हे तर माननीय कृषी मंत्री देखील सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे यात शासनाची उदासिनता दिसत आहे. यात सदनाचा देखील अवमान होत आहे. येथे सदनाला कमी लेखण्याचा प्रकार होत आहे.

**उप सभापती :** या प्रस्तावावरील सविस्तर उत्तर उद्या सकाळी 11.00 वाजता, माननीय मंत्र्यांकडून देण्यात येईल. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.31 ते 1.00 वाजे पर्यंत स्थगित झाली.)

......

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**(माननीय सभापती महोदयांच्या अभीष्टचिंतनाबाबत)**

**श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) :**आज सभापती महोदयांचा वाढदिवस असल्यामुळे सभागृहाच्या वतीने मी त्यांना शुभेच्छा देतो.त्यांच्या अनुभवाचा लाभ या सभागृहाला मिळत असल्यामुळे त्यांचे मी पुन:श्च आभार व्यक्त करतो.

**सभापती :** आभारी आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्याला वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा दिलेल्या आहेत. मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने आपले अभीष्टचिंतन व्यक्त करतो व आपल्या अनुभवाचा लाभ सभागृहाला व्हावा अशी सदिच्छा व्यक्त करतो.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, कॉँग्रेस पक्षाच्या वतीने तसेच सभागृहाच्या वतीने वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त करतो.

श्री. अनिल तटकरे : सभापती महोदय, आपल्या वाढदिवसानिमित्त माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाच्या उच्च परंपरेस साजेसे व्यक्तिगत संबंधाचे प्रदर्शन या ठिकाणी घडवले आहे. आपल्या वाढ दिवसानिमित्त आम्ही आपल्या दालनात शुभेच्छा दिलेल्या आहेत. परंतु सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात होण्यापूर्वीच अतिशय उमद्या मनाने आपले अभिनंदन केल्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांचे सभागृहाच्या वतीने मनापासून धन्यवाद देतो. हीच परंपरा यापुढेही चालत राहो अशी सद्‌भावना व्यक्त करतो. धन्यवाद.

**सभापती :** माननीय मुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते तसेच माझे सर्व सन्माननीय सदस्यांनी मला वाढदिवसानिमित्ती दिलेल्या शुभेच्छाबद्दल मनापासून धन्यवाद देतो. सभागृहाचे कामकाज करण्यासाठी आपल्या सर्वांच्या शुभेच्छा उपयोगी पडतील असा विश्वास व्यक्त करतो. मी वैयक्तिक पातळीवर आपल्या सर्वांचा ऋणी आहे. धन्यवाद.

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:**तोंडी उत्तरे

**आयआरबी कंपनीच्या विविध ठिकाणच्या कार्यालयावर केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) पथकाने टाकलेले छापे**

***(१)* * २८६७ *डॉ.नीलम* गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवरर:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाची बांधणी करणाऱ्या व या मार्गावरील जमिनी अवैध रित्या ताब्यात घेण्याचा आरोप असलेल्या आयआरबी कंपनीच्या २१ ठिकाणच्या कार्यालयावररकेंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) पथकाने दिनांकक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास छापे टाकल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

***(२)*** असल्यास, या कंपनीच्या कार्यालयावर छापे मारण्याची कारणे काय आहेत,तसेच सदरीलल छाप्यात सीबीआय च्या पथकास काय आढळून आले,

***(३)*** तसेच, उपरोक्त प्रकरणात दोषी आढळून येणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

***(४)*** नसल्यास, विलंबाची िकारणे काय आहेत ***?***

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) प्रश्नात नमूद कंपनीच्या कार्यालयावर केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने टाकलेले छापे ही बाब राज्य शासनाच्या अखत्यारीतील नसून केंद्र शासनाशी संबंधित आहे.

***(३)*** व (४) उपरोक्त प्रकरणात दोषी आढळून आल्यास संबंधितांवर योग्यती कारवाई करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात या सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. या प्रश्नाचे एकंदर दोन भाग आहेत. सतीश शेट्टी यांच्या खुनाचा तपास सीबीआयकडे देण्यात आला होता. मुळात जमिनींच्या गैरव्यवहारासंदर्भात सतीश शेट्टी यांनी आवाज उठवला होता. हे मुळ प्रकरण राज्य सरकारच्या अखत्यारीत आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सरकारने जे उत्तर दिलेले आहे ते कायदेशीर चौकटीत राहून दिलेले आहे. ही घटना ज्यावेळेस घडली त्या भागात अगोदर इन्स्पेक्टर श्री.लांजिले यांची राजगुरुनगर येथे चौकशी सुरु होती. आज या अधिकाऱ्याला प्रमोशन मिळून त्याची नागपूर येथे बदली झालेली आहे. या प्रकरणातील एका व्यक्तीचा खून होतो व त्या खुनाचा तपास सीबीआयकडे जातो. सीबीआयकडे तपास गेल्यानंतर न्याय मिळण्याची अपेक्षा आम्ही राज्य सरकारकडून ठेवायची नाही तर कोणाकडून ठेवायची ?

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. : 2867.....

डॉ. नीलम गोऱ्हे.....

त्यामुळे या जमीन गैरव्यवहार प्रकरणातील कागदपत्रे किंवा ही केस ही सीबीआयकडे ट्रान्सफर झालेली नाही. त्यामुळे यासंदर्भात राज्य सरकारने चौकशी करुन यामध्ये ज्या अधिकाऱ्याने हलगर्जीपणा केला त्या अधिकाऱ्याच्या संदर्भात शासनाने कोणती पावले उचलली आहेत किंवा उचलणार आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास नम्रपणे आणून द्यावयाचे आहे की, मुळ प्रश्न हा सीबीआयने टाकलेल्या छाप्यांच्या संदर्भात आहे. या प्रश्नाच्या संदर्भात माझा कोणताही आक्षेप नाही. परंतु सीबीआयने टाकलेल्या छाप्यांच्या संदर्भात राज्य शासन कोणत्याही प्रकारचे उत्तर देऊ शकत नसल्यामुळे हा प्रश्न खऱ्या अर्थाने स्वीकृत होऊ शकत नाही. त्यामुळे अशा प्रश्नांच्या संदर्भात आपण भविष्यकाळात निदेश द्यावेत अशी विनंती आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. गोऱ्हे यांनी प्रश्नाच्या निमित्ताने ज्या भावना व्यक्त केल्या त्यासंदर्भात माहिती घेऊन 100 टक्के चौकशी केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितले आहे की, हा प्रश्न राज्य सरकारच्या अखत्यारीत येत नाही. परंतु असे असतानाही हा प्रश्न स्वीकारला गेला व त्यावर सभागृहात चर्चा होत आहे. खरे म्हणजे असे होणे एकंदरीत चुकीचे आहे. प्रश्न जर राज्य सरकारच्या संबंधात नसेल तर तो स्वीकारलाच कसा काय गेला, चर्चेला आलाच कसा काय ? पूर्वी जे प्रश्न स्वीकारले जात नव्हते त्यासंदर्भात आम्हाला पत्र येत होते व त्या पत्रात, "या प्रश्नाचा संबंध राज्य सरकारशी येत नसल्यामुळे आपला प्रश्न स्वीकारला जाऊ शकत नाही" असे कळवले जात होते.

सभापती महोदय, या ठिकाणी दुसरा प्रश्न लांजिरेच्या बाबतीत उपस्थित करण्यात आलेला आहे. या प्रकरणातील खुनामध्ये ज्याला दोषी ठरवण्यात आले होते त्या अधिकाऱ्याची नागपूर येथे बदली करण्यात आलेली आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यावर योग्य कारवाई राज्यसरकारकडून केली जाणार आहे काय ? खरे म्हणजे ही केस प्रथम आपल्याकडे रजिस्टर झाली व नंतर ती सीबीआयकडे गेली. त्यामुळे या केसच्या संदर्भात आजही राज्य सरकार निर्णय घेऊ शकते त्यामुळे या अधिकाऱ्याच्या संदर्भात राज्य सरकार कोणता निर्णय घेणार आहे ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, ही बाब जरुर तपासली जाईल. हे प्रकरण सीबीआयच्या अखत्यारीत असेल तर सीबीआयला सांगितले जाईल. याप्रकरणाच्या संदर्भात राज्य सरकारने जी कारवाई करणे अपेक्षित आहे ती कारवाई राज्य सरकार करेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. शरद रणपिसे : सन्माननीय सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी जी काही माहिती दिली त्यासंदर्भात आम्ही देखील सहमत आहोत. सीबीआयच्या प्रकरणात आपण हस्तक्षेप करण्याचे काही एक कारण नाही. मुळ प्रश्न हा आहे की, जमिनी अवैध रित्या ताब्यात घेण्याची प्रकरणे आपल्या विभागाकडे आली आहेत काय, आली असल्यास राज्य शासन त्यासंदर्भात कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या क्षणी तरी यासंदर्भातील माहिती माझ्याकडे नाही. आयआरबी कंपनीच्या 21 कार्यालयावर सीबीआयने छापा घातला असा या प्रश्नाचा मुळ रोख आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी बाब उपस्थित केली आहे त्यासंदर्भात जरुर माहिती घेण्यात येईल. यासंदर्भातील माहिती राज्य सरकारकडे आली असेल तर त्यासंदर्भात उचित कारवाई केली जाईल.

श्री. अनिल तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे त्यासंदर्भात मी अधिकचा प्रश्न उपस्थित करीत आहे. या प्रश्नाचा राज्य सरकारशी संबंध नसेल तर हा प्रश्न चर्चेला कसा काय आला ? या ठिकाणी संसदीय कार्य मंत्री उपस्थित आहे. ज्या प्रश्नांचा संबंध राज्य सरकारशी असतो असेच प्रश्न स्वीकारले जात असतात. मागच्या काळात सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुद्दा उपस्थित केला होता की, त्यांच्या लेटर हेडचा वापर करुन तारांकित प्रश्न टाकण्यात आले होते. यासंदर्भातील खुलासा नंतरच्या काळात झालेला नाही. आजच्या वर्तमानपत्रात 93 च्या सूचना, विशेष उल्लेखाचा मुद्दा आलेला आहे. लक्षवेधी सूचनेची निवेदने सुध्दा सदस्यांपर्यंत अद्याप आलेली नाहीत. या ठिकाणी योगायोगाने माननीय मुख्यमंत्री तसेच संसदीय कार्यमंत्री उपस्थित आहेत त्यामुळे संसदीय कामकाजाच्या संदर्भात आपण दोघांनी गांभीर्याने लक्ष घालावे अशी विनंती आहे.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. : 2867.....

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, हा प्रश्न केंद्रशासनाच्या अखत्यारीतील आहे. केंद्रसरकारच्या प्रोजेक्टला राज्य सरकार जमीन देत असते. राज्यसरकार प्रथम जमीन ॲक्वीझीशन करते व नंतर ती जमीन प्रोजेक्टला देत असते. या आयआरबी कंपनीच्या प्रकरणामध्ये जमीन देण्याबाबत तक्रार होती. या प्रकरणामध्ये एका व्यक्तीचा खून झालेला आहे. या प्रकरणाची आपल्या सर्वांना माहिती आहे. रस्ता बनवण्यासाठी राज्य सरकारने आपल्या ताब्यातील जमिनी दिलेल्या असल्यामुळे या प्रकरणाशी राज्यसरकारचा संबंध येतो त्यामुळे यासंदर्भात राज्य शासन यासंदर्भात चौकशी करेल काय ?

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 2867...

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी या संदर्भातील माहिती अगोदर दिलेली आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की,या प्रकरणाची पूर्ण माहिती घेतली जाईल आणि आवश्यक असेल तर निश्चितपणे चौकशी केली जाईल.

ॲड.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारितील असल्यामुळे त्याचा राज्य सरकारशी काही संबंध नाही. परंतु लेखी उत्तरात नमूद केलेले आहे की, उपरोक्त प्रकरणात दोषी आढळून आल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल. जर हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारितील असेल तर राज्य शासन कारवाई कशी करणार ? मला वाटते उत्तरामध्ये संदिग्धता आहे. तेव्हा याबाबत माननीय मुख्यमंत्री खुलासा करतील काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय,उपरोक्त प्रकरणात दोषी आढळून येणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे असा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. त्या प्रश्नाचे उत्तर वरील प्रमाणे दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी स्टॅन्ड अलोन उत्तर न वाचता एकत्रित उत्तर वाचावे. मला प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर देता आले असते, परंतु मी गंभीरपणे उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी मेरीटवर उत्तर दिलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी संसदीय कार्य मंत्र्यांचा उल्लेख केला म्हणून त्या संदर्भातील माहिती देण्यासाठी मी उभा आहे. सभागृहात प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चेच्या सूचना किंवा अन्य आयुधांच्या माध्यमातून सदस्य जे प्रश्न विचारतात ते स्वीकृत किंवा अस्वीकृत करण्याचे अधिकार माननीय सभापतींना आहेत. तो त्यांचा अधिकार आहे. फक्त सभागहाच्या कामकाजाच्या संदर्भात ससंदीय कार्य मंत्र्यांचा संबंध आहे. सन्माननीय सदस्यांचा गैरसमज होऊ नये म्हणून मी हा खुलासा केलेला आहे.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पुणे जिल्ह्यातील संरक्षण विभागाशी संबंधित प्रश्नांबाबत झालेल्या बैठकीबाबत**

***(२)*** * **३४१९ *श्री.अनिल* भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटीलल:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** पुणे जिल्ह्यातील संरक्षण विभागाशी संबंधित प्रश्नांबाबत मा.सरंक्षण मंत्री यांचे समवेत पर्यावरण मंत्री, जिल्हाधिकारी आणि पालिकेचे अधिकारी यांची माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात बैठक झाली, हे खरे आहे काय,

***(२)*** असल्यास, सदर बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले आहेत,

***(३)*** तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

***(४)*** अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

***(२)*** सदर बैठकीमध्ये, संरक्षण विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबत पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजित विकास कामांसाठी संरक्षण विभागाच्या ताब्यात असलेल्या आवश्यक जमिनीबाबतचे प्रलंबित प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत संरक्षण मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्याच्या सुचना मा.संरक्षण मंत्री, भारत सरकार यांनी दिल्या आहेत.

***(३)*** संरक्षण विभागाकडील जागेबाबत पुणे महानगरपालिकेने ३ तर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने ११ प्रस्ताव संबंधित स्थानिक कार्यालयास (प्रधान संचालक, डिफेन्स ईस्टेट, पुणे) सादर केलेले आहेत. उपरोक्त बैठकीमध्ये दिलेल्या सुचनेनुसार, पुणे महानगरपालिकेने घोरपडी येथील पुणे-मिरज रेल्वे लाईन व पुणे-सोलापूर रेल्वे लाईन क्रॉसिंग येथील प्रस्तावित रेल्वे उड्डाणपुलासाठीच्या जागाबाबतचा आणि लुल्लानगर चौक-कोंढवा खुर्द येथील प्रस्तावित उड्डाणपुलासाठीच्या जागाबाबतचा प्रस्ताव दिनांक २०.१.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सादर केला आहे. सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांनी अनुक्रमे दिनांक २४.२.२०१५ व दिनांक ९.२.२०१५ च्या पत्रान्वये सचिव, संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने बोपखेल ता.हवेली येथील कॉलेज ऑफ मिल्ट्री इंजिनिअरिंग यांनी बंद केलेल्या बोपखेल-दापोडी रस्त्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २८.१.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सादर केला असून, सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक २३.२.२०१५ च्या पत्रान्वये सचिव, संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

***(४)*** वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

..३..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 3419...

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, देशाचे संरक्षण मंत्री पुणे येथे आले होते आणि त्यांनी पुणे येथील मिलिटरीच्या जमिनी सर्वसामान्य लोकांना वाहतुकीसाठी देण्यात येतील, उड्डाणपूल पूर्ण करण्यात येतील तसेच त्या जागा राज्य शासन आणि महानगरपालिकेच्या ताब्यात दिल्या जातीत असे त्यांनी सांगितले होते. या संदर्भात राज्य शासनाची काय भूमिका आहे ? संरक्षण खात्याच्या जमिनीवर घरे बांधलेली आहेत. त्या लोकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी राज्य शासन आणि महानगरपालिका खर्च करु इच्छिते पण संरक्षण खात्याने बंदी आणली आहे. तेव्हा तेथील लोकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी राज्य शासन कोणत्या उपाययोजना करणार आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस :सभापती महोदय, पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या संदर्भात अशाप्रकारची बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये जे प्रकल्प अडलेले आहेत त्या प्रकल्पास माननीय संरक्षण मंत्र्यांनी अनुकुलता दाखविली होती. त्यांनी सांगितले होते त्या संदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत पाठविण्यात यावेत. त्यानुसार पुणे महानगरपालिकेचे तीन प्रस्ताव दिनांक 24.2.2015, 9.2.2015 आणि 9.2.2015 प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. घोरपडे येथील पुणे-मिरज, पुणे-सोलापूर रेल्वे लाईनवरील उड्डाणपूल, कोंडवा येथील उड्डणपूल आणि गणपतीमाथा ते शिवडे पूल एनडीए रस्ता आणि त्यासोबत पिंपरी-चिंचवडचे 11 प्रस्ताव पाठविले आहेत. काही ठिकाणी संरक्षण विभाग ब्लँकेट निर्णय घेऊ शकत नाही. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने रेड झोनच्या संदर्भात दोन प्रस्ताव दिलेले आहेत. हा रेड झोन कमी केला पाहिजे त्यामुळे काही बांधकामे नियमित होतील आणि लोकांना सुविधा पुरविता येतील असे त्यांचे म्हणणे आहे. ते दोन प्रस्ताव म्हणजे देहू रोड येथील रेड झोनची हद्द कमी करणे आणि दिघी मॅगझीन रेड झोनची हद्द कमी करणे. हे दोन्ही प्रस्ताव संरक्षण विभागाकडे पाठविण्यात आले आहेत. या प्रकरणी माननीय संरक्षण मंत्री अनुकूल आहेत. संरक्षण आस्थापनेला कोणताही धोका न होता ज्या गोष्टींची परवानगी देणे शक्य आहे त्या फास्ट ट्रॅकवर देण्याचा त्यांचा निर्णय आहे. राज्य सरकारने देखील त्यास प्रतिसाद देऊन ते प्रस्ताव पाठविलेले आहेत. या प्रस्तावांचा पाठपुरावा करून त्यास मान्यता घेण्यात येईल.

.4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 3419...

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. त्या ठिकाणी असलेल्या लोकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिका आणि राज्य सरकाला खर्च करण्यास संरक्षण विभाग परवानगी देत नाही. तेथील घरे जुनी झालेली आहेत. तेथे झोपडपट्टी आहे. त्या ठिकाणी एसआरए योजना राबविता येत नाही. या सर्व प्रश्नाची सोडवणूक करण्याकरिता राज्य शासन संरक्षण विभागाशी चर्चा करणार काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी अगोदर सांगितलेले आहे की, त्या ठिकाणी संरक्षण विभागाकडून ब्लँकेट ऑडर्स मिळू शकणार नाहीत. महानगरपालिकेला स्पेसिफीक केसेस आयडेन्टीफाय कराव्या लागतील. आम्हाला या भागामध्ये सुविधा पुरवावयाच्या आहेत त्यासाठी परवानगी पाहिजे असा प्रस्ताव महानगरपालिकेला जिल्हाधिकारी यांचेमार्फत संरक्षण विभागाकडे पाठवावा लागेल. त्यानंतर संरक्षण विभाग त्यावर निर्णय घेईल. या प्रकरणी माननीय संरक्षण मंत्री अनुकूल आहेत. तेव्हा अशाप्रकारच्या ज्या काही केसेस असतील त्याबाबत लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन जिल्हाधिकारी यांचेमार्फत संरक्षण विभागाकडे पाठवाव्यात. त्याठिकाणी संरक्षण विषयक सामुग्री तयार करणे वा अन्य असे डेपो आहेत त्यास कोणाताही धोका न होता ज्या ज्या ठिक्ाणी परवानगी देणे शक्य आहे ती देण्याची अनुकूलता माननीय संरक्षण मंत्र्यांनी दाखविली आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, काही ठिकाणी संरक्षण विभागाच्या जागा आहेत. मग अनेक शहरांमध्ये कॅन्टोन्मेट बोर्ड तयार होतात, त्यांची एक वेगळी ऑथॉरिटी तयार होते. परंतु कॅन्टोन्मेंट बोर्ड आणि त्याच्या बाहेरची जागा यातील मधल्या जागांची फार कुचंबणा होते. असा अनुभव नाशिक, औरंगाबाद, नगर, पुणे या विभागांना आलेला आहे. तो संपूर्ण विभाग संरक्षण विभागाच्या अखत्यारित येतो. जेथे नागरी वस्ती असेल त्यांना सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेचे आणि नगरपालिकेचे काम आहे आणि त्यामध्ये अडथळे निर्माण होतात. संरक्षण विभागाच्या दृष्टीने जो विभाग संवेदनशील आहे त्या विभागामध्ये काही करता येत नाही. आमच्या नाशिकच्या आर्टीलरी सेंटरमध्ये कितीतरी गावे बाधित झाली आहेत. तेव्हा राज्य शासनाने या सर्व जागांचा आढावा घेऊन जेथे नागरी सुविधा देण्याची आवश्यकता आहे त्या देण्याचा प्रयत्न राज्य शासन करेल काय ?

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 3419...

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, ज्या ज्या ठिकाणी स्थानिक प्राधिकरणे आहेत त्यांना सूचना देण्यात येतील की, त्यांनी ज्या ज्या मागण्या आहेत त्या आयडेन्टीफाय करुन त्या राज्य शासनाकडे पाठवाव्यात. त्यावर राज्य शासन उचित निर्णय घेईल. जर आवश्यकता असेल तर त्या त्या जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना तेथील लोकप्रितिनिधीशीं बैठक घेण्यास सांगण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेकडून हा प्रस्ताव गेलेला आहे. केंद्र सरकारकडून परवानगी मिळाल्याशिवाय आपण प्रकल्प पूर्ण करु शकत नाही त्यामुळे आपल्या विकासात अडथळा येतो. हे सर्व प्रस्ताव जलद गतीने मंजूर व्हावेत यासाठी राज्य शासनामार्फत भविष्यात एक समन्वय कक्ष स्थापन करण्यात येईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, त्या ठिकाणी रेसिडन्स कमिशनर आहेत. त्या शिवाय श्री.लोकेश चंद्र, आयुक्त यांची देखील नियुक्ती केलेली आहे. ते या सर्व गोंष्टीचा सातत्याने पाठपुरावा करीत आहेत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, प्रत्येक केस संरक्षण मंत्रालयाकडे मंजुरीसाठी पाठवावी लागते. सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी सांगितले की, त्या ठिकाणी झोपडपट्टी आहे आणि तेथे प्राथमिक सुविधा द्यायच्या आहेत. त्या परिसरामध्ये उड्डाणपूल बांधायचे असेल तर संरक्षण मंत्र्यांशी बोलून धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड आहे तेथे बिग्रेडिअर दर्जाचे अधिकारी मुख्य असतात. संरक्षण विभागाचे अधिकारी आणि महानगरपालिकेचे आयुक्त यांची एक समिती स्थापन करावी. कारण प्रत्येक वेळेला माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालून ते प्रकरण संरक्षण मंत्रालयाला पाठवावयाचे, त्याचा पाठपुरावा करायचा ही पद्धत योग्य नाही. तेव्हा एखादी स्थायी समिती नेमून संरक्षण विभागाचे अधिकारी आणि महानगरपालिकेचे आयुक्त यांना अशा प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिता अधिकार द्यावेत अशा प्रकारचा प्रस्ताव राज्य सरकार संरक्षण मंत्रालयास पाठवणार काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3419....

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, डीफेन्स एस्टॅब्लीशमेंट संदर्भात केंद्र सरकारचा कायदा आहे. या कायद्याच्या विविध तरतुदींतर्गत डीफेन्स इस्टेट आणि त्यांची वेगवेगळी जी प्राधिकरणे आहेत त्यांना या संदर्भात डील करण्याचा अधिकार दिलेला आहे. व्हायटल एस्टॅब्लीशमेंट कोणत्या आहेत, त्याच्या बाहेर किती जागा आरक्षित असावयास पाहिजे, ज्या व्हायटल नाहीत त्या ठिकाणी काय असावयास पाहिजे, या बाबतची मानके त्यांनी तयार केलेली आहेत. त्या मानकांमध्ये काही बदल करण्याची विनंती अगोदरच केंद्र सरकारला केलेली आहे. आपल्याच विनंतीवरुन त्यांनी 2011 चे नोटीफिकेशन रद्द करुन त्या पूर्वीच्या अशा अनेक प्रकरणांना मान्यता सुध्दा दिली आहे. परंतु यामध्ये अधिक व्यापकता आणण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात माननीय संरक्षण मंत्र्यांसोबत एक बैठक झाली आहे. ते या विषयी बरेच सकारात्मक आहेत. याचे सातत्याने परस्युलेशन करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी बरेच समाधानकारक उत्तर दिलेले आहे. परंतु या प्रश्नावर ज्या वेळी चर्चा झाली त्यावेळी त्या भागातील आयुक्त, पालकमंत्री आणि संरक्षण तसेच नगर विकास विभाग यांच्याकडेच हा विषय येतो. ज्या प्रश्नांचे निर्णय प्रलंबित राहिले आहेत त्या बाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन निर्णय घ्यावा. त्यांनी अशा प्रकारची बैठक घेतली तर धोरणात्मक सूचना आणि तांत्रिक अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून देता येतील. परिणामी, या संदर्भातील अंमलबजावणी होऊ शकेल. त्या भागात चार विभागीय आयुक्त, चार महानगरपालिका आयुक्त, तसेच देहू रोड सारख्या कॅन्टोनमेंटमध्ये जिल्हाधिकारी यांचा संबंध येतो. त्यामुळे पुढील काळात माननीय मुख्यमंत्री या संदर्भातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी बैठक आयोजित करतील काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : महोदय, एकत्रित बैठक घेऊन हा प्रश्न सुटेल असे मला वाटत नाही. परंतु त्या त्या पालकमंत्र्यांना या बाबत सूचना देण्यात येतील. जेणेकरुन नेमके प्रश्न निश्चित होतील आणि त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करता येईल.

--------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ठाणे येथील प्रशासकीय सेवा प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेच्या इमारतीमध्ये होत असलेल्या पाण्याच्या गळतीबाबत**

***(३)** * **३५४१** ***ॲड.निरंजन** **डावखरे :*** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** ठाणे महानगरपालिकेमार्फत ठाणे येथे राज्यातील प्रशासकीय सेवेचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे म्हणून चिंतामणराव ऊर्फ सी.डी.देशमुख यांचे नावाने प्रशिक्षण संस्था चालविली जात असून सदर संस्थेस ठाण्यातील ***IASu फॅक्टरी*** म्हणून संबोधिले जाते, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, सदर इमारतीत प्रशासकीय सेवा प्रशिक्षणाचे वर्ग भरत असलेल्या कक्षात गेल्या वर्षापासून तेथील वरच्या मजल्यावरील प्रसाधनगृहातील पाण्याच्या गळतीमुळे वर्गामध्ये दुषित सांडपाणी साठून प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
***(३)*** असल्यास, सदर इमारतीची तातडीने दुरूस्ती व डागडुजी करावी म्हणून प्रशिक्षण संस्थेच्या प्रशासनाने ठाणे महानगरपालिका प्रशासनाकडे गेल्या वर्षभरापासून अनेकदा अर्ज-विनंत्या करूनही त्याप्रकरणी अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
***(४)*** असल्यास, त्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने याप्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ***?***

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रशासकीय सेवेचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे याकरीता ठाणे महानगरपालिकेमार्फत संचलित संस्था चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था । या नावाने ओळखली जाते.
***(२)*** इमारतीच्या तळमजल्यावरील वर्ग खोली क्रमांक-१ मध्ये गळती होत असल्याचे जानेवारी २०१४ मध्ये निदर्शनास आले. मात्र त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर कोणताही परिणाम झाल्याची बाब आढळून आली नाही.
***(३)*** होय.

इमारतीमधील १ ल्या मजल्यावरील स्वच्छता गृहाची दुरुस्ती करण्याबाबत महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार केल्यानंतर पहिल्या मजल्यावरील स्वच्छतागृहाचा वापर कायमस्वरुपी बंद केला असल्याने सांडपाणी / दुषित पाण्याबाबतची चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण या संस्थेची समस्या दुर झालेली आहे.
***(४)*** प्रश्न उद्‌भवत नाही.

ता.प्र.क्र.3541....

ॲड.नीरंजन डावखरे : सभापती महोदय, ठाण्यामध्ये प्रशासकीय सेवेचे प्रशिक्षण देणारी ही इमारत आहे. ही इमारत जुन्या ठाणे महापालिकेची आहे. ही जुनी इमारत प्रशासकीय सेवा प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावी म्हणून माननीय उप सभापती श्री.वसंतराव डावखरे यांच्या पुढाकाराने ती देण्यात आली आणि त्या ठिकाणी प्रशिक्षण देण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. पहिल्या मजल्यावर प्रशासकीय सेवेचे प्रशिक्षण आणि उर्वरित तीन मजल्यावर ग्रंथालयाची सुविधा विद्यार्थ्यांना पुरविली जाते. परंतु ग्रंथालयाच्या टॉयलेटमध्ये लिकेज असल्यामुळे वरच्या मजल्याचे पाणी प्रशिक्षण वर्गामध्ये गळते. परिणामी, प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यामुळे अडचण निर्माण झालेली आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाने ग्रंथालयाचे टॉयलेट बंद केल्यामुळे समस्येचे निराकरण झाले आहे. मी विचारु इच्छितो की, टॉयलेट बंद केल्यामुळे तेथील अडचण दूर कशी होईल ? या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, सदरहू टॉयलेटच्या लिकेजेसची दुरूस्ती सार्वजनिक बांधकाम विभाग करणार काय आणि त्यासाठी शासन निधी उपलब्ध करून देणार काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न योग्य आहे. वास्तविक पाहता ज्यावेळी टॉयलेटमधून गळती होत होती त्यावेळी ती गळती बंद करण्यासाठी ग्रंथालय विभागाने त्याची दुरूस्ती करणे अपेक्षित होते. परंतु ग्रंथालय विभागाकडे कोणताही निधी नसल्यामुळे त्या दोघांनी मिळून शॉर्टकट काढला आणि ते टॉयलेटच बंद करून टाकले. वास्तविक पाहता असे करणे योग्य नाही. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्यानुसार निश्चितपणे ग्रंथालय विभागाला निधी देण्यात येईल. तसेच सदरहू टॉयलेट दुरूस्त करून, ग्रंथालयात येणाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, केवळ शौचालय दुरूस्त करण्याचा विषय नाही. हा संपूर्ण इमारतीच्या दुरूस्तीचा विषय आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, संपूर्ण इमारतीची दुरूस्ती करण्याचा शासन निर्णय घेणार काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3541....

श्री.देवेंद्र फडणवीस : महोदय, ही इमारत महानगरपालिकेची आहे. त्यामुळे या इमारतीचे ऑडिट करुन काही सुधारणा करणे आवश्यक असेल तर त्या करण्याबाबत महानगरपालिकेला सूचना देण्यात येतील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रशिक्षण संस्थेला चिंतामणराव देशमुख यांचे नाव देण्यात आलेले आहे. या राज्यातून मोठे झालेले आणि अभ्यासू व्यक्तिमत्व असलेल्या सी.डी.देशमुख यांचे नाव या इमारतीला देण्यात आलेले आहे. या इमारतीतून आयएएस चे प्रशिक्षण मिळावे हा उद्देश आहे. शासनाने विशेष बाब म्हणून ही इमारत नव्याने बांधावयाची असेल तर नव्याने बांधून किंवा ग्रंथालयाला आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन तसेच आयटीच्या माध्यमातून अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या तर तेथील प्रशिक्षणार्थी अधिक मोठ्या प्रमाणावर शिक्षित होऊन, आयएएस मध्ये महाराष्ट्राचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वतः याकडे लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, महानगरपालिका आणि महाराष्ट्र शासन यांनी एकत्रित येऊन या संस्थेला ज्या व्यक्तीचे नाव दिले आहे त्या व्यक्तीच्या नावाला साजेसे काम शासन भविष्यात हाती घेईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : होय.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुंबईत एसआरए योजनेच्या पुनर्विकास प्रकल्पाचे**
**काम नियमावली प्रमाणे करण्याबाबत**

***(४)*** * **३८२२ *श्री.प्रकाश* बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनील तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.अनिल परब, श्रीमती विद्या चव्हाण, *ॲड*.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** मुंबई शहर आणि उपनगरात महानगरपालिकेच्या जमिनीवर वसलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे तसेच म्हाडाअंतर्गत योजनेचे अनेक प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, मुंबईत एसआरए योजनेच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी स्वतंत्रपणे विकास नियमावली असतांना अनेक विकासकांनी नियमावलीस बगल देवून इमारत बांधकामात अनियमितता केल्याबाबत एसआरए प्राधिकरणाने काही विकासकांना नोटीसा पाठविल्या आहेत, हे खरे आहे काय,
***(३)*** असल्यास, सदर विकासक कोणकोणते आहेत व त्यांचेवर कोणती कारवाई केली आहे,
***(४)*** तसेच सदर एसआरए प्रकल्पाचे काम नियमावलीप्रमाणे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
***(५)*** अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री. प्रकाश मेहता :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तसेच म्हाडाच्या मालकीच्या जमिनीवरील अनुक्रमे ११७ व ९६ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव परिशिष्ट-२ अनुक्रमे बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडाकडील सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त न झाल्यामुळे प्रलंबित आहेत.
***(२), (३)*** व (४) एस.आर.ए.ने विकासकांनी नियमालीस बगल देवून केलेल्या अनियमितते अनुषंगाने मागील एक वर्षाच्या कालावधीत १२ योजनांसंदर्भात खालील नमूद ११ विकासकांवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

१) श्री.एस.व्ही.जोशी,
२) मे.हरिओम कन्स्ट्रक्शन (श्री.जोसेफ)
३) मे.अरिहंत कन्स्ट्रक्शन कंपनी
४) इम्तियाज अहमद पार्टनर ऑफ ज्योती बिल्डर्स सी.ए.टू.विकास हाऊसिंग लि.
५) पवन सेठ ॲण्ड असोसीएट
६) मे.मिका इंजीनीअर्स
७) मे.फाईन डेव्हलपर्स,
८) मे.के.के.कन्स्ट्रक्शन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3822
श्री.प्रकाश महेता....

९) मे.जयेश बिल्डर्स
१०) मे.हरे कृष्णा बिल्डर्स
११) मे.धृवी कन्स्ट्रक्शन

त्यापैकी मे.के.के. कन्स्ट्रक्शन यांचेकडून रुपये २४,३९,१००/- इतका दंड वसूल करण्यात आला असून मे.अरिहंत कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेविरुद्ध मुलुंड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

*(५)* प्रश्न उद्‌भवत नाही.

महोदय, मी आपल्या अनुमतीने पहिल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करु इच्छितो.

महोदय, पहिल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये '117' या संख्येऐवजी '129' ही संख्या वाचावी.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात नमूद केले आहे की, "बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तसेच म्हाडाच्या मालकीच्या जमिनीवरील अनुक्रमे 129 व 96 झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव परिशिष्ट-2 अनुक्रमे बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडाकडील सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त न झाल्यामुळे प्रलंबित आहेत." या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, ज्या अधिकाऱ्यांनी या सर्व कामी विलंब लावला आहे त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ? तसेच उत्तर क्रमांक 2, 3 व 4 मध्ये कारवाई करण्यात आलेल्या 11 विकासकांची नावे देण्यात आलेली आहे. माझ्या माहितीनुसार मुंबई शहरातील अनेक एसआरए योजनांमध्ये वेगवेगळ्या पध्दतीने धांदली होत असतात. अनेक ठिकाणी झोपडपट्टीवासीयांची संख्या जास्त दाखविली जाते, काही ठिकाणी परवानगी नसताना अनेक मजले वाढविले जातात. यापूर्वी सुध्दा अशाच प्रकारचा प्रश्न या सभागृहात आला होता. 11 विकासकांवर करण्यात आलेली कारवाई ही अपुरी आहे. या निमित्ताने मी विचारतो की, या प्रकरणी संपूर्ण चौकशी करुन दोषी असलेल्या उर्वरित विकासकांची नावे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3822

श्री.प्रकाश बिनसाळे....

काय ? महोदय, उत्तराच्या शेवटी असे नमूद केले आहे की, "मे.के.के.कन्स्ट्रक्शन यंचेकडून रुपये 24.39,100/- इतका दंड वसूल करण्यात आला असून, मे.अरिहंत कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेविरुध्द मुलुंड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे." 11 विकासकांवर कारवाई करण्यात आली, परंतु त्यापैकी केवळ एकाच विकासकाने दंड भरला आणि अन्य एका विकासकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या निमित्ताने मी विचारतो की, उर्वरित विकासकांवर गुन्हा का दाखल केला नाही ? महोदय, एसआरए योजनेच्या माध्यमातून मुंबई शहरात एफएसआय स्कॅण्डल होते, अनेक ठिकाणी गुंडांकडून झोपडपट्टीवासीयांना धमक्या देऊन एसआरए योजना राबविली जाते किंवा 70 टक्के रहिवाशांच्या सह्या मिळविण्यासाठी प्रयत्न केला जातो. त्यामुळे एसआरए योजनांवर लक्ष ठेवण्यासाठी व या योजनेत कोणतीही धांदली होऊ नये यासाठी शासन कायमस्वरुपी मॉनिटरींग यंत्रणा आणि कारवाई करणारी यंत्रणा निर्माण करणार काय ? तसेच दुसरी बाब अशी की, या प्रकरणी ज्या पोलीस केसेस होतात त्यातील अनेक केसेस प्रलंबित राहतात. त्यामुळे अशा प्रकरणांचा निपटारा तातडीने करण्यासाठी, तसेच ज्यांनी गैरप्रकार केले असतील त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी शासन काही पावले उचलणार आहे काय ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, म्हाडाच्या मालकीच्या जमिनीवरील अनुक्रमे 129 व 96 झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे ते प्रलंबित आहेत. किती वेळेत परिशिष्ट-2 दिले पाहिजे यासाठी नियम तयार करुन एसआरए योजनेतील गलथानपणा दूर केला जाईल.

तसेच दुसरी बाब अशी की, ज्या 96 इमारतींचे ॲनेक्श्चर तयार केले नाही त्याचे कारण असे की, तीन वर्षापूर्वी तत्कालीन सरकारने असा निर्णय घेतला होता की, म्हाडाच्या जमिनीवर झोपडपट्ट्यांचा विकास म्हाडा स्वत: करणार आहे. हे काम एसआरए ला देणार नाही. त्यामुळे या गोंधळात हे राहिले. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 1 डिसेंबर, 2014 रोजी म्हणजेच 13 वर्षानंतर पहिल्यांदा प्राधिकरणाची बैठक घेतली. त्यावेळी हे सर्व विषय समोर आले. नियमावलीस बगल देऊन काम करणाऱ्या विकासकांची संख्या 11 नाही, कदाचित यापेक्षा जास्त असेल. परंतु 11

..8..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

SJB/ AKN/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 13:20

ता.प्र.क्र.3822

श्री.प्रकाश महेता...

विकासकांपैकी 2 विकासकांना शिक्षा करण्यात आली आहे. इतर विकासकांची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 च्या कलम 53 अन्वये चौकशी करीत आहोत. अशा प्रकारे नियमांना डावलून काम करणारे इतर विकास असतील तर त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कलम 53 अन्वये कारवाई आणि दंडात्मक कारवाई करण्यात कोणताही अडथळा नाही.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3822....

श्री. प्रकाश महेता ....

मुंबईत योजनेला वेग मिळत नाही, अनेक अडचणी निर्माण होत आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी विस्तृत बैठक घेतल्यानंतर काही मार्गदर्शक तत्वे बनविली आहेत. परिशिष्ट 2 पासून गोंधळ सुरू होतात. विकासकांची, लोकांची गटबाजी टाळण्यासाठी नियमबध्द कार्यक्रम कसा करता येईल ते पाहण्यात येईल. आपण ठरविले होते की, म्हाडा त्यांच्या जमिनीवरील एसआरए योजना स्वतः बनविणार. परंतु आता म्हाडा एसआरए योजना न बनविता झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंतर्गतच ही योजना पूर्ण करण्यात येईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, म्हाडाकडे तीन ते साडे तीन हजार कोटी रूपये शिल्लक आहेत. इमारतींचे बांधकाम करणे हे म्हाडाचे काम आहे. मुंबई दुरूस्ती मंडळ वेगळे आहे. मुंबई गृहनिर्माण मंडळ आहे. म्हाडाच्या जमिनीवरील एसआरए योजना आहेत, त्या एसआरएच्या नियमावलीने मंजूर कराव्यात. परंतु या योजना म्हाडानेच केल्या पाहिजेत जेणेकरून हाऊसिंग स्टॉकचा प्रश्न सुटू शकतो. शासनाच्या वतीने स्वस्त दरात घरे देण्याचा प्रयत्न केला जातो, त्यासाठी हाऊसिंग स्टॉक एसआरएच्या योजनेतून मोठ्या प्रमाणात मिळू शकतो. शासन गिरणी कामगारांना घरे देऊ शकत नाही. आपण या माध्यमातून तेही करू शकता. म्हाडाच्या 96-97 योजना आहे, ज्यावर स्लम आहे, त्या सर्व योजनांची म्हाडाच्या माध्यमातून एसआरएच्या नियमावलीमध्ये पुनर्बांधणी करून घरे उपलब्ध करून देणार आहात का ?

श्री. प्रकाश महेता : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली, तेव्हा म्हाडाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मागच्या शासनाने आम्हाला सांगितले आणि आम्ही तपासून घेतले. पण 3 वर्षांत आम्ही एकही झोपडपट्टी योजना तयार करू शकलो नाही. म्हाडाने मत व्यक्त केले की, आम्ही एसआरए झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प करू शकत नाही. (अडथळा) आता शिवशाही प्रकल्प मिळेल. परंतु तोपर्यंत शिवशाही प्रकल्प सुध्दा अस्तित्वात नव्हता. 1 डिसेंबरला माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतल्यानंतर शिवशाही प्रकल्पामध्ये योग्य सक्षम अधिकारी

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3822....

श्री. प्रकाश महेता ....

नेमला आहे. स्वस्त घरे मोठ्या प्रमाणात निर्माण व्हावीत यासंबंधीचे धोरण एसआरएच्या माध्यमातून किती करता येईल ते पाहत आहोत. शासन नवीन धोरण तयार करीत आहे. 15 दिवसांच्या आत धोरण नक्की होईल आणि ते तुम्हाला मिळेल. शासनाचा या संदर्भातील हेतू स्पष्ट आहे.

**सभापती** : मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, विधानसभा व विधानपरिषदेत मुंबईतील सन्माननीय सदस्य आहेत. आपण आपले धोरण त्यांच्याशी चर्चा करून केलेले जास्त योग्य होईल असे मला वाटते.

श्री. प्रकाश महेता : सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांकडे धोरणाचे प्रारूप पाठवून त्यांचेही मत घेऊन धोरण तयार करण्यात येईल.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी असे घोषित केले होते की, मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नवीन धोरण जाहीर करू. परंतु आता त्याला थोडा कालावधी लागला तरी चालेल. सर्व सन्माननीय सदस्यांना अगोदर धोरणाचा मसुदा पाठविण्यात येईल, त्यावर त्यांचे म्हणणे ऐकून घेऊनच धोरण अंतिम करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, के.के. कस्ट्रक्शनचे डायरेक्टर कोण आहेत, कंपनीचे शेअर होल्डर्स कोण आहेत, ही कंपनी काळ्या यादीत टाकणार का ? दंडात्मक कारवाईच्या संदर्भात सांगण्यात आले आहे. एसआरए वेगळे क्षेत्र होत आहे. एसआरए डेव्हलप करण्याचे वेगळे षडयंत्र मुंबईत सुरूआहे. विशिष्ट लोक, राजकीय पाठबळ, गुंडांचे पाठबळ यामुळे मुंबईत एसआरए डेव्हलपमेंट होत नाही. मी पुन्हा विचारतो की, कंपनीचे डायरेक्टर कोण आहेत, शासन त्या कंपनीला काळ्या यादीत टाकणार का, कंपनीचे शेअर होल्डर्स कोण आहेत ? माननीय मंत्र्यांकडे या संदर्भातील माहिती आता उपलब्ध नसेल तर ती पटलावर ठेवावी.

श्री. प्रकाश महेता : सभापती महोदय, एकूण 12 कंपन्या आहेत. के.के. कन्स्ट्रक्शन या कंपनीच्या मालकाचे नाव मला माहीत नाही. मी ते पटलावर ठेवतो. सन्माननीय सदस्यांना कदाचित माहीत असेल तर प्रश्नोत्तराच्या तासानंतर कंपनीचे कोण शेअर होल्डर्स आहेत ते मला त्यांनी सांगावे. तपास करण्यात येईल. ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3822....

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरात दिलेली 11 कंपन्यांची यादी एका वर्षातील आहे. 15-20 वर्षांत एसआरए योजना झोपडपट्टीवासियांसाठी कमी आणि विकासकाला मुंबईतील जमिनी बळकाविण्याचे कुरण होऊन बसले आहे. एसआरए योजनेत अनियमितता खूप आहे. प्रश्नाच्या उत्तरात 11 विकासकांची यादी दिली आहे. गेली अनेक वर्षे नियमबाह्य कामे केली आहेत. काही लोकांनी नाले वळविले आहेत तर काही लोकांनी पोईसर, मिठी नद्यांचे प्रवाह बदलले आहेत. शासन अशा लोकांवर कडक कारवाई करणार का ? 24 लाख 39 हजार रूपये इतका दंड सांगितला आहे. मी म्हणते की, हा दंड विकासकाचा बाल सुध्दा बाका करू शकत नाही. 1 फ्लॅटची किंमत 1 कोटी रूपयांच्या वर आहे. ही योजना झोपडपट्टीवासियांसाठी कमी आहे. मोठे टॉवर बांधले जात आहेत. लो इंकम ग्रुपसाठी घरे बांधण्यासाठी या योजनेची जोड दिली तर मुंबईतील मध्यमवर्गीयांना घरे मिळू शकतील. शासन या संदर्भात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न करणार का ?

सभापती महोदय, म्हाडमध्ये 600 ते 650 इंजिनिअर्स आहेत, ते काय कामे करतात ? म्हाडाची घरे मध्यमवर्गीयांना परवडत नाहीत. आपण त्यांना पांढरा हत्ती म्हणून पोसणार आहात का ? म्हाडामध्ये दलाली चालते. चौ.फुटांवर भ्रष्टाचार चालतो. आपण यावर कसे वेसन घालणार आहात ?

श्री. प्रकाश मेहता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले खरे आहे. 15 वर्षे चौ.फुटामागे मोजमाप झाल्यामुळेच माजी माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयी थोडा चाप दिला. त्यानंतर ते सर्व लाईनवर आले आहे. बऱ्याच इमारती, इंडस्ट्रीमध्ये चौ.फुटा मागे मोठा गोंधळ माजवला होता, त्याला स्थगिती मिळाली आहे. आता त्याच लाईनवर पुढे जाऊन 24 लाख रूपये दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. 53 अन्वये असलेल्या तरतुदीमध्ये वाढ करावी लागली तर तेही करण्यात येईल. झोपडपट्टीच्या सर्व योजना 14-15 वर्षे रखडल्या आहेत. गृहनिर्माण धोरण 14-15 वर्षे सुस्पष्ट नव्हते. त्यामुळे स्पष्ट धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी नवीन गृहनिर्माण धोरण आणत आहोत. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सुध्दा परवडणारी घरे सर्वसामान्यांसाठी मिळणार का

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3822....

श्री. प्रकाश महेता ....

यासंबंधी सुध्दा स्पष्टता करणार आहोत. हाऊसिंग बोर्ड ही मोठी एजन्सी आहे, त्यांना सुध्दा स्वस्त घरे योजनेच्या माध्यमातून कामाला लावून त्यांच्या उपयोगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सर्वसामान्यांसाठी, मध्यमवर्गीयांसाठी घरे निर्माण करण्याच्या योजनेचा विचार करीत आहोत. योजना कार्यशील, गतीशील राहील एवढेच मी तुम्हाला सांगतो. आम्ही त्याची दखल घेणार आहोत.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांना माहीत आहे की, मी अनेक वर्षे एसआरएच्या संदर्भात मुंबईत लढा देत आहे. आघाडी सरकारने सन 2000 पर्यंतच्या खरेदी-विक्रीला मान्यता असा कायदा केला. अनेक वर्षे तो कायदा रखडला होता. कायदा केला, त्याचा शासन निर्णय आला, पैसे भरून त्यांना मान्यता द्यायची होती. परंतु ती अजून दिलेली नाही. शासन निर्णय कदाचित खाली गेला नसेल. अनेक झोपडपट्टीधारक पात्र झाले असते तर एसआरएमध्ये पुढे एलवाय मिळला असता आणि पुढे काही झाले असते. एसआरएच्या माध्यमातून 10-12 वर्षांत 10-15 हजार पीएपी घरे तयार आहेत. परंतु ती म्हाडाने किंवा सरकारने ताब्यात घेतलेली नाहीत. ती अंधेरी भागांत आहेत. ती घरे लवकर ताब्यात घेऊन पोलिसांना किंवा बाकीच्यांना देणार का ?

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3822.......

श्री.भाई गिरकर.......

सभापती महोदय, एस.आर.ए.चे अनेक प्रकल्प रखडलेले आहेत आणि त्याच झोपडपट्टीत आणखी झोपड्या वाढत आहेत. त्यामुळे गुगलवर सर्च करुन मुंबई शहरामध्ये एस.आर.ए.मध्ये एकूण किती घरे आहेत, याची तपासणी करण्याबाबतच्या मुद्याचा समावेश नवीन गृहनिर्माण धोरणात शासन करणार आहे का ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सन 1992 व त्यानंतर आता सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांना आपण पात्र ठरविले आहे. काही ठिकाणी झोपडीधारकाने झोपडी दुसऱ्याला विकली आहे. त्यामुळे झोपडीचे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी सांगितले ते खरे आहे. काही विभागांपर्यंत शासनाच्या सूचना पोहोचलेल्या नाहीत. परंतु, आम्ही गेल्या 100 ते 150 दिवसांपासून या संदर्भातील प्रयत्न करीत आहोत. मागील निर्णयांना गती देण्याच्या दृष्टीने निश्चितपणे तत्काळ कार्यवाही करु

सभापती महोदय, गेल्या 10 ते 12 वर्षात अनेक लोक प्रकल्पबाधित झाले आहेत. एस.आर.ए.च्या माध्यमातून बिल्डरकडून बांधण्यात आलेली घरे ताब्यात घेणे गरजेचे आहे. यासाठी आपण प्रकल्पबाधित लोकांची यादी तयार केली आहे. प्रकल्पबाधितांना घरे देण्यासंबंधीचे आदेश मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले आहेत. हे काम गेल्या 10 ते 12 वर्षांपासून रखडलेले आहे. नवीन गृहनिर्माण धोरण तयार करीत असताना हे काम गतीने कसे करता येईल, याचा निर्णय शासन करील.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, एस.आर.ए.योजनेच्या संदर्भात मुख्यमंत्री महोदय आणि गृहनिर्माण मंत्री महोदयांनी चांगल्या सूचना केल्या आहेत. एक नवीन गृहनिर्माण धोरण निश्चित केले जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले आहे. नवीन गृहनिर्माण धोरण निश्चित होईल, तेव्हा होईल. परंतु, आज विकासक, विविध विभागांचे अधिकारी आणि पोलीस संगनमताने झोपडपट्टीत राहणाऱ्या गरीब लोकांची लुटमार करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

बिनसाळे यांनी सांगितले आहे, ते खरे आहे. एस.आर.ए.स्किम तयार करीत असताना जे लोक

..2....



ता.प्र.क्र.3822.......

प्रा.जोगेंद्र कवाडे........

झोपडीत रहात नाहीत, त्यांची नावे समाविष्ट करण्यात येत आहेत आणि जे खरोखरच झोपडीत राहतात, त्यांना वगळण्यात येत आहे. अशा प्रकारे विकासक, विविध विभागांचे अधिकारी आणि पोलीस संगनमताने केवळ झोपडपट्टीधारकांचीच नाही तर शासनाचीही फसवणूक करीत आहेत. ही फसवणूक थांबविण्यासाठी शासन संबंधितांविरुध्द कठोर कारवाई करणार आहे का आणि त्यांना प्रतिबंध करणार आहे का ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगला प्रश्न विचारला आहे. अशा प्रकारची कोणतीही घटना घडली असेल, घडत असेल आणि ती संबंधितांनी शासनाच्या लक्षात आणून दिली तर चोवीस तासांच्या आत त्याची दखल घेतली जाईल. आपल्या माध्यमातून मी या सभागृहाच्या आणि सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील आणि विशेषत: मुंबईतील जनतेच्या हे लक्षात आणून देतो की, असे प्रकार कुठे घडत असतील तर सर्वसामान्य झोपडपट्टीधारकांना न्याय देण्याची शासनाची भूमिका आहे. जर कोणी अधिकारी किंवा विकासक गडबड करीत असेल आणि ते शासनाच्या लक्षात आणून दिले तर शासन निश्चितच झोपडपट्टीधारकाला मदत करण्याची भूमिका ठामपणे व तत्काळ घेईल.

-------------

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पुण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांची संख्या वाढविण्याबाबत**

**(5) * ३२०१ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांची संख्या वाढविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधीतांकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी निवासस्थांनामध्ये वाढ करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५५मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, पोलीस कर्मचारी यांच्या निवासस्थानाची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळाकडून पुणे शहरातील पोलीस अधिकारी व कर्मचा-यांसाठी एकूण १०८५ निवासस्थाने बांधण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, एकूण 1085 निवासस्थाने बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. माझा प्रश्न असा आहे की, सध्या अस्तित्त्वात असलेल्या इमारती पाडून ही निवासस्थाने बांधण्यात येणार आहेत का, नसल्यास, नवीन भूखंड घेऊन तेथे निवासस्थाने बांधण्यात येणार आहेत का ?

सभापती महोदय, पुण्यातील कर्मचारी वसाहतींची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. काही ठिकाणी टॉयलेट नाहीत, टॉयलेट असतील तर ती पडावयास आली आहेत, इमारतींची दुरावस्था आहे. मी माझ्या आमदार निधीतून पुणे पोलिसांना निवासस्थानांच्या दुरूस्तीसाठी निधी दिलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, जुन्या इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी किंवा संपूर्ण दुरूस्तीसाठी शासन काही आर्थिक तरतूद करणार आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेले प्रश्न योग्य आहेत. साधारणपणे 80 टक्के सॅटिसफॅक्शन लेव्हल असली पाहिजे, असा विचार आपण करीत असतो. म्हणजेच, किमान 80 टक्के कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थाने उपलब्ध झाली पाहिजेत, अशी अपेक्षा आहे. परंतु, पुणे येथे तशी परिस्थिती नाही. त्या ठिकाणी सुमारे 4151 निवासस्थानांची कमतरता आहे.

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3201....

श्री.देवेंद्र फडणवीस......

सभापती महोदय, निवासस्थाने तयार करण्याच्या संदर्भात सुरुवातीला एक प्लॅन तयार करण्यात आला होता व त्या माध्यमातून 1085 निवासस्थाने उपलब्ध होणार होती. त्या पलीकडे जाऊन आपण आता असा नवीन निर्णय केला आहे की, मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद या अ-वर्ग महानगरपालिकांमध्ये पोलीस हाऊसिंगसाठी 4 एफ.एस.आय.देण्यात यावा. तशा प्रकारचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, सध्या पुणे येथे अस्तित्त्वात असलेली पोलिसांची निवासस्थाने ही इंग्रजांच्या काळातील बरॅकच्या स्वरुपात आहेत. त्यामुळे या सर्व वसाहतींचा पुनर्विकास करुन मोठ्या प्रमाणावर पोलिसांसाठी हाऊसिंग स्टॉक उपलब्ध करता येईल. तशा प्रकारचे आदेश दिलेले आहेत. त्यासोबतच नव्याने मंजूर केलेल्या एफ.एस.आय.चा उपयोग करुन 3 एफ.एस.आय.मध्ये पोलिसांची निवासस्थाने आणि 1 एफ.एस.आय.विक्रीकरिता उपलब्ध करुन खाजगी तत्त्वावर बांधकाम करुन घेण्याचाही विचार आहे. तसेच, पोलीस गृहनिर्माण मंडळाला बांधकाम करावयाचे असेल तर हुडकोकडून 500 कोटी रुपयांचे कर्ज काढण्यास त्यांना अनुमती दिलेली आहे. त्यामुळे आता 'नीति' आणि 'निधी' दोन्ही गोष्टी ठरलेल्या आहेत. या संदर्भातील प्रस्ताव तातडीने तयार करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी पोलिसांसाठी विशेष एफ.एस.आय.चे जाहीर केलेले धोरण स्वागतार्ह आहे, चांगले आहे, त्याबद्दल वाद असण्याचे काही कारण नाही. या माध्यमातून शासनालाही काही निधी उपलब्ध होणार आहे व बांधकामासाठी शासनाला काही तोशीसही पडणार नाही.

सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेचा विकास आराखडा शासनाला सादर होणार आहे. यामधून काही शासकीय किंवा निमशासकीय भूखंड उपलब्ध होणार असतील तर ते भूखंड पोलीस किंवा अन्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी आरक्षित करुन त्याचा वापर निवासस्थानांसाठी करण्याबाबतचा निर्णय शासन घेणार आहे का ?

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3201....

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, विकास आराखडा तयार करीत असताना पोलीस स्टेशन आणि पोलीस गृहनिर्माण यांचा विचार केला जात असतो. सन्माननीय सदस्यांनी सुचविल्यानुसार पुन्हा एकदा सूचना देण्यात येतील.

सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, आजही पुणे पोलीस विभागाकडे जागा आहे. कारण, इंग्रजांच्या काळातील बरॅक त्या ठिकाणी आहेत, तशा त्या अनेक ठिकाणी आहेत. त्यामुळे कमी प्रमाणात घरे आणि मोठ्या प्रमाणात मोकळी जागा, अशी परिस्थिती त्या ठिकाणी आहे. अशा परिस्थितीत योग्य नियोजन करुन योग्य प्रकारे बांधकाम केले तर मोठ्या प्रमाणावर हाऊसिंग स्टॉक निर्माण केला जाऊ शकतो. बास्केट ॲप्रोच म्हणतो तशा प्रकारचा ॲप्रोच शासनाने घेतलेला आहे. जास्तीत जास्त घरांची निर्मिती केली पाहिजे, यासाठी पोलीस गृहनिर्माण मंडळाला प्रोत्साहन देण्यात येत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करीन. त्यांनी नवीन गृहनिर्माण धोरण निश्चित करण्याची घोषणा केली आहे. परंतु, हे धोरण सर्व राज्यभर राबविले जाणार आहे का ?

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यात अलिबाग येथे असलेल्या पोलीस निवासस्थानांची अत्यंत दयनीय अवस्था आहे. पोलिसांची मुले गुंडगिरीकडे वळली आहेत, असे वातावरण त्या ठिकाणी आहे. राम मंदिर ट्रस्टच्या जागेसंदर्भात मी आजच मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा केली आहे. अलिबाग हे शहर एमएमआरडीएमध्ये अंतर्भूत आहे. त्यामुळे या ठिकाणी 4 एफ.एस.आय.मंजूर करण्यात येईल का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना जरुर तपासून बघू आणि त्या संदर्भात उचित कार्यवाही करु.

सभापती महोदय, सद्य:स्थितीत महानगरपालिका क्षेत्रामध्ये ही बाब लागू करण्यासाठी नोटिफिकेशन काढले आहे. फक्त औरंगाबाद येथे निवडणूक आचारसंहिता असल्यामुळे त्या

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3201....

श्री.देवेंद्र फडणवीस.......

महानगरपालिकेचा समावेश त्यामध्ये करण्यात आलेला नाही. तथापि, सन्माननीय सदस्यांनी एमएमआरडीए रिजनसाठी हे लागू करावे, अशी जी सूचना केली आहे, ती तपासून कार्यवाही करु.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, सध्या अस्तित्त्वात असलेल्या पोलीस गृहनिर्माण मंडळावर फक्त अधिकाऱ्यांचीच नेमणूक केलेली आहे. त्यांना बांधकामाचा कोणताही अनुभव नाही. त्यामुळे ज्या राजकीय किंवा बिगर राजकीय लोकांना बांधकाम क्षेत्रातील चांगला अनुभव आहे, चांगले ज्ञान आहे, अशा आर्किटेक्ट, इंजिनिअर व्यक्तिची या महामंडळावर नियुक्ती केल्यास प्रभावीपणे या मंडळाचे काम होऊ शकेल, असे मला वाटते. या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या महामंडळावर सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्यांना प्रतिनियुक्तीवर पाठविण्याचा निर्णय नुकताच शासनाने घेतला आहे.

-----------

...7.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## पुण्यातील येरवडा तुरुंगातील कैद्यांकडे मोबाईल हॅन्डसेट व सिमकार्ड मिळाल्याबाबत

**(6) * ३२९५ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुण्यातील येरवडा तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांकडे मोबाईल हॅन्डसेट व सिमकार्ड मिळाली असून इतर कैदीही त्या मोबाईलचा वापर करत असल्याचे तपासाअंती निष्पन्न झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, शासनाच्या संबंधीत विभागाने या प्रकरणास आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(3) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे नाही.

मात्र, न्यायाधीन बंदी मुन्ना दावल शेख याचे कोठडीमध्ये दिनांक ०६.०५.२०१४ रोजी कारागृहामधील अधिकाऱ्यांनी घेतलेल्या झडतीमध्ये मोबाईल जप्त करण्यात आलेला आहे.
(2) व (३) अशा प्रकरणास आळा घालण्यासाठी १ मोबाईल डीटेक्टर, २४ नग मोबाईल जामर, ३० नग वॉकी-टॉकी सेट, १३५ सी.सी.टीव्ही कॅमेरे, १२ नग हॅन्ड मेटल डीटेक्टर, १ नग डोअर फ्रेम मेटल डीटेक्टर, १ नग बॅगेज स्कॅनर यासारख्या प्रभावी उपाययोजना कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3295...

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांच्या नागपूर शहरातील जेलमध्ये मोबाईल सापडल्याची चर्चा चार पाच दिवसापूर्वी करण्यात होती. पुणे येथील येरवडा जेलमध्ये मोबाईल सापडल्याची बातमी आलेली आहे. मुख्यमंत्री महोदयांनी लेखी उत्तरात नाही म्हटले आहे. परंतु याबाबत काय उपाययोजना करण्यात येईल या प्रश्नाला उत्तर देतांना असे नमूद केले आहे की, एक मोबाईल डिटेक्टर, 24 मोबाईल जामर, 30 वॉकी टॉकी वगैरे. याबाबत मला मुख्यमंत्री महोदयांकडून खुलासा पाहिजे की, ही सर्व व्यवस्था संपूर्ण महाराष्ट्रातील जेलसाठी करण्यात आली आहे किंवा फक्त येरवडा जेलपुरती करण्यात आली आहे. ही व्यवस्था केली ही बाब स्वागतार्ह आहे. जामर, स्कॅनर व डिटेक्टर असताना नागपूर किंवा येरवडा जेलमध्ये असे प्रकार कसे काय घडतात. याबाबत यापुढे काय उपाययोजना करण्यात येणार आहे. नागपूर येथे एका आरोपीला त्याच्या पत्नीला एकांतात भेटण्याची परवानगी दिली होती. एकांत शब्दाच्या तपशीलात मी अधिक जात नाही. अशा प्रकारच्या चर्चा होत असताना याबाबत मुख्यमंत्री महोदय काय उपाययोजना करणार आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, नागपूरची घटना अतिशय गंभीर आहे, त्याबाबत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे इतर कारागृहाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या यंत्रसामुग्रीतील काही सामुग्री येरवड्यासाठी व इतर काही कारागृहासाठी आहे. यातून काही गोष्टी लक्षात आल्या आहेत की, नागपूर जेलच्या संदर्भात सन 2014 च्या सातव्या किंवा आठव्या महिन्यात राज्य शासनाकडे एक पत्र आले होते. त्यामध्ये नमूद केले होते की, तेथे 100 पेक्षा जास्त मोबाईल आहेत. राज्य सरकारला खाली पहावे लागेल अशी घटना घडण्याची शक्यता आहे. असे असताना देखील त्याबाबत त्यावेळी कारवाई करण्यात आली नाही म्हणून आता चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. इतके स्पेसिफिक इनपूट नागपूर व येरवडा कारागृहाच्या संदर्भात आल्यानंतर कारवाई झाली नाही. या ठिकाणी जेल प्रशासनात एकवाक्यता दिसून येत नाही. आता सर्व ठिकाणी छापे मारण्याची कारवाई सुरु करण्यात आली आहे. ही घटना जुनी असली तरी आज तेथे अशी परिस्थिती असल्याचे गृहीत धरुन रात्रीचे छापे मारण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. जामर ज्या प्रमाणात इफेक्टीव्ह पाहिजेत ते तसे नाहीत

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3295...

श्री.देवेंद्र फडणवीस...

त्यामुळे टेक्नॉलॉजी प्रोव्हायडर यांच्याशी चर्चा करुन जामर टॉवर्स उभे करता येतील काय याबाबत माहिती घेतली जात आहे. त्या माध्यमातून कारवाई करण्यात येणार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, येरवडा कारागृहाच्या संदर्भात शिवसेना युवा नेते श्री.आदित्य ठाकरे यांच्याकडे आलेली माहिती गृह विभागाकडे पोहचविली आहे. सभागृहात मला मुद्दाम सांगायला पाहिजे की, काही कैदी एक ते दोन महिना तेथे राहून आले आहेत, त्यांच्याकडून जी माहिती प्राप्त झाली ती लेखी स्वरुपात माननीय मुख्यमंत्री सांगतील त्या अधिकाऱ्यांकडे देण्याची आमची तयारी आहे. काही कैद्यांनी दोन रुम बुक केल्या होत्या. हे लोक पाहिजे तेवढ्या जास्तीच्या गाद्या मागवून घेतात. असे सर्व प्रकार येरवडा कारागृहात सुरु आहेत. मुख्यमंत्री महोदयांचा इरादा अत्यंत नेक आहे. वर्षानुवर्षे याबाबत तक्रारी येऊन त्याबाबत दुर्लक्ष का होत आहे. याबाबत चौकशी करण्यात येईल काय ? या तक्रारी सर्वज्ञात आहेत, त्या ठिकाणी कोणी तरी अशी व्यक्ती आहे की, या सर्व लोकांना ती प्रोटेक्ट करीत असावी. यासंदर्भातील माहिती आम्ही कोणत्याही अधिकाऱ्यांना सांगू शकत नाही. ही माहिती कोणाला सांगावी असा प्रश्न निर्माण होतो म्हणून सभागृहात प्रश्न विचारण्यात आला आहे. येरवडा जेलमध्ये ज्या अपप्रवृत्ती वाढीस लागल्या आहेत. त्यांना संरक्षण देणारे कोण अधिकारी आहेत, याबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, डीजी ॲन्टीकरप्शन यांना नागपूर जेलच्या संदर्भात चौकशी करण्याचे सांगण्यात आले आहे. आज वेगवेगळ्या जेलमधून जी माहिती येत आहे, ती अतिशय गंभीर आहे. नागपूर सह इतर जेलमध्ये काय परिस्थिती आहे. त्यावर काय उपाययोजना कराव्या लागतील यासंदर्भातील सूचना डीजी ॲन्टीकरप्शन यांना देण्यात येतील. मी मघाशी सांगितले की हे प्रकार अतिशय गंभीर आहेत, येथील अधिकाऱ्यांमध्ये एकवाक्यता दिसत नाही. नागपूर येथील 10 ते 11 अधिकारी/कर्मचारी सस्पेंड करण्यात आले आहेत. ज्या अधिकाऱ्यांचा यामध्ये सहभाग आहे त्यांना सस्पेंड करुन राज्य शासन थांबणार नाही तर त्यांना नोकरीतून काढून टाकण्यात येईल असा निर्णय करण्यात येत आहे.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3295...

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, दिनांक 6/5/2014 रोजी मुन्ना दावल शेख यांच्या कोठडीत मोबाईल सापडला होता. त्यावर पुढे काय कारवाई झाली हा माझा प्रश्न आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, गुन्हेगाराची झडती घेतांना अधीक्षकांना मोबाईल सापडला आहे. त्यांच्या रुटीन कारवाईत मोबाईल सापडला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर कारवाईचा प्रश्न निर्माण होत नाही. गुन्हेगारावर निश्चितपणे नियमानुसार कारवाई सुरु करण्यात आली आहे.

-------------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नाशिक शहरातील गुन्हेगारीवर आळा घालण्याबाबत**

***(७)* * २८२० डॉ.*अपूर्व* हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

*(१)* नाशिक शहरात माहे नोव्हेंबर, २०१४ अखेरपर्यंत ११ महिन्याच्या कालावधीत ९७७ दुचाकी, चारचाकी वाहनांची चोरी झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
*(२)* असल्यास, गतवर्षात बॅग लिफ्टींग, चेन स्नॅचिंग यासारख्या जबरी चोरीचे एकुण ११३ गुन्हे घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
*(३)* असल्यास, प्रश्नोक्त बाब १ व २ मधील गुन्हे घडून तसेच चोऱ्या घरफोड्या सारख्या घटना सातत्याने घडल्यानंतरही सदरहू गुन्ह्यांची चौकशी होण्यास विलंब होत आहे व सदरहू गुन्हे पोलीस कर्मयाऱ्यांची संख्या कमी असल्याने प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
*(४)* असल्यास, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभुमीवर नाशिक शहरातील गुन्हेगारीवर आळा घालून गुन्हेगारी कमी करण्यासाठी व पोलीसांचे संख्याबळ वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
*(५)* नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत *?*

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस आयुक्त, नाशिक यांचे कार्यक्षेत्रात नमूद कालावधीत ६४६ दुचाकी व चारचाकी वाहन चोरीचे गुन्हे दाखल आहेत.
*(२)* होय, गतवर्षात पोलीस आयुक्त, नाशिक यांचे कार्यक्षेत्रात बॅग लिफ्टींग, चैन स्नॅचिंगचे १२४ गुन्हे दाखल आहेत.
*(३)* हे खरे नाही. गुन्ह्याबाबत माहिती मिळताच ताबडतोब पोलीस अंमलदार घटनास्थळी रवाना करुन तपास सुरु करण्यात येतो. पोलीस आयुक्त, नाशिक यांचे आस्थापनेवरील मंजूर पोलीस संख्याबळातून पोलीस कामकाजाचे नियोजन करुन त्यामधूनच गुन्ह्यांचा तपास पूर्ण करुन घेवून कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.
*(४)* गृह विभागाच्या दि. ०४/०३/२०१४ च्या शासन निर्णयानुसार पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचे आस्थापनेवर विविध संवर्गात ४४२ पदे निर्माण करण्यात आले आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्यादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखणे करिता अन्यघटकाकडून जादा पोलीस मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याचे प्रस्तावित आहे.कायदा व सुव्यवस्था राखणेकरिता कर्मचारी अधिकारी यांना वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येते. तसेच कोंबींग ऑपरेशन, ऑलआऊट ऑपरेशन तसेच झोपडपट्टी चेकींग करुन सराईत व संशयीत गुन्हेगार यांचा शोध घेवून त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाइ करण्यात येते.सोसायटी मिटींग आयोजित करणे, नागरिकांनी सतर्क राहणेकरिता मार्गदर्शन करणे, सूचना फलक लावणे, तत्काळ संपर्काकरिता नियंत्रण कक्ष, पोलीस ठाणे यांचे फोन नंबर प्रसिध्द करणे इ. कार्यवाही करण्यात येते. तसेच स्थानिक संस्थांच्या मदतीने शहरात ठिकठिकाणी सी.सी.टी.व्ही. बसविण्याची कार्यवाही चालू आहे.
*(५)* विलंब झालेला नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, दोन तीन महिन्यानंतर नाशिक येथे कुंभ मेळा होणार आहे. मुख्यमंत्री महोदयांनी उत्तरात कुंभ मेळ्याच्या निमित्ताने अधिक पोलीस देण्याचे मान्य केले आहे. कुंभ मेळ्यासाठी आता किती पोलीस दल उपलब्ध आहे. या काळात त्यामध्ये किती वाढ

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2820...

श्री.हेमंत टकले....

करण्यात येणार आहे. नोव्हेंबर 2014 पर्यंत 977 वाहनांची चोरी झाली होती असा प्रश्न विचारण्यात आला होता तर त्याबाबत 646 चोरीचे गुन्हे दाखल झाले असे सांगण्यात आले आहे. तुलनात्मक दृष्ट्या ही संख्या कमी नाही. पोलीस आयुक्तालयात जी पदे महत्वाची आहेत, त्या पदांवर गेल्या काही वर्षातील अनुभव असा आहे की, त्या पदाला न्याय देतील असे पोलीस अधिकारी तेथे देण्यात आले नाहीत. नाशिक सारख्या महत्वाच्या आयुक्तालयात असा अनुभव आला आहे की, ज्यांचा सेवानिवृत्ती काळ जवळ आला असे वरिष्ठ पोलीस अधिकारी तेथे पाठविले जातात. त्यांना तेथील कामात फारसा रस नसतो. तेथे जे पोलीस आयुक्त काही वर्षात होऊ गेले त्याबाबत तेथील नागरिकांशी चर्चा केल्यावर असे लक्षात येते की, सक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने कुंभ मेळा लक्षात घेऊन पोलीस दलाची पुनर्रचना व आवश्यक असलेला वेगवेगळ्या वयोगटातील पोलीस कर्मचारी शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येतील काय ?

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने शहरात ठिकठिकाणी सीसीटीव्ही बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. ही कार्यवाही किती दिवसांपासून सुरु आहे. किती ठिकाणी सीसीटीव्ही बसविले आहेत. आयजी हे एक तेथे स्वतंत्र विभागीय पद आहे. आयुक्त आणि डीजी हे समकक्ष पद आहे, कुंभ मेळ्यासाठी व पोलीस यंत्रणा सक्षम करण्यासाठी पोलीस यंत्रणेत आमुलाग्र बदल करण्यात येतील काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, नाशिक मध्ये एकूण अधिकाऱ्यांची 273 पदे मंजूर आहेत. त्यापैकी 248 पदे भरण्यात आली असून 28 पदे रिक्त आहेत. शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांची 3036 पदे मंजूर असून त्यापैकी, 2941 भरलेली आहेत व 95 पदे रिक्त आहेत. कुंभ मेळ्यासाठी जवळपास 15 हजार पोलीस अतिरिक्त द्यावे लागणार आहेत याबाबत सर्व तयारी राज्य सरकारने केली आहे. यासाठी नाशिक जिल्ह्यातील निवडणुका व इतर ग्रामपंचायत निवडणुका अगोदर घेण्यात आल्या आहेत. नाशिक येथील कुंभ मेळ्यासाठी राज्यातील संपूर्ण पोलीस फोर्स उपलब्ध करुन देण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. नाशिकमध्ये नवीन सीपी नियुक्त करण्यात आले आहेत. नाशिक येथील पद वरिष्ठ असल्यामुळे तेथे वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती होते.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2820...

श्री.देवेंद्र फडणवीस...

आता नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना सेवा निवृत्तीसाठी वेळ आहे, सेवा निवृत्तीला आलेले अधिकारी तेथे देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे तेथे ते उचित काम करतील. सीसीटीव्हीच्या संदर्भात टेंडर प्रोसेस करण्यात आली आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी काही आक्षेप घेतले होते. याबाबत चौकशी नेमण्यात आली आहे. त्र्यंबक येथील सीसीटीव्हीबाबत आक्षेप होता. त्यामुळे सीसीटीव्ही संदर्भातील पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही. नाशिक येथील सीसीटीव्हीबाबत काही आक्षेप नसल्यामुळे ती प्रोसेस करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही सर्व चौकशी लवकर संपवून कुंभ मेळा सुरु होण्या अगोदर सीसीटीव्ही लावणे आवश्यक आहेत, त्यामुळे यासंदर्भातील सर्व अहवाल प्राप्त करुन पुढील कार्यवाही तातडीने करण्यात येईल.

------

या नंतर श्री.बोरले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**रत्नागिरी जिल्ह्यातील वशिष्टी-दाभोळ खाडीला पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्याबाबत**

***(८)*** *** ३०९१ *श्रीमती* हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर** ***:*** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** रत्नागिरी जिल्ह्यातील वशिष्टी-दाभोळ खाडीला पर्यटन स्थळ घोषित करून त्याचा केरळच्या धर्तीवर पर्यटनात्मक विकास व्हावा अशी तेथील समस्त गांवकऱ्यांची मागणी असल्याचे फेस्टिवलच्या माध्यमातून माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, चिपळूण नगर परिषदेच्या पर्यटन विकास निधीतून बोटिंगसाठी एक जेटीही तयार करण्यात आली असून ती जेटी पर्यटकांसाठी खुली होणार आहे, हे ही खरे आहे काय,
***(३)*** असल्यास, सदरील वशिष्टी-दाभोळ खाडीला पर्यटनचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे आला आहे काय,
***(४)*** असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
***(५)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
***(२)*** नाही.
***(३)*** नाही. श्री राम रेडीज, रा. चिपळूण यांचेकडून दि. १६/५/२०१३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे विनंती प्राप्त झालेली आहे.
***(४)*** व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, तारांकित प्रश्नात "नाही" असे लेखी उत्तर दिलेले आहे. मला खात्री आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी त्या ठिकाणी निश्चितपणे भेट दिलेली नाही. त्याच प्रमाणे, ज्या अधिकाऱ्यांनी या प्रश्नाचे लेखी उत्तर दिलेले आहे त्या अधिकाऱ्यांनी देखील त्या ठिकाणी भेट दिलेली नसेल. त्यामुळे या तारांकित प्रश्नाला "नाही" असे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, वशिष्टी नदी पूर्वी उन्हाळ्यामध्ये कोरडी होत होती. परंतु, जेव्हा पासून कोयनेचे अवजल या नदी पात्रात सोडण्यात आले तेव्हा पासून ती नदी बारमाही वाहते. त्या ठिकाणी एका बाजूला डोंगरांची रांग, नारळाच्या झाडांची रांग, निळेभोर पाणी आणि अतिशय सुंदर

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती हुस्नबानू खलिफे..........

असा गोवळकोट किल्ला आहे. तारांकित प्रश्नाला "नाही" असे उत्तर दिलेले असल्यामुळे मी त्या ठिकाणाचे वर्णन करीत आहे. हे अतिशय सुंदर ठिकाणी आहे आणि ते खाडी लगत असल्यामुळे त्या ठिकाणी बॅक वॉटर येते. त्यामुळे ज्या प्रमाणे केरळचे बॅक वॉटर पर्यटन केंद्र आहे त्या प्रमाणे हे ठिकाण विकसित होऊ शकेल आणि ते चांगले पर्यटन केंद्र म्हणून विकसित झाले तर महसूल देखील वाढू शकतो आणि अतिशय चांगले पर्यटनही होऊ शकते. म्हणून शासन हे ठिकाण पर्यटन केंद्र म्हणून घोषित करणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, "नाही" उत्तर यासाठी देण्यात आलेले आहे की, शासनातर्फे त्या ठिकाणी कोणतेही फेस्टिव्हल आयोजित करण्यात आले नव्हते. ग्लोबल चिपळून टुरिझम मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी या खाजगी संस्थेने दिनांक 27.11.2014 च्या दरम्यान गोवळकोट चिपळूण येथे हे फेस्टिव्हल आयोजित केले होते. परंतु, त्याही ठिकाणी अशा प्रकारची मागणी आल्याची शासनाकडे कोठेही नोंद नाही. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयात जे रेडिज आहेत त्यांनी दिनांक 16.05.2013 रोजी अशा प्रकारचे एक निवेदन दिलेले आहे आणि त्या संदर्भात त्यांनी अशी मागणी केलेली आहे की, याचा पूर्ण बृहत आराखडा तयार करुन त्या संदर्भातील कार्यवाही करण्यात यावी. अद्याप राज्य शासनाकडे हे प्राप्त झालेले नाही. परंतु, तरी देखील सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केलेली आहे आणि खरोखर ही महत्वाची जागा आहे. म्हणून राज्य शासन याबद्दल सकारात्मक आहे. राज्य शासन स्वत: यामध्ये लक्ष घालेल आणि त्या ठिकाणी पर्यटन स्थळ तयार करण्याच्या संदर्भात पुढील कार्यवाहीचे आदेश दिले जातील.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, कोकणात केरळच्या धर्तीवर बॅक वॉटरचे क्षेत्र तयार करण्याच्या दृष्टीकोनातून खूप मोठ्या प्रमाणावर पोटेंशियल आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या संदर्भात सर्व्हेक्षण करुन पुढील 5 वर्षाचे बॅक वॉटर निर्माण करण्यासंदर्भात शासन आराखडा तयार करणार आहे काय ? कारण, अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन आणि पलीकडे मंडणगढ, दापोली पासून ते थेट सिंधुदुर्ग, वेंगुर्ला पर्यंतच्या निसर्गरम्य खाडी किनाऱ्यामध्ये आपल्याला बॅक वॉटरसाठी

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.........

मोठ्या प्रमाणावर क्षेत्र निवडता येतील. म्हणून तसे सर्व्हेक्षण करुन आराखडा तयार करण्यात येणार आहे काय ? तसेच, सागरी महामार्गावर काही खाडी पूल आहेत. माननीय मुख्यमंत्री परवा शिवपुण्यतिथी निमित्त रायगडावर उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी 300 कोटी रुपये जाहीर केलेले आहेत. वास्तविक पाहता मी अर्थमंत्री असताना तो पूल नाबार्ड योजने अंतर्गत सुरु करण्याचा प्रस्ताव होता. तो नवीन प्रस्ताव नाही. खाडी मार्गावरील जे पूल आहेत ते करण्यासाठी नाबार्डच्या योजने अंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला जाईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे आणि दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर तपासून कार्यवाही केली जाईल.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** महिला बचत गटांना देण्यात आलेल्या पूरक पोषण आहार पुरवठ्यासंबंधी

**मु.शी.:** महिला बचत गटांना देण्यात आलेल्या पूरक पोषण आहार पुरवठ्यासंबंधी संबंधी माननीय महिला व बाल विकास मंत्र्यांचे निवेदन.

श्रीमती पंकजा मुंडे (महिला व बाल विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करते :-

सभापती महोदय, दिनांक 7 एप्रिल, 2015 रोजी विधान परिषदेच्या कामकाज पत्रिकेतील अ.क्र.8 वरील महिला व बाल कल्याण विभागाशी संबंधित लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आली होती. या चर्चेच्या अंती उप सभापती महोदयांनी खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

सर्व सन्माननीय सदस्यांनी या विषयाबाबत भावना व्यक्त केलेल्या आहेत. शासनातर्फे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. राज्यातील आर्थिक दृष्टया कमकुवत महिलांना न्याय मिळणे आवश्यक आहे. परंतु, या विषयाची व्यापकता लक्षात घेता या संदर्भात सभागृहात निर्णय होईल, असे मला वाटत नाही. म्हणून या संपूर्ण विषयाला न्याय देण्याच्या दृष्टीने मी उद्या दुपारी म्हणजे आज दुपारी 4.00 वाजता माझ्या दालनात संबंधित सन्माननीय सदस्यांची माननीय मंत्री महोदयांसमवेत बैठक आयोजित करतो. ज्या 3 महिला संस्थांच्या बाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांनी ऑब्जेक्शन घेतलेले आहे, ते ठेकेदार आहेत किंवा कसे, हे मला माहीत नाही. परंतु, त्यांचे पुरवठा करण्याचे काम ताबडतोब बंद करावे आणि 64 महिला बचत गट संस्थांना ताबडतोब उर्वरित काम देण्यात यावे, असे आदेश काल उप सभापती महोदयांनी दिलेले आहेत.

सभापती महोदय, प्रस्तुत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात विभागाचे मंत्री या नात्याने मी स्पष्ट केले की, या 64 बचत गटांच्या संदर्भात उर्वरित कार्यवाही लवकरात लवकर करुन त्यांना परवानगी देण्यास शासन कटिबद्ध आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार या मुलांना जे अन्न दिले जाते त्यामध्ये जास्तीत जास्त प्रोटीन, कॅलरीज, न्युट्रेन्स असणे आवश्यक आहेत आणि तसे अन्न दिले

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे..........

जावे, यासाठी लागणाऱ्या सर्व पद्धतीचा अवलंब करण्यात यावा. त्यामध्ये हायजिन मेन्टेन केले जावे. (...अडथळा...) हे व्यक्तिगत निवेदन नाही. मंत्री म्हणून मी शासनाच्या वतीने हे निवेदन करीत आहे. त्यामुळे हे आदेश पाळण्यास शासन कटिबद्ध आहे. (...अडथळा...) माननीय उप सभापतींनी निर्देश दिलेले आहेत. हे माझे कर्तव्य आहे की, मी सभागृहाच्या निदर्शनास काही गोष्टी आणून देणार आहे. त्यामुळे माझे असे म्हणणे होते की, 553 प्रकल्पांची तपासणी करुन जे योग्य आहेत त्यांना यामध्ये घ्यावे आणि जे अयोग्य आहेत त्यांना नक्कीच हद्दपार करण्याबाबतची भूमिका मी काल व्यक्त केलेली आहे. या 64 महिला बचत गटांच्या बाबतीत आहार पुरवठा करण्याचे काम होते. मी सभागृहाचा जास्त वेळ न घेता शासन कटिबद्ध आहे असे सांगितलेले आहे. त्यांची तपासणी करुन लवकरात लवकर यांना काम देण्याच्या बाबतीतील भूमिका मी कालही जाहीर केलेली आहे. परंतु, ज्या 3 महिला बचत गट संस्था आहेत त्यांचे पुरवठा करण्याचे काम ताबडतोब बंद करावे, असे निर्देश देण्यात आले होते आणि असेही सांगण्यात आले होते की, सर्वोच्च न्यायालयाचे तसे आदेश आहेत. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने पिपल्स युनियन फॉर सिव्हील लिबर्टीज विरुद्ध केंद्र शासन व इतर या प्रकरणात स्पेशल कोर्ट कमिशनरची नियुक्ती केली होती. काल सांगण्यात आले होते की, एसआयटीची नियुक्ती केली होती, तर हे खरे नाही. कमिशनरच्या रिपोर्टमध्ये टीएचआरसंबंधी जो अहवाल दाखल केलेला आहे तो फक्त महाराष्ट्राचा नाही तर संपूर्ण देशाचा आहे आणि त्यांनी त्यामध्ये काही मुद्यांची नोंद केलेली आहे. त्यामध्ये त्यांनी या संस्थांविषयी काही आक्षेपही घेतलेले आहेत, हे सत्य आहे. परंतु, या संदर्भात आम्हाला सुप्रीम कोर्टाने अद्याप कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे पिपल्स युनियन फॉर सिव्हील लिबर्टीज विरुद्ध केंद्र शासन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या स्पेशल कोर्ट कमिशनर यांनी सादर केलेल्या अहवालात ओरिसा आणि केरळ प्रमाणे स्थानिक बचत गटांना चांगल्या प्रकारे पुरवठा करण्याच्या संदर्भातील निर्णय घेतला. आपण दोन्ही राज्यातील टीएचआरच्या आयुक्तालयातील अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन अहवालही सादर केलेला आहे. महिला बाल विकास आणि महिला

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे.........

बचत गट मंडळांकडून टीएचआर पुरवठा करुन घेऊन त्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबवून राज्यभर 314 बचत गटांना पुरवठा आदेश दिलेले आहेत. मी आताच आपल्याला 64 बचत गटांबद्दल अतिशय सकारात्मक प्रतिक्रिया दिलेली आहे आणि त्याची प्रक्रिया सुरु आहे. जेथे बचत गट उपलब्ध नाहीत, जेथे बचत गट पात्र ठरलेले नाहीत अशा ठिकाणीच फक्त या संस्थांना आहार पुरवठ्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे, केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे किमान 300 दिवस आहार देणे आवश्यक आहे आणि त्यामुळे पूर्वीच्या 3 महिला संस्थांकडून होत असेलेला पुरवठा आजच्या आज म्हणजे कालच्या काल बंद करणे शक्य होणार नाही, तातडीने पर्यायी व्यवस्था करणेही शक्य होणार नाही आणि ते तपासून आम्ही योग्य तो निर्णय घेऊ. मुख्य उद्देश कुपोषणावर मात करणे हा आहे आणि त्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

---------

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, काल या लक्षवेधी सूचनेला सन्माननीय मंत्री महोदयांनी उतर दिले. मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधन न झाल्यामुळे माननीय उप सभापतींनी या संदर्भात निर्देश दिले. आज दुपारी माननीय उप सभापतींच्या दालनात संबंधित सर्व बचत गट, सन्माननीय सदस्य यांची बैठक घेऊन या संदर्भात निर्णय घेण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. माननीय मंत्री महोदयांनी शासनाच्या वतीने सभागृहात निवेदन केलेले आहे. शासनाच्या वतीने निवेदन करण्यात आलेले असल्यामुळे मी बोलत आहे. वैयक्तिक निवदेनावर बोलण्याचा अधिकार नाही. शासनाच्या वतीने सभागृहात निवेदन करण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांची एवढीच मागणी होती की, ज्या 64 बचत गटांची जिल्हाधिकाऱ्यांकडून तपासणी झालेली आहे, त्यांना ज्या फॉरमेटमध्ये फॅम्टरी उभी करण्यास सांगण्यात आले होते त्या फॉरमेटमध्ये त्यांनी फॅक्टरी उभी केलेली आहे. ते पात्र ठरलेले आहेत.

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे......

त्या पात्र संस्थांची जिल्हाधिकाऱ्यांच्या समितीने पाहणी केल्यानंतर त्यांच्याशी ॲग्रीमेंट केले गेले. त्या ॲग्रीमेंटनुसार संस्थांना 3 वर्षे काम द्यावे लागते. त्या 64 बचत गटांना तत्काळ काम द्यावे हीच भूमिका लक्षवेधी सूचना मांडण्यामागे होती, दुसरी कोणतीही भूमिका नव्हती. कोर्टाचे आदेश काय आहेत, त्याचे पालन करायचे की नाही हा शासनाचा विषय आहे. निवेदनामध्ये ते नमूद केले आहे. उद्या अडचण निर्माण झाली तर पुन्हा सभागृहात प्रश्न उपस्थित होईल. आज आमची एकच भूमिका आहे की, 64 बचत गटांना शासन काम देऊ शकते, त्यांना काम मिळावे. आज दुपारी 4.30 वाजता आयोजित केलेल्या बैठकीच्या संदर्भात काय निर्णय झाला हे आम्हाला माहिती नाही. त्या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करावे.

**सभापती** : माननीय उप सभापतींबरोबर विचारविनिमय करुन बैठक होणार आहे की नाही हे अवगत केले जाईल.

-------

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचना

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन प्रस्तावाच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत. पहिली सूचना माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे, सर्वश्री सुनील तटकरे, हेमंत टकले, रामराव वडकुते, ख्वाजा बेग, दिपकराव साळुंखे पाटील, वि.प.स.यांनी दिलेली आहे. सूचनेतील विषय "राज्यातील मराठा, धनगर, मुस्लीम या समाजाला आरक्षण देण्यासंबंधी असलेली मागणी" हा आहे. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना थोडक्यात म्हणणे मांडण्याची संधी देत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, म.वि.प.नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. राज्यातील मराठा, धनगर व मुस्लीम या तीन प्रमुख समाजांकडून आरक्षण मिळण्याबाबत मागणी करण्यात आली होती. या आरक्षणाच्या मुद्यावरुन या तीनही प्रमुख समाजांमध्ये शासनाच्या विरोधात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. शासकीय, निमशासकीय सेवा व शैक्षणिक कारणासाठी मराठा समाजाला 16 टक्के व मुस्लीम समाजाला शैक्षणिक कारणासाठी 5 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय आघाडी सरकारने जुलै, 2014 मध्ये घेतला होता. त्या संदर्भातील अध्यादेश काढण्यात आला. काही दिवसांपूर्वी उच्च न्यायालयाकडून मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत अंतरिम स्थगिती देण्यात आली असून मुस्लीम समाजाला शैक्षणिक कारणासाठी आरक्षण देण्यास हरकत नाही असा उच्च न्यायालयाने निकाल दिला आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये सत्तांतर झाल्यानंतर राज्य सरकारने मराठा समाजाला 16 टक्के आरक्षण लागू केले होते. त्या आरक्षणाला उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिलेली असताना राज्य सरकारने कायदा पारित करण्याची भूमिका घेतली. त्या भूमिकेचे आम्ही समर्थन केले होते. मागील हिवाळी अधिवेशनात त्या संदर्भातील विधेयक सभागृहामध्ये मांडण्यात आले होते. आम्ही सातत्याने आग्रह धरला होता की, मराठा समाजाला जे आरक्षणाचे आमिष दाखविले जात आहे, त्याबाबतचा कायदा संमत करण्यात यावा. त्याचबरोबर मुस्लीम समाजाला 5 टक्के शैक्षणिक आरक्षण लागू करण्याबाबत कायदा मंजूर करण्यात यावा. त्यावेळी संसदीय कार्यमंत्र्यांनी आम्हाला सांगितले होते की, मुस्लीम समाजाच्या आरक्षणाबाबतचा प्रस्ताव महाअधिवक्त्यांकडे पाठविला आहे, त्यांचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल. अद्यापही तो निर्णय झालेला नाही. मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत विधेयक का मांडले जात आहे या प्रश्नाला उत्तर देताना असे सांगण्यात आले की, अंतरिम स्थगिती दिली आहे ती उठविण्यासाठी राज्य सरकारच्या

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

कायद्याचा आधार मिळू शकतो. परंतु कायदा मंजूर करूनही अंतरिम स्थगिती उठविण्याबाबत राज्य सरकारला मदत झाली नाही. आज या दोन्ही समाजांमध्ये शासनाच्या विरोधात असंतोष निर्माण झाला आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 289 अन्वये हा विषय स्थगन प्रस्तावाचा कसा होतो या मेरिटवर भाष्य केले पाहिजे. चर्चा करण्यास सरकार घाबरत नाही. मूळ विषयाला हात घातला तर चर्चा लांबेल, ती एकतर्फी होईल. त्यामुळे हा विषय नियम 289 चा कसा होतो हे सांगावे आणि आपण त्याबाबत निर्णय द्यावा.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मराठा आणि मुस्लीम समाजाला आघाडी सरकारने आरक्षण लागू केले होते. मराठा समाजाच्या 16 टक्के आरक्षणाचा कायदा कोर्टात टिकला नाही. आज राज्यातील मराठा समाजाच्या मनामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. मुस्लीम समाजाच्या मनामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. धनगर समाजाला एका महिन्यात आरक्षण लागू करण्याचे कबूल करूनही त्या समाजाला अद्याप आरक्षण लागू करण्याबाबत शासनाने पाऊल उचललेले नाही. या तीनही प्रमुख समाजांना न्याय देण्यासाठी आजचे सर्व कामकाज बाजूला सारून या प्रस्तावावर चर्चा घेण्यात यावी अशी मी विनंती करतो.

**सभापती** : नियम 289 अन्वये उपस्थित केलेला विषय आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबींसंबंधात नसल्याने म.वि.प.नियम 289 च्या उपरोक्त सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

नियम 289 अन्वये दुसरी सूचना माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी दिलेली आहे. सूचनेतील विषय "मुंबईमधील मानखुर्द येथील मोहिते-पाटील नगरामध्ये दिनांक 6 एप्रिल, 2015 रोजी अवैध अतिक्रमणे काढण्यास गेलेल्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर दगडफेक करणे, कॉलर पकडून धमकी देणे, महिला अधिकाऱ्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करणे" हा आहे. मी माननीय सदस्यांना थोडक्यात म्हणणे मांडण्याची संधी देत आहे.

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मुंबईतील मानखुर्द येथील मोहिते-पाटील नगरात अवैध बांधकाम पाडण्यासाठी गेलेल्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना सत्तेमध्ये सहभागी असलेल्या एका राजकीय पक्षाच्या नेत्यांनी कर्तव्य बजावण्यापासून रोखले, त्यांच्यावर दगडफेक करण्यात आली, एका पोलीस उप निरीक्षकावर कढईतील उकळते तेल फेकण्यात आले, एका अधिकाऱ्याची कॉलर पकडण्यात आली, महिला अधिकाऱ्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यात येऊन त्यांचा विनयभंग करण्यात आला. गुन्हा दाखल करु नये म्हणून पोलीस अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्यात आला. अतिक्रमणे पाडण्याचे अवघड काम करणाऱ्या अधिकाऱ्यांबाबत सत्तारुढ भारतीय जनता पक्षाचे एक पदाधिकारी अशा प्रकारचे कृत्य करीत असतील तर ती घटना अतिशय गंभीर आहे.

नंतर एस.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

राज्यामधील अतिक्रमणे हटविणे गरजेचे आहे. ती हटविण्यासाठी अधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांनी जायचे किंवा नाही असा प्रश्न आता त्यांच्यासमोर उभा राहिलेला आहे. एवढेच नव्हे तर शासनाचे आदेश मानायचे किंवा कसे यासंबंधीचा प्रश्न देखील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसमोर उभा राहिलेला आहे. ही सर्वच ठिकाणची व्यथा आहे. शेवटी राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी शासनाची आहे. राज्यातील अतिक्रमणे हटली पाहिजेत अशी राज्यकर्ते व शासनाची इच्छा असते. बीजेपीचा एक नेता तेथे अशा प्रकारचे कृत्य करत असेल तर ती गंभीर बाब आहे. अतिक्रमणे हटविण्यासाठी अधिकारी गेल्यानंतर त्यांची अडवणूक होणार असेल तर ते चुकीचे आहे....

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी भाषण करू नये.

(दोन्ही बाजूकडील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.माणिकराव ठाकरे : .... तेव्हा सभागृहासमोरल आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा सुरू करावी अशी मी विनंती करतो.

**सभापती :** नियम 289 अन्वये उपस्थित केलेला विषय आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबी संबंधात नसल्याने मी ही सूचना अमान्य करीत आहे.

......



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.गिरीष बापट (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विधानपरिषदेच्या सन 2014 च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात दिनरंक 8 डिसेंबर, 2014 ते दिनरंक 24 डिसेंबर, 2014 या कालावधीत मा. मंत्री / मा. राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण 544 आश्वासनांची यादी तसेच सन 2014 चे पाचवे (हिवाळी) अधिवेशनसंस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण 126 आश्वासनांच्या पूर्ततेसंबंधीच्या विवरणपत्रांची यादी" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : मंगरुळ तलावात (वडद,ता.कुदी) 7 तरुणांचा बुडून झालेला मृत्यू याबाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.राम शिंदे ( पर्यटन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 78 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या लेखी निवेदनाच्या माध्यमातून मला एकच उप प्रश्न विचारावयाचा आहे. तलावाचे ठिकाण सहलीचे स्थळ नसून वन विभागाच्या झोनमध्ये येते असे लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे. असे असेल तर मग ती मुले तेथे सहलीला गेली कशी ? सहलीला गेल्यामुळे 7 युवकांचा मृत्यू झालेला आहे. त्यावेळी वन विभागाचे अधिकारी कर्मचारी काय करीत होते ? येथे 7 युवकांचा मृत्यु झाल्यामुळे शासनाने कोणती खबरदारी घेतली आहे ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, शासनातर्फे अतिशय स्पष्टपणे उत्तर देण्यात आले आहे की, हा तलाव पर्यटन विभागाचा नाही. युवक हे सहलीला गेले होते. तो भाग आरक्षित वन असल्यामुळे तेथे त्यांना जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. त्यामुळे तेथे वन सरंक्षक देखील नव्हते. जेथे घटना घडली तेथे डोंगा म्हणजे छोटी बोट तलावाच्या बाजूला पडलेली होती. सहलीला एकूण अकरा युवक गेले होते. फोटो काढण्याच्या उद्देशाने सदर बोट ढकलत ढकलत तलावात नेत असताना त्यांचा त्यात बुडून मृत्यू झाला आहे. यात सात जणांचा मृत्यू झाला असून एक जण वाचलेला आहे. यासंबंधात एवढीच माहिती आहे.

.....

**सभापती :** आता निवेदन क्रमांक 128 घेण्यात येईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, संबंधित खात्याचे माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

**सभापती :** आता निवेदन क्रमांक 134 घेण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, संबंधित खात्याचे माननीय मंत्री उपस्थित नाहीत.

**सभापती :** मी संसदीय कामकाज मंत्र्यांना सांगू इच्छितो की, ज्या माननीय मंत्र्यांची निवेदन असतील त्यांना सभागृहात उपस्थित राहण्यास सांगावे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, संबंधित माननीय मंत्र्यांना मी सभागृहात उपस्थित राहण्यासंबंधातील बोलावणे पाठविले आहे.

(माननीय समाजकल्याण राज्यमंत्री यांचे सभागृहात आगमन होते.)

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : राज्यातील संजय गांधी व श्रावणबाळ निराधार योजनांच्या लाभार्थींना वेळेवर अनुदान न मिळणे याबाबत श्री.अमरसिंह पंडित यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 128 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, राज्यातील संजय गांधी व श्रावणबाळ सारख्या निराधार योजनांच्या लाभार्थींना वेळेवर अनुदान न मिळाल्यामुळे त्यांची आज उपासमार होत आहे. या लाभार्थींना दरमहा साधारणपणे सहाशे रूपये अनुदान मिळते. मी येथे माननीय मंत्र्यांना स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. हे जे लाभार्थी आहेत ते संघटित नाहीत. त्यामुळे त्यांना सहा-सहा महिने अनुदान मिळत नाही. परंतु, जे संघटित आहेत व ज्यांचे प्रतिनिधी या सभागृहात आहेत ते एक तारखेला सकाळी बीडीएस नसला तरी त्या बँकेने त्यांचा पगार करावा अशा प्रकारची मागणी करताना आम्ही येथे पाहिलेले आहे. त्यांना एक तारखेला पगार मिळाला नाही तरी त्यांचा संसार थांबत नाही. त्यांना दुपारचे जेवण मिळत आहे. संध्याकाळची भाकरी मिळते आहे. पण हा जो शोषित, पीडित, निराश्रित, दारिद्र्य रेषेखालील असंघटित वर्ग आहे त्यांना काहीच मिळत नाही. या लाभार्थींना 3 ते 6 महिन्यांमध्ये 600 रूपये देखील देता येत नाहीत ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. या सारखी दुसरी कोणतीही शांकांतिका असू शकणार नाही. तेव्हा दर महिन्याच्या एक तारखेला अनुदानाची रक्कम या योजनेतील लाभार्थींच्या खात्यावर जमा करण्यात येणार आहे काय ? आपण जन धन योजने अंतर्गत एवढी खाती उघडण्यात आली असल्याचे सांगितले आहे. .... (अडथळा) ... मी माननीय मंत्री श्री.बापट साहेबांना सांगू इच्छितो की, मराठवाड्यातील 61 कोटी रूपये परत आले आहेत.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, खाते फोड न झाल्यामुळे निधी परत आलेला आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.गिरीष बापट हे जोरात बोलत असल्यामुळे मला धडकी भरते. त्यामुळे सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा हकरतीचा मुद्दा आहे. सदनाचे कामकाज व्यवस्थितपणे चालविण्याची जबाबदारी संसदीय कामकाज मंत्र्यांची आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे .......

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कोणत्याही प्रकारचे विषयांतर केले नसतांना तसेच सन्माननीय सदस्यांनी संसदीय कार्य मंत्र्यांच्या पक्षावर किंवा शासनावर कोणत्याही प्रकारचे आरोप केलेले नसताना माननीय सदंसदीय कार्य मंत्री सन्माननीय सदस्यांच्या निवेदनामध्ये अडथळा आणीत असल्यामुळे आपण त्यांना समज द्यावी अशी विनंती आहे.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी राजकीय भावनेने प्रेरित होऊन विचार मांडू नये अशी माझी त्यांना विनंती आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा असे माननीय सभापती महोदय सदस्यांना सांगत असतांना सन्माननीय सदस्य प्रश्न न विचारता भाषण करीत होते. माननीय सभापतींच्या बोलण्याकडे जर दुर्लक्ष केले जात असेल तर ते माननीय सभापती महोदयांच्या निदर्शनास आणून देणे हे माझे काम असून मी माझे काम केले आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : माननीय सभापती महोदय, सक्षम आहेत.

**सभापती :** वेळ वाया न घालविता सन्माननीय सदस्यांनी कृपया प्रश्न विचारावा.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या लाभार्थ्यांचे अनुदान एक तारखेला त्यांच्या खात्यात जमा होणार आहे काय ? हे जे 600 रुपये अनुदान दिले जाते ते अतिशय तोकडे आहे त्यामुळे या अनुदानात शासन वाढ करणार आहे काय ? या योजनेतील लाभार्थ्यांच्या संदर्भात मी सातत्याने पत्रव्यवहार करीत आहे परंतु मला त्यासंदर्भात अद्याप उत्तर मिळाले नाही. कोर्ट पीडित महिलांचे लग्न होत नाही, त्यांना नोकरी लागणेही अडचणीचे ठरते त्यामुळे लाभार्थ्यांच्या यादीमध्ये कोर्ट पीडित महिलांना सीएसच्या एका प्रमाणपत्राने तहसीलदार लाभ देण्याच्या संदर्भात शासन निर्णय करणार आहे काय ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. हा विषय अतिशय दुर्लक्षित असलेल्या निराधार, गरीब, गरजू, निरक्षीत, विधवा अशा महिलांच्या संदर्भातील आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी हा विषय या अधिवेशनात तिसऱ्यांदा उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात मी आजच बीड जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देतो की, जे अनुदान बाकी असेल ते अनुदान सोमवार पर्यंत म्हणजे

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप कांबळे ......

13 एप्रिल पर्यंत सर्व लाभार्थ्यांना मिळेल. त्यांचा दुसरा प्रश्न होता की, सन्माननीय सदस्यांचा पगार जर एक तारखेला बँकेत जमा होत असेल तर त्याच धर्तीवर सर्व जनधन योजनेच्या अंतर्गत ज्यांनी बँकेमध्ये खाती उघडली असतील अशा सर्व लाभार्थ्यांचे अनुदान त्यांच्या खात्यात 1 तारखेला जमा होईल एवढे मी आपल्या मार्फत सदनाला सांगू इच्छितो.

-------------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : महाजनकोने पारस औष्णिक केंद्ररकरिता गाझीपूर, जि.अकोला कामामध्ये कमी दराने निविदा देण्याबाबत श्री धनंजय मुंडे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 134 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, या निवेदनाच्या संदर्भात जे उत्तर आले आहे त्यासंदर्भात माझे केवळ दोनच उप प्रश्न राहणार आहेत. या बधाऱ्याच्या अंदाजपत्रकाची रक्कम 15.71 कोटी रुपये असताना प्रत्यक्षात ही निविदा 41टक्के बिलोने देण्यात आली होती काय ? अंदाजपत्रक जाणीवपूर्वक फुगवून पुन्हा 40/50 टक्के बिलोने घेऊन घोळ करण्यात आला आहे काय ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, ही बाब खरी आहे की, 15 कोटी 77 लाख 80 हजार 930 रुपयांची ही निविदा होती. 47.97 टक्के कमी दराने ही निविदा आलेली आहे. अंदाजपत्रक वाढवलेले नव्हते परंतु संबंधित ठेकेदाराच्या स्वतःच्या मालकीच्या सर्व प्रकारच्या मशिन्स असून त्या मशिन्सची यादी सुध्दा संबंधित विभागाला त्यांनी दिली होती. स्वतःच्या मशिन्स लावून हा ठेकेदार काम करीत असतो. यासंदर्भात 5 ठेकेदाराने 10,12,18,47 टक्क्यापर्यंत कोट केलेला आहे. ही जी निविदा आहे ती बरोबर आहे. ही निविदा बिलो असून आतापर्यंत 65 टक्के काम पूर्ण झालेले असून उर्वरित काम 3 महिन्यात पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. या नवेदनाच्या संदर्भात शासनाने काळजी घेतलेली आहे. हे काम यंत्रणे मार्फत तपासून त्याचा रिपोर्ट सुध्दा सादर झालेला आहे.

----

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : नाशिक जिल्हा मध्यवती्र सहकारी बँकेमध्ये माहे एप्रिल 2012 ते मार्च, 2013 या कालावधीत प्रचंड गैरव्यवहार होणे याबाबत श्री.जयवंतरावजाधव,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.चंद्रकांत पाटील ( सहकार मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 32 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, शासनाच्या वतीने मला जे निवेदन देण्यात आले आहे त्यामध्ये उल्लेख करण्यात आला आहे की, सन 2014 रोजी हा अहवाल रद्द करण्यात आलेला आहे. यांसदर्भात मी मंत्री महोदयांना एकच प्रश्न विचारु इच्छितो की, ग्रामीण भागात असलेल्या 12 गुंठयाच्या जमिनीवर 7.46 कोटी रुपयाचे कर्ज घेण्यात आले आहे. रेणुकादेवी यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्थेने हे 7.46 कोटी रुपयांचे घेतलेले कर्ज बेकायदेशीर आहे तसेच या संस्थेने आजपर्यंत एक टक्का सुध्दा परतफेट केलेली नाही. त्यामुळे ज्यांनी या संस्थेचे कर्ज मंजूर केले त्यांच्यावर आपण कारवाई करणार काय, ज्या संस्थेने हे कर्ज बेकायदेशीररित्या घेतलेले आहे ते कर्ज शास्ती लावून वसूल केले जाईल काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, या बँकेची त्या त्यावेळी लागलेली 83,88 च्या चौकशा व त्यासंदर्भातील आलेले अहवाल हे आधीच्या सरकारने रद्द बातल ठरवल्यामुळे कोणतीही कारवाई झाली नाही. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणी नुसार पुन्हा एकदा नव्याने एखादा मुद्दा जोडून 83,88 लावता येते. रेणुकादेवी यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्थेची सुध्दा यामध्ये चौकशी केली जाईल. त्यामुळे पुन्हा एकदा नव्याने कालबध्द 83,88 लावून जे कर्ज अनियमितपणे वाटली गेली अशा सर्व कर्जाच्या संदर्भात नव्याने चौकशी केली जाईल.

----

...7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : महामंडळाच्या बसमध्ये अपंग व ज्येष्ठ नागरिकांना आधारकार्ड दाखविण्याची केली जाणारी सक्ती या विषयाबाबत श्री.जयंत प्र.पाटील,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.दिवाकर रावते ( परिवहन मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 83 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

...8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, निवेदनाच्या उत्तराने माझे समाधान झाले आहे. परंतु एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, बोगस कार्ड जप्त केलेले आहे त्यासंदर्भात कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे यासंदर्भातील कारवाई होणार काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यासंदर्भात लातूर येथे गुन्हा दाखल झालेला आहे. यामध्ये काही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील कारवाई सुरु आहे.

----

...9...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : हवामानातील बदलामुळे पर्जन्यावर, हवामानावर, पर्यावरणावर होणारे गंभीर परिणाम याबाबत श्री.हेमंत टकले,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.रामदास कदम ( पर्यावरण मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 104 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

10....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले :सभापती महोदय, खरे म्हणजे वातावरणातील बदलाच्या संदर्भात मी या सभागृहात स्थगन प्रस्तावाच्या निमित्ताने चर्चेस परवानगी द्यावी असा प्रस्ताव मी आपल्यापुढे ठेवला होता. परंतु आपण निर्देश दिल्याप्रमाणे नियम 93 अन्वयेच्या सूचनेला मंत्री महोदयांचे उत्तर आलेले आहे. या उत्तरामध्ये जेवढी माहिती इतरत्र उपलब्ध आहे त्याच माहितीची पुनरावृत्ती करण्यात आलेली आहे. एकगोष्ट निश्चित आहे की, वाढत्या तापमानामुळे शेतीवर होणारे परिणाम,पाणी पुरवठयावर होणारे परिणाम व त्यामुळे निर्माण होणारी रोगराईचा उल्लेख केलेला आहे. निवेदनाच्या शेवटी असे म्हटले आहे की, "या बदलामुळे व वाढणाऱ्या उष्णतेमुळे दैनंदिन वापरातील विजेची मागणी सुध्दा वाढणार आहे.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

हा सर्व विषय व्यापक आहे. निवेदनामध्ये दिलेली माहिती सर्वसाधारणपणे सर्वांकडे उपलब्ध आहे. मी हा विषय यासाठी मांडला होता की, ज्यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना झाली त्यावेळी या मंडळाचा फक्त पाण्याशी संबंध होता. परंतु जस जशी क्षेत्र वाढत गेली तस तसा त्याचा विस्तार होत गेला.

सभापती महोदय, राज्य शासनाने जाहीर केल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक समुद्रामध्ये उभे राहणार आहे. सन 2020 मध्ये गेट ऑफ इंडिया पाण्याखाली जाईल असा अहवाल आलेला आहे. हा अहवाल आपण वाचला का ? आपण स्मारक बांधताना पूर्व सूचना घेऊन तशी व्यवस्था करणार आहोत काय ?

सभापती महोदय, आपण गोवंश हत्या विधेयक पारित केले. देशातील आणि राज्यातील पशुधन संख्या लक्षात घेतली आणि ती संख्या वाढत राहिली तर या जनावरांमुळे निर्माण होणाऱ्या मिथेन वायुमुळे वातावरण किती दूषित होणार आहे याचा आपण अभ्यास केला आहे काय ?

सभापती महोदय, जमीन संपादनाचा एक मुद्दा आहे. जमीन संपादन करताना पर्यावरणात होणाऱ्या बदलाचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. राज्यात तसा अभ्यास झालेला नाही. तरी सुद्धा आपण एकामागोमाग एक कायदे करीत आहोत आणि पर्यावरणाकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत आहोत. तेव्हा एका नव्या आयोगाची स्थापना करून त्यामध्ये पर्यावरणातील बदलत्या हवामानाचा आणि वाढत्या तापमानाच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी खूप मोठा कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता आहे. या विषयाची सविस्तर चर्चा झाली पाहिजे. त्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेऊन हा विषय चर्चेला घेतला पाहिजे. निवेदनामध्ये तांत्रिक माहिती दिलेली आहे. यापूर्वीही आमच्याकडे ती माहिती होती. परंतु जो धोका वाढत आहे त्याची चर्चा व्हावी आणि त्यादृष्टीने शासनाने उपाययोजना करावी. या ठिकाणी निवेदनात जी माहिती दिलेली आहे त्या व्यतिरिक्त अधिकची माहिती माननीय मंत्री देतील काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडे कोणती माहिती उपलब्ध आहे याची मला काही कल्पना नाही. परंतु शासनाकडे जी माहिती उपलब्ध होती, ती माहिती सन्माननीय सदस्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम मी केलेले आहे. त्यांच्याकडे अधिकची माहिती असेल तर त्यांनी ती मला द्यावी.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, अलीकडे वातावरणामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे. ही परिस्थिती फक्त महाराष्ट्रात नव्हे तर जगभरात आहे. तेव्हा फक्त महाराष्ट्रामध्ये बदल होऊन चालणार नाही तर संपूर्ण देशामध्ये बदल होणे गरजेचे आहे. केंद्र सरकारने प्रत्येक राज्याकडून पर्यावरणाविषयी अहवाल मागितला आहे. राज्य शासनाने 15 दिवसांपूर्वी तसा अहवाल केंद्र शासनाकडे पाठविलेला आहे. त्या अहवालात काय काय म्हटले आहे याची माहिती पाहिजे असेल तर ती मी सभागृहाला वाचून दाखवितो.

सभापती महोदय, आपणास भविष्यामध्ये पशुधन सांभाळण्याचे काम करावे लागणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे की, अन्य कोणत्याही प्राण्यांचा बळी घेण्याचा आमचा विचार नाही. वर्तमानपत्रात चुकीची माहिती आलेली आहे. या संदर्भातील खुलासा माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेला आहे.

सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. आपल्या सर्वांच्या जीवनाशी त्याचा संबंध आहे. मागील अनेक वर्षापासून जंगल तोड झाली आहे. आपल्याकडे दहा टक्के जंगल आहे असे सांगण्यात येते. मी या संदर्भात अधिक माहिती घेतली असता असे समजले की, आपल्याकडे फक्त पाच टक्के जंगल आहे आणि ते ही खाजगी आहे. आपल्याकडे फक्त एक-दोन ठिकाणी जंगले आहेत. आपण डोंगर तोड केलेली आहे. आपण जंगल तोड करीत आहोत, झाडे तोडत आहोत.या सर्वांचा वातावरणावर निश्चितपणे परिणाम होत आहे. मी वन सचिवांना बोलावून त्यांच्याकडून मागील दहा वर्षात किती झाडे तोडण्यास परवानगी दिली याची माहिती घेतली. जेव्हा एक झाड तोडण्याची परवानगी दिली जाते तेव्हा दहा झाडे लावण्याची अट घालण्यात येते. पण ती दहा झाडे लावली का, लावली असतील तर जी जगली का याची तातडीने चौकशी झाली पाहिजे आणि यामध्ये जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे असे आदेश मी वन सचिवांना दिलेले आहेत. मी त्याचा पाठपुरावा करीत आहे. अधिक झाडे कशी लावली जातील याकडे आम्ही लक्ष देत आहोत. कडुलिंबाचे झाड 24 तास प्राणवायू सोडतात. अशा वृक्षांची लागवड अधिक प्रमाणात कशी होईल यादृष्टीने आपले प्रयत्न असले पाहिजेत. डोंगरतोड पूर्णपणे थांबली पाहिजे. खदाणीच्या माध्यमातून धूळ उडते. धुळींच्या कणामुळे वातावरणात मोठे बदल होत

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम...

आहेत. हा मोठा व्यापक विषय आहे. औष्णिक ऊर्जेच्या चिमण्या 30 ते 50 मीटर उंच केल्या तरी त्यातून बाहेर पडणारा कार्बनडायऑक्साईड आकाशात जातो. कार्बनडायऑक्साईचे प्रमाण वाढत आहे.

**सभापती** : या प्रश्नाची व्याप्ती खूप मोठी आहे. आपण मागील दहा-पंधरा वर्षापासून अवकाळी पाऊस, दुष्काळ यावर सातत्याने बोलत आहोत. माझ्यामते फक्त ती मलमपट्टी ठरते. शास्त्रज्ञांच्या मते 50 वर्षानंतर हवामानात बदल होणार आहेत आणि त्याचा प्रत्यय आपणास येत आहे. आज हवामानात झपाटयाने होत आहेत. आज आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रत्येक देशावर ऑब्लीगेशन्स घालण्यात आलेले आहेत. प्रत्येक देशाकडून राज्यातील ऑब्लीगेशन्स पूर्ण करण्यासाठी प्रयत्न होत आहेत. या सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी माननीय महोदयांनी महिनाभराचा कालावधी घ्यावा. पर्यावरणाचा आंतरराष्ट्रीय पातळीवर, देशपातळीवर आणि महाराष्ट्र राज्यावर होणारा परिणाम आणि त्या संदर्भात राज्याला ज्या काही डयुटीज दिलेल्या आहेत त्यासंबंधीची माहिती घेण्यासाठी माझ्या दालनात सर्वपक्षीय सदस्यांची बैठक घेण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझी आज देखील तयारी आहे. 20 वर्षानंतर काय होणार आहे, 50 वर्षानंतर काय होणार आहे याचा तक्ता देखील मी दिलेला आहे. मला माहिती देण्यामध्ये कोणतीही अडचण नाही. महाराष्ट्रामध्ये जी समिति नेमली होती, त्या समितीचा निर्णय काय आहे, त्या समितीच्या सूचना काय आहेत, याची माहिती मी त्यांना दिलेली आहे. आपण आज बैठक घेतली तरी माझी काही हरकत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी पर्यावरण विभागाचा मन लावून अभ्यास केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अतिशय महत्वपूर्ण विषय नियम 93 अन्वयेच्या सूचनेद्वारे विचारला होता आणि त्यावर आज निवेदन होत आहे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपण आपल्या दालनात बैठक घेणार असल्याचे सांगितले. आपणास काही बाबी दिसत नाहीत, परंतु त्याचे फार मोठे परिणाम होणार आहेत.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

कोणत्याही नवीन गोष्टीची सुरुवात महाराष्ट्र राज्यापासून होते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पुढील काही काळात समुद्राची पातळी वाढणार आहे, ती पातळी किती वाढणार आहे, जनावरांची संख्या वाढली तर त्यातून कोणते दुष्परिणाम होणार आहेत, आज राज्यातील पीक पॅटर्न बदलण्याची गरज आहे असे अनेक प्रश्न आहेत. आमच्या भागात मोसमी वारे वाहण्याचे पूर्णपणे थांबले आहेत. मागील आठ-दहा वर्षापासून ही प्रक्रिया सुरु आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात माझ्या दालनात सर्वपक्षीय बैठक बोलाविली आहे त्यावेळी आपणास हा विषय मांडता येईल.

-----------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.**: कोकणातील समुद्रात परप्रांतीय मच्छिमारांनी घुसखोरी केल्यामुळे स्थानिक मच्छिमारांवर उपासमारीची वेळ येणे याबाबत श्री. अनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.एकनाथराव खडसे ( मत्स्यव्यवसाय मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 127 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : विधिमंडळ अधिवेशन सुरु असताना अधिसूचना काढण्यात येणे

**मु.शी.**: विधिमंडळ अधिवेशन सुरु असताना अधिसूचना काढण्यात येणे, या विषयाबाबत श्री.माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांनी श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांच्या विरुध्द दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी "विधिमंडळ अधिवेशन सुरु असताना अधिसूचना काढण्यात येणे" या विषयाबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या विरुध्द विशेषाधिकारभंगाची सूचना दिली आहे. सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याविरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना मांडण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पिय अधिवेशन दिनांक 9 मार्च, 2015 पासून मुंबईत सुरु झालेले आहे. परंतु राज्य सरकारने दिनांक 13 मार्च, 2015 रोजी म्हणजेच अधिवेशन सुरु असताना अधिसूचना काढली आहे. एका विधेयकाच्या बाबतीत दुरुस्ती संदर्भात ती अधिसूचना काढली आहे. वास्तविक पाहता विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना किंवा एखाद्या कायद्याच्या बाबतीत अशा प्रकारे अधिसूचना काढून त्यामध्ये दुरुस्ती करता येऊ शकते, हा माझ्या समजण्याच्या पलीकडील विषय आहे. एखाद्या विषयाच्या बाबतीत राज्य सरकारला काही धोरण जाहीर तयार करावयाचे असेल किंवा काही बदल करावयाचे असतील तर विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असल्यामुळे त्या बाबतची माहिती अगोदर सभागृहाला द्यावी लागते आणि त्यानंतरच ती बाहेर जाहीर करता येते. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी 9 मार्चपासून अधिवेशन सुरु झालेले असताना दिनांक 13 मार्च रोजी अधिसूचना काढली. भूमी अधिग्रहण विधेयकाकडे संपूर्ण देशाचे, राज्याचे आणि गावातील लोकांचे सुध्दा लक्ष लागलेले आहे. विधिमंडळ अधिवेशन सुरु असताना एखाद्या विषयी अधिसूचना काढणे हा सभागृहाचा आणि संसदीय परंपरेचा अवमान आहे. त्यामुळेच मी माननीय मुख्यमंत्री यांच्या विरोधात ही हक्कभंगाची सूचना दिली आहे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

सभापती महोदय, माझी विनंती आहे की, सभागृहाने सदरहू विशेषाधिकार भंगाची सूचना स्वीकारावी.

**तालिका सभापती** (श्री.प्रकाश बिनसाळे): सन्माननीय सदस्यांनी विशेषाधिकार भंगाची जी सूचना दिलेली आहे ती मला प्राप्त झाली आहे. या विषयी शासनाकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर माननीय सभापतींच्या निदेशानुसार त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

----------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**तालिका सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, मी अत्यंत गंभीर अशा विषयाकडे औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. खामगाव, जिल्हा बुलढाणा या तहसील कार्यालयाच्या माध्यमातून विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी दुकानदारांना जवळपास 6 हजार शिधापत्रिका देऊन त्याचे वाटप बोगस लोकांना करण्यात आले. त्या शिधापत्रिकांवर तहसीलदारांच्या अधिकृत सह्या आहेत. तहसील कार्यालयाच्या माध्यमातून त्या देण्यात आल्या आहेत. महोदय, नमुनादाखल काही शिधापत्रिका मी सभागृहात आणलेल्या आहेत. या ठिकाणी माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री उपस्थित आहेत. महोदय, एकीकडे गरिबांना धान्य मिळेनासे झाले आहे आणि दुसऱ्या बाजूला अशाप्रकारे बोगस शिधापत्रिका वितरित केल्या गेल्या. महोदय, शिधावाटप दुकानदार बोगस शिधापत्रिका वाटून त्यावरील धान्य काळ्या बाजारात विकत असतील तर ते योग्य नाही. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, हे तुमच्या काळात हे झालेले आहे.

महोदय, श्री.नरेंद्र दामोदर मोदी, शिवाजी वेस, खामगाव, जि.बुलढाणा, श्रीमती सोनिया राजीव गांधी, सजनपुरी, ता.खामगाव, श्री.राधाकृष्ण बाळासाहेब विखे-पाटील, रेखा प्लॉट, खामगाव, श्री.देवेंद्र गंगाधर फडणवीस, शिवाजी वेस, ता.खामगाव, श्री.गिरीश भालचंद्र बापट, खामगाव, श्री.धनंजय पंडितराव मुंडे या व्यक्तींच्या नावे बोगस शिधापत्रिका वितरित करण्यात आल्या आहेत. या बोगस शिधापत्रिकांवर तहसीलदारांची सही व शिक्का आहे. या बोगस शिधापत्रिका मी आपल्याला देऊ इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरेजी, विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी 6 हजार बोगस शिधापत्रिका वाटून आपण लोकांकडून मतनादानाचा फायदा घेतला. या बोगस शिधापत्रिका बाहेर गेल्या. या शिधापत्रिकांच्या माध्यमातून बोगस व्यक्ती धान्य उचलत आहेत. या ठिकाणी माननीय मंत्री उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती करतो की,...

श्री.माणिकराव ठाकरे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी ज्यांच्या नावे शिधापत्रिका काढण्यात आल्या आहेत त्यातील अनेक नावे वाचून दाखविली. त्यांनी सांगितले की,

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

या बोगस शिधापत्रिका मागच्या सरकारच्या काळात वितरित करण्यात आलेल्या आहेत. माझे म्हणणे एवढेच आहे की, कोणाचीही सत्ता असो बोगस शिधापत्रिका वितरित करता कामा नये. जर अशाप्रकारे बोगस शिधापत्रिका वितरित झाल्या असतील तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी जी नावे वाचून दाखविली त्या नावांविषयीचे जे आकर्षण निर्माण झाले ते निवडणुकीच्या नंतरच्या काळातील आहे. त्यांनी माननीय श्रीमती सोनिया गांधी यांच्या नावाचा उल्लेख केला. परंतु त्याच बरोबर त्यांनी माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस आणि माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.गिरीष बापट तसेच माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या नावाचा सुध्दा उल्लेख केला. ही नावे बघता हे सर्व काम तुम्ही सत्तेवर आल्यानंतरचे आहे, असे मला वाटते.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, मी दाव्याने सांगतो की, या 6 हजार बोगस शिधापत्रिका तहसीलदारांनी दुकानदारांकडे ठेवल्या होत्या. दुकानदाराने त्यामध्ये बोगस नावे टाकून त्यावरील माल उचलला आणि आजही तो उचलला जात आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे. फार मोठे रॅकेट याच्या पाठीशी आहे. शिधापत्रिकांवर बोगस नावे टाकून माल उचलला जात असेल तर या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे. या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मी मागणी करतो की, या गोष्टीला जे जे अधिकारी जबाबदार असतील त्यांना ताबडतोब निलंबित केले पाहिजे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. मी माननीय मंत्र्यांना सांगतो की, त्यांनी या बाबत चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, या ठिकाणी माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री उपस्थित आहेत. मला वाटते त्यांनी या विषयी काही तरी सांगितले पाहिजे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, हे प्रकरण गंभीर आहे. हे प्रकरण निवडणुकीपूर्वीचे आहे की नंतरचे आहे, हा मुद्दा नाही. दुकानदारांनी बोगस शिधापत्रिका दिल्या काय, त्या शिधापत्रिकांवर खरोखरच तहसीलदारांच्या सह्या आहेत काय, या बाबतची चौकशी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून केली जाईल. प्राथमिक चौकशीत जे अधिकारी दोषी आढळतील त्यांना निलंबित केले जाईल आणि त्यांच्यावर उचित ती कारवाई केली जाईल.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी शैक्षणिक साहित्याच्या किटची प्रतिक्षा करीत असतात. या महापालिकेंतर्गत असलेल्या नेतीवली येथील शाळेमध्ये एक प्रकार उघडकीस आला. त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना वाटप करावयाच्या शैक्षणिक कीट धूळ खात पडून होत्या. वास्तविक पाहता त्या विद्यार्थ्यांना वितरित करावयास पाहिजे होत्या. या विषयी शिक्षण मंडळाच्या सदस्यांनी चौकशी केली असता असे निदर्शनास आले की, त्या शाळेमध्ये शैक्षणिक कीट वर्षभर तशाच पडून होत्या. या विषयी संबंधित अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. हा विषय अतिशय गंभीर आहे. मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मागणी करतो की, या प्रकरणी जे अधिकारी दोषी असतील त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

महोदय, सभागृहात संबंधित विभागाचे माननीय राज्यमंत्री उपस्थित आहेत. मी आपल्या माध्यमातून त्यांना या प्रकरणाचे सर्व डिटेल्स देतो. त्यांनी या प्रकरणी चौकशी करुन जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : पुढील सन्माननीय सदस्यांनी औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सदर विषय अतिशय गंभीर आहे. गरीब विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे. आपण भेदभाव करूनये. माननीय मंत्र्यांनी या संदर्भात सांगावे.

**तालिका सभापती** : माननीय मंत्री दखल घेतील. आपल्याकडे खूप कामकाज आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न आहे. माननीय मंत्र्यांनी या संदर्भात सांगावे.

**तालिका सभापती** : माननीय मंत्र्यांनी या संदर्भात तातडीने दखल घ्यावी.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, नोंद घेतली आहे. सदर बाबतीत दखल घेतली जाईल.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मी शासनाचे लक्ष गंभीर प्रश्नाकडे वेधू इच्छितो. ठाणे् जिल्ह्यातील कल्याण तालुक्यातील मुरबाड रोड म्हासळ गावच्या उत्तरेकडील भूभाग नदीपर्यंत सीआरझेडमध्ये येतो, तो भाग रिजेन्सी इन्फ्रास्ट्रक्चर नामक कंपनीद्वारा शेतजमिनीमध्ये अनधिकृतपणे 20 ते 22 फूट भराव टाकल्यामुळे कल्याण-डोंबिवली येथील सखल भागात पावसाळ्यात पाणी साचून पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊन तेथील लाखो लोकांच्या जीविताचा व त्यांच्या मालमत्तेचा, दरवर्षी होणाऱ्या नुकसानीच्या बाबत प्रश्न निर्माण झाला आहे. उक्त कंपनीद्वारे केलेल्या भरावामुळे मुरबाड रोड म्हणजे राष्ट्रीय महामार्ग 2 दिवस बंद राहिल्याने राष्ट्राचे आर्थिक नुकसान झाले आहे. सदर बाबतीत वेळोळी वृत्तपत्रात बातम्या येऊन देखील म्हासळ सहकारी सामुदायिक शेती सोसायटी म्हासळ ता. कल्याण, जि ठाणे या संस्थेची मंजूर पोट नियमाप्रमाणे चौकशी अद्यापपर्यंत न होणे, उक्त संस्थेच्या मुळाच्या मंजूर पोटनियमांना डावलून कायदाचे उल्लंघंन करून 2 हजार वारसांच्या मालकी व हितसंबंधात बाधा आणून रिजेन्सी इन्फ्रास्ट्रक्चरने सदर जमीन विक्रीस परवानगी दिल्यामुळे संबंधितांवर अन्याय झाला आहे, त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. मी या अतिशय महत्त्वाच्या विषयाच्या संदर्भात औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधत आहे. शासनाने या संदर्भात त्वरित कडक कारवाई करावी अशी मी मागणी करीत आहे.

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## औचित्याच्या मुद्यांच्या संदर्भात

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, आपण दोन विषयांविषयी औचित्याचे मुद्दे दिले आहेत. आपल्याला कोणताही एक विषय मांडता येईल. आपण दुसरा विषय दुसऱ्या दिवशी मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी माननीय सभापतींशी बोलून पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडण्याबाबत सांगितले होते. माझ्याकडे दोन औचित्याचे मुद्दे आहेत.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, आपण दोन विषय दिले आहेत. परंतु आपल्याला कोणताही एक विषय मांडता येईल. आपण दुसरा विषय दुसऱ्या दिवशी मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी महिलांच्या चेंजिंग रुममध्ये छुपे कॅमेरे बसविणे हे गंभीर मानावे की सामना दैनिकाच्या वार्ताहर श्रीमती मनिषा गुरव यांच्यावर झालेला हल्ला हे गंभीर मानावे याबद्दल आपण मला मार्गदर्शन करावे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला निर्णय करायचा आहे. मी सन्माननीय सदस्यांना एक औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी देतो.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, दिनांक 8 एप्रिल, 2015 ला पहाटे दीड वाजता दैनिक सामनाच्या हिंदीच्या पत्रकार श्रीमती मनिषा गुरव यांच्यावर हल्ला करण्यात आला. चोरटयाने श्रीमती मनिषा यांना ट्रेनमधून ओढून ढकलण्याचा प्रयत्न केला. परंतु श्रीमती मनिषा यांनी प्रतिकार केल्यामुळे चोरटा त्यांच्या हातून मोबाईल घेऊन पळून गेला. श्रीमती मनिषा या दैनिक सामनाच्या गुन्हे विषयक वृत्तांकने करतात. पूर्वी आझाद मैदानातील दंगलीचे रिपोर्टिंग केल्यावर सेवानिवृत्त एसीपी यांनी व्हॉटस ॲपवर श्रीमती मनिषा गुरव यांच्याबाबत बदनामीकारक मजकूर टाकला होता. 66 अ कलमानुसार एसीपींवर गुन्हा देखील दाखल झालेला आहे. परंतु आता हे कलमच रद्द झाल्यामुळे या केसबाबत फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, महिला प्रवाशांसाठी प्रत्येक डब्यात महिला पोलीस ठेवण्याबाबत सरकारने घोषणा केली आहे. मग या महिलांच्या डब्यामध्ये पोलीस का नव्हते याबाबत चौकशी होणे गरजेचे आहे. शासनाकडून योग्य तो पोलीस बंदोबस्त लोकन ट्रेनला देण्यात यावा. श्रीमती मनिषा गुरव यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोराला ताबडतोब अटक करण्यात यावी. ठाणे रेल्वे पोलिसांकडे त्यांनी या संदर्भात आज सकाळीच तक्रार नोंदविली आहे.

सभापती महोदय, सभागृहाचा मौल्यवान वेळ खर्च करून अर्ध्या मिनिटांत माननीय गृह राज्यमंत्र्यांनी या संदर्भात दखल घेतो असे सांगितले तर महिलांवर फार उपकार होतील.

**तालिका सभापती** : आता नवीन प्रथा सुरूझाली आहे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, दखल घेतली जाईल.

----

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यात वाळुमाफियांचा प्रश्न निर्माण झाला आहे. सत्रामध्ये मी वाळुमाफियांच्या बाबतीत अनेक वेळा चर्चा केली आहे. दिनांक 5 एप्रिल, 2015 रोजी गंभीर प्रकार घडला आहे. गंभीर बाब आहे. दिनांक 5 एप्रिल, 2015 रोजी म्हसळा येथे तहसीलदार, नायब तहसीलदार यांना वाळुमाफियांनी मारले. रायगड जिल्ह्यात संपूर्ण महसूल खात्याने लेखणी बंद आंदोलन सुरू केले आहे. वाळुमाफियांच्या संदर्भात सभागृहात चर्चा घडवून आणल्यानंतर महसूल खात्याने कडक मोहिम उभारली आहे. त्यामुळे वाळुमाफिया दहशत निर्माण करीत आहेत. ते राजरोसपणे तलाठी, सर्कल, नायब तहसीलदार, तहसीदार यांना मारहाण, दमदाटी करीत आहेत, धमकी देण्याचे प्रकार सुरूआहेत. मी मागणी केली होती की, या संदर्भात एमपीडीए कायदा लागू करावा. माननीय महसूल मंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, अधिवेशन संपण्यापूर्वी ताबडतोब या कायद्याचा वटहुकूम काढण्यात येईल. मी मागणी केली हाती की, अधिवेशन सुरूअसताना खास बाब म्हणून एमपीडीए कायदा लागू करावा. माझी मागणी आहे की, शासनाने या संदर्भात तातडीने निवेदन करावे. राज्यात सर्वत्र वाळुमाफियांची दहशत सुरूआहे. त्यामुळे अधिवेशन संपण्यापूर्वी हा कायदा अंमलात येईल आणि याची ताबडतोब अंमलबजावणी होईल असे शासनाने निवेदन करावे अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ आर्डरबाबत**

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. आपण तालिका सभापती आहात, आपले निर्णय आम्ही मान्यच करीत असतो. आपण असे वाक्य वापरले की, सभागृहात नवीन प्रथा पडत आहेत. आपण असाल किंवा माननीय सभापती महोदय असतील, सन्माननीय सदस्य औचित्याचा मुद्दा मांडतात तेव्हा माननीय मंत्र्यांनी किंवा माननीय राज्यमंत्र्यांनी दखल घेतली तर ती नवीन प्रथा आहे असे म्हणता येणार नाही. पूर्वीसुध्दा अनेकदा माननीय मंत्र्यांनी आणि माननीय राज्यमंत्र्यांनी औचित्याच्या मुद्याची आम्ही दखल घेत आहोत असे म्हटले आहे आणि ते चालते. आम्ही आग्रह धरूनये हे आपले म्हणणे आम्हाला मान्य आहे. दखल घेतलीच पाहिजे हे म्हणणे ठीक नाही. माननीय मंत्र्यांनी तयारी दर्शविली तर त्याला प्रतिबंध करणे योग्य होणार नाही. सन्माननीय सदस्य औचित्याचा मुद्दा काही गंभीर विषयाच्या संदर्भात मांडत असतात. वेळेची मयार्दा असली तरी माननीय मंत्र्यांनी दखल घेण्याबाबत स्वागत केले पाहिजे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, औचित्याच्या मुद्यांची उत्तरे परस्पर येत असतात.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्यांची उत्तरे येत नसतात. माननीय मंत्र्यांकडून फक्त दखल घेतली जाते. विशेष उल्लेखाची उत्तरे येतात.

**तालिका सभापती** : औचित्याच्या मुद्याची दखल घेतली आहे की नाही हे कळविण्याबाबत काय करता येईल याबाबत माननीय सभापतींशी चर्चा करण्यात येईल आणि त्या पध्दतीने निर्णय घेण्यात येईल.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : नाशिक मनपा विकास नियंत्रण विकास नियमावलीमध्ये काही गौण फेरबदल करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे.

**मु.शी.** : नाशिक मनपा विकास नियंत्रण विकास नियमावलीमध्ये काही गौण फेरबदल करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे यासंबंधी श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"नाशिक महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही गौण फेरबदल करण्याविषयीचा प्रस्ताव गेल्या अडीच वर्षापासून शासनाकडे प्रलंबित असणे, दिनांक 17 डिसेंबर, 2011 रोजी नाशिक महानगरपालिकेच्या महासभेत विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही फेरबदल करण्याचा ठराव मंजूर करुन दिनांक 4 जानेवारी, 2012 रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात येणे, दिनांक 3 जानेवारी, 2012 रोजी स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये नोटीस प्रसिध्द करुन त्यावर हरकती व सूचना इत्यादी कार्यवाही पूर्ण करुन त्यावर मा.संचालक यांनी कलम 37 (1) प्रमाणे दिनांक 7 सप्टेंबर, 2012 रोजी शासनास अंतिम मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केलेला असणे, सदर प्रस्तावात मुख्यत्वे प्रस्तावित नियम क्र.13.6 (ब) मधील रिफ्युज फ्लोअर ऐवजी रिफ्युज एरीया उंच इमारतींना सोडविण्याविषयी तरतूद असणे, सदर तरतुदीमुळे हजारो सदनिकांचे प्रकल्प मंजुरीविना तर काही प्रकल्प बांधकाम पूर्णत्वाच्या दाखल्याविना अडकून पडलेले असणे, नाशिक म.न.पा. क्षेत्रात नियमाप्रमाणे एफएसआय विरहीत मिळणाऱ्या कपाटांच्या क्षेत्रांमध्ये किरकोळ वाढ झाल्यामुळे हजारो सदनिकांच्या बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळत नसल्याने सर्वसामान्यांना घरे ताब्यात मिळत नसल्याने एमआरटीपी चे कलम 22 (एम) नुसार नियोजन प्राधिकरणास त्यावर योग्य तो अधिभार लावून झालेली किरकोळ वाढ नियमित करणेविषयी सूचित करण्याची आवश्यकता, काही सुधारणा अधिभार आकारुन एफएसआय फ्री क्षेत्र मंजूर करण्याविषयी तरतुदी असून ज्यातून शासनाला व स्थानिक महापालिकेला मिळणाऱ्या कोट्यावधी रुपयांच्या महसूलात अडीच वर्षापासून अडचण



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयवंतराव जाधव ....

निर्माण झालेली असणे, महापालिकेने प्रस्तावित केल्यानुसार सर्व गौण फेरबदल महापालिकेने ठरविलेल्या अधिभाराच्या टक्केवारीनुसार कलम 37 (2) अन्वये मंजूर करुन ते 15 दिवसांच्या आत प्रसिध्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..9

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, शासकीय अधिकाऱ्यांचा लाल फितीचा कारभार कसा आहे याचा अनुभव आमच्या नाशिक मनपाला, सर्वसामान्य विकासकांना, सदनिका बूक करणाऱ्यांना येत आहे. नाशिक मनपाने अडीच वर्षांपासून कलम 37(1) च्या कारवाया करून शासनाला मंजूर करण्याकरिता पाठविल्या आहेत. अडीच वर्षांपासून सर्व प्रकरणे प्रलंबित असूनही शासनाने यावर काहीही कारवाई केलेली नाही. मी या संदर्भात विनंती करीत आहे. टायपोग्राफीकल मिस्टेकसारखे छोटे विषय आहेत. शासन अडीच वर्षे त्यामध्ये बदल करत नसेल तर ते योग्य नाही. त्यामुळे नाशिक मनपासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे करोडो रूपयांचे नुकसान होत असून सामान्य लोक घरापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे हे शासनाला भूषणावह नाही. कलम 37(1) चे काही गौन फेरबदलाचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत. आज सभागृहात माननीय मंत्र्यांनी आश्वासित करावे की, ते तातडीने मंजूर करण्यात येतील.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव.........

नाशिक महानगरपालिकेने टी.डी.आर.किंवा 33 टक्के एफ.एस.आय.ची मागणी केलेली आहे, त्याबाबत राज्य शासन आज या सभागृहात आम्हाला काही आश्वासन देणार आहे का ?

सभापती महोदय, सिताराम कुंटे समितीने इतर महानगरपालिकांमध्ये जे बदल अपेक्षित होते ते करुन त्यांना मान्यता देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर नाशिक महानगरपालिकेच्या माध्यमातून किंवा क्रिडाईच्या माध्यमातून 37 (1) नुसार ज्या मान्यता मागितलेल्या आहेत, त्या शासन देणार आहे का ?

सभापती महोदय, इमारतींमधील कपाटांच्या संदर्भात एक प्रश्न प्रलंबित आहे. आज या इमारती तयार झाल्या आहेत. गेल्या 25 वर्षांपासून ही पध्दत सुरु आहे. परंतु, या एका गोष्टीमुळे बांधून तयार असलेल्या सदनिकांना कम्प्लिशन सर्टिफिकेट देण्याचे थांबविण्यात आले आहे. या ठिकाणी अशी माहिती देण्यात आली आहे की, एकूण एवढी प्रकरणे होती, एवढ्या प्रकरणांना मंजुरी देण्यात आली आहे. मात्र, तशी वस्तुस्थिती नाही. अपार्टमेंट किंवा प्लॅटला मंजुरी देण्यात आली नसून छोट्या बंगल्यांना मंजुरी देण्यात आली आहे. अशा प्रकारे आमची दिशाभूल करु नये. त्यामुळे या सर्व गोष्टींना मंजुरी देऊन काही गोष्टी राहिल्या असतील तर अधिवेशन संपल्यानंतर लगतच्या आठवड्यामध्ये मंत्री महोदय आपल्या दालनात संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि क्रिडाईच्या प्रतिनिधींची बैठक घेतील का आणि महानगरपालिकेला निर्देश देतील का ?

श्री.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी एक मूलभूत प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला आहे. ही बाब प्रलंबित आहे, हे सत्य आहे. नाशिक महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील 37 (1) नुसार फेरबदलाच्या सूचना आहेत. अशा एकूण 25 सूचना त्यांनी दिल्या आहेत. रेफ्युजी फ्लोअर ऐवजी रेफ्युजी एरिया मान्य करावा, अशी एक महत्त्वाची सूचना आहे. इमारतीची उंची 25 मीटर पासून 30 मीटरपर्यंत किंवा त्याच्यापेक्षा जास्त होते त्यावेळी आठव्या मजल्यावर स्पेस ठेवावी लागते. ही जागा आग लागल्यास उपयोगी पडत असते. नॅशनल बिल्डींग कोडमध्ये ही अट अंतर्भूत आहे. परंतु, टायपोग्राफिकेल मिस्टेक असल्यामुळे हा प्रश्न प्रलंबित राहिलेला आहे व त्यामुळे गेलया अडीच वर्षांपासून कम्प्लिशन सर्टिफिकेट देणे थांबविलेले आहे.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रणजित पाटील.......

सभापती महोदय, डबल हाईट टेरेसचा फ्री एफ.एस.आय., प्रिमियम आकाऊन अतिरिक्त एफ.एस.आय. या आणि इतर काही मागण्या आहेत, ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला आहे. इतर शहरांचा डी.सी.आर. आणि शासनाचे धोरण यांचा अभ्यास करुन दोन महिन्यांच्या आत या संदर्भातील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, गेल्या अडीच वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे.

श्री.रणजित पाटील : सभापती महोदय, मी दोन महिन्यांच्या आत, असे म्हणालो आहे. याचा अर्थ, कदाचित त्या कालावधीपूर्वी देखील हा निर्णय होऊ शकेल. मी दोन महिने ही जास्तीत जास्त लिमिट सांगितली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कपाटाच्यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला आहे. यामध्ये दोन फुट प्रोजेक्शन काढून बांधकाम केले जाते. 100 ते 125 स्क्वेअर फुटाच्या बांधकामामध्ये 20 ते 25 स्क्वेअर फुटाचा फरक पडतो. एफएसआय एक्सेस झाला तर कम्पाऊंडिंग करुन सुध्दा मार्ग राहणार नाही. पण एफ.एस.आय. एक्सेस होत नसेल तर प्रशमित करुन आपल्याला मार्ग काढता येईल.

सभापती महोदय, सिताराम कुंटे समितीचा अहवाल अद्याप शासनाला सादर व्हायचा आहे. येत्या 10 ते 15 दिवसात हा अहवाल प्राप्त होईल, अशी अपेक्षा आहे. त्यामधून काही तरी मार्ग सापडेल आणि प्रशमित करुन या इमारती मोकळ्या करु शकू, असे वाटते. त्या दृष्टीकोनातून निश्चितपणे हे अधिवेशन संपल्यानंतर 15 दिवसांच्या आत क्रिडाई आणि सन्माननीय सदस्यांबरोबर बैठक घेऊ आणि मार्ग काढता येईल तो काढू.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. इमारती तयार आहेत. या संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार महापालिका आयुक्तांना आहे. आयुक्त दंड आकारुन ही बांधकामे नियमित करु शकतात. सध्या उभ्या असलेल्या इमारती आपण पाडू शकणार नाही. एकीकडे आपण झोपडपट्टया नियमित करीत आहोत आणि जे प्रिमियम भरण्यास तयार आहेत, अशा इमारतींना मान्यता देत नाही. म्हणजे, जे कायदा मानतील त्यांना कायदा आणि जे

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव.......

कायदा मानणार नाहीत, त्यांना कायदा माफ, असे होत आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे की, सध्या उभ्या असलेल्या इमारतींच्या संदर्भात आपण आयुक्तांना आदेश द्यावेत. रेफ्युजी एरिया आणि फ्लोअर बाबत आपण आयुक्तांना काही तरी निदेश द्यावेत.

श्री.रणजित पाटील : सभापती महोदय, एमआरटीपी ॲक्टच्या कलम 22 नुसार किरकोळ बदल करावयाचे असतील तर महापालिका आयुक्तांना दंड आकारुन मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. तशा सूचना आयुक्तांना शासनाकडून देण्यात येतील. त्याबरोबरच समितीचा अहवाल आल्यानंतर याबाबत उचित कार्यवाही करता येईल. किरकोळ बाबींमुळे अनेक इमारतींचा पूर्णत्त्वाचा दाखला प्रलंबित आहे. अशी 1700 प्रकरणे आहेत. परंतु, या अहवालाच्या माध्यमातून यामधील बहुतांश प्रकरणात मार्ग निघेल, अशी अपेक्षा आहे.

------------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

**पृ.शी.** : क्रमांक सी.एस.टी.109, प्रकाश पेठे मार्ग, कुलाबा या आरक्षित भूखंडाचा वापर डंम्पिंग ग्राऊंडसाठी केला जाणे
**मु.शी.** : क्रमांक सी.एस.टी.109, प्रकाश पेठे मार्ग, कुलाबा या आरक्षित भूखंडाचा वापर डंम्पिंग ग्राऊंडसाठी केला जाणे यासंबंधी श्री.राहूल नार्वेकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.राहूल नार्वेकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मुंबई बॅकबे रेक्लेमेशन मधील ब्लॉक ४, प्रकाश पेठे मार्ग, कफ परेड, कुलाबा, मुंबई या ठिकाणी एम.एम.आर.डी.ए.चा भूखंड असून त्या भूखंडामधील काही जागा मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असून त्या जागेवर बगीचा व सुशोभिकरणासाठी आरक्षित असणे, असे असताना मुंबई महानगरपालिकेने सदर भूखंडावर घनकचरा टाकून ती जागा डंपिंग ग्राऊंड म्हणून वापरण्यात येणे, आजूबाजूला मच्छीमार नगर तसेच मोठ्या प्रमाणावर रहिवाशी रहात असून, कफ परेड मधील स्कायस्क्रॅपरचा समावेश असणे, या आरक्षित भूखंडावर बगीचा व सुशोभिकरण करण्याकरिता स्थानिक रहिवाशांनी महापालिकेकडे वारंवार निवेदनाद्वारे मागणी करुनही महापालिका प्रशासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर भूखंडावर बगीचा व सुशोभिकरण होण्यासाठी रहिवाशांकडून सातत्याने होत असलेली मागणी, परिणामी स्थानिक रहिवाशांत पसरलेली तीव्र संतापाची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."***

श्री.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...५....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राहूल नार्वेकर : सभापती महोदय, मुंबई बॅकबे रेक्लेमेशन मधील ब्लॉक 4, प्लॉट सी.एस.क्र.109, प्रकाश पेठे मार्ग, कफ परेड, कुलाबा, मुंबई या भूखंडासंदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. ब्लॉक क्रमांक 4 मध्ये एमएमआरडीओ ही स्पेशल टाऊन प्लॅनिंग ॲथॉरिटी आहे. एमएमआरडीअेने सन 2000 मध्ये विकास आराखडा तयार केला असून त्या विकास आराखड्यात हा भूखंड गार्डनसाठी आरक्षित आहे. या भूखंडावर गार्डनचे आरक्षण असताना मुंबई महानगरपालिका ही जागा डंम्पिंग ग्राऊडसाठी वापरीत आहे. उच्च न्यायालयाचे असे अनेक आदेश आहेत की, आर.जी. किंवा पी.जी. आरक्षणातील भूखंड इतर कोणत्याही कारणासाठी वापरण्यात येऊ नयेत. असे असताना मुंबई महानगरपालिका गेल्या 15 वर्षांपासून या जागेचा वापर डंम्पिंग ग्राऊंडसाठी करीत आहे. ही जागा एमएमआरडीअेची म्हणजेच जिल्हाधिकाऱ्यांची आहे. ही जागा मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात कशी आली, त्यासंदर्भात कोणती लॅण्ड ग्रँट ऑर्डर आहे का ?

श्री.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राहूल नार्वेकर यांनी प्रकाश पेठे मार्गावरील एका भूखंडासंदर्भात ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. गार्डनचे आरक्षण असलेला हा भूखंड एमएमआरडीअेच्या मालकीचा असून तो सध्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहे, हे सत्य आहे. या भूखंडावर सुशोभिकण आणि बगिचा असे आरक्षण आहे. या लक्षवेधी सूचनेचा रोख असा आहे की, या भूखंडावर आरक्षण असताना त्याचा वापर डंम्पिंग ग्राऊंडसाठी केला जात आहे. वॉर्डमध्ये निर्माण होणारे डेब्रिज किंवा स्ट्रक्चर तोडल्यानंतर निर्माण होणारा कचरा टाकण्यासाठी युटिलिटी म्हणून या भूखंडाचा वापर केला जात आहे. यामुळे आजुबाजूच्या परिसरात दुर्गंधी निर्माण होत आहे व त्यामुळे लोकांना त्रास होत आहे. या संदर्भात शासन स्तरावरून उपाययोजना केल्या जातील आणि या भूखंडावर बगिच्याचे आरक्षण असल्यामुळे येणाऱ्या 15-20 वर्षांच्या प्रवासात हे आरक्षण विस्मरणात जाऊ नये, अशी समज संबंधितांना देण्यात येईल. तात्पुरती व्यवस्था म्हणून युटिलिटीसाठी या भूखंडाचा वापर करीत असताना पर्यायी व्यवस्था झाल्यानंतर ज्या मूळ कारणासाठी या भूखंडावर आरक्षण घालण्यात आले आहे, त्यासाठी या भूखंडाचा वापर व्हावा, असे आदेश देण्यात येतील.

..6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राहूल नार्वेकर : सभापती महोदय, उच्च न्यायालयाचे असे आदेश आहेत की, आर.जी.किंवा पी.जी.आरक्षण असलेल्या भूखंडांचा वापर अन्य कोणत्याही कारणासाठी करण्यात येऊ नये. हा भूखंड एमएमआरडीएचा असताना तो महानगरपालिकेच्या ताब्यात कसा आला, याचे उत्तर मला मिळालेले नाही. युटिलिटीसाठी या भूखंडाचा वापर करावा, असे कोणतेही आदेश नाहीत. असे असताना महानगरपालिकेने हा भूखंड फोर्सफुली ताब्यात घेतला आहे का ? आरक्षित भूखंडाचा वापर आरक्षणातील उद्देशासाठी गेल्या 15 वर्षात न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासन कारवाई करणार आहे का ?

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले आहे की, सदर भूखंडावर जी व्यवस्था करण्यात आली आहे ती तात्पुरती आहे. युटीलिटी म्हणून त्या भूखंडाचा वापर करण्यात येत नाही. तेथे काही डेब्रीज निघाले तर ते तात्पुरत्या स्वरुपात ठेवले जाते व नंतर ते उचलून गतव्यस्थानी नेले जाते. सन्माननीय सदस्य सत्य सांगत आहे असे गृहीत धरुन ही जागा मोकळी अशी होईल याबाबत आदेश निर्गमित केले जातील. या जागेच्या मूळ उद्देशापासून लांब न जाता ते आरक्षण बगीच्यासाठी असेल तर ते त्यासाठीच ठेवण्यात येईल व बगीच्याचा विकास केला जाईल असे आदेश निर्गमित करण्यात येतील. एमएमआरडीएच्या जागेचा पूर्ण ताबा बीएमसीने घेतला आहे काय ? असा आपण प्रश्न विचारला होता. एमएमआरडीएच्या काही जागा महानगरपालिकेला वापरण्यासाठी देण्यात आल्या आहेत. त्या जागा हॅन्ड ओव्हर करण्यात आल्या आहेत. याबाबत काय पत्रव्यवहार झाला व कोणत्या माध्यमातून एमएमआरडीएकडून बीएमसीकडे भूखंड गेला, याबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, तेथील रहिवाशी सातत्याने मागणी करीत आहेत की, या भूखंडावर बगीचा आणि सुशोभिकरण करावे. मुंबईतील लोकांना सकाळी व संध्याकाळी फिरण्यासाठी जागा नाही. या जागेचा वाद सुरु असेल तर महानगरपालिका किंवा एमएमआरडीए या जागेचे सुशोभिकरण किती दिवसात करणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, स्थानिक नागरिकांकडून यासंदर्भात चार निवेदन प्राप्त झाली आहेत. या जागेच्या बाजूला एक लाख मीटरचे गार्डन आहे. यासाठी हे कारण असू शकत नाही. ज्या आरक्षणासाठी हा भूखंड ठेवण्यात आला आहे त्या निर्णयापासून कदापिही लांब जाता येणार नाही. याची खातरजमा करुन यासंर्भातील आदेश निर्गमित करण्यात येतील.

-----------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मुंबईतील माहिम येथील शितलादेवी औद्योगिक वसाहतीच्या जागेची मालकी बोटावाला ट्रस्टने कलकत्ता कॉन्फेशनरीला व इतर व्यावसायिकांना भाड्याने देणे

**मु.शी.** : मुंबईतील माहिम येथील शितलादेवी औद्योगिक वसाहतीच्या जागेची मालकी बोटावाला ट्रस्टने कलकत्ता कॉन्फेशनरीला व इतर व्यावसायिकांना भाड्याने देणे यासंबंधी श्री.प्रकाश बिनसाळे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मुंबईतील माहिम येथील शितलादेवी औद्योगिक वसाहतीच्या जागेची मालकी असलेल्या बोटावाला ट्रस्टने सदर जागा कलकत्ता कॉन्फेशनरीला व इतर व्यवसायिकांना भाड्याने देणे, याबाबत उपनिबंधक, मुंबई यांचेकडे नोंदणी सुध्दा करण्यात येणे, या जागेवर कलकत्ता कॉन्फेशनरीने इमारत बांधून इमारतीमध्ये ३१ गाळे भाडयाने देवून उर्वरित जागेत आपला स्वत:चा कारखाना सुरु करणे, भाडेतत्वाची मुदत १९९७ मध्ये संपल्यानंतर पुर्ननोंदणी न करणे, २०१४ मध्ये मुंबई महानगरपालिकेने सदर इमारतीचे परिक्षण करुन इमारत धोकादायक असल्याचे घोषित करणे, भाडेकरु कलकत्ता कॉन्फेशनरी कंपनीकडे भाडयाचे पैसे जमा करण्यास गेले असता त्यांनी पैसे घेण्यास नकार देणे, बोटावाला ट्रस्टने इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे, त्यात ऑडीटरने सदर इमारतीची दुरुस्ती करता येवू शकते व इमारत धोकादायक नाही असा अहवाल महानगरपालिकेकडे सादर करणे, याकडे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी व कलकत्ता कॉन्फेशनरीने केलेले दुर्लक्ष, महानगरपालिकेने इमारतीमधील गाळेधारकांना कलम ३५४ त्याचप्रमाणे बोटावाला ट्रस्टला कलम ४८९ कलमाखाली इमारत खाली करण्याचे आदेश देणे, त्यामुळे गाळेधारकांत पसरलेले भितीचे वातावरण, इमारतीच्या मालकांनी महानगरपालिकेच्या अधिकारीवर्गासोबत संगनमत करुन***

...३...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***श्री.प्रकाश बिनसाळे...***

***पुनर्विकासासाठी ही इमारत खाली करत असल्याची व्यक्त होत असलेली शंका, यासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."***

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्वाची आहे. मुंबई शहरात अनेक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन कायद्याचा धाक दाखवून तेथील इमारती खाली करुन तोडण्याचा व तेथील रहिवाशांना देशोधडीला लावायचे षडयंत्र रचण्याचे काम मुंबईत अनेक ठिकाणी होत आहे. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी आलेल्या आहेत. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे नमूद केले आहे की, इमारत खाली करण्यात येत आहे असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही व दुसरे असे नमूद केले आहे की, ही इमारत 64 वर्षाची आहे. 1963 मध्ये ही इमारत बांधून पूर्ण झाली आहे. या वर्षी या इमारतीमध्ये रहिवाशी राहण्यासाठी आले होते. त्यामुळे या इमारतीला 64 वर्षे झालेली नाहीत. ही इमारत फक्त 50 वर्षाची झालेली आहे. दिनांक 21/6/2014 रोजी कलम 54 अन्वये ही इमारत धोकादायक आहे असे घोषित करण्यात आले व तशी नोटीस जारी करण्यात आली होती. या सर्व नोटीसेस फक्त घरमालकांना देण्यात आल्या आहेत. कोणत्याही प्रकारची नोटीस किंवा त्याची प्रत किंवा यासंर्भातील कल्पना तेथे राहणारे रहिवाशी किंवा शितलादेवी ट्रस्टचा जे लोक वापर करतात त्यांना देण्यात आली नाही. तेथील गाळेधारकांनी बोटावाला ट्रस्ट यांना लेखी निवेदन दिले होते की, ही इमारत आम्ही दुरूस्त करु इच्छितो. त्यासाठी आम्हाला परवानगी देण्यात यावी. तेथे जे रहिवासी राहतात त्यांनी या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन प्रमाणपत्र दिले आहे. या प्रमाणपत्रात असे नमूद केले आहे की सदर इमारत दुरूस्त होऊ शकते. आरसीसी इमारतीचे आयुष्यमान साधारणतः 75 वर्षे गृहीत धरले जाते. या इमारतीची बांधकामाची परवागनी ग्राऊंड प्लस थ्री होती. या इमारतीचे फाऊंडेशन ग्राऊंड प्लस थ्रीचे तयार करण्यात आले आहे. या इमारतीचे बांधकाम ग्राऊंड प्लस वन केलेले आहे. या इमारतीमध्ये सर्व्हीस इंडस्ट्री आहे, कोणतीही हेवी इंडस्ट्री नाही. असे असताना ही इमारत धोकादायक आहे, असे सांगितले जाते. रहिवाशांना इमारत दुरूस्तीची परवानगी दिली जात नाही. रहिवाशांना नोटीसीची प्रत किंवा कल्पना देण्यात आलेली नाही. तेथील रहिवाशांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही. तातडीने इमारत तोडावी लागेल अशी नोटीस दिली आहे. हे एक षडयंत्र आहे. याबाबत चौकशी करुन योग्य ती कारवाई मंत्री महोदय करतील काय ? ही इमारत खाली करुन तेथील रहिवाशांना हाकलून देण्याचे षडयंत्र रचण्यात आले आहे त्याबाबत या ट्रस्टने आणखी एक गोंष्ट केलेली आहे. या इमारतीच्या आवारात आजपर्यंत कधीही सुरक्षा रक्षक ठेवण्यात आले नव्हते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे..

आता त्या ठिकाणी बाऊन्सर स्वरुपाचे सुरक्षा रक्षक ठेवण्यात आले आहेत. यासंदर्भातील तक्रार स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली आहे. इमारतीमधील इंटरनेटसाठी लागणारी वायर व डीश ॲन्टिना तोडून टाकण्यात आला आहे. इमारत खाली करायची नसेल तर या बाबी करण्याचे काहीही कारण नाही. या सर्व प्रकारची गांभीर्याने चौकशी करुन तेथील रहिवाशांना योग्य संरक्षण देऊन त्यांचे हक्क अबाधित राखण्यासाठी योग्य ती कार्यवाही तातडीने करण्यात येईल काय ? ज्या लोकांनी ही षडयंत्र रचले आहे त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी माहीम येथील शितलादेवी औद्योगिक वसाहतीच्या इमारतीचे मालक बोटावाला ट्रस्ट आहेत. त्या ठिकाणी भाडेकरु राहत आहेत. ही बाब सत्य आहे की, महानगरपालिका अधिनिमय 1888 च्या नियम 353 कलमान्वये आयुक्तांना अधिकार आहेत की, धोकादायक इमारत असेल तर त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन ती इमारत पाडायची. परंतु त्या इमारतीमध्ये जे भाडेकरु असतात त्यांच्या पुनर्वसनाचा कोणताही विचार केला जात नाही हे उघड सत्य आहे. ही इमारत 50 ते 52 वर्षाची असून बीएमसीने इमारतीचा सर्व्हे केला आहे. दिनांक 26/3/2014 रोजी स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर दिनांक 21/6/2014 रोजी सेक्शन 24 अंतर्गत सदर इमारत पाडण्याची नोटीस देण्यात आली आहे. दिनांक 15/12/2014 रोजी भाडेकरु असोसिएशनने ही इमारत रिपेअर होऊ शकते असे निवेदन दिले आहे. तशाच प्रकारे स्ट्रक्चर ऑडिटचे प्रमाणपत्र देखील देण्यात आले आहे. त्यामध्ये एनडीटी टेस्ट होती असा प्रकार पुढे आलेला आहे. दिनांक 12/1/2015 रोजी ओनर यांनी प्रापर स्ट्रक्चरल स्टेबिलिटी रिपोर्ट एनडीटी टेस्टसह दिलेला आहे. याबाबत महानगरपालिका प्रशासनाकडून टीएसी कमिटी नियुक्त करण्यात आली आहे. बीएमसीच्या डायरेक्शननुसार इंजिनिअर सर्व्हीसेस आणि प्रोजेक्ट यामध्ये सीटी इंजिनिअर व सर्व लोक असतात. गरज पडल्यास साईट व्हीजीट करुन अंतिम रिपोर्ट देण्यात येईल. यानंतर दिनांक 23 जून 2014 रोजी बीएमसीने सी-1 कॅटेगिरीच्या धोकादायक इमारती इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यासंदर्भातील रिपोर्ट मागविला आहे. या इमारतीमधील भाडेकरुंना स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टनुसार ही इमारत रिपेअर

...6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील....

करता येऊ शकत असेल व इमारतीची एनडीटी टेस्ट घेतल्यानंतर ही इमारत राहण्यास योग्य असेल तर टीएसीच्या रिपोर्टप्रमाणे भाडेकरुंना पूर्ण संरक्षण देण्यात येईल. तशा प्रकारचे आदेश देण्यात येतील. धोकादायक इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करताना तेथील लोकांची जीवितहानी होऊ नये यासंदर्भातील जबाबदारी स्थानिक प्रशासनावर असते. असे बरेच प्रकार उघडकीस आले आहेत की, ओनर आणि डेव्हलपर्स यांच्या संगनमताने भाडेकरुचा बळी जातो. भाडेकरुंबाबत सरकार पूर्ण सहानुभूती ठेवणार आहे. टीएसीचा रिपोर्ट व त्यांनी दाखल केलेला स्ट्रक्चरल ऑडिटचा रिपोर्ट या दोन्हीची खातरजमा करुन याबाबत यथायोग्य निर्णय घेतला जाईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, बोटावाला ट्रस्ट यांनी स्ट्रक्चरल ऑडिट केले त्यामध्ये एनडीटी टेस्ट केली आहे. त्यांनी दुरुस्तीचा खर्च जास्त अपेक्षित केला आहे. रहिवाशांनी केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये एनडीटी टेस्ट नसली तरी दुरुस्ती होऊ शकते असा रिपोर्ट दिला आहे. 52 ते 53 वर्षाची आरसीसी इमारत पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळत नाही. स्लॅबचा काही भाग कोसळू शकतो परंतु पत्यांच्या बंगल्यासारखी कधीही आरसीसी इमारत कोसळत नाही.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे.......

तसेच, त्या ठिकाणी बाऊन्सर ठेवलेले आहेत. जर ती इमारत धोकादायक होती तर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी तेथे ज्या अनधिकृत शेड्स वगैरे होत्या त्या जेसीबी मशिनच्या सहाय्याने कशा काय पाडल्या ? जेसीबीमुळे ती इमारत पडू शकली असती. याचा अर्थ असा होतो की, ती इमारत चांगली आहे, ती इमारत दुरूस्त होऊ शकते. परंतु, केवळ त्या रहिवाशांना त्यांच्या जागेतून बाहेर काढावयाचे आणि त्या जागेचा ताबा बिल्डरच्या घशात घालावयाचा, असे शड्यंत्र निश्चितपणे रचण्यात आलेले आहे. आपण या संदर्भात उच्च स्तरीय चौकशी करुन यामध्ये जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी असे सांगितले की, तेथे बाऊन्सर पाठविलेले आहेत. याची सुद्धा चौकशी केली जाईल. त्या ठिकाणी असलेल्या केबल्स, पाण्याच्या वाहिन्या, इलेक्ट्रीसिटीच्या केबल्समध्ये जर कोणी टॅम्पर केले असेल तर आम्ही त्याची देखील चौकशी करु. तेथे सध्या जे भाडेकरु राहत आहेत त्यांच्या बाजूने शासनाची सहानुभूती राहील आणि तेथे कोणी कितीही बाऊन्सर आणलेले असतील तरीही भाडेकरुंचे संरक्षण करण्याची शासनाची भूमिका राहील. या संदर्भात संपूर्ण चौकशी केली जाईल आणि तेथे बाऊन्सर ठेवलेले आहेत किंवा कोणी टॅम्पर केलेले आहे असे चौकशी अंती सिद्ध झाले तर असे जे कोणी करीत असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. आम्ही केवळ 15 दिवसांचा कालावधी मागत आहोत. या संदर्भातील जे काही रिपोर्ट असतील ते कम्पलीट करुन आपण 15 दिवसाच्या आत या संदर्भात बैठक घेऊ आणि निर्णय घेऊ.

--------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**लक्षवेधी सूचना क्र.4 बाबत.**

**तालिका सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेत अ.क्र.4 वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेली आहे.

-------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यरत उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमातील शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी लागू करणे

**मु.शी.** : उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यरत उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमातील शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी लागू करणे यासंबंधी श्री अनिल सोले, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्रातील शालेय शिक्षण विभागांतर्गत कार्यरत "उच्च माध्यमिक शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी दिनांक 1 जानेवारी, 1996 पासून लागू झाली असणे, सदर वेतनश्रेणी उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यरत उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमातील शिक्षकांना त्याचवेळी लागू होणे अपेक्षित असणे, शिक्षक संघटनांनी याबाबत निवेदने देऊन व धरणे आंदोलन करुन याबाबत सतत पाठपुरावा करणे, दरम्यान उच्च व तंत्र शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे चुकीचा प्रस्ताव पाठविणे, मा.वित्तमंत्री महोदयांचे सुधारित प्रस्ताव पाठविण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाला सूचना करणे, परंतू उच्च व तंत्र शिक्षण विभागाची या संदर्भाधिन उदासिनता, यामुळे राज्यातील जवळपास 2840 शिक्षकांवर अन्याय होणे, हा अन्याय दूर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रवींद्र वायकर (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल सोले : सभापती महोदय, राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक आणि उच्च व तंत्र शिक्षक एमसीव्हीसी कोर्स यांना सारखीच वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. त्यांना दिनांक 01.01.1996 पासून पाचव्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी देण्यात यावी, अशी अनेक दिवसांपासूनची मागणी आहे. त्याला विविध माध्यमातून मान्यताही देण्यात आलेली आहे. मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, उच्च माध्यमिक शिक्षकांना दिनांक 01.01.1996 पासून सुधारित वेतनश्रेणी देण्यात आली आहे. त्या प्रमाणे अशासकीय नंतर माध्यमिक व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमातील पूर्ण वेळ शिक्षकांना देखील सुधारित वेतनश्रेणी देण्याच्या दृष्टीकोनातून ती नस्ती वित्त विभागाकडे पाठविण्यात आली होती. त्यामध्ये 65 कोटी रूपयांची थकबाकी दाखविण्यात आलेली आहे. त्यामुळे वित्त विभागाने ही नस्ती पुन्हा उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे पाठविलेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, ही नस्ती दिनांक 23.02.2015 रोजी पुन्हा वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, सदर नस्ती दिनांक 23.02.2015 रोजी वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेली आहे. परंतु, मला अशी माहिती मिळालेली आहे की, त्यामध्ये पुन्हा 65 कोटी रूपयांची तरतूद करण्याबाबत अपेक्षा व्यक्त करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, शासन निर्णयाप्रमाणे दिनांक 1 एप्रिल, 2014 पासून फक्त 5 कोटी रूपयांच्या थकबाकीसह दुरूस्ती करून ती नस्ती पाठवावयास पाहिजे होती. आता दुरूस्ती करून ती नस्ती पुन्हा वित्त विभागाकडे केव्हा पाठविण्यात येणार आहे काय ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभाग आणि व्यवसाय शिक्षण संचालनालयामार्फत अनुदानित संस्थांमधील पूर्ण वेळ शिक्षकांना ज्या प्रमाणे सुधारित वेतनश्रेणी दिलेली आहे त्या प्रमाणे त्यांना सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत अनेक वेळा सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात आले. दिनांक 23.02.2015 रोजी वित्त विभागाकडून जो अभिप्राय आलेला आहे तो मी वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "राज्यातील अशासकीय माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील पूर्ण वेळ शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीचा

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रवींद्र वायकर........

लाभ दिनांक 01.03.2000 ऐवजी दिनांक 01.01.1996 पासून लागू करण्याचा शालेय शिक्षण विभागाचा प्रस्ताव राज्याची आर्थिक स्थिती पाहता अतिरिक्त आर्थिक भार सोसणे शक्य होत नसल्यामुळे वित्त विभागाने अमान्य केला होता. तरी देखील शालेय शिक्षण विभागाने सदर प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन दिनांक 26.02.2014 रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यामुळे सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने व्यवसाय शिक्षण संचालनालयामार्फत अशासकीय अनुदानित संस्थेतील पूर्ण वेळ शिक्षकांना देखील पाचव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणीचा लाभ दिनांक 01.03.2000 ऐवजी दिनांक 01.01.1996 पासून लागू करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता, तो प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे." आपण 65 कोटी रुपयांच्या थकबाकी संदर्भात सांगितले. परंतु, ती रक्कम 60 कोटी 57 लाख रुपये होती. शासन निर्णयाप्रमाणे करणार काय, असे आपण सांगितले. आपली सूचना मला योग्य वाटते. राज्यातील उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना दिनांक 03.06.2000 च्या शासन निर्णयाप्रमाणे लागू असलेली त्रिस्तरीय वेतनश्रेणी दिनांक 1 जानेवारी, 1996 पासून काल्पनीक वेतनवाढ देऊन लागू करावी. मात्र सदर शिक्षकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ दिनांक 1 एप्रिल, 2014 पासून देण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही, असा शासन निर्णय आहे. ती रक्कम जवळपास 4 कोटी रुपयांच्या जवळपास होते. अशा पद्धतीने देण्यास कोणतीही हरकत नाही. तशा पद्धतीने प्रस्ताव सादर करण्यात येईल.

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमातील शिक्षकांना दिनांक 01.01.1996 पासून पाचव्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबातचा हा प्रश्न आहे. प्रत्यक्ष आर्थिक लाभ दिनांक 1 एप्रिल, 2014 पासूनच देणे घोषित झाले असताना जी गणना करण्यात आली ती दिनांक 01.01.1996 पासून दिनांक 31 मार्च, 2014 पर्यंत करण्यात आली. म्हणून सुमारे 60 कोटी रुपयांची मागणी वित्त विभागाकडे करण्यात आली. वित्त विभागाने ती मागणी अमान्य केली. हा प्रस्ताव योग्य प्रकारे सुधारित करुन तो वित्त विभागाकडे किती दिवसात पाठविण्यात येणार आहे ?

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, हा प्रस्ताव एक महिन्याच्या आत पाठविण्यात येईल.

**तालिका सभापती** : मंत्री महोदय, राज्यातील शालेय शिक्षण विभाग, ग्रामीण विकास विभाग आणि तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणारे शिक्षक व उच्च माध्यमिकचे बायोफोकल विभागाचे शिक्षक समान तत्वावर काम करतात. शालेय शिक्षण विभागाने जो निर्णय घेतलेला आहे तो या शिक्षकांना लागू करण्यास काही अडचण दिसत नाही. आपण त्या पद्धतीने निर्णय घ्यावा, अशी मी सूचना करतो.

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, होय.

--------

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची सविस्तर आकडेवारी अद्याप उपलब्ध न होणे

**मु.शी.** : शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची सविस्तर आकडेवारी अद्याप उपलब्ध न होणे यासंबंधी डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"राज्य शासनाने शेतकऱ्यांना सावकारी कर्जातून मुक्त करण्याकरिता कर्जमाफीची रक्कम देण्याचा निर्णय घेतला असला तरी सहकार खात्याची संपूर्ण यंत्रणा सहकारी संस्थांच्या निवडणुकांत व्यस्त असल्यामुळे सावकारी कर्जाची सविस्तर आकडेवारी अद्याप उपलब्ध न होणे, गेल्या तीन वर्षात विविध कारणांमुळे सहकारी संस्थांच्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आल्याने सहकारी निवडणुक प्राधिकरणाने निवडणुकांना पात्र झालेल्या राज्यातील जवळपास सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करून त्यांस 30 जूनपर्यंत मुदतवाढ दिलेली असणे, याकरिता सहकार खात्याची संपूर्ण यंत्रणा निवडणुकीच्या कामात अडकलेली असल्याने या शेतकऱ्यांना कर्जमाफीची रक्कम मिळण्याकरिता वाट पहावी लागणे, सध्या राज्यातील सर्वच शेतकऱ्यांना गारपीट, अवकाळी पाऊस व दुष्काळ यामुळे आधीच मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत असल्याने सदरची रक्कमही न मिळाल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेली नाराजी व नैराश्याची भावना, याबाबत शासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, या संदर्भात शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

..8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये काही गोष्टींचा तपशील चांगल्या प्रकारे दिलेला आहे. माझे याबात तीन-चार प्रश्न आहेत. लक्षवेधी सूचनेच्या निवेदानात असे म्हटलेले आहे की, 2 लाख 23 हजार 157 शेतकऱ्यांना दिलेले कर्ज आणि त्यावरील व्याज संबंधित सावकारास अदा करुन शेतकऱ्यांना कर्ज मुक्त करण्याचा निर्णय घेतलेला आहे. संपूर्ण राज्यात शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाच्या संदर्भात मी प्रश्न विचारला होता. परंतु, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात आपण विदर्भ आणि मराठवाड्यातील परवानाधाक सावकारांचा उल्लेख केलेला आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रात एकही खाजगी सावकार नाही काय आणि खाजगी सावकार नसल्यामुळे कर्जमाफी देण्याच्या संदर्भात काही घडलेले नाही काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, किती जिल्ह्यातील किती सावकारांच्या कर्जापासून किती शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आलेली आहे ? लक्षवेधी सूचनेच्या निवेदनातील तिसऱ्या परिच्छेदात असे नमूद केलेले आहे की, "सहकारी संस्थांच्या निवडणूक कामामुळे सावकारी कर्ज माफीची आकडेवारी अद्याप उपलब्ध झाली नाही, ही बाब खरी नाही." आता ही माफी प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना मिळालेली आहे ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, आपण मुद्दल आणि व्याज माफ केले असेल तर त्याबद्दलचा तपशील सभागृहाला द्यावा. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनातील शेवटच्या परिच्छेदात असे नमूद केलेले आहे की, दिनांक 11.03.2015 च्या शासन परिपत्रकान्वये अशा गावातील बाधित शेतकऱ्यांना सहकारी कर्जांचे रुपांतर करण्याचा व शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे." यानुसार एकूण किती रकमेच्या कर्जाला स्थगिती मिळालेली आहे ?

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, हिवाळी अधिवेशनात प्रामुख्याने दुष्काळी पॅकेजचा भाग म्हणून ही घोषणा केली होती. एकूण महाराष्ट्रामध्ये पंचनामे केल्यानंतर विदर्भ आणि मराठवाडा येथील 24 हजार गावे दुष्काळी घोषित करण्यात आली. ही घोषणा प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी केलेली असल्यामुळे उर्वरित महाराष्ट्राची घोषणा यामध्ये अंतर्भूत नाही. आतापर्यंत किती शेतकऱ्यांना लाभ झाला, याचे उत्तर निवेदनामध्ये दिलेले आहे. ही सगळी माहिती गोळा करुन त्याचा निर्णय 12 मार्चच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये घेण्यात आला. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद केली गेली. 30 जूनपर्यंत त्या त्या नोंदणीकृत सावकारांकडून माहिती घेणे, त्या माहितीचे कन्फर्मेशन घेणे, त्यांच्या खात्यात पैसे देण्यापूर्वी शेतक-यांनी जमिनी किंवा दागिने गहाण ठेवल्या आहेत ते त्यांना मिळाले अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र मिळणे, त्यानंतर खात्यावर पैसे भरणार असल्यामुळे अजूनही याची प्रक्रिया सुरु झालेली नाही. 30 जूनपर्यंत प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. किती जणांना याचा लाभ दिला या प्रश्नाचे उत्तर 'यादी शून्य' असे आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, शेतकऱ्यांची संख्या शून्य कशी असू शकते?

श्री.चंद्रकांत पाटील : आतापर्यंत एकूण किती शेतकऱ्यांना लाभ दिला त्याची माहिती शून्य आहे असे मी म्हटले. शेवटचा प्रश्न सहकारी कर्जाचे रुपांतर करण्याबाबतचा होता. त्याचा निर्णय शासनाने घोषित केला आहे. 5 वर्षांसाठी कर्जाचे पुनर्गठन करणार आहोत. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन कर्जाच्या वसुलीला 30 जूनपर्यंत स्थगिती दिली आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जमाफीची घोषणा हिवाळी अधिवेशनात करण्यात आली होती. याबाबतचा निर्णय 12 मार्चच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानंतर 25 दिवस उलटूनही अद्याप शासन निर्णय निर्गमित का झालेला नाही? निवेदनात म्हटले आहे की, शासनाने 2,23,157 शेतकरी/कर्जदार यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जमाफीची घोषणा केली आहे. या उत्तराबाबत माझा आक्षेप आहे. तुम्ही 'कर्जदार' असा उल्लेख केला आहे. मला माहितीच्या अधिकाराखाली सहकार विभागाकडून जी माहिती प्राप्त झाली त्यानुसार राज्यात 1 लाखापेक्षा जास्त कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची कर्जाची रक्कम 31.37 लाख इतकी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील : शासनाने फक्त मराठवाडा व विदर्भाला पॅकेज दिलेले आहे.

श्री.धनंजय मुंडे : मी राज्याची माहिती देत आहे. प्रत्येक वेळी हा विषय आल्यानंतर मी म्हटले आहे की, राज्य सरकारला सावकारांचे कर्ज अशाप्रकारे देता येणार नाही. एकूण 1 लाखापेक्षा कमी कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या 251 आहे आणि त्यांच्या कर्जाची रक्कम 96 लाख 24 हजार इतकी आहे. ही माहिती मला दिनांक 12 फेब्रुवारी, 2015 रोजी प्राप्त झाली. सहकार खात्याने दिलेली अधिकृत माहिती आहे. सरकारने जाहीर केलेली शेतकऱ्यांची संख्या 2.23 लाख आहे. ही संख्या हिवाळी अधिवेशनात निर्णय घोषित केल्यानंतरची आहे की त्यापूर्वीची आहे? 12 फेब्रुवारीपर्यंत कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या कर्जाची रक्कम 1.5 कोटी रुपये आहे. मग शासन 173 कोटी रुपये कर्ज कोणाचे माफ करणार आहे? शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची टक्केवारी दिली आहे. ही माहिती 14 जानेवारीची आहे. 14 जानेवारीनंतर शेतकऱ्यांची संख्या कशी वाढली?

सभापती महोदय, डीडीआर कार्यालयात फर्मचे नाव टाकून मागणी केल्यानंतर सावकारांना व्यवसाय करण्यास लायसन्स दिले जाते. त्या लायसन्सच्या क्लॉज 2 मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, शेतीसाठी कर्ज पुरवठा करता येणार नाही. त्यामुळे शासनाने केलेली घोषणा खोटी आहे की केलेली घोषणा सत्यात उतरविण्यासाठी सरकारने द्राविडी प्राणायाम सुरु केला आहे. शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेले नसेल तर कोणाचे कर्ज फेडले जाणार आहे, पूर्णपणे सावकांराचा फायदा करुन दिला जात आहे का? 14 जानेवारीपर्यंत शेतकऱ्यांच्या कर्जाची रक्कम 1.5 कोटी रुपये असल्याची विभागाने माहिती दिली आहे. मंत्री महोदयांनी या संदर्भात खुलासा करावा.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या शेवटच्या मुद्याबाबत मी अगोदर उत्तर देतो, म्हणजे सर्व गोष्टींचा उलगडा होईल. प्रामुख्याने दुष्काळी भागात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. आपण सावकारी प्रतिबंध कायदा केला. आजही आपण आवाहन करीत आहोत की, जे सावकार त्रास देत असतील त्यांच्या विरोधात जिल्हाधिकारी किंवा पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार दाखल करावी. त्यांच्याविरुध्द

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

फौजदारी कारवाई होईल. नोंदणीकृत सावकारांकडून घेतलेले कर्ज आपण माफ करु शकलो तर खूप मोठा दिलासा शेतकऱ्यांना मिळू शकेल. लक्षात असे आले की, शेतकऱ्यांनी शेतीसाठी कर्ज

..3...



श्री.चंद्रकांत पाटील....

घेतलेले असेल तर त्यावर 12 टक्के व्याज आकारले जाते आणि शेती व्यतिरिक्त कामासाठी कर्ज घेतले असेल तर 16 टक्के व्याज आकारले जाते. सावकारांच्या लायसन्समध्ये शेतीसाठी कर्ज पुरवठा करता येणार नाही असा उल्लेख आहे. प्रामुख्याने शेतकऱ्यांनी कोणत्याही कारणास्तव कर्ज घेतले असले तरी त्या कर्जामुळे तो आत्महत्येकडे वळतो. मुलीच्या लग्नासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी किंवा घरातील आजारपणासाठी कर्ज घेतलेले असले तरी विचारपूर्वक निर्णय असा घेण्यात आला की, शेतकरी ग्रामीण भागात राहतो, अनेक शेतकरी शहरी भागात राहतात त्यांना यादीतून वगळले आहे. त्यामुळे शेतकरी आहेत आणि ग्रामीण भागात राहतात त्यांनी कोणत्याही कारणास्तव कर्ज घेतलेले असेल, तो शेतकरी हैराण झालेला आहे, आत्महत्येकडे वळतो म्हणून त्यांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, सर्व प्रकारच्या सावकारांची नोंद डीडीआरकडे असते. त्यांना दर 3 महिन्यांनी अहवाल द्यावा लागतो. किती जणांनी कर्ज घेतले, व्याज किती आहे त्यावरुन आकडेवारी सादर केली आहे ती बरोबर आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, शेतीसाठी आणि बिगर शेतीसाठी कर्ज घेतलेल्या अधिकृत शेतकऱ्यांची यादी 14 जानेवारीपर्यंतची यादी आलेली आहे. त्यात 1 लाखापेक्षा जास्त कर्ज घेतलेल्या कर्जाची संख्या 16.54 कोटी असून 1 लाखाच्या आत घेतलेल्या कर्जाची रक्कम 50 कोटी रुपये आहे. 14 जानेवारीपर्यंतची अधिकृत आकडेवारी आहे. शेतकऱ्यांना अडचणीतून सोडविण्याकरिता घेतलेला निर्णय आहे. हा निर्णय शेतकऱ्यांऐवजी सावकारांचा फायदा करणारा आहे. सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची नोंद शासन दरबारी नाही. आपण जी माहिती दिली ती माझ्याकडे उपलब्ध आहे. कर्ज कोणते माफ होणार आहे, या निर्णयामुळे शेतकऱ्यांचा फायदा होणार नाही. शासनाला सावकारांचा फायदा करायचा आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या नावाखाली सावकारांचा फायदा करणार असाल तर ते चुकीचे आहे. 2.23 लाख शेतकरी कोणत्या माध्यमातून आयडेंटिफाय करणार आहात?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सावकारांना शेतीसाठी कर्ज द्यायचा अधिकार नसेल तर सावकारांनी ज्या शेतकऱ्यांना कर्ज दिले त्या शेतकऱ्यांची यादी गृहित धरणार आहात काय? या गोष्टी क्लिष्ट आहेत. मी अमरावतीचा मुद्दा उदाहरण म्हणून सांगू इच्छितो. मराठवाडा आणि अमरावती विभागामध्ये सावकारांनी शेतीसाठी कर्ज दिलेले नाही.

नंतर 2बी.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

सावकाराच्या दफ्तरामध्ये 8अ चा एक नमुना असतो. त्यात कर्ज शेतीसाठी घेतले आहे अशी नोंद केलेली असते. मराठवाडा आणि विदर्भामध्ये शासनाच्या नमुन्यामध्ये शेतीसाठी कर्ज दिल्याचा कुठेही पुसटचा देखील उल्लेख नाही. हे मी जबाबदारीपूर्वक सांगत आहे. तेव्हा या सगळ्या गोष्टींचा खुलासा माननीय मंत्र्यांनी करावा.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी मघाशी स्पष्ट केले की, शेतकऱ्याने कुठल्याही कारणाने कर्ज घेतले असेल मग ते मुलीच्या लग्नासाठी, घरातील कोणाच्या तरी आजारपणासाठी, मुलाच्या शिक्षणासाठी कर्ज घेतल्याने तो त्रस्थ होतो आणि मग आत्महत्येकडे वळतो. फक्त शेतीसाठी कर्ज घेतले म्हणून शेतकरी आत्महत्येसाठी प्रवृत्त होत नाही. असे जरी असले तरी मराठवाडा आणि विदर्भ या दोन विभागातील शेतकऱ्यांचे जे जे कर्ज असेल ते माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. माननीय विरोधी पक्ष नेते वारंवार आकडेवारीचा उल्लेख करीत आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील सावकाराकडे ज्या नोंदणीकृत नोंदी आहेत त्याप्रमाणे आकडेवारी तयार झालेली आहे. आम्ही हे सर्व 30 जून पर्यंत देणार आहोत. त्याची यादी देखील आम्ही पटलावर ठेवू.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, सावकारांचे कर्ज मार्फ करण्याची अत्यंत चुकीची पद्धत पडत आहे. त्यातून सरकार सावकारीला प्रोत्साहन देत आहे असे आमचे स्पष्ट म्हणणे आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारे होणार नाही. तसेच उर्वरित महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना का गाळण्यात येत आहे असा माझा दुसरा प्रश्न आहे. तेथील शेतकऱ्यांनी अजून आत्महत्या केलेल्या नाहीत. त्या कराव्यात अशी आपण वाट पाहात आहात काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी सुरूवातीलाच सांगितले आहे की, यावर्षी महाराष्ट्रामध्ये भीषण दुष्काळ हा प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यामध्ये पडला आहे. पहिल्या सर्वेक्षणानंतर जवळ जवळ 24 हजार गावांची यादी झाली तयार झाली आहे. दुष्काळी पॅकेज घोषित करण्यामध्ये नोंदणीकृत सावकरांचे कर्ज माफ करू असा एक मुद्दा होता. त्यानुसार त्यांचे कर्ज माफ झालेले आहे. तसेच, याच भागामध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे हे देखील आपल्याला माहीत आहे. त्या भागातील लोकांनी आत्महत्या केल्यानंतर कर्जमाफी देऊ असा त्याचा अर्थ होत नाही. सगळ्यांचे मत असेल तर मग उर्वरित महाराष्ट्राचा देखील विचार केला जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय,शेती आणि बिगर शेती मिळून सावकरांकडून दिल्या गेलेल्या कर्जाची रक्कम 70 ते 75 कोटी रूपयांपेक्षा जास्त नाही असे माहितीच्या अधिकारात सहाकार आयुक्तांनी उत्तर दिलेले आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, ती यादी मी पटवावर ठेवतो.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ही यादी नुसती पटलावर ठेवून चालणार नाही. तर ती नाव व कारणांहित ठेवावी लागेल. माहितीचा अधिकारात सहकार आयुक्तांनी चुकीची माहिती दिली असेल व ती चूक असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सहकार आयुक्तांविरूद्ध कारवाई करणार आहात काय ?

श्री.चंद्रकांत पंडित : सभापती महोदय, मी उत्तरातच सांगितले आहे की, दिनांक 30 जून 2015 पर्यत आपण किती जणांचे कर्ज माफ करू शकू याचा अंदाज घेण्यात येईल. आपण चार हजार कोटी रूपयांचे पॅकेज घोषित केले. त्यातील 500 कोटी रूपये उरले आहेत. यासाठी वेगवेगळी कारणे आहेत. आपण जेव्हा 30 जूनला पूर्ण विराम देऊ तेव्हा 2 लाख 23 हजार एवढच्या संख्येची यादी आपण पटलावर ठेवू.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या प्रश्नामध्ये अजूनही स्पष्टता आणली नाही. सावकारांना लायसेन्स डीडीआर देतो. त्यामुळे दरवर्षी मार्च अखेर पर्यंत कोणी किती लोन घेतले आहे हे डीडीआरला कळवावे लागते. तसे सावकारांनी डीडीआरला कळविलेले आहे काय, त्याची चौकशी शासन करणार आहे काय ? असे केले तर त्यात फॉल्ट नक्की मिळेल. असे केले तर त्यात ऑडिटर देखील येईल. आपल्याला अगदी सोपे उदाहरण पेण अर्बन बँकेचे देण्यात येईल. तेव्हा ऑडिट व फेर तपासणी करण्याचे काम राज्य शासन करणार आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पंडित : सभापती महोदय, डिसेंबरच्या अधिवेशनापासून वेळ लागण्याचे मुख्य कारण पूर्ण छाननी हेच आहे. नियम असा आहे की, नोंदणी केल्यानंतर सावकाराला लायसेन्स मिळाल्यानंतर त्याने दर महिन्यांनी किती जणांनी कर्ज घेतले आहे याचे स्टेटमेंट द्यायचे असते. त्याने केलेल्या व्यवहाराचे दरवर्षी ऑडिट होते. या सर्वांची पाहणी करण्यामध्ये वेळ गेल्यामुळे 12 मार्च रोजी कॅबिनेट नोट तयार झाली. त्यामुळे आपण पुरेशी काळजी घेत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सूचना केल्याप्रमाणे आण्खी काळजी घेण्यात येईल.

........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : राज्यात बोगस पॅथॉलजी लॅबचे पसरत चालले जाळे

**मु.शी.** : राज्यात बोगस पॅथॉलजी लॅबचे पसरत चालले जाळे

यासंबंधी सर्वश्री भाई गिरकर, संजय दत्त, भाई जगताप, मुझफ्फर हुसेन सय्यद, शरद रणपिसे, जगन्नाथ शिंदे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यामध्ये हजारो डी.एम.एल.टी. किंवा तत्सम अर्हताधारक व्यक्ती महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे (MMC) नोंदणीकृत नसताना, मान्यताप्राप्त पॅथोलॉजीस्टची नियुक्ती न करता लॅबोरोटरी चालवून आधुनिक वैद्यकशास्त्राचा व्यवसाय करीत असणे, सदर व्यक्ती पात्र नसताना स्वत: रक्ताच्या चाचण्या करणे, अहवाल तयार करुन सदर चाचणी अहवाल मान्यताप्राप्त पॅथोलॉजीस्ट शिवाय सतत प्रमाणित करणे, अशापध्दतीने जनतेच्या आरोग्यास धोका निर्माण करुन आर्थिक फसवणूक करीत असणे, त्यामुळे जनतेच्या आजाराचे चुकीचे निदान दाखवून चुकीची औषधे देण्यात येणे, त्याचे विपरित परिणाम आरोग्यावर होत असून प्रसंगी लोकांना जीव गमवावा लागत असणे, भारतीय वैद्यकीय परिषद आणि महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांनी दिलेल्या तत्वानुसार पॅथोलॉजीस्ट लॅबोरोटरी चालविणे, त्याचे रिपोर्ट कोणी प्रमाणित करणे याबाबत शासनाचे नियम असणे, परंतू त्याची योग्य ती अंमलबजावणी न होणे, मुंबई सारख्या ठिकाणी देखील पॅथोलॉजीस्ट लॅबची महानगरपालिकेकडे नोंदणी न केल्यामुळे बेकायदेशीर लॅब सुरू करुन लोकांच्या जीवाशी खेळणे, राज्यात या बेकायदेशीर लॅबचे जाळे फोफावले असून त्या मुंबईत गल्लो-गल्लीत आढळून येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे (वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, डीएमएलटीधारक स्वतःला डॉक्टर समजून रूग्णांना चुकीचे रिपोर्ट देतात. जे डीएमएलटीधारक चुकीचे रिपोर्ट देत आहेत त्यांना गेल्या 10 वर्षापासून एक लॉबी वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे. येथे नवी मुंबईचा एक दाखला देण्यात आला आहे. मी मागील अधिवेशनामध्ये पॅसिफिक लॅबच्या मालक श्रीमती गीता मेहरा, श्री.राजेंद्र मेहरा यांच्याबद्दलचा प्रश्न उपस्थित केला होता. पॅसिफिक लॅबच्या श्रीमती गीता मेहरा यांनी एका रूग्णाला चुकीचा रिपोर्ट दिला. त्याला एडस नसताना एडस झाला असल्याचे सांगितले. एडस झाला म्हणून तो रूग्ण आत्महत्या करणार होता. या प्रकरणी नंतर कारवाई होऊन संबंधितांना अटक देखील झाली. दरम्यानच्या काळात आम्ही बरे करतो असे सांगून त्या रूग्णाकडून एक लाख रूपये घेतले गेले. अशा बोगस पॅथॉलजी अनेक जिल्ह्यात आहेत. यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाने देखील आपले मत नोंदविले आहे. पण अशा प्रकारच्या केसेस गेल्या 10 वर्षात कुठेही घडलेल्या नाहीत असे भासविण्यात येत आहे. मी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माननीय मंत्र्यांना विनंती करतो की, डीएमएलटीधारक हे डॉक्टर नसताना देखील त्यांनी पॅथॉलजी लॅब उघडून चुकीचे दाखले देण्याचे काम सुरू केले आहे त्यास आपण आळा घातला पाहिजे. पॅथॉलजी लॅब मधून तयार होणाऱ्या रिपोर्टवर एम.डी.लाच सही करण्याचा अधिकार असतो. आज कोणीही उठतो आणि गल्लीबोळामध्ये पॅथॉलजी लॅब काढत आहे. उत्तरामध्ये आपण नमूद केले आहे की, अशा लॅबचा सुळसुळाट झालेला नाही. माझ्या कांदिवली भागातच हजारो लॅब असतील. डॉक्टरला कमिशन देऊन देखील रिपोर्ट दिले जातात. त्यामुळे माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, बोगस डॉक्टरवर आपण कारवाई करतो त्याप्रमाणे जे डीएमएलटीधारक आपण डॉक्टर असल्याचे भासवून बोगस, चुकीचा रिपोर्ट देतात त्यांच्यावर कारवाई करावी व तशा प्रकारचे निदेश जिल्हाधिकाऱ्यांना द्यावेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी मांडलेला विषय अतिशय गंभीर आहे. बोगस पॅथॉलजीच्या बातम्या आपण वारंवार वर्तमानपत्रात वाचत असतो. त्यात एक प्रकारचे रॅकेट असल्याचे लोकप्रतिनिधींना फिरतानाच जाणवते. या विषयासंबंधी शासनाने महाराष्ट्र पॅरा मेडिकल कौन्सिल बिल 2011 मांडून ते पारित देखील केले होते. पण त्यातील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

काही शब्दांना केंद्र शासनाने हरकत घेतली होती. त्यामुळे ते बिल परत आलेले आहे. सदर बिल परिपूर्ण होण्यासाठी पुन्हा आपल्याला मांडावे लागणार आहे. सध्या बोगस वैद्यकीय व्यवसायींवर कारवाई करण्यासंबंधी वेगवेगळ्या प्रकारच्या पाच समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. मुंबई शहर जिल्ह्याकरिता पोलीस आयुक्तांची समिती आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे ....

जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यतेखाली समिती आहे, महानगरपालिकेच्या स्तरावर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती आहे, नगरपरिषदेच्या स्तरावर सीईओ यांच्या अध्यक्षतेखाली समिती आहे तसेच तालुक्याच्या ठिकाणी गटविकास अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. अशा एकंदर 5 समित्या नियुक्त करण्यात आलेल्या आहेत. या समित्या शासन निर्णयाद्वारे गठीत करण्यात आल्या होत्या. शासन निर्णयाद्वारे ज्या समित्या गठीत करण्यात आलेल्या समित्यांना असणारे अधिकार हे कोर्टात फार वेळ टिकत नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रावरील अधिसूचनेद्वारे या समित्या पुनर्रगठीत केल्या तर त्यांना थोडी अधिक ताकद मिळून हे प्रकार रोखण्यासाठी मदत होऊ शकते. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी केलेली सूचना यामाध्यमातून आम्ही अंमलात आणू शकू.

श्री. जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी जो विषय या ठिकाणी उपस्थित केला आहे तो फार गंभीर आहे. या विषयाच्या संदर्भात आम्ही सुध्दा एक मोहीम हाती घेतली होती. परंतु त्यावेळेला फूड अँड ड्रग विभागाने हात वर केले होते. या विषयाच्या संदर्भात गृह विभागाकडे गेलो परंतु त्यांनी देखील या विषयाच्या संदर्भात हात वर केले. पॅथॉलॉजीच्या नावाखाली बोगस लोक हा पॅथॉलॉजीचा धंदा करतात तसेच बोगस डॉक्टर्स सुध्दा अशाच प्रकारे धंदा करतात. यासंदर्भात पोलीस किंवा एफडीए हे बोगस धंद्याकडे लक्ष देत नाही. या सर्व प्रकारामुळे सार्वजनिक आरोग्याला फार मोठी बाधा आलेली आहे. खोटे रिपोर्ट दिल्यामुळे रुग्ण गांगरुन जातो. यामध्ये एडस् किंवा कॅन्सरचे खोटे रिपोर्ट देऊन गरीब माणसाला नागवले जाते. त्यामुळे यासंदर्भात शासनाने ठोस अशी कारवाई करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात पॅरॉमेडीकलची कमिटी स्थापन करुन उपयोग होणार नाही त्यामुळे शासनाने पोलीस आणि एफडीए या दोघांच्या माध्यमातून ठोस कारवाई करणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : होय, सभापती महोदय.

प्रा. अनिल सोले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. बोगस डॉक्टर आणि डीएमएलटी पदविकाधारक हा फार गंभीर विषय आहे. वास्तविक पाहता डीएमएलटी पदविकाधारकांच्या संदर्भात पॅरामेडीकल कौन्सील बील

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. अनिल सोले.....

क्रमांक 66 हे सन 2011 मध्ये मंजूर झाले होते. हे बिल केंद्रशासनाच्या आयुषकडे पाठविण्यात आले होते. परंतु आयुषने त्यामध्ये काही त्रुटी आणि चुका दाखवल्यामुळे हे बिल दि. 30/4/2014 रोजी राज्य शासनाकडे दुरुस्त्यांसहित परत पाठविले गेले. त्यांनी पाठवलेल्या दुरुस्त्या राज्य शासनाने मान्य केल्या आहेत असे मला कळाले आहे ते सत्य आहे काय ? शासनाने या दुरुसत्या मान्य केल्या असतील तर सुधारित बिल कधी आणले जाणार आहे ? हे बिल जोपर्यंत पास होणार नाही तोपर्यंत यामध्ये ठोस कारवाई होऊ शकणार नाही. डीएमएलटीला सगळयाच टेस्ट् करणे अनुज्ञेय नाही. त्यांना परवानगी असलेल्याच टेस्ट् त्यांनी केल्या पाहिजेत. त्यामुळे डीएमएलटीच्या संदर्भात शासनाने योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे राज्य शासन केंद्राच्या सूचनेप्रमाणे सुधारणा बिल किती तारखेपर्यंत आणणार आहे ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपले बिल अमान्य करतांना केंद्र सरकारने ज्या काही गोष्टी मांडल्या आहेत त्यामध्ये डिप्लोमा ईन मेडिकल लॅब टेक्नॉलॉजीचा जो व्यावसायिक आहे त्याला प्रॅक्टीशनर म्हणण्यास त्यांनी आक्षेप घेतला आहे. त्यांना वर्कर किंवा कर्मचारी म्हणावे असे त्यांनी सुचवले आहे. असे म्हटले तर ते या व्यावसायिकाला फार सन्मानपूर्वक होणार नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारल्यानुसार येत्या जूनच्या अधिवेशनात नवीन बिल मांडू व त्यामध्ये सर्व गोष्टी आपल्याला आणता येतील. त्याच बरोबर बोगस डॉक्टर प्रतिबंधकाचे जे नियम आहे त्याअंतर्गत बोगस पॅथॉलॉजीवरील कारवाई कोर्टात टिकण्यासाठी शासन विचार करीत आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, बोगस डॉक्टर्स तसेच बोगस पॅथॉजिस्टचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात आहे. ग्रामीण भागात तसेच झोपडपट्टयांमध्ये बोगस डॉक्टर्स तसेच बोगस पॅथॉजिस्टचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात आहे. या लोकांवर धाड टाकून त्यांचे प्रमाणपत्र खरे आहे की, खोटे आहे हे तपासण्याची कोणतीही यंत्रणा नाही. आपल्याकडे स्त्रीभ्रूण हत्या झाल्या होत्या तेव्हा पीसीपीएनडीटी ॲक्ट राबवण्यासाठी सर्वत्र धाडी टाकण्याचे सत्र सुरु झाले आणि त्यानंतर स्त्रीभ्रूण हत्येला आळा बसला होता. त्यामुळे तशा प्रकारे आपण काही पावले उचलणार आहात काय ?

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, तसे आम्ही सर्व करु.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना धन्यवाद देऊ इच्छितो की, बोगस डॉक्टरांवर आपण कारवाई करतो परंतु ते डॉक्टर नसतांना सुध्दा सर्टिफिकेटवर सही करतात. त्यांना अशा प्रकारे सही करण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे बोगस डॉक्टरांप्रमाणे पॅथॉलॉजीवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले तर अशा प्रकारच्या पॅथॉलॉजी 50 टक्के तरी बंद होतील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर व सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी बोगस डॉक्टरांच्या संदर्भात उल्लेख केला असून त्यांना मी सांगू इच्छितो की, बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याच्या संदर्भात पुनर्विलोकन समिती आहे त्या समितीची कार्यकक्षा आम्ही वाढवू व त्या कार्यकक्षेत पॅथॉलॉजीला आणले तर त्यांच्यावर त्या पध्दतीने कारवाई करता येईल.

-----

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : केंद्रीय आश्रमशाळ व अपंग शाळांना अनुदान देणे

**मु.शी.** :केंद्रीय आश्रमशाळ व अपंग शाळांना अनुदान देणे यासंबंधी श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"***राज्य शासनाने राज्यामध्ये साधारणपणे २८८ केंद्रीय आश्रमशाळांना व अपंग शाळांना अनुदान तत्त्वावर मान्यता देणे, तद्‍नंतर या शाळांना अनुदान द्यावे यासाठी शिक्षक कर्मचाऱ्यांनी शासनाकडे सातत्याने मागणी करणे, या शाळांमधून हजारो गोरगरीब विद्यार्थी शिक्षण घेत असणे, या शाळा सुव्यवस्थित सुरू असणे, या शाळांची दरवर्षी सामाजिक न्याय विभागाकडून तपासणी होणे तसेच अनुदान देण्यासाठी सुध्दा पडताळणी होणे, परंतु याबाबत शासनाने कोणताच निर्णय न घेणे, त्यामुळे सामाजिक न्याय विभागाकडून परवानगी देण्यात आलेल्या राज्यातील २८८ केंद्रीय आश्रमशाळांना व अपंग शाळांना अनुदान देणे याबाबत शिक्षक प्रतिनिधी वेळोवेळी शासन दरबारी पाठपुरावा करणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.***"

श्री. दिलीप कांबळे (सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते ) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आपण सुध्दा या प्रश्नाच्या संदर्भात शासनाकडे वारंवार मागणी करीत आहात. या राज्यातील 288 आश्रमशाळांना केंद्राने मान्यता दिली असून त्यांना राज्य शासनाने सुध्दा परवानगी दिलेल्या आहेत. या आश्रमशाळांना अनुदान मिळण्याबाबत आम्ही अनेक दिवसापासून पाठपुरावा करीत आहोत. स्व.विलासरावजी देशमुख मुख्यमंत्री असताना त्यांनी यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्यास सांगितले होते. हा प्रस्ताव मंत्री मंडळासमोर सुध्दा गेला होता. परंतु हा प्रस्ताव आजतागायत मंजूर झालेला नाही. असे असतानाही 25 नवीन शाळांना परवानग्या देण्यात आल्या आहेत. मागच्या वेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत या आश्रमशाळाची तपासणी केली गेली होती. त्यावेळी अ,ब,क,ड अशी वर्गवारी करण्यात आली. जिल्हयामध्ये जिल्हाधिकाऱ्यापेक्षा कोणीही मोठा नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी तपासणी केलेल्या शाळांचा प्रस्ताव अनुदान सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तपासणी झालेल्या अ आणि ब वर्गामध्ये ज्या शाळा पात्र ठरल्या त्या शाळांना अनुदान देण्याच्या संदर्भात शासन कधी पर्यंत निर्णय घेणार आहे ?

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे...

अपंग शाळांना अनुदान देण्यात आल्याचे निवेदनात नमूद केलेले आहे. ज्या अपंग शाळांना अजून अनुदान देण्यात आलेले नाही त्या शाळांच्या बाबतीत शासन केव्हा निर्णय घेणार आहे, ज्या केंद्रीय आश्रमशाळा बंद आहेत आणि ज्या शाळांनी तपासणी करण्यास नकार दिलेला आहे त्या शाळांच्या बाबतीत सरकारची कोणती भूमिका आहे ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन 2000 पासूनचा हा विषय आहे. या संदर्भात शासन तातडीने निर्णय घेणार आहे. दिनांक 16 मार्च रोजी शाळांची तपासणी झाली आहे आणि त्यामध्ये अ, ब, क आणि ड असे प्रकार केलेले आहेत, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. यातील अ आणि ब शेरा असलेल्या शाळांना आणि संस्थांना अनुदान देण्याचा निर्णय शासन घेणार आहे. ज्या शाळांनी किंवा संस्थानी तपासणी करण्यास विरोध केला त्या शाळांची पुन्हा तपासणी करण्यात येईल आणि त्यांना बहिष्कार मागे घेण्यास सांगण्यात येईल. मार्च महिन्यामध्ये कुठे तपासणी करता असे काही शाळांनी सांगितले. तेव्हा त्या शाळांची पुन्हा तपासणी करण्यात येईल. दिनांक 16 मार्च रोजी झालेली तपासणी जिल्हाधिकारी, महसूल विभागामार्फत झालेली आहे. या संदर्भात शासनाची स्पष्ट आणि स्वच्छ भूमिका आहे. शासनाला या शाळांना किंवा संस्थांना मान्यता द्यायची आहे, पण बोगस शाळांच्या बाबतीत शासन अतिशय कठोर असून अशा शाळांना कदापि मान्यता देणार नाही.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, मागील चौदा वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. 50 हजारांपेक्षा जास्त मुले या आश्रमशाळांमध्ये भोजन करतात. हा अतिशय गंभीर विषय आहे. या ठिकाणी माननीय मंत्र्यांनी सांगितले की, लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल. आम्ही हे उत्तर तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्यापासून ऐकत आलो आहे. त्यांनी सांगितले होते की, आम्ही मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव आणतो. मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव जाऊन आला आहे. माझा प्रश्न आहे की, लवकरात लवकर म्हणजे नेमक्या किती कालावधीत ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल ?

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांना पुढील अधिवेशनात प्रश्न विचारण्याची संधी मिळणार नाही, एवढेच मी सांगतो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी दमदार उत्तर दिल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. दिनांक 16 मार्च रोजी तपासणी झाली त्यावेळी राज्यात परीक्षा सुरु होत्या. काही ठिकाणी इयत्ता आठवी व नववी इयत्तेच्या परीक्षा संपल्यामुळे शाळेत विद्यार्थी नव्हते. राज्यात एकाच दिवशी तपासणी करण्यात आली. ही कोणती महंमद तुघलकी तपासणी होती ? माझा प्रश्न आहे की, जिल्हाधिकारी यांचेमार्फत शाळांची तपासण्‍ी झाली त्यानुसार अ, ब क व ड अशी वर्गवारी ठरविण्यात आली. या सर्व शाळांना अनुदान देण्याचा निर्णय शासन घेणार काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, दिनांक 16 मार्च रोजी राज्यातील सर्व शाळांची तपासणी झालेली आहे. काही संस्थांनी सांगितले की, दहावीच्या परीक्षा सुरु आहेत. परंतु ज्या शाळांच्या पटलावर विद्यार्थी आहेत त्यांच्या बाबतीत निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल. एका शाळेतून दुसऱ्या शाळेची तपासणी करण्यासाठी अधिकारी जात असताना त्यांच्या गाडीमागे ट्रक का जात आहेत अशी अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता, ज्या शाळांची तपासणी झाली त्या शाळेतील विद्यार्थी ट्रकमध्ये आहेत आणि ते पुढच्या शाळेत जात आहेत असे निदर्शनास आले.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, एका शाळेतील विद्यार्थी दुसऱ्या शाळेत दाखववायाचे आणि तेच विद्यार्थी तिसऱ्या शाळेत दाखवयाचे असे प्रकार होत आहेत. माझा प्रश्न आहे की, तपासणीमध्ये बोगस शाळा आढळून आल्या त्या शाळांवर शासन अधिवेशन संपण्यापूर्वी कडक कारवाई करणार का ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, होय.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते ):** मी मंत्री महोयांना सांगू इच्छितो की, हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. गोरगरिबांची मुले त्या शाळेत शिक्षण घेत आहेत. मागील 15 वर्षापासून हा संघर्ष सुरु आहे. माननीय मंत्र्यांनी या विषयासंबंधी गांभीर्याने आणि सकारात्मक विचार करावा अशी माझी सूचना आहे.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, होय.

----------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे )**

**पृ. शी.** : रायगड जिल्ह्यातील दिघी पोर्टमधून रायगड जिल्ह्यात आणि इतर ठिकाणी बेकायदेशीरपणे वाहतूक सुरु असल्यामुळे त्या भागांतील रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे

**मु. शी.** : रायगड जिल्ह्यातील दिघी पोर्टमधून रायगड जिल्ह्यात आणि इतर ठिकाणी बेकायदेशीरपणे वाहतूक सुरु असल्यामुळे त्या भागांतील रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे यासंबंधी सर्वश्री सुनील तटकरे**,** ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, नरेंद्र पाटील, किरण पावसकर, हेमंत टकले, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुनील तटकरे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रायगड जिल्ह्यातील दिघी पोर्ट मधून रायगड जिल्ह्यात तसेच राज्यात इतर ठिकाणी दिघी कंपनीचे अवजड ट्रेलर, 10 चाकी किंवा त्यापेक्षाही जास्त चाकाचे ट्रक यामध्ये क्षमतेपेक्षा जास्त माल भरणे, त्यामध्ये लोखंडी कॉईलची मोठ्या प्रमाणात वाहतूक होणे, म्हसळा गावातील अंतर्गत बाजारपेठेतील रस्त्यावरुन बेकायदेशीरपणे ही वाहतूक सुरु असणे, दिघी पोर्टने रस्ता दुरुस्तीसाठी 55 कोटी रुपये भरणे आवश्यक असणे, परंतु या दिघी पोर्टने अद्याप 55 कोटी रुपये भरलेले नसणे, दिघी पोर्टने केलेल्या माती व वाळूच्या बेकायदा उत्खननाबाबत शासनाने त्यांचेवर सुमारे 45 कोटी रुपये दंड आकारणे, परंतु अद्यापही दिघी पोर्टने दंडाची रक्कम जमा न करता शासनाच्या आदेशाचा केलेला भंग, रस्त्याची अतिशय दूरवस्था झाली असल्यामुळे तत्कालीन पालकमंत्री रायगड यांच्यावतीने शासनाने निधी खर्च करुन रस्त्याची दुरुस्ती करणे, या रस्त्यावरील वाहतूक सुरू करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड व सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी मौखिक आदेश देणे, या वाहतुकीमुळे म्हसळा बायपास रस्त्यावरील मोरीवरील पूल तुटून नादुरुस्त

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

झाल्याने इतर वाहनासाठी सदरचा पूल धोकादायक झालेला असणे, रस्त्याचेसुध्दा मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, याबाबत तेथील नागरिकांनी पोलिसांकडे तक्रारी केल्या असता त्याकडे पोलिसांचे होणारे दुर्लक्ष, आता दिघी पोर्ट कंपनीने ही वाहतूक कोणालाही न जुमानता रात्रीचेवेळी अवैधपणे सुरु ठेवलेली असणे, या वाहतुकीला प्रशासनाचाच अंतर्गत पाठिंबा असल्याची चर्चा स्थानिक नागरिकांमध्ये असणे, म्हसळा बाजारपेठेतील जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूने शाळा, शासकीय इमारती व निवासी वस्ती असून हा रस्ता आधीच अरुंद असल्याने रात्रीच्यावेळी या ठिकाणी वाहतूक सुरु असल्यामुळे अपघाताचे वाढलेले प्रमाण, राज्य शासनाने सन 2010 मध्ये जाहीर केलेल्या "पोर्ट पॉलिसी" प्रमाणे फायदा घेणे, परंतु अद्यापही सन 2010 च्या पॉलिसीप्रमाणे शासनासोबत (मेरीटाईम बोर्ड) करार न करणे, ही वाहतूक बंद करुन दिघी पोर्ट विरुध्द कारवाई करण्याबाबत तेथील ग्रामस्थांची होत असलेली मागणी, मागणी पूर्ण होत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.चंद्रकांत पाटील ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती :** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना मी दुसऱ्यांदा विचारत आहे. नागपूरच्या अधिवेशनात देखील मी ही लक्षवेधी सूचना विचारली होती. या लक्षवेधीचा गाभा लक्षात घेतला तर बंदर विकास विभागाच्या मार्फत म्हणजे माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देणे अपेक्षित होते. या लक्षवेधी सूचनेस सार्वजनिक बांधकाम मंत्री उत्तर देत असतील तर त्यास माझी काही हरकत नाही कारण ते ज्येष्ठ मंत्री आहेत. या लक्षवेधी सूचनेमध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची उत्तरे त्यांच्याकडून मिळतील अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, सन 2002 मध्ये राज्य सरकारने दिघी बोर्ड कंपनीला खाजगीकरणाच्या माध्यमातून विकास करण्याची परवानगी दिली. त्यावेळी जो करारनामा झालेला त्या सांक्षाकित करारानाम्याच्या उल्लेख निवेदनात केलेला आहे. त्या करारातील अटींप्रमाणे विकासकाने रस्त्यांच्या बाबतीत कोणती कामे करावयाची होती ? सन 2010 मध्ये सुधारित बंदर विकास धोरण जाहीर झाले. आता 2015 सुरु आहे. सुधारित बंदर विकास धोरणाप्रमाणे सदर विकासकाने करारनामा साक्षांकित करण्याची आवश्यकता होती की नाही ? कारण मेरीटाईम बोर्डाने कळविले आहे की, त्यांनी करारावर सही केलेली नाही. आपण आता करारनामा न करता पोर्ट ऑपरेशन करण्याची परवानगी दिली म्हणजे आपण हजारो कोटी रुपयांचा पोर्ट त्याला आंदण म्हणून दिलेला आहे, याची कारणे काय आहेत ? 2002 च्या करारनाम्यानुसार विकासकाने रस्त्याची दुरुस्ती करायची होती. पोर्ट कमिशन झाल्यापासून सार्वजनिक बांधकाम विभागाने किती खर्च केलेला आहे ? नागपूरच्या अधिवेशनात मी प्रश्न विचारला होता तेव्हा माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले होते की, तेथील वाहतूक बंद होईल आणि त्यावेळी माननीय सभापतींनी देखील आदेश दिले होते. परंतु, वरिष्ठ पातळीवर कोणतीही परवानगी नसताना सचिव, बांधकाम आणि जिल्हाधिकारी रायगड यांनी मौखिक सूचना देऊन वाहतूक सुरु करण्याची परवानगी दिली अशी नोंद स्टेशन डायरीमध्ये आहे, अशी माझी माहिती आहे. तेव्हा या संदर्भातील खुलासा मंत्री महोदय करतील काय ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, दिघी पोर्टचा मेरीटाईम बोर्डाबरोबर जो करार त्यानुसार ते हा रस्ता वापरतील आणि रस्त्याची देखभाल करतील. पोर्टच्या वाहनांव्यतिरिक्त इतर वाहनांसाठी देखील हा रस्ता वापरण्यात येतो. म्हसळा बायपासवरील पूल तुटला त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी कंपनीस 35 लाख रुपये भरण्यास सांगितले तसेच या पुलाची दुरुस्ती झाल्याशिवाय तो वाहतुकीस खुला करणार नाही असे सांगितल्यानंतर कंपनीने पैसे भरले. त्या रस्त्यावरुन अन्य वाहने देखील जात असल्यामुळे त्यात्या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक तो खर्च केलेला आहे. त्या रस्त्यावर ज्या प्रकारची वाहने जातात त्यावरुन हा रस्ता रुंद करणे आवश्यक आहे व त्यासाठी 620.75 कोटी खर्च आहे. हा सर्व खर्च दिघी पोर्टने करावयाचा आहे. असा प्रस्ताव सरकारकडे सादर झालेला आहे. त्याचे टेक्निकल परीक्षण देखील पूर्ण होत आले आहे. कराराप्रमाणे हा सर्व खर्च दिघी पोर्टने करावयाचा आहे. त्याठिकाणी टोल न लावता पोर्टमध्ये येणाऱ्या वाहनांकडून कार्गो चार्जेस वसूल करायचा आहे, असे करारामध्ये आहे.

सन 2010 च्या मेरीटाईम बोर्डाच्या नवीन पॉलिसीप्रमाणे ॲग्रीमेंट का करण्यात आले नाही असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, तसे ॲग्रीमेंट करणे कम्पलशन नाही. सन 2010 च्या धोरणाप्रमाणे त्यांनी ॲग्रीमेंटप्रमाणे साईन केले असते तर त्यांनी वेगवेगळ्या कारणासाठी खणकाम केले त्यासाठी पैसे भरावे लागले नसते.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील....

पण 2010 च्या धोरणानुसार त्यांनी अजून करारावर सही केली नाही. वास्तविक पाहता करारावर सही करणे न करणे हे सर्वस्वी त्यांच्यावर अवलंबून आहे. परंतु 2010 च्या धोरणानुसार त्यांना जास्त सवलती हव्या असतील तर ते घेऊ शकतात.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मंत्री दिशाभूल करीत आहेत. आपण ज्येष्ठ असल्याबद्दल मला आपल्याविषयी आदर आहे. आपण सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री आहात. मी आपल्या लक्षात आणून देतो की, हा रस्ता मुळात लहान वाहनांच्या वाहतुकीसाठी आहे. तो रस्ता अति अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी नाही. माननीय श्री.चंद्रकांत पाटील साहेब, आपण सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री आहात याचा विसर पडू देता कामा नये, अशी माझी नम्र विनंती आहे. कोणाचा तरी ठेका घेऊन येथे उत्तर देणे गैरवाजवी ठरेल. होय, मी आरोप करतो. परंतु मी काय बोलतो ते प्रथम ऐकून घ्यावे. दिघी पोर्ट कमीशन होऊन तीन-चार वर्षे झाली आहेत. या रस्त्यावरुन प्रवासी वाहतूक आणि अति अवजड वाहनांच्या वाहतुकीचे प्रमाण पाहिले तर ते व्यस्त आहे. त्यामुळे हा संपूर्ण रस्ता उद्ध्वस्त झाला आहे. त्या रस्त्यांवर अपघात होऊन काही माणसे मृत्युमुखी पडली आहेत. परंतु आपण सहज सांगत आहात की, 35 लाखाच्या पुलाच्या दुरूस्तीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी पत्र दिले होते. वास्तविक पाहता रस्त्याच्या दुरूस्तीसाठी 55 कोटी रुपये द्यावयाचे होते. दिघी पोर्ट कमीशन झाल्यापासून या रस्त्यावरील सार्वजनिक बांधकाम विभागाचा खर्च केवळ 50-55 कोटी रुपये आहे. दिवे आगार आणि हरिहरेश्वर हे तीर्थक्षेत्र सुध्दा त्याच भागात आहे. त्यामुळे या तीर्थस्थळांच्या ठिकाणी हजारो पर्यटक हे त्याच रस्त्यावरुन जात असतात. परंतु दिघी पोर्ट कमीशनमुळे तो रस्ता पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. मी माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, 2002 चा करार आजही अस्तित्वात आहे. त्या करारानुसार त्या ठिकाणी चौपदरी रस्ता करावयाचा होता, परंतु तो केला गेला नाही. या रस्त्याची देखभाल व दुरूस्ती विकासकाने करावयाची आहे, हे माननीय मंत्र्यांनी कबूल केले आहे. शिवाय हस्तांतरित करण्यात आलेल्या आगरदांडा ते रोहा हा रस्ता सुध्दा त्यांनीच दुरूस्त करावयाचा आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या रस्त्याच्या दुरूस्तीपोटी त्यांनी किती रक्कम द्यावयाची होती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..2..

श्री.सुनील तटकरे....

आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मेरीटाईम बोर्डाकडे किती रकमेचा प्रस्ताव पाठविण्यात आला ? महोदय, मेरीटाईम बोर्डाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.पराग जैन यांची भूमिका सुध्दा या संदर्भात संशयास्पद होती. या बाबतीत मी नंतर बोलेन.

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्थानिक अभियंत्यांनी त्यांच्याकडे 55 कोटी रुपयांची मागणी करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर पाठविला होता. मंत्रालयातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्या प्रस्तावाचा पूर्ण अभ्यास केल्यानंतर विकासकाकडे एवढ्या रकमेची मागणी करता येणार नाही म्हणून त्या विकासकाकडे 5 कोटी रुपयांची मागणी करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविला. त्याचा पाठपुरावा सार्वजनिक बांधकाम विभाग करीत आहे.

श्री.सुनील तटकरे : महोदय, स्थानिक अभियंत्यांनी रस्त्याच्या दुरुस्तीसंदर्भात 55 कोटी रुपये वसूल करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव यांची सुध्दा या संदर्भातील भूमिका संशयास्पद आहे. त्यामुळे त्यांची अँटी करप्शन ब्युरो मार्फत चौकशी करणार काय ? स्थानिक बाबींशी निगडित प्रस्ताव हे कार्यकारी अभियंत्यांकडून येत असतात. कारण त्या रस्त्याची संबंध देखभाल त्यांच्याकडून होत असते. तो रस्ता 50 कि.मी. लांबीचा आहे. त्यामुळे त्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी 55 कोटी रुपये खर्च स्वाभाविकपणे येणार होता. परंतु विभागाचे प्रधान सचिव परस्पर कसे ठरवितात की, विकासकाकडे 55 कोटी रुपयांची रक्कम मागता येणार नाही. त्यांच्या वाहतुकीमुळे रस्ता खराब झाला असेल तर सार्वजनिक बांधकाम विभागाची त्यांच्याकडून कराराप्रमाणे रक्कम मागण्याची जबाबदारी होती. या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रधान सचिवांकडून जो पत्रव्यवहार झाला आहे त्या संदर्भात त्यांची आपण चौकशी करणार काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, मी अगोदरच सांगितले की, त्या रस्त्यावरुन दिघी पोर्टची जशी वाहतूक होते तशीच इतरही वाहनांची वाहतूक होते. त्यामुळे या रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीचा संपूर्ण खर्च त्यांच्यावर टाकता येणार नाही. स्थानिक पातळीवरुन पाठविलेल्या प्रस्तावाचा

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील....

मंत्रालय पातळीवर अभ्यास केल्यानंतर त्यांच्याकडे 5 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. सदरहू रक्कम मिळण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. आता सदरहू दोन्ही रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाने मेरीटाईम बोडाकडे वर्ग केले आहेत आणि मेरीटाईम बोर्डाने ते विकासकाकडे वर्ग केले आहेत. जवळजवळ 620 कोटी रुपयांच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव लवकरात लवकर मान्य होईल. तसेच या मार्गाचे रुंदीकरण केले तरी वाटेतील गावांना त्रास होणार आहे, हे लक्षात घेऊन त्यांनी रेल्वे मार्गाचा प्रस्ताव ठेवला आहे. त्या प्रस्तावानुसार दिघी ते रोहा हा रेल्वे मार्ग मंजूर झाला आहे. या संदर्भातील खर्च दिघी पोर्टने करावयाचा आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मुळात या लक्षवेधी सूचनेचे उत्तर माननीय बंदरे मंत्र्यांनी द्यावयास पाहिजे होते. केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये पेण तालुक्यातील जिते ते दिघी यामध्ये रेवस पोर्ट व दिघी पोर्ट असा रेल्वे मार्ग प्रस्तावित आहे. पण गोरेगाव ते दिघी हा रेल्वे मार्ग व्हायबल होऊ शकत नाही. माननीय मंत्री महोदय, आपण श्रीवर्धनचे जावई आहात. आपण या रस्त्यावरुन अनेक वेळा गेलेला आहात. म्हसळा ते श्रीवर्धन या दरम्यान संपूर्ण डोंगर आहे, तेथे घाटरस्ता आहे. त्यामुळे त्या ठिकाणी रेल्वे व्हायबल नाही, रेल्वे मार्ग होऊ शकत नाही. जर करायचाच असेल तर त्यासाठी किमान 25-30 वर्षे लागतील. तसेच माननीय मंत्री महोदय, नवीन रेल्वे मार्गाबाबतच्या ज्या प्रस्तावाचा उल्लेख करीत आहेत तो प्रत्यक्षात येण्यास अजून 8 वर्षांचा कालावधी लागणार आहे. बंदर धोरणामध्ये अंतर्गत रस्ते आणि ॲप्रोच रस्ते करण्यासंदर्भात पोर्टने 50 टक्के आणि शासनाने 50 टक्के खर्च करण्याचे धोरण आहे. परंतु सदरहू बंदर ते हायवे पर्यंतचे अंतर 60-70 कि.मी. चे आहे. शिवाय हा रस्ता राज्य महामार्ग आहे. कोणताही राज्य महामार्ग बनविताना त्या रस्त्यावरुन होणारी वाहतूक आणि स्ट्रेन्थ गृहीत धरुन तो तयार केला जातो. पोर्टचे रस्ते आणि जनरल रस्ते यामध्ये फरक आहे. परंतु या संदर्भात ज्या इंजिनियरने अंदाजपत्रक तयार केले आहे ते संपूर्ण चुकीचे आहे. हा रस्ता म्हसळा गावातून जातो. म्हसळा येथे पोर्ट होण्यापूर्वीच ट्राफीक जाम होत आहे. या बाबीचा विचार सार्वजनिक बांधकाम विभागाने केला आहे काय, या संदर्भातील भरपाई संबंधितांकडून घेतली आहे काय ? तसेच जोपर्यंत हा रस्ता पूर्ण होत नाही आणि परिपूर्ण रक्कम वसूल होत नाही तोपर्यंत पोर्टची वाहतूक थांबविणार काय ?

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, म्हसळे गावातील वाहतूक कोंडी लक्षात घेऊन त्या ठिकाणी बायपास केला. पण त्या ठिकाणी पूर्ण गाव वसले आहे. त्यामुळे आता सकलपकडे बायपास करण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी जमीन विकत घेणे सुरु आहे. जेणेकरुन त्या बायपासवरुन वाहने जातील. तसेच रेल्वेच्या बाबतीत सांगू इच्छितो की, काल-परवाच रेल्वे मंत्रालयाने सदरहू रेल्वे मार्गाच्या बाबतीत सँक्शन लेटर दिले आहे. हा मार्ग होण्यास 8-10 वर्षे लागतील. हा रस्ता करावाच लागेल. या संदर्भातील सर्व कायदेशीर प्रक्रिया करुन सार्वजनिक बांधकाम विभागाने मेरीटाईम बोर्डाला देणे आणि मेरीटाईम बोर्डाने दिर्घी पोर्टला देणे अशी प्रक्रिया आहे. त्या दृष्टीने त्यांनी 620 कोटी रुपयांचा प्रस्ताव देणे ही बाब पूर्ण झाली आहे.

श्री.सुनील तटकरे : महोदय, माननीय मंत्री वारंवार तेच तेच सांगत आहेत. आगरदांडा ते रोहा आणि दिघी ते माणगांव हा रस्ता चौपदरी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने मेरीटाईम बोर्डाकडे हस्तांतरित केला आहे. नवीन भूसंपादन कायद्यानुसार हे काम करणार की कसे, हे मला माहीत नाही. परंतु हे काम 10-20 वर्षे होणार नाही. या रस्त्यावरुन वाहतूक अवजड होणार आहे. शिवाय सरकारने विकासकाकडून दुरुस्तीपोटी घ्यावयाची रक्कम माफ केली आहे. कारण विकासकाने अजूनपर्यंत दुरुस्तीपोटी द्यावयाचे 5 कोटी रुपये दिलेले नाहीत. परंतु विकासकाकडील 5 कोटी रुपये वसूल करण्याबाबत माननीय मंत्री गांभीर्याने काहीच बोलत नाही. महोदय, एका विकासकाकडून पैसे वसूल करण्यासाठी सरकारला पाठपुरावा करावा लागत आहे. मी त्या भागाचा आमदार होतो. मी मंत्री असताना, या कामाच्या बाबतीत 5 वेळा पत्र दिले होते. परंतु त्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी त्याकडे लक्ष दिले नाही. होय, मी जाहीर आरोप करीत आहे.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

मला स्पष्ट बोलण्यास काय हरकत आहे ? आता तो रस्ता हस्तांतरित करण्यास दिला, तो रस्ता पूर्ण होण्यास 10 वर्षे जातील, भूसंपादन होण्यासाठी जवळपास 5 वर्षे लागतील, तोपर्यंत तुम्ही या रस्त्यावरून वाहतूक करून घेणार, लोक मरणार, रस्ते उद्ध्वस्त होणार, पर्यटक तेथे जाणार नाहीत. केवळ तो रस्ता दिघी पोर्ट ट्रस्टकडे हस्तांतरित केला आहे. ते तो रस्ता करणारच नाहीत. 5 कोटी रुपये भरत नाहीत तर साडे सहाशे कोटी रुपयांचा रस्ता कसा करणार ? तुम्ही त्याला पोट कमिशन करण्याची परवानगी देणार. सन 2002 ला मूळ करारनामा झाला. 15 वर्षे झाली नाहीत तोपर्यंत कमिशन होत होते. (अडथळा) मी त्या भागातील आहे. मी देखील सरकारमध्ये होतो. मी सरकारबद्दल बोलत आहे. मी कोणला पाठिशी घालत नाही. मी माजी मुख्यमंत्र्यांचे नाव घेऊन म्हटले आहे. आता यापेक्षा आणखी काय बोलले पाहिजे. आपण प्रधान सचिवांची चौकशी करणार का, मेरिटाईम बोर्डाच्या सीओंची पराजयांची ॲण्टी करप्शनमार्फत चौकशी करणार आहात का ? आपण रस्त्याच्या वसुलीच्या संदर्भात नेमके काय करणार आहात, रस्त्याचे चौपदीकरण होण्यापर्यंत, रस्त्याच्या देखभाल व दुरस्तीची हमी सार्वजनिक बांधकाम खाते घेणार का ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, हा रस्ता मेरिटाईम बोर्डाकडे आणि तेथून दिघी पोर्ट ट्रस्टकडे गेल्यामुळे त्याची सर्व देखभाल व दुरूस्ती हा विषय त्यांच्याकडे गेला आहे, त्यांनी ते केला पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, आपण हा रस्ता हस्तांतरित केला. हा रस्ता केवळ दिघी पोर्ट ट्रस्ट वापरत नाही तर ग्रामस्थ वापरतात त्यामुळे त्याच्या देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी कोण घेणार आहे, आपल्याला 5 कोटी रुपये भरण्यासाठी पाठपुरावा करावा लागतो तर 620 कोटी रुपयांचा रस्ता ते कसा करणार आहेत, आपण त्यांच्याकडून बँक गॅरेंटी घेतली आहे का हे मूलभूत प्रश्न आहेत. तेथील रहिवाशांनाही समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य पोटतिडकीने बोलत आहेत. आपण त्याचा विचार निश्चितपणे करावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य वारंवार मागच्या अनुभवावरून मते मांडत आहेत. केंद्र शासनाची जल वाहतुकीच्या संदर्भातील निती आहे. त्यामध्ये अधिक सहकार्य करणे अपेक्षित आहे. 30 मिलियन टन इतकी क्षमता असणारे हे बंदर आहे. मात्र त्यामध्ये आता 1-2 मिलियन टन इतकीच क्षमता युटिलाईज केली जात आहे. माझे म्हणणे असे आहे की, आपले धोरण अशा प्रकारच्या उद्योगांना चालना, वाव, बढावा देण्याचे आहे. बाकी राज्ये त्या मानाने अशी कनेक्टिव्हीटी स्वतःच्या खर्चाने देत आहेत. त्यामुळे ते तो रस्ता चौपदरी करतील, त्यासाठी जो पाठपुरावा करावा लागेल तो सार्वजनिक बांधकाम विभाग करेल. परंतु आता ती वाहतूक बंद ठेवल्याने पूर्ण पोर्ट ट्रस्टची ॲक्टिव्हिटी बंद होईल. त्यामुळे तसे करता येणार नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, पुढील रस्त्याच्या देखभाल व दुरूस्तीचे काम मेरिटाईम बोर्डाकडे दिले आहे हे उत्तर तुम्ही द्यायलाच नको होते. मेरिटाईम बोर्डाच्या प्रमुखांनी उत्तर दिले पाहिजे होते. कारण पुढची लांबी आहे. आतापर्यंत झालेला खर्च, आतापर्यंत देण्याचा खर्च वसूल करण्याबाबतीत कारवाई नाही. त्यामुळे ही लक्षवेधी राखून ठेवण्यात यावी. ज्यांच्याकडे याचे उत्तर आहे, ज्यांनी जबाबदारी घ्यायची आहे त्यांनी उत्तर दिले पाहिजे. आपण म्हणालात की, मेरिटाईम बोर्ड त्याची देखभाल व दुरूस्ती करेल. आपण सतत बोलता की, तेथे इतर प्रवासी वाहतूक आहे. 2 रस्ते आहेत. विकासकाने 5 कोटी रूपये दिलेले नाही.

**तालिका सभापती** : हा रस्ता हस्तांतरित कधी झाला ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोरदय, हा रस्ता या महिन्यात हस्तांतरित झाला आहे.

**तालिका सभापती** : लक्षवेधी सुचना येण्यापूर्वी झाला की लक्षवेधी सूचना आल्यानंतर हा रस्ता हस्तांतरित झाला ? लक्षवेधी सूचना येण्यापूर्वी हा रस्ता हस्तांतरित झाला असेल तर याचे उत्तर मेरिटाईम बोर्डाने दिले पाहिजे होते.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मार्चमध्ये अधिवेशन सुरूअसताना सर्व करार पूर्ण झाला. मेरिटाईम बोर्ड व सार्वजनिक बांधकाम विभाग सर्व मिळून सरकार एक आहे. सरकारच्या वतीने उत्तर आहे.

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना देण्यापूर्वी रस्ता हस्तांतरित झाला असेल तर याचे उत्तर मेरिटाईम बोर्डाने दिले पाहिजे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आगारदांडा रस्ता हस्तांतरित केला का ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, होय. दोन्ही रस्ते हस्तांतरित केले आहेत. दोन्हींचा मिळून 620 कोटी रुपयांचा प्रस्ताव आला आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हा रस्ता जवळपास 100 गावांतून जातो. त्यामुळे याला पर्यायी रस्ता पाहिजे. स्थानिक आमदार आहेत, त्यांना या संदर्भात विचारात घेतले पाहिजे होते. लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा करावी. लोक आम्हाला विचारत आहेत.

**तालिका सभापती** : मंत्री महोदय, आपण आपल्या परीने उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहात. परंतु विषय आपल्या खात्याच्या अंतर्गत नाही. तो मेरिटाईम बोर्डाच्या अंतर्गत असल्यामुळे त्यांनी काय पावले उचलली याबाबत काहीही समजत नाही. हा महत्वाचा रस्ता आहे. हरिहरेश्वर तीर्थस्थळ तेथे आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाचा विषय आहे.

**तालिका सभापती** : आपण रस्ता हस्तांतरित केल्यानंतर तो सार्वजनिक बांधकाम विभागाचा विषय होत नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मेरिटाईम बोर्ड बाहेरचे नाही. मी सरकारच्या वतीने बोलत आहे.

**तालिका सभापती** : मंत्री महोदय, उत्तराने समाधान होऊ शकणार नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी याचे समाधान करतो.

**तालिका सभापती** : मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवतो. मेरिटाईम बोर्डाकडून याचे पूर्ण उत्तर येऊ द्यावे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आपण लक्षवेधी सूचना राखून ठेवू नये. आमच्यावर अन्याय होत आहे.

**तालिका सभापती** : मेरिटाईम बोर्डाकडे रस्ता हस्तांतरित झाला आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी सरकार म्हणून हे उत्तर दिले आहे. मेरिटाईम बोर्ड याची काळजी घेईल. आवश्यक असलेला प्रस्ताव आलेला आहे.

**तालिका सभापती** : मी या संदर्भात निर्णय दिलेला आहे. सदर लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात येत आहे.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : श्रीक्षेत्र अष्टविनायकापैकी रायगड जिल्ह्यातील पाली व महड येथे वाढणारी भविकांची गर्दी व औद्योकीकरण यामुळे रस्त्यांवर ताण येणे.

**मु.शी.** : श्रीक्षेत्र अष्टविनायकापैकी रायगड जिल्ह्यातील पाली व महड येथे वाढणारी भविकांची गर्दी व औद्योकीकरण यामुळे रस्त्यांवर ताण येणे यासंबंधी श्री. अनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. अनिल तटकरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"श्रीक्षेत्र अष्टविनायकापैंकी रायगड जिल्ह्यातील पाली व महड येथे वाढणारी भाविकांची गर्दी, या तिर्थक्षेत्रामध्ये वाढणारे औद्योगिकीकरण या सर्व बाबीचा ताण रस्त्यावर येत असणे, सदर श्रीक्षेत्रामध्ये जाणारे रस्ते, पेडली, परळी गावातून जात असून पाली येथील मंदिर गावाच्या एका बाजूला असणे, या तिन्ही ठिकाणी रस्त्यांच्या दुतर्फा परंपरागत घरे असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होणे, सदर रस्ते वळणाचे असल्याने वाहन चालकाला देखील काळजीपूर्वक वाहक चालविण्याचे दडपण येत असणे, सदर रस्त्यावरुन वाहन चालविताना वाहकास कसरत करावी लागणे, रस्त्याची अडचण विचारात घेता सदर ठिकाणी पर्यायी रस्ता करुन सदर स्थानकाचा विकास करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. चंद्रकांत पाटील (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक बांधकाम वगळून) मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अनिल तटकरे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील जनतेच्या मनात अष्टविनायकाचे स्थान आपल्याला माहीतच आहे. मला अभिमान आहे की, माझ्या रायगड जिल्ह्यात त्यातील 2 तीर्थस्थाने आहेत. दोन्ही तीर्थस्थाने लगतच्या तालुक्यात आहेत. पाली सुधागडमध्ये आहे आणि महड खालापूरमध्ये आहे. मधील 40 कि.मी.चा जो रस्ता आहे त्या संदर्भात मी ही लक्षवेधी सूचना दिली आहे.

सभापती महोदय, गेल्या 50 वर्षांपासून मी या रस्त्यावरून प्रवास करीत आहे. रस्त्याची रूंदी तेवढीच आहे. रस्त्याच्या तुलनेत वेगवेगळ्या कारणांमुळे रस्त्यावरील वाहतूक 200 पटीने वाढली आहे. प्रचंड औद्योगिकीकरण झाले आहे. हा रस्ता खोपोलीच्या बाजूने सुरू होतो तेथे भूषण स्टील, उत्तम मलपाया अशा नामांकित स्टिल कंपन्या आहेत, पुढे आल्यानंतर अजून एक मोठी कंपनी आहे. 2-3 वर्षांपूर्वी सुरू झालेले फार मोठे ॲडलॅब इमॅजिका हे थीम पार्क आहे. त्यामुळे संपूर्ण रस्त्यावरील वाहतुकीचे प्रमाण 50 वर्षांपूर्वीचे प्रमाणापेक्षा 300 टक्क्यांनी वाढले आहे. रस्ता मात्र तेवढाच आहे. रस्त्याच्या रूंदीमध्ये फरक करू शकत नाही आणि केलेला नाही. ते सर्व मंजूर आहे, करू, होईल असे माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले आहे. ठोस उत्तर देण्यात आलेले नाही. उत्तरात म्हटले आहे की, सदर देवस्थानला जाणारा रस्ता हा वाकण पाली खोपोली राज्यमार्ग क्र.93 हा असून याची लांबी 40.750 कि.मी. इतकी आहे. पाली हे देवस्थान सदर रस्त्यावर कि.मी 8/800 वर असून या रस्त्यावर पेडली व परळी ही गावे येतात. यापैकी सुरूवातीचा वाकण ते पाली हा रस्ता 8.800 कि.मी. असून हा रस्ता आंबा नदीच्या कडेने जात असून तो वळणावळणाचा आहे व या रस्त्याची रूंदी 5.500 मी. आहे. सदर लांबीमध्ये आवश्यक त्या भागात रस्त्याचे रुंदीकरण, नदीकिनारी, वळणांवर व घाट भागात संरक्षण भिंती / कठडे व इतर अनुषंगिक रू150 लक्षाची कामे सन 2015-16 च्या अर्थसंकल्पामध्ये मंजूर करण्यात आली आहेत. पाली गावातील वाहतुकीची कोंडी सोडविण्याकरिता पाली गावास बाह्यवळण रस्ता भूसंपादनासहित बांधण्यासाठी रू1450 लक्ष निधी आवश्यक असून निधी निकषास अधीन राहून सदर काम हाती घेण्याचे नियोजन आहे. वाकण-पाली-खोपोली या रस्त्याची 800 मी. लांबी ही परळी गावातून जात असून रस्त्याच्या दुतर्फा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

घरे असल्यामुळे वाहतूक कोंडी होते. याकरिता परळी बाह्यवळण रस्ता प्रस्तावित असून त्याकरिता भूसंपादनासहित रू522 लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. ..7



**तालिका सभापती** : आपण निवेदनातील मजकूर वाचू नका. आपण प्रश्न विचारावा.

श्री. अनिल तटकरे : सभापती महोदय, थीम पार्क झाल्यामुळे तेथील वाहने रस्त्यांवर येतात, ती वाहने 2 दिवस पार्किंगच्या ठिकाणी असतात. आपण कामे सुरूकेली असे म्हणत आहात. माझ्या महितीप्रमाणे खोपोलीपासून जो सुरूवातीचा रस्ता आहे त्या रस्त्याकरिता 4 कोटी रूपयांच्या कामाची निविदा केव्हा मंजूर झाली, त्याचे कार्यादेश जानेवारी, 2015 मध्ये दिले गेले आहेत. परंतु अद्यापही त्या रस्त्याच्या कामावर एकही खडी तुकडा टाकला गेलेला नाही.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल तटकरे........

हे काम केव्हा सुरु होणार आहे ? त्या ठिकाणी थिम पार्क आल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होत आहे. मोठ्या प्रमाणावर पर्यटक त्या ठिकाणी येत असतात. परळी गाव आणि पडली गावाच्या बाहेरुन जाणारा रस्ता करण्याबाबत आपण सांगितले आहे. परंतु, रायगड जिल्हा हा भूसंपादनामुळे पूर्णपणे खलास झालेला आहे. त्यामुळे रुंदीकरण कशा पध्दतीने करणार आहात ? पालीचे देवस्थान गावाच्या टोकाला आहे. त्या अनुषंगाने थेट रस्ता काढणार आहोत. त्या संदर्भातील प्रक्रिया आपण कधी सुरु करणार आहात ? मुळात जो रस्ता मंजूर केलेला आहे, कार्यादेश झालेले आहेत, त्या रस्त्याच्या कामाची सुरुवात केव्हा होणार आहे ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, या रस्त्याचे काम मंजूर झालेले आहे आणि अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. त्यामुळे जे काम मंजूर झाले आहे आणि ज्यासाठी आर्थिक तरतूद झाली आहे, अशा कामाची निविदा निघून ते काम सुरु होईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बायपास करण्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला आहे. बायपास केल्याशिवाय तेथील वाहतूक कोंडीमधून मार्ग निघणार नाही. त्यासाठी सुध्दा अंदाजपत्रक तयार करुन येत्या जुलै महिन्यातील अधिवेशनात पुरवणी मागणी सादर करुन कामाला सुरुवात करु.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, या कामासाठी टोकन प्रोव्हिजन झालेली आहे व कार्यादेश 15 जानेवारीला दिलेले आहेत. हा रस्ता पावणे दोन किलो मीटर लांबीचा आहे व त्यासाठी 4 कोटी रुपये वितरित केले आहेत. सदर निधी संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडे जमा आहे. कार्यादेश देऊन सुध्दा संबंधित कंत्राटदाराने काम सुरु केले नाही, या कामास विलंब झाला, विलंबाची कारणे काय आहेत व हे काम कधी सुरु होणार आहे ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सदरचे काम जून, 2015 पर्यंत पूर्ण होईल व 3 बायपासबाबत नवीन अंदाजपत्रक तयार करुन जुलैमध्ये पुरवणी मागणीव्दारे व्यवस्था करु आणि ते काम पूर्ण करु.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वरुन खोपोलीसाठी रस्ता

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.........

जातो. या रस्त्यावर सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे थिम पार्क हे पर्यटन केंद्र विकसित झाले आहे. दिवसाला कमीतकमी 2000 ते 2500 वाहने त्या ठिकाणी येत असतात. पावसाळ्यानंतर रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने आम्ही पाठपुरावा केल्यानंतर खबरदारी घेतली व त्यामुळे पुढील रस्ता झाला. त्याच वेळी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी सांगितल्याप्रमाणे सुरुवातीचा दीड किलो मीटरचा रस्ता होणे गरजेचे होते. या कामाची निविदा अंतिम होऊन कार्यादेश जानेवारी महिन्यात देण्यात आले. परंतु, काम झाले नाही. आता आपण असे सांगत आहात की, जून महिन्यात काम सुरु करण्यात येईल. परंतु, आपल्याला कल्पना आहे की, कोकणात पर्जन्यमान मोठ्या प्रमाणावर असते व त्यामुळे कदाचित हा केलेला रस्ता पुन्हा उद्ध्वस्त होऊ शकतो. त्यामुळे मर्यादित कालावधीत हे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने संबंधितांना तातडीने सूचना देण्यात येतील का, या कामाला विलंब झाल्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का आणि पेडली, परळी व पाली या बायपास रस्त्यांसाठी तरतूद करुन पावसाळ्यानंतर ही कामे सुरु करण्यात येतील का ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, या कामाला विलंब झाल्याबाबत चौकशी करुन विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करु. हे काम पावसाळ्यापर्यंत पूर्ण करु. 3 बायपास बाबत मी यापूर्वीच सांगितले आहे की, अंदाजपत्रकीय तरतूद करुन जुलै महिन्यानंतर किंवा पावसाळ्यानंतर ही कामे पूर्ण करु.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पाली व महड येथील रस्त्याच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. आज संकष्टी चतुर्थी आहे. देशातील आणि राज्यातील हजारो भाविक अष्टविनायक यात्रा करीत असतात. अष्टविनायक रस्ता जोडण्याच्या संदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट नाही. त्यामुळे अष्टविनायक रस्त्यांची जोडणी करुन या रस्त्यांवर निवारा, स्वच्छतागृह या सारख्या सुविधांचे नियोजन करुन रस्ता जोडणीचा कार्यक्रम शासन प्रस्तावित करील का ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आगामी काळात करावयाच्या कामांच्या नियोजनात या सर्व सूचनांचा अंतर्भाव करण्यात येईल.

--------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : ***मुंबईतील बांद्रा येथील दी नॉर्थ बॉम्बे कंझ्युमर्स को-ऑप अँड होलसेल अँड रिटेल लि. या संस्थेच्या पुनर्विकास प्रकल्पात झालेला भ्रष्टाचार***

**मु.शी.** : ***मुंबईतील बांद्रा येथील दी नॉर्थ बॉम्बे कंझ्युमर्स को-ऑप अँड होलसेल अँड रिटेल लि. या संस्थेच्या पुनर्विकास प्रकल्पात झालेला भ्रष्टाचार*** यासंबंधी ***सर्वश्री. धनंजय मुंडे, आनंद ठाकूर, विक्रम काळे, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. अमरसिंह पंडित, जगन्नाथ शिंदे, हेमंत टकले***, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मुंबईतील बांद्रा येथील दी नॉर्थ बॉम्बे कंझ्युमर्स को-ऑप अँड होलसेल अँड रिटेल लि. या ग्राहक सहकार बाजार सोसायटीत सुमारे ३०० कोटी रुपयांचा पध्दतशीरपणे झालेला भ्रष्टाचार, या संस्थेच्या संचालकांनी संस्थेच्या भागधारकांची व इतर आवश्यक पूर्तता परवानगी न घेता इमारतीतील मोकळ्या जागेची अत्यल्प किंमतीत विक्री करणे, विकासकाला देणे, संस्थेच्या शेअर्समध्ये अफरातफर करणे, चुकीचे प्रस्ताव पास करणे, शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरुन ही संस्था स्वत:च्या ताब्यात ठेवण्यासाठी प्रयत्न करणे, संचालकांनी त्यांच्या सोयीस्कर माणसांना संस्थेत व्यवसायासाठी अत्यल्प किंमतीत जागा देवून केलेला गैरव्यवहार, यासंदर्भात संस्थेच्या कारभाराबाबत शासनाकडे अनेकदा तक्रारी झाल्यानंतर सहकार (पणन) विभागाने चौकशी करणे, या चौकशीत संस्थेचे माजी चेअरमन व सध्याचे चेअरमन, संस्था व्यवस्थापक आणि विकासक दोषी आढळून येणे, कारभार अनियमित आढळला, या चौकशीत संचालकांवर ३ कोटी ५६ लाख रुपयांची वसुली दाखविण्यात येणे व शेवटी वसुली फक्त ६७ लाख रुपयाचीच करणे, या संदर्भात***

...४....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***श्री.धनंजय मुंडे.....***

***शासनाकडे वेळोवेळी तक्रारी करुन सुध्दा त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी भागधारकांत पसरलेले चिंतेचे वातावरण आणि संगनमताने विकासकाला हाताशी धरुन संस्था, व्यवसायिकांची व शासनाची फसवणूक झाल्याचे दिसून येणे, दोषी आढळल्यानंतरसुध्दा बोर्ड बरखास्त न करणे, सहकार खात्याची चौकशी सुरू असणे व ते दोषी आढळल्यानंतरही संस्था व विकासक दोषी आढळले तरी तेथे गैरप्रकारे बांधकाम व विक्री सुरु असणे, संस्थेतच ऑफिस असणाऱ्या डेप्युटी रजिस्टार यांचे झालेले दुर्लक्ष, या संदर्भात उच्चस्तरीय चौकशी करुन तक्रारदारांची मदत घेवून संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."***

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मुंबईतील बांद्रा येथील दी नॉर्थ बॉम्बे कंझ्युमर्स को-ऑप अँड होलसेल ॲण्ड रिटेल लि.या संस्थेच्या बांद्रा रेल्वे स्टेशनसमोर सी.टी.एस.क्रमांक 1341, 1349 व 1350 एच.पश्चिम विभाग येथील 1036.30 स्क्वे.मी.भूखंडावर इमारतीच्या पुनर्विकासासंदर्भातील प्रश्न या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने उपस्थित करण्यात आला आहे.

सभापती महोदय, या पुनर्विकास प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. सहकार विभागाने केलेल्या चौकशीत सदरहू पुनर्विकास करीत असताना आणि विकासक नेमताना अनेक अनियमितता झाल्या आहेत.

सभापती महोदय, हा पुनर्विकास प्रकल्प रचना कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. परंतु, पुनर्विकासासाठी मागविण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट आहे की, निविदा आहे, हे स्पष्ट होत नाही. अहवालात या संदर्भातील खुलासा झालेला आहे. ही संस्था सुध्दा याबाबतचा खुलासा करु शकलेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, आयुक्तांनी नेमलेल्या चौकशीच्या अहवालात या संदर्भात कोणती स्पष्टता करण्यात आली आहे ?

सभापती महोदय, या सहकारी संस्थेने संबंधित विकासकाबरोबर एम.ओ.यु.केलेला आहे. बांद्रा येथील अतिशय मोक्याच्या ठिकाणी हा भूखंड आहे. सध्याच्या उपलब्ध क्षेत्राच्या आधारे 1 एफ.एस.आय.गृहित धरुन क्षेत्रफळाचे वाटप करण्यात आले आहे. या संदर्भात शासनमान्य वास्तुविशारदांच्या अहवालानुसार संस्थेस 1000 स्क्वेअर फुटाची जागा हस्तांतरित केल्यानंतर विक्रीसाठी 15 हजार स्क्वेअर फुटाची जागा विकासकाला उपलब्ध होते. अतिरिक्त बांधकाम खुल्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे का ? याबाबत आयुक्तांनी नेमलेल्या चौकशींमध्ये या संस्थेच्या संदर्भात कोणकोणत्या अनियमितता निदर्शनास आल्या आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, या सहकारी संस्थेचे एकूण 3 प्लॉट असून 1036.30 स्क्वे.मी.एवढे एकूण क्षेत्रफळ आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत रूपये 27,88,90,772/- एवढी असून लक्षवेधी सूचनेच्या विषयात म्हटल्याप्रमाणे या प्रकरणात 300 कोटी रूपयांचा भ्रष्टाचार झालेला नाही. तथापि, विकासकाला काम देताना अनियमितता झाल्या आहेत.

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील.....

सभापती महोदय, या प्रकरणी सहकार आयुक्तांनी कलम 83 व कलम 88 अन्वये चौकशी सुरु केली होती. या चौकशी अहवालानुसार रुपये 3,24,25,230/- एवढे नुकसान होईल, असे वर्तविण्यात आले आहे. अंतिम अहवालानुसार 3 प्रकारचे नुकसान झाले आहे. एकूण रुपये 67,62,060/- एवढे नुकसान झाले आहे. पर्यायी जागा उपलब्ध नसल्यामुळे स्टोअर बंद होते व त्यामुळे 17 लक्ष रुपयांचे नुकसान झाले आहे विकासकाने त्यांना फर्निचर द्यावयाचे आहे. अद्याप प्लिंथपर्यंतचे काम झाले असल्यामुळे त्यापोटी 50 लक्ष रुपयांचे नुकसान झाले आहे, असे म्हणता येणार नाही. परंतु, विकासकाने फर्निचर दिले नाही तर नुकसान झाले, असे म्हणता येईल आणि आर्किटेक्ट यांच्यावरील खर्च रुपये 62,060/- असे मिळून रुपये 67,62,060/- एवढे नुकसान झाले आहे. विकासक ठरवित असताना ज्या प्रोसिजर फॉलो करावयास हव्या होत्या, त्या केलेल्या नाहीत. त्यामुळे या संदर्भातील योग्य चौकशी केली जाईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझी एवढीच विनंती आहे की, विकासक नेमताना अनियमितता झाल्या आहेत, हे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. त्यामुळे ही सर्व प्रक्रिया थांबवून विकासक नेमण्याबाबतची प्रक्रिया नव्याने करण्याबाबत मंत्री महोदय आदेश देणार आहेत का ? अहवालामध्ये नुकसानीची आकडेवार दिलेली आहे. तो बांद्रा येथील 66 हजार स्क्वेअर फुटाचा प्लॉट आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

आपण 27 कोटी रुपये किंमत सांगत आहात, हा प्लॉट सहकार आयुक्तांकडे कोणी तरी 150 कोटी रुपयांना मागितला आहे. सदर अहवालात चुकीचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची पुन्हा चौकशी होणे आवश्यक आहे. तोपर्यंत सहकारी संस्थेची विकासकासोबत जी प्रक्रिया झाली आहे, ती थांबविण्याचे काम सरकार करणार आहे काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे विकासकाला विकास करण्यासाठी देताना जी अनियमितता झाली, ती बाब लक्षात घेऊन पूर्ण चौकशी केली जाईल. चौकशीअंती अगोदरचा विकासकाचे कंत्राट रद्द करावे असे वाटले तर तशी कारवाई शासनाकडून करण्यात येईल.

----------

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : विदर्भातील अनेक सिंचन प्रकल्पाचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव प्रलंबित असणे

**मु.शी.** : विदर्भातील अनेक सिंचन प्रकल्पाचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव प्रलंबित असणे यासंबंधी श्री.संदिप बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संदिप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"विदर्भातील विशेषत: बुलढाणा, वाशिम, अकोला, यवतमाळ या जिल्ह्यांतील विविध सिंचन प्रकल्प गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असून सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठीचे शेकडो प्रस्ताव मंत्रालय व प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असणे, रखडलेल्या अर्धवट सिंचन प्रकल्पामुळे शासनाचे मोठे आर्थिक नुकसान होणे, विदर्भातील सिंचनक्षेत्र वाढविण्यासाठी शासनाने करावयाची कृती तसेच रखडलेले सिंचन प्रकल्प लवकर पूर्ण करण्यासाठी प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची लोकप्रतिनिधीसह जनतेतून गेल्या तीन ते चार वर्षापासून होत असलेली सतत मागणी, या मागणीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर मागणीबाबत शासनाकडून ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता व त्याकरीता करावयाची आर्थिक तरतूद, तसेच रखडलेले सिंचन प्रकल्प प्रस्ताव मंत्रालयीन स्तरावर जलदगतीने निकाली काढण्याकरीता करावयाची उपाययोजना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."***

श्री.विजय शिवतारे (जल संपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.संदिप बाजोरिया : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना विदर्भासाठी अत्यंत महत्वाची आहे. विदर्भात मोठ्या प्रमाणात आत्महत्या होत आहेत. मागील सरकारने विदर्भ व मराठवाड्यात अनेक कामे केली आहेत. तेथील सर्व कामे सुरु झाली आहेत. आता अनेक कामे सुधारित प्रशासकीय मान्यतेमुळे प्रलंबित आहेत. सर्वप्रथम या शासनाचे मी अभिनंदन करतो. ते यासाठी की, पृथ्वीवरील काही पाताळयंत्री लोकांनी जावई शोध लावला होता की, सिंचन 00.1 टक्के आहे. या सरकारने आता असे सांगितले आहे की, आठ लाख हेक्टर सिंचन वाढले आहे. या सरकारने सिंचन वाढल्याचे कबूल केले आहे. माझा प्रश्न असा आहे की, ज्या प्रकल्पांच्या सुधारित प्रशासयकीय मान्यता प्रलंबित आहेत, जे प्रकल्प चालू झाले आहेत, हे प्रकल्प अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील आहेत. ज्या प्रकल्पांसाठी पैसा आहे, त्या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता किती दिवसात देण्यात येईल ? गेल्या दहा वर्षात अनेक प्रकल्पांसाठी निधी आलेला आहे. या प्रकल्पाचा निधी विदर्भातील दुसऱ्या प्रकल्पासाठी वळता करण्यात आला आहे. ज्या मूळ प्रकल्पाचा निधी दुसऱ्या प्रकल्पासाठी वळता करण्यात आला, तो निधी त्या प्रकल्पासाठी आता देण्यात येईल काय ?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जो विषय उपस्थित केला तो संपूर्ण महाराष्ट्रात गंभीर झालेला आहे. या सरकारला आता तीन ते चार महिन्यांचा कालावधी झालेला आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता गेल्या पाच ते आठ वर्षापासून प्रलंबित आहेत. फेब्रुवारी 2015 मध्ये विदर्भातील 48 प्रकल्पांपैकी 20 प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. 10 प्रकल्प ईपीसीमध्ये होते. काल याबाबत संपूर्ण चर्चा झाली आहे. अशा प्रकारे 30 प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. मंत्री महोदयांनी दिल्ली येथे जाऊन तीन प्रकल्पांना केंद्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता मिळविली आहे. दुसरा प्रश्न असा विचारण्यात आला होता की, इतर प्रकल्पांचे पैसे वळविण्यात आले होते. विदर्भातील प्रकल्पांवर मार्च प्रयत्न जो नियतव्यय होता तो त्याच प्रकल्पावर खर्च करता येत नव्हता. त्यामुळे विदर्भातील प्रकल्पांचा विचार करुन विदर्भातच हे पैसे इतर प्रकल्पांसाठी वापरता येत असतील तर तो निधी वापरण्यात आलेला आहे. विदर्भातील प्रकल्पासाठी निधीची कमतरता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नाही. पैसे परत मिळतील किंवा नाही असा प्रश्न विचारण्यात आला आहे. याबाबत वैधानिक मान्यता व इतर बाबी पूर्ण झाल्यामुळे निधी मिळू शकतो.

...4...



श्री.संदिप बाजोरिया : सभापती महोदय, माझा मूळ प्रश्न असा होता की, जिगांव प्रकल्पासाठी 180 कोटी रुपयांचा निधी होता. त्यातील 90 कोटी रुपये लोअर वर्धा प्रकल्पासाठी देण्यात आले आहेत. बेंबळा प्रकल्पाला 90 कोटी रुपये देण्यात आले आहेत. 2007 मध्ये लोअर पेंडी प्रकल्पावरील 77 कोटी रुपयांचा निधी लोअर वर्धा प्रकल्पाकडे वळविण्यात आला. लोअर वर्धा प्रकल्पावर एवढे प्रेम का आहे. तो प्रकल्प आहे व इतर प्रकल्प नाहीत काय. आज लोअर पेंडीं प्रकल्पाला निधीची गरज आहे. चालू वर्षाच्या तरतुदीमध्ये लोअर वर्धा प्रकल्पासाठी जो निधी असेल त्या निधीतून लोअर पेंडी प्रकल्पाचे घेतलेले पैसे परत करण्यात येतील काय ? जिगांव प्रकल्पांना 180 कोटी रुपये परत करण्यात येतील काय ?

श्री.गिरीश महाजन : हे खरे आहे की, पूर्वी असे निर्णय झाले आहेत. या प्रकल्पाचा पैसा दुसऱ्या प्रकल्पासाठी वळविण्यात आला आहे. नंतर हे प्रकार थांबविण्यात आले आहेत. पूर्वी जे पैसे घेतले ते देणार आहात काय असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. अनेक प्रकल्पाबाबत पुनर्वसनाचे प्रश्न आहेत, सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रश्न आहेत. केंद्रीय वन्यजीव, पर्यावरण विभाग, वन विभागाचे काही प्रश्न आहेत त्यामुळे हे प्रकल्प रखडलेले आहेत. निधी असून देखील या ठिकाणी कामे करता येत नाहीत. अमरावती विभागात 3000 कोटी रुपये पीएल अकाऊंटमध्ये राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार पडून आहेत. एकीकडे आपण निधी नाही असे म्हणतो व येथे हा निधी अखर्चित आहे. काही प्रकल्पाचे टायटल क्लिअर असून निधी अभावी तेथील कामे होत नाहीत. काही प्रकल्पांवर सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी व काही भूसंपादना अभावी त्या कामावर खर्च होऊ शकला नाही. पैसे वळविता येतील काय असा प्रश्न विचारण्यात आला आहे याबाबत शासन निश्चित गंभीरपणे विचार करणार आहे. येत्या सात ते आठ दिवसात यासंदर्भातील निर्णय करण्यात येणार आहे. आता ज्या प्रकल्पावर निधी खर्च करता येत नाही परंतु निधी पडून आहे तो पैसा दुसऱ्या प्रकल्पावर वळविता येईल काय याचा विचार शासन करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी प्रश्नाला उत्तर देत असताना असे म्हटले की, पश्चिम विदर्भात 3000 कोटी रुपये पडून आहेत. राज्यपाल महोदयांचा उल्लेख त्यांनी केलेला आहे. विदर्भातील आठ जिल्हे अनुशेषग्रस्त आहेत. त्यामध्ये बुलढाणा, अकोला,

....5...



श्री.माणिकराव ठाकरे...

वाशिम, यवतमाळ व अमरावती सर्वात जास्त अनुशेष असलेले जिल्ह्ये आहेत या जिल्ह्यांचा हा पैसा आहे. तो खर्च करण्याचे शासनाचे काय नियोजन आहे, तो निधी कसा खर्च करण्यात येणार आहे. त्या भागात निधी पडून आहे म्हणून तो निधी दुसरीकडे वळविण्याचा शासनाचा विचार आहे काय ? या दृष्टीकोनातून मंत्री महोदय उत्तर देत आहेत काय ? याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.गिरीश महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगतात ते खरे आहे की, हा दुष्काळी भाग आहे, अनुशेषग्रस्त हे जिल्हे आहेत, येथील पैसे दुसरीकडे वळविण्याचा शासनाचा मानस नाही. जिल्ह्यातील निधी जिल्ह्यातील प्रकल्पासाठी वळविता येईल काय त्याचा विचार करण्यात येईल हा निधी जिल्ह्याच्या बाहेर वळविण्याचा शासनाचा विचार नाही. जिल्ह्यातील एका कामासाठी पैसे आहेत व ते तेथे खर्च होऊ शकत नसतील तर ते दुसऱ्या कामासाठी वळविता येतील काय याबाबत राज्यपाल महोदयांच्या परवानगीने आम्ही प्रयत्नशील आहोत. अनेक प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळत नाही. या वर्षी व पुढील वर्षी किती प्रकल्प पूर्ण करायचे याचे नियोजन शासनाने केले आहे. फेब्रुवारी महिन्यात आपल्या भागातील 11 प्रकल्पाना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन.......

आम्ही 22 कामांना मान्यता दिलेली आहे. त्यातील 11 कामे अमरावती विभागातील आहेत. उद्या ईपीसी कमिटीची बैठक आहे. आम्ही जवळपास 11 कामांना पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यता देत आहोत. केंद्रीय वन्यजीव मंडळाकडे 3 प्रकरणे प्रलंबित होती, ती आम्ही क्लिअर केलेली आहेत. आता त्यांच्याकडे 6 प्रकरणे प्रलंबित आहेत. मी स्वत: पुढील आठवड्यात दिल्ली येथे जाऊन माननीय केंद्रीय मंत्री श्री.प्रकाश जावडेकर साहेबांना त्या संदर्भात विनंती करणार आहे. बॅकलॉग दूर झाला पाहिजे, विदर्भाला सिंचनाचे पाणी मिळाले पाहिजे याबाबत शासन अतिशय गंभीर आहे. पैसे असून देखील आम्ही काही करु शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. मुख्यमंत्री महोदयांनी डिसेंबर महिन्यात अमरावती, यवतमाळ, नागपूर येथे बैठका घेतल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. जे बदल करणे आवश्यक आहेत ते बदल करण्याचे अधिकार आम्ही ईडी, सीई, एसी यांना दिलेले आहेत. यासाठी जे करणे आवश्यक आहे ते सर्व आम्ही करीत आहोत. जेणे करुन त्या विभागातील कामे लवकरात लवकरझाली पाहिजेत आणि जो अनुशेष आहे तो भरुन निघाला पाहिजे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, भूसंपादानाच्या अडचणीमुळे काही प्रकल्पांची कामे रखडलेली आहेत. आता नवीन भूसंपादन कायदा येणार आहे. नवीन भूसंपादन कायद्यामुळे निर्माण होणाऱ्या ज्या अडचणी आहेत त्याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ? वन जमिनीचा विषय, स्थानिक विरोध हे सर्व विचारात घेता सिंचन प्रकल्प पूर्ण होण्यासाठी वेळ लागणार आहे. सिंचन प्रकल्पांचे कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासन काही धोरण आखणार आहे काय ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, या संदर्भात शासन अतिशय गंभीर आहे. आम्ही मागील दोन महिन्यात 20 कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. आपण वनाच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. मी स्वत: आणि विभागाचे अधिकारी दिल्ली येथे जाऊन या संदर्भात चर्चा करुन सर्व प्रश्न मार्गी लावत आहोत. आपण सांगितले की,

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन.......

आता भूसंपादनाचा नवीन कायदा आलेला आहे, हे बरोबर आहे. मागील वर्षी कायद्यात सुधारणा करण्यात आली होती. परंतु, आता नवीन भूसंपादन कायदा आलेला आहे. सरळ पद्धतीने काही जमीन घेता येईल काय, यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. परंतु, केंद्र शासनाने असे सांगितले आहे की, तुम्हाला अशा प्रकारे जमीन खरेदी करता येणार नाही. जो पर्यंत आम्ही गाईड लाईन्स देत नाही, तो पर्यंत जमीन खरेदी करु नये. आमचे या संदर्भात प्रयत्न सुरु आहेत. केंद्र शासन ज्यावेळी निदेश देईल त्यावेळी आम्ही सरळ पद्धतीने जमिनी खरेदी करून प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करू.

--------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : अमळनेर नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने पाठविलेला प्रस्ताव अद्याप शासनाकडे प्रलंबित असणे

**मु.शी.** : अमळनेर नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने पाठविलेला प्रस्ताव अद्याप शासनाकडे प्रलंबित असणे यासंबंधी श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती स्मिता वाघ (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"जळगाव जिल्ह्यात अंमळनेर शहरासाठी जलोद येथील पंपींग स्टेशनमार्फत तापी नदीतून पाणी घेवून शहरासाठी पाणीपुरवठा करण्यात येणे, शहराची लोकसंख्या सुमारे 98 हजार असून दररोज दरडोई 70 लीटर पाणी दिले जाणे, तापी नदीपात्रातून दररोज 70 लाख लीटर पाणी उपसा होणे, ठिकठिकाणी गळती होत असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाणे, त्यामुळे सध्या चार दिवसांआड शहराला होत असलेल्या पाणीपुरवठा एक-दोन दिवसाआड उशिराने होण्याची निर्माण झालेली परिस्थिती, तापी नदीपात्रात अत्यल्प जलसाठा असल्याने अंमळनेर शहराला 15 दिवस पुरेल एवढेच पाणी आता शिल्लक असणे, संभाव्य पाणी टंचाई विचारात घेऊन या संदर्भातील अंमळनेर नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव अद्यापही शासनाकडे प्रलंबित असणे, सदर प्रस्तावास तातडीने मंजुरी देऊन शहरातील पाणीपुरवठा नियमित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती स्मिता वाघ : सभापती महोदय, अमळनेर शहराची लोकसंख्या जवळपास 1 लाख आहे. अमळनेर शहराला जलोद येथील पंपींग स्टेशनमार्फत तापी नदीतून पाणी पुरवठा केला जातो. परंतु, उन्हाळ्यात तापी नदीचे पात्र पूर्णपणे कोरडे होते. त्यामुळे आम्हाला भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. पाणी टंचाईचा सामना करीत असताना आम्हाला प्रत्येक वर्षी हतनूर धरणातून तीन आवर्तने घ्यावी लागतात आणि त्यासाठी नगरपरिषदेचे जवळपास 42 लाख रुपये खर्च होतात. आपणा सर्वांना माहीत आहे की, नगरपरिषदांची आर्थिक स्थिती अतिशय खराब आहे. त्यामुळे अमळनेर नगरपरिषदेला 42 लाख रुपये खर्च करणे खूप त्रासदायक होते. म्हणून यातून वेगळा मार्ग काढला गेला पाहिजे. मी स्वत: अमळनेर शहरात राहते. मला देखील पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. त्या ठिकाणी लोकांच्या भावनांचा मोठ्या प्रमाणावर उद्रेक होतो. एडीसीसी इन्फो केअर नागपूर ही शासकीय कंपनी आहे. अमळनेर नगरपरिषदेने या कंपनीकडे सर्व्हेक्षणासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे. जलोद गावापासून 4-5 किलो मीटर अंतरावर कलाली नावाचे गाव आहे. त्या ठिकाणी तापी नदीचा मोठा डोह आहे. त्या डोहामध्ये बाराही महिने पाणी असते. शासनाने या डोहापासून जलोद पर्यंत पाणी पुरवठ्याची लाईन टाकली तर अमळनेर शहराचा कायम स्वरुपी पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. माझी अशी विनंती आहे की, त्या कंपनीकडे जे सर्व्हेक्षणाचे काम दिलेले आहे ते तत्काळ करण्यात यावे आणि डीपीआरमध्ये त्याचा समावेश करण्यात यावा. मंत्री महोदय या संदर्भात तत्काळ पावले उचलून आम्हाला न्याय देण्यासाठी प्रयत्न करणार आहेत काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिता वाघ यांनी अमळनेर शहराला कलाली डोहातून पाणी पुरवठा व्हावा या संदर्भात ही लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. अमळनेर नगरपरिषदेने हा प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यास त्याला तत्काळ मान्यता देण्यात येईल.

श्रीमती स्मिता वाघ : सभापती महोदय, प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. मंत्री महोदयांनी संबंधित कंपनीला फोन करुन तत्काळ सर्व्हेक्षण करुन अहवाल मागवून घेतला तर बरे होईल.

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, होय.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिता वाघ यांनी सांगितले की, प्रस्ताव पाठविलेला आहे आणि मंत्री महोदय सांगतात की, प्रस्ताव आलेला नाही. शासनाकडे सदर अहवाल प्राप्त झालेला आहे आणि त्याला प्रशासकीय मान्यता देण्याबाबत नेमकी काय स्थिती आहे, याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, तो प्रस्ताव कंपनीकडे पाठविण्यात आलेला आहे. कंपनीकडून शासनाकडे प्रस्ताव आल्यानंतर हा प्रस्ताव तातडीने मंजूर करण्यात येईल.

----------

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : गांधारी नदीवर बांधण्यात येणाऱ्या पुलाचे काम बंद असणे याबाबत श्री.अनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.अनिल तटकरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महाड तालुक्यातील (जि.रायगड) नाते गाव सुमारे तीन हजार लोकवस्तीचे असून गावामध्ये प्राथमिक शाळेप्रमाणेच माध्यमिक विद्यालय असून आडी, नांदगाव, कवळी इत्यादी गावांसह 20 वाड्या या परिसरात असून तेथील विद्यार्थी शिक्षणासाठी येत असून गांधारी नदीवर बांधण्यात येणाऱ्या पुलासाठी शासनाने निधी न दिल्याने वर्षभरापासून काम बंद असणे, आगामी पावसाळ्यात पुला अभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने तसेच, तालुक्यातील महत्वाच्या गावांना जोडणाऱ्या गांधारी नदीवरील पुलास निधी उपलब्ध करुन पुलाचे काम तातडीने करण्यात यावे, अशी शिफारस मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

---------

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.**: कोल्हापूर जिल्ह्यातील हुपरी ग्रामपंचायतीचे नगरपालिकेत रुपांत करण्याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात हुपरी नावाचे गाव आहे. या गावाचे वैशिष्ट्य असे आहे की, देशातील चांदीचे दागिणे हुपरी गावात तयार होतात. असे म्हटले जाते की, हुपरी गावातील गटारांमधून चांदी वाहते. आता त्या गावातील लोकसंख्या 60 हजार आहे. हुपरी येथे सध्या ग्रामपंचायत आहे. त्या ठिकाणी नगरपालिका स्थापन करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार केलेली आहे. मार्च, 2015 रोजी वा त्या सुमारास संबंधित विभागाकडे हुपरी नगरपरिषद निर्माण करण्याची मागणी करण्यात आली होती. 60 हजार लोकवस्ती असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये एकच ग्राम विकास अधिकारी कार्यरत असल्यामुळे नागरिकांना लागणारे दाखले, उतारे वेळेवर मिळत नाहीत. तेथील सर्व कामे एकाच ग्राम विकास अधिकाऱ्यांवर अवलंबून असल्याने दैनंदिन कामाचा बोजवारा उडतो. त्यामुळे बांधकाम परवाने देणेबाबत प्रत्येक ठिकाणी जाऊन समक्ष पाहणी करणे ग्राम वकास अधिकाऱ्यांना अशक्य होत नसल्याने हे कामकाज कर्मचारीच बघतात. त्यामुळे याबाबतची सत्यता पडताळणी करणे अशक्य होत आहे. तसेच, शासनाचे पत्रव्यवहार, शासकीय माहिती तत्काळ संगणकावरून मागविली जात असल्याने पंचायतीकडे प्रशिक्षित व सुशिक्षित कर्मचारी वर्ग नसल्याने तेथील नागरिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. तसेच, स्वत:ची मिळकत असून देखील सिटी सर्व्हे न झाल्यामुळे आर्थिक अडीअडचणींसाठी, व्यवसाय उभारणी, घरातील मंगलकार्य किंवा घर उभारणीसाठी बँकांकडून अर्थसहाय्य मिळत नसल्यामुळे तेथील जनतेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ग्रामपंचायतीच्या तुटपुंज्या उत्पन्नामुळे आरोग्य सेवा पुरविणे व स्वच्छतेसाठी वाहने उपलब्ध नसल्याने आरोग्य विषयक समस्येमुळे नागरिक हैराण होत आहेत.

..8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

सभापती महोदय, माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. ते सभागृहात उपस्थित असते तर चांगले झाले असते. शासनाने कोल्हापूर जिल्ह्यातील हुपरी ग्रामपंचायतीचे नगरपालिकेत रुपांतर करण्यासाठी तत्काळ विशेष प्रयत्न करावेत, अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

------

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : मौजे चौल, ता.अलिबाग, जि.रायगड येथील स.नं.732 या संरक्षित क्षेत्रात झालेल्या उत्खननाबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"मौजे चौल, ता.अलिबाग, जि.रायगड येथील सर्वे नं.732 या संरक्षित वन जमिनीतून जाणाऱ्या रस्त्याच्या परवानगीकरिता केंद्र शासनाकडे कराव्या लागणाऱ्या प्रस्तावात अनेक त्रृटी असताना खोटे दस्तऐवज वापरुन रस्त्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर रस्त्याच्या कामासाठी लागणारी वन जमीन प्रस्ताव धारकास ताब्यात द्यावी लागते ती ताब्यात देताना, वन विभागाच्या वन सर्वेक्षकांना जागेवर जाऊन पाहणी करावी लागते व मोजणी केल्याशिवाय ताब्यात देता येत नाही. दिनांक 7.3.2011 रोजी सदर पाहणी अहवालात स्पष्ट केले आहे की, परवानगी देताना केंद्र शासनाने आखणी करुन दिलेल्या अलायमेंटनुसार रस्त्याची आखणी नसल्यामुळे वेगळा प्रस्ताव सादर करुन मंजूरी घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे रस्त्याच्या कामाला दिनांक 6.8.2014 रोजी उप वनसंरक्षक, अलिबाग यांनी स्थगिती दिली आहे. असे असताना सदर रस्त्याचे काम चालू ठेवण्यात आले असून ठेकेदाराने उत्खनन करुन 7 ते 8 हजार बाब संरक्षित वन क्षेत्रातील मातीची परस्पर विल्हेवाट लावून महसूल विभागाची रॉयल्टी बुडविली आहे. सबब या सर्व प्रकरणाची चौकशी होऊन यामध्ये दोषी असणारे अधिकारी व बेकायदेशीर काम करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई व्हावी यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

---------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : राज्यातील प्राण्यांच्या शिकारीचे वाढलेले प्रमाण
याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स.
यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

"राज्यात वाढते प्राण्यांचे शिकारीचे प्रमाण, त्यातच चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत 2 महिन्यांत 4 बिबटे व 3 वाघिणींचा मृत्यू झाल्याचे दिनांक 13/01/2015 ला उघडकीस येणे, त्यातच वन्य प्राण्यांची शिकार करणारी टोळी स्फोटकाच्या साहित्यासह जिल्ह्यात सक्रीय असल्याचे दिसून येणे, परंतु संबंधित शिकारधार टोळीवर न होत असलेली कारवाई, याकरिता मी सभागृहात विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे."

---------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : जात पडताळणी प्रमाणपत्राची आवश्यकता रद्द करून प्रमाणपत्र देण्याकरिता भ्रष्टाचार करणाऱ्यांना कडक शासन करणे याबाबत डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्याच्या व केंद्राच्या शिष्यवृत्ती, नोकरी आदींसह अनेक सवलतींमध्ये राजकीय आरक्षण आदी बाबींसाठी जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र आवश्यक असते तथापि, अशा अर्जांची संख्या प्रचंड मोठी असते. तसेच खूप मोठी शासकीय यंत्रणा यासाठी कार्यरत असते. यामध्ये नागरिकांना प्रचंड हाल सोसावे लागतात, खूप मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार यामध्ये असतो. जात प्रमाणपत्र देताना यातील अनेक बाबींची खातरजमा केली जाते. त्यामुळे जात पडताळणी प्रमाणपत्राची आवश्यकता रद्द करावी व जे थोडे लोक याबाबतीत गैरफायदा घेतात ते घेऊ नये यासाठी शासनाने नवीन कायदा करुन अतिशय कडक शासन (तुरुंगवास व दंडात्मक कारवाईचा समावेश असलेल्या तरतूदींसह कायदा) करावे, म्हणजे असे प्रकार होणार नाहीत. याकरिता मी सभागृहात विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : राज्यातील ऑटोरिक्षा चालकांच्या कल्याणासाठी
रिक्षाचालक मंडळ स्थापन करणे याबाबत
ॲड.जयदेव गायकवाड, वि.प.स. यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"राज्यात ऑटोरिक्षा सार्वजनिक वाहन असून रोज सुमारे 13 ते 14 तास रिक्षा चालवून प्रवासी सेवा देणारा रिक्षा चालक मात्र सार्वजनिक सेवक न समजणे, मात्र रिक्षांचा रंग, आसन क्षमता, हद्द, भाडेदर, चालकाचा गणवेश, मीटर प्रकार इत्यादि नियम कर्तव्य, शासनामार्फत ठरविण्यात येणे, तसेच भाडेवाढ, नियमभंग केल्यास दंड, चालक व वाहन परवाना, निलंबन निश्चित करण्यात येणे, मात्र रिक्षा चालकांना कोणत्याही सुविधा मिळत नसणे, याशिवाय रिक्षाचालक पंचायतीमार्फत रिक्षा चालकांसाठी रिक्षा चालक मंडळाची मागणी दिनांक 07 ऑक्टोबर, 2013 रोजी करुनही त्याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी रिक्षा चालकात शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष व निराशेची भावना, रिक्षा चालकाचे जीवन सुसह्य व्हावे, यासाठी रिक्षा चालकांसाठी रिक्षा चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात यावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीतील बिल्वदल या धोकादायक इमारतीतील 48 बेघर कुटुंबीयांच्या निवासाची पर्यायी व्यवस्था करणे याबाबत श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"कल्याण-डोंबिवली मनपा हद्दीतील डोंबिवली पूर्वेतील नामदेववाडी, पाटीलवाडी परिसरातील बिल्वदल या इमारतीमधील रहिवाशांना सदरहू इमारत धोकादायक झाल्याचे जाहीर करुन, 9 ऑगस्ट, 2014 रोजी दुपारी अडीच वाजता घरे खाली करण्यास सांगून सदर इमारत रिकामी करुन घेतली, मात्र अद्याप 48 कुटूंबांच्या वास्तव्याची कोणतीही सोय मनपाने केलेली नसून, सदर इमारतीच्या मालकाने आम्हाला त्याच ठिकाणी घरे द्यावीत किंवा मनपाने बी.एस.यु.पी. योजनेत घरे उपलब्ध करुन द्यावीत अशी मागणी या बाधित परिवाराकडून केली जात असताना आठ महिने झाल्यानंतरही त्यांची वणवण संपलेली नसल्याने, शासनाने याप्रकरणी लक्ष घालून त्या 48 बेघर झालेल्या कुटूंबांना न्याय मिळवून द्यावा, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

---------

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : मुंबईच्या विकास नियोजन आराखड्याच्या मसुद्यात मुंबईतील 1000 पुरातन वास्तूंचा समावेश नसणे याबाबत श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"मुंबई महापालिकेने 2014-2034 या वर्षासाठी मुंबईचा विकास नियोजन आराखड्याचा मसुदा तयार केल्याचे व सदर मसुद्यावर सूचना आणि हरकती सादर कल्या जात आहेत या विकास आराखड्याच्या मसुद्यात पालिकेने ना विकास क्षेत्रातील तब्बल 16 हजार एकर जागा खुली करण्याचा घाट घातला आहे. आता या आराखड्यातून तब्बल 1 हजार पुरातन वास्तू परिसराची हद्द कमी झाली असून पुरातन यादीमध्ये मुंबईतील 1488 पुरातन वास्तूंना संरक्षण देण्यात अले आहे. मात्र या यादीतील 70 टक्के म्हणजे एक हजार वास्तू या विकास आराखड्याच्या मसुद्यात समाविष्ट करण्यात आलेल्या नाहीत. तर 35 वास्तूमध्ये बदल करण्यात आले आहेत. मुंबईतील सर्व पुरातन वास्तूचे जतन करण्यात यावे, अशी मागणी मी ह्या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

---------

...7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : नागपूर येथील शासकीय मेडिकल रुग्णालयातील एक्स-रे मशीन बंद असणे याबाबत प्रा.अनिल सोले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"नागपूर स्थित शासकीय रुग्णालय, मेडिकल येथे एक्सरे मशीन बंद आहे. वारंवार एक्सरे फिल्मचा तुटवडा होत आहे. तसेच एक्सरे मशीन नादुरुस्त असते. त्यामुळे गोरगरीब जनतेत रोष निर्माण होत आहे. या रुग्णालयात विदर्भ व मध्य प्रदेशातून रुग्ण येतात. यावर शासनाद्वारे करावयाची कार्यवाही, यासाठी सदरची बाब विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात उपस्थित करीत आहे."

---------

...8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा शासकीय रुग्णालयातील भौतिकोपचार विभाग बीओटी तत्वावर चालविण्यास देणे तसेच नागभीड येथे ट्रॉमा केअर युनिट उघडणे याबाबत श्री.मितेश भांगडिया,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"राज्यात विशेषत: चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील भोतिकोपचार करणारी यंत्रणा रेडिऑलॉजी विभाग बहुतेक स्थानी बंदच आहेत. विभाग बंद असल्यामुळे महागड्या मशीनरी धुळ खात आहेत. याकरिता लागलेला शासनाचा करोडो रुपयांचा निधी वाया गेलेला आहे. सामान्य नागरिकांना स्कॅनिंग, एमआरआय आदि विशेष तपासण्या खाजगी केंद्रातून महागड्या रकमेवर करावे लागते. जिल्हा रुग्णालयांना विविध विषयांचे तज्ज्ञ प्रमुख नसल्यामुळे सामान्य रुग्णालयांमध्ये एन.आर.एच.एम. अंतर्गत कन्सल्टंट म्हणून नियुक्त केलेले कन्सल्टंट फारच कमी वेळ रुग्णालयांना वेळ देतात. यामुळे उपचाराकरिता आलेल्या सामान्य रुग्णाला मोठ्या शहराकडे उपचाराकरिता धाव घ्यावी लागते वा खाजगी रुग्णालांचा महागड्या उपचाराकरिता आधार घ्यावा लागतो. चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील भोतिकोपचार विभाग रेडिऑलॉजी बीओटी तत्वावर देण्याची नितांत गरज आहे. दोन्ही जिल्ह्यांचे केंद्रस्थान असलेल्या नागभीड या गावी ट्रामा केअर युनिट उघडण्याची आवश्यकता आहे. याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---------

नंतर 2 के.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : शासकीय कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा तत्वावर नोकरी देणे याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"राज्यातील शासकीय विभाग/कार्यालयांमधील व शासन अनुदानित शैक्षणिक संस्थांतील गट-क व गट-ड संवर्गातील अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या प्रतिक्षा यादीतील पद भरतीसाठी शासनाच्या (वित्त विभाग) दिनांक 22 मार्च, 2012 च्या शासननिर्णयाद्वारे, दिनांक 31 डिसेंबर, 2011 पर्यंतची मुदत अंतिम करण्यात येणे, तथापि, शासन सेवेत व कर्तव्यावर असताना दिनांक 31 डिसेंबर, 2011 नंतर निधन पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या वारसास शासनाच्या या निर्णयामुळे डावलण्यात येणे, अनुकंपा यादीमधील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना सेवेत सामावून घेण्यासाठी किमान 5 ते 6 वर्षे व त्यापेक्षा जास्त कालावधी लागतो, परिणामी दिनांक 31 डिसेंबर, 2011 च्या सदर शासन निर्णयामुळे अनुकंपा तत्वावरील उमेदवारांवर अल्याय होऊन त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे, त्यामुळे सदर शासन निर्णयातील दिनांक 31 डिसेंबर, 2011 पर्यंतची अनुकंपा तत्वावरील उमेदवारीच्या भरतीची अट रद्द करण्यात यावी व दिनांक 31 डिसेंबर, 2011 नंतर शासन सेवेत व कर्तव्यावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात यावी, याकरिता मी सभागृहात विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे."

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती मिळण्यास विलंब होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष याबाबत श्री.नागो गाणार,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"केंद्र शासनाकडून 6 जानेवारी, 1998 पासून इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली असून सदर योजनेत 2003-04 पासून उत्पन्न मर्यादा 44 हजार 500 विचारात घेऊन सदर योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना देण्यात येणे, मात्र महाराष्ट्र शासनाने 21 जानेवारी, 2008 ला इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शासनाने विहित केलेली उत्पन्न मर्यादा 44 हजार 500 वरुन 1 लाख रुपये एवढी करणे, परंतु वाढीव शिष्यवृत्तीसाठी राज्य सरकारने केंद्र सरकारची परवानगी न घेता राज्य सरकारने केंद्राकडे वाढीव शिष्यवृत्तीची रक्कम रुपये 1 हजार 392 कोटी थकबाकीची मागणी करणे, यामुळे केंद्र व राज्य सरकारमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण होणे, यामुळे इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यास विलंब होणे, परिणामी विद्यार्थ्यांमध्ये शासन विरोधात पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, पसरलेले नैराश्याचे व चिंतेचे वातावरण, यामुळे राज्य व केंद्र सरकारमध्ये असलेला संघर्ष तात्काळ मिटवून विद्यार्थ्यांना वाढीव शिष्यवृत्तीचा लाभ देण्याबाबत शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही, सदर बाब गंभीर व विद्यार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने मी या विशेष उल्लेखाद्वारे मांडत आहे."

---------

**उप सभापती :** हल्ली विशेष उल्लेख सूचना देखील वाढायला लागले आहेत व त्यांची लांबी देखील वाढायला लागली आहे. खरे म्हणजे विशेष उल्लेख आपल्याला थोडक्यात आटपायचे असतात. पण आता सन्माननीय सदस्य येथे प्रबंध वाचायला लागले आहेत. ते बिलकूल चालणार नाही. ज्यांची नावे मी पुकारली होती त्यांची नावे मी पुन्हा संधी देणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : वालधुनी नदीच्या (ता.कल्याण,जि.ठाणे) काठावर होत असलेले अतिक्रमण याबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

माझ्या विशेष उल्लेखाच्या सूचनेतील विषय आपल्याशी निगडित असा आहे. आपण देखील या विषयामध्ये लक्ष घातलेले आहे. कल्याण (जि.ठाणे) येथील वालधुनी नदीच्या काठावर गेल्या काही दिवसांपासून बेकायदा बांधकामांनी जोर धरला असून या बांधकामामुळे नदीचा ओढा होतोय की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मध्यंतरी जिल्हा नियोजन समितीाच्या बैठकीत सुद्धा बेकायदेशीर बांधकामाचा विषय आला होता. त्यावर कारवाई व्हावी असा निर्णय झाला होता. पण कारवाई काही झाली नाही. तेव्हा हा विषय शासनाने गांभीर्याने घेऊन यावर कारवाई करावी ही विनंती.

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : नाशिकसह संपूर्ण राज्यात बंद पडलेली ट्रॅफिक वॉर्डन योजना सुरू करणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"राज्यामध्ये मुंबई, पुणे, नांदेड, जळगांव, रायगड, लातूर, कल्याण, भंडारा इत्यादी शहरांमध्ये ट्रॅफिक वॉर्डन हे मासिक मानधनावर वाहतूक पोलिसांना मदतीचे काम करत असणे, नाशिक शहरात सुध्दा दिनांक 5 सप्टेंबर, 2004 रोजी पोलीस महासंचालकांच्या हस्ते ओळखपत्र वितरित करुन ट्रॅफिक वॉर्डन योजनेचा शुभारंभ करण्यात आलेला असणे, त्यांना ट्रॅफिकचे नियम आणि कायदेविषयक माहितीचे 90 दिवसांचे प्रशिक्षण सुध्दा देण्यात आलेले असणे, मात्र 2009 नंतर ही योजना शहरात बंद करण्यात आलेली असणे, राज्यातील सर्व मोठ्या शहरांमधील वाढती रहदारी व वाहतुक व्यवस्था लक्षात घेता ट्रॅफिकच्या नियोजनासाठी नाशिकसह राज्यभरामध्ये ट्रॅफिक वॉर्डन ही योजना सुरु करण्याची आवश्यकता आणि वाहतुक मदतनीसांना होमगार्डच्या धर्तीवर मानधन देण्यात यावे, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** डॉ.विजय केळकर समितीचा अहवाल

**मु.शी.:** डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालासंबंधी सभापतींचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरू......

श्री.शिवाजीराव देशमुख (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सभापती महोदय, अतिशय महत्त्वाच्या अशा केळकर समितीच्या अहवालावर मला बोलण्याची आपण मला संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र असे तीन भाग मिळून आपला महाराष्ट्र आहे. विदर्भ व मराठवाड्याला दुर्दैवाने सातत्याने अनुशेषाला तोंड द्यावे लागले आहे. श्री.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री या नात्याने नेतृत्त्व स्वीकारले त्याच वेळी विदर्भ व मराठवाडा या दोन्ही भागातील असणारा अनुशेष योग्य पद्धतीने भरून काढण्यात येईल अशा प्रकारचे अभिवचन त्यांनी तत्कालीन विदर्भ व मराठवाड्यातील नेत्यांना दिले होते. त्या अनुसार आपण सातत्याने प्रयत्न करीत आलेलो आहोत.

1984 साली श्री.वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना विदर्भातील आमचे सन्माननीय सदस्य श्री.नागपुरे यांनी विधान सभेमध्ये एक अशासकीय ठराव मांडला होता. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतदादा पाटील यांनी त्यांना आपला अशासकीय ठराव मागे घेण्याची विनंती केली होती व त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, दोन्ही सदनामध्ये शासनच ठराव मांडेल. त्यावेळेपासून विदर्भाच्या अनुशेषाला चालना मिळाली.

1984 मध्ये राज्य शासनाने दांडेकर समितीची स्थापना केली. या समितीने संपूर्ण महाराष्ट्राचा सखोल असा अभ्यास केला. या समितीने राज्यातील जिल्ह्यांमध्ये व तालुक्यांमध्ये कोणती परिस्थिती आहे, कशा प्रकारचा अनुशेष आहे व त्यासाठी कशा प्रकारे तरतुदी केल्या पाहिजेत यावर सविस्तर अशी माहिती संकलित केली. सदर माहिती संकलित केल्यानंतर त्यावर निर्णय घेण्यामध्ये काहीसा उशीर झाल्यामुळे त्या माहितीचा तसा काहीच उपयोग झाला नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख....

विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र या तीन भागात कोणकोणत्या क्षेत्रात अनुशेष आहे व तो भरून काढण्याकरिता आर्थिक तरतूद कशा प्रकारे करण्यात येईल यावर सातत्याने विचार झाल्यानंतर त्यावर 7-8 वर्षानंतर पहिल्यांदा निर्णय झाला.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शिवाजीराव देशमुख .....

सभापती महोदय, स्व.मुख्यमंत्री श्री.शंकरराव चव्हाण साहेबांनी मंत्री मंडळातील आम्हा सर्वांना एक दिवशी सह्याद्री गेस्ट हाऊस बोलावून सांगितले की, विदर्भ, मराठवाडयाचा अनुशेष आहे. हा अनुशेष संपवण्याकरिता लागेल तेवढे पेसे आपण देऊ या. परंतु एक गोष्ट पथ्य म्हणून पाळू या की, संघर्ष करुन ब्रिटिश सत्तेला जसे आपल्या देशातून बाहेर काढले तशाच पध्दतीने आपल्याला काम करावे लागणार आहे. संसदीय लोकशाही पध्दतीमध्ये मुख्यमंत्री हा राज्यातील मंत्री मंडळाचा प्रमुख असतो. त्याला राज्यातील सर्व विभागातील हीत जपण्याचा अधिकार असतो अधिकार लोकशाहीत महत्वाचा असतो. हा अधिकार जपणे गरजेचे आहे. म्हणून विदर्भ, मराठवाडयाला जे जे काही पाहिजे आहे, जे काही द्यावयाचे आहे ते आपण देऊ या, पण आपल्या अधिकारात असलेले अधिकार अनुच्छे 371(2) नुसार राज्यपालांकडे सुपूर्द करा अशी जी कल्पना पुढे आलेली आहे, ती आज तुम्हाला गोंडस वाटत असली तरी नंतरच्या काळामध्ये तो रेशमी धागा काहींच्या न कळत कोठे ना कोठे घासून जाईल. आम्ही ते निमूटपणे ऐकले, विचार केला आणि आम्हालाही ते नकळत पटले. पण तरीही भावनेच्या अनुषंगाने मराठवाडा, विदर्भ हे सुध्दा आमचे बंधू आहेत. आम्ही जेव्हा तिघे एकत्रित आलो त्याच वेळेला मुंबईसहीत संयुक्त महाराष्ट्र झाला. संयुक्त महाराष्ट्राचा संघर्ष आम्ही पाहिला आहे. 101 हुतात्म्यांचे रक्त ज्यावेळेला या पवित्र भूमीवर सांडले गेले त्याच वेळा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला. अशा परिस्थितीमध्ये स्व.शंकरराव चव्हाण साहेबांनी आम्हाला दिलेला तो विचार जरी बरोबर असला तरी भावनेच्या आहारी जाऊन आम्ही काही मंडळींनी, आज जसे आपण सदनात सगळे एकाच विचाराचे लोकप्रतिनिधी आहोत, आपण सर्व महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करतो. त्यावेळी सन्माननीय श्री. शरद पवार साहेब 1994 च्या दरमयान राज्याचे मुख्यमंत्री होते. स्व.रामरावजी अदिक, स्व.सुधाकररावजी नाईक, स्व.विलासराव देशमुख आणि मी स्वत: असे आम्ही पाच प्रतिनिधींनी ठरवले की, दोन्ही सदनाच्या माध्यमातून त्यावेळचे देशाचे पंतप्रधान स्व. नरसिंहरावजी यांना आपण भेटून त्यांना 371(2) च्या संदर्भात माहिती देऊ. आपल्याला जी स्वायत्त मंडळे तयार करावयाची आहे त्यामध्ये विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व आपण करु आणि माननीय पंतप्रधानांना हे पटवून देऊ या की, अशा पध्दतीने 371(2) खाली स्वतंत्र मंडळे विकासाच्या अनुषंगाने करणे आवश्यक असून त्या

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शिवाजीराव देशमुख .....

संदर्भातील संपूर्ण अधिकार राज्यपालांना बहाल करा. अशा पध्दतीने त्यावेळी आम्ही तेथे विचार मांडल होते. स्व.शंकरराव चव्हाण साहेब त्या बैठकीला उपस्थित होते परंतु त्यांनी त्या बैठकीत एक शब्दही उच्चारला नाही. त्यांचे विचार त्यावेळचे पंतप्रधानांनाही माहिती होते तसेच आम्हा सर्व लोकांनाही माहिती होते. अशा पध्दतीने महाराष्ट्रामध्ये प्रथम 371(2) हे स्वयंभू, स्वंतत्र मंडळ विकासाच्या अनुषंगाने या महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात आले.

सन्माननीय उप सभापती महोदय, आपण देशाची परिस्थिती बघितली तर गुजरातमध्ये 371(2)चा एक छोटा विभाग होता व तो कच्छ होता. परंतु 371(2) झाला तरी त्या ठिकाणी त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही अशी माझी माहिती आहे. यासंदर्भात अन्य माहिती असेल तर ती देण्यास हरकत नाही. देशामध्ये कर्नाटक राज्यातील एका छोटया भागामध्ये गेल्या दोन तीन वर्षामध्ये 371(2) अस्तित्वात आले आहे. विस्ताराने बोलण्याचे कारण असे आहे की, 1994 मध्ये आपण दांडेकर समिती निर्माण केली. या समितीने चांगला अभ्यास करुन अनेक निष्कर्ष काढले, अनेक विभागांचा अनुशेष दाखवून दिला. त्यानंतरच्या काळात भुजंगराव कुलकर्णी हे विभागीय आयुक्त होते त्यांच्या अध्यक्षतेखाली दोन कमिटया नेमण्यात आल्या आणि त्यांनीही काही निष्कर्ष काढले. त्या निष्कर्षानेही आमचे कोणाचे समाधान झाले नाही. आता केळकर समिती विदर्भ, मराठवाडयाचा समतोल विकासाच्या बाबतीत त्यांनी निष्कर्ष दिलेले आहेत. परतु याबाबतीत सुध्दा आमच्या विदर्भातील मित्रांमध्ये काही प्रमाणात नाराजी आह. समतोल विकासाच्या माध्यमातून कोणत्या क्षेत्रामध्ये किती काम झाले किती कमी आहे यासंदर्भात आपण चर्चा करीत राहू. पण त्या समितीने विदर्भ, मराठवाडयाचा भौतिक अनुशेष किती आहे आणि आर्थिक अनुशेष किती आहे हे आम्हाला काही सांगितले नाही. मला वाटते आपण 10 समित्या यासंदर्भात नेमल्या तरी आपले कोणाचेही वेगवेगळया सेक्टरमध्ये समाधान होण्याची शक्यता नाही असे मला स्वतःला वाटते. केळकर समितीने अहवाल तयार करण्यासाठी पुष्कळ परिश्रम घेतले असून त्यांनी तयार केलेला रिपोर्ट फार मोठा आहे. अनेक लोकांनी एकत्रित बसून चर्चा करुन तुम्ही आम्ही समजून घेण्याचा प्रयत्न केला तरी आठ, पंधरा दिवस लागतील. हा रिपोर्ट अभ्यास करुन तयार केलेला आहे. रोगाचे अचूक औषध कोणते हे या रिपोर्टमध्ये काही सांगितलेले नाही आणि ते कोणीच सांगू

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शिवाजीराव देशमुख .....

शकणार नाही. या रिपोर्टमध्ये दांडेकर समितीने एक सूत्र मांडले आहे. राज्यातील विविध भागातील विकासाचा असमतोल मांडून समितीने निधी वाटपाचे नवे सूत्र मांडले आहे. त्यामुळे विदर्भाला मिळणाऱ्या निधीत 10 टक्के वाढ करा, मराठवाडयाला मिळणाऱ्या निधीमध्ये 7 टक्के वाढ करा आणि उर्वरित महाराष्ट्रातील निधीत मात्र 19 टक्के घट करा अशा पध्दतीची ही शिफारस आहे. अशी शिफारस असली तरी उर्वरित महाराष्ट्राचा प्रतिनिधी या नात्याने मी नाराज राहणार नाही. समतोल विकास करण्याच्या दृष्टीने आम्हा तीन भावंडाना वाटणारी जी भावना आहे त्या अनुषंगानेच या पध्दतीने आपण येथे काम करतो. उर्वरित महाराष्ट्राच्या निधीमध्ये 19 टक्के घट करा असे ज्या वेळेस मांडले जाते त्यावेळेला दुर्दैवाने महाराष्ट्रातील अनेक सेक्टरमधील कामे त्या त्या ठिकाणीच थांबवावी लागतील अशी भीती सुध्दा आहे. मी या अनुषंगाने खुल्या मनाने या सभागृहात याबाबतीतील काही महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, दुष्काळग्रस्त महाराष्ट्रासाठी रंगनाथ समितीने काढलेले निष्कर्ष आणि केळकर समितीने केलेला अभ्यास या दोन्हीची बेरीज केली तर या महाराष्ट्रातील जवळ जवळ 45 टक्के भाग दुष्काळी आहे. महाराष्ट्रात आज केवळ 18 टक्के भाग बागायती आहे. अनेक प्रयत्न केल्यानंतर तो 35 टक्के होईल परतु तो बारमाही 35 टक्के होणार नाही. काही विभागामध्ये ते चारमाही होईल तर काही विभागामध्ये तो आठमाही होईल आणि अगदी अपवाद म्हणून काही ठिकाणी बारमाही होईल अशी आपली परिस्थिती आहे.

यानंतर श्री. अजित......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख...

सभापती महोदय, आपण पुणे आणि मराठवाडा विभागाचा विचार केला तर पुणे विभागातील सांगली, सातारा, सोलापूर, पुणे या सर्व जिल्ह्यांतील दोन-तृतीयांश तालुके दुष्काळी आहेत. मराठवाड्यातील उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यांमध्ये अतिशय दुष्काळी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, सिंचनाचा अनुशेष काढायचा असेल तर तो तालुका प्रमाण धरून काढण्यात यावा असा निष्कर्ष दांडेकर समितीने काढला होता. सन 1999 च्या दरम्यान या कामाकरिता आणखी एका समितीची नियुक्ती करण्यात आली. या समितीने तालुक्याचे प्रमाण बदलून जिल्हा प्रमाण धरण्यास सांगितले. माझ्या मतदारसंघातील जत तालुका हा राज्यातील सर्वात दुष्काळग्रस्त भाग आहे आणि त्यानंतर बीड जिल्ह्यातील किमान सात तालुके आहेत. आपण तालुका प्रमाण धरून सिंचनाचा अनुशेष काढला तेव्हा जत तालुक्यामध्ये साडेचार टक्के सिंचन होते. परंतु आपण तालुक्यावरून जिल्हा प्रमाण धरले तेव्हा जत तालुक्यामध्ये 43 टक्के इरिगेशन असल्याचे दाखविण्यात आले. माझ्या मते ही सर्व जग्लरी आहे.

सभापती महोदय, केळकर समितीने ढोबळ मानाने जवळपास 146 अभिप्राय दिलेले आहेत. त्या सर्व अभिप्रायांचा विचार केला तर असे वाटते की, केळकर समितीने ढोबळ मानाने निधी वाटपाचे नवीन सूत्र मांडलेले आहे. त्याप्रमाणे विदर्भाला दहा टक्के जास्त द्यावेत. मराठवाड्याला 60 टक्के निधी वाढ द्यावी. उर्वरित महाराष्ट्राचे 19 टक्के कमी करावे अशी समितीने शिफारस केलेली आहे. केळकर समितीने मांडलेली ही शिफारस विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील लोकांना पसंत पडेल असे नाही आणि त्यास अनेक कारणे आहेत.

सभापती महोदय, आमच्या दुष्काळी तालुक्यातील लोक सात-आठ महिने घराबाहेर असतात. काहीजण ऊसतोडीसाठी तसेच अन्य कामासाठी आपले मूळ घरदार सोडून बाहेरगावी जाऊन आपले जीवन उभे करतात. बाहेरच्या ठिकाणी आपली मुले-माणसे सांभाळतात. शेतीमध्ये काम करतात. रात्रंदिवस कष्टाचे काम करून घरी परतताना किमान 25 ते 40 हजार रुपये जमा करतात, त्यावेळी ते उर्वरित पाच महिने मूळ घरी जगू शकतात अशी परिस्थिती आहे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख...

सभापती महोदय, आमच्या दुष्काळी भागात यावेळी एक-दोन ठिकाणी आत्महत्या झालेल्या आहेत आणि त्या आत्महत्या अपेक्षित नव्हत्या. अचानक नैसर्गिक आघात झाले त्यामुळे त्यांनी आत्महत्या केल्या अन्यथा यापूर्वी दुष्काळी भागातील लोकांनी आत्महत्येचा पर्याय कधी स्वीकारलेला नाही. माझ्या विभागामध्ये तर नाहीच अशी परिस्थिती आहे. आपणास या तिन्ही विभागांना न्याय द्यावयाचा असेल तर, त्यांचे समाधान होईल अशा पद्धतीने समिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर कोणाचेच पूर्ण समाधान होईल अशी परिस्थिती नाही.

सभापती महोदय, माझी पहिली सूचना आहे की, ज्या ठिकाणी अत्यंत कमी पर्जन्यमान आहे. दुष्काळी भागामध्ये चार ते पाच मी.मी.पेक्षा जास्त पाऊस पडत नाही. अशा दुष्काळी भागामध्ये स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करावे. आपणास त्या विभागांना खऱ्या अर्थाने न्याय द्यावयाचा असेल तर या व्यतिरिक्त आपल्याकडे दुसरा कोणताही पर्याय नाही. या व्यतिरिक्त खानदेश विभागामध्ये तापी खोरे आहे. त्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे, पण पैसा नाही. उर्वरित महाराष्ट्राचा तो एक भाग आहे. त्या विभागाला न्याय द्यावयाचा असेल तर त्या ठिकाणी देखील स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करावे लागेल. तापी खोऱ्यातील राखीव पाणी उचलण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही.खानदेशकरिता अशाच प्रकारे वैधानिक विकास मंडळ उभे करणे जरूरीचे आहे. यापूर्वी सदनाने एकमताने ठराव देखील केलेला आहे.दुर्दैवाने केंद्र सरकारने तो ठराव स्वीकारलेला नाही.

सभापती महोदय, उत्तर महाराष्ट्रातील नाशिक आणि नगर जिल्ह्यांची परिस्थिती पाहिली तर अर्धा नाशिक जिल्हा दुष्काळी आहे. नगर जिल्ह्याची देखील तीच परिस्थिती आहे. त्याठिकाणी सुद्धा स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करावे लागेल. आपण चार विभागांमध्ये अशी वैधानिक मंडळे स्थापन करण्यामध्ये यशस्वी झालो तर जो खऱ्या अर्थाने गरीब आणि सामान्य माणसाला न्याय देण्याच्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकू असे मला वाटते.

सभापती महोदय, केळकर समितीचे प्रयत्न चांगले आहेत. पण काहीही झाले तरी तीन विभागांच्या व्यथा, दु:ख आणि यातना कोणत्याही रिपोर्टने सुटलेल्या नाहीत आणि पुढील काळात



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव देशमुख...

सुटण्याची शक्यता नाही. तेव्हा माझी सूचना आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही सभागृहातील विरोधी पक्ष नेत्यांसह केंद्र सरकारकडे जाऊन महाराष्ट्रामध्ये तीन नवीन वैधानिक विकास मंडळ मंजूर करुन घ्यावीत. या व्यतिरिक्त अन्य एक ठराव झालेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

SJB/ AKN/ पूर्वी श्री.अजित.... 17:50

श्री.शिवाजीराव देशमुख....

कोकण विभागासाठी सुध्दा अशाच प्रकारे स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करावे लागणार आहे. कारण कोकणात सुध्दा जलसंपदेच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर अनुशेष आहे. दुर्दैवाने कोकणामध्ये यापूर्वी जलसंपदा विषयक कामे फारच कमी प्रमाणात झालेली आहेत. डॉ.केळकर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने मी अत्यंत महत्त्वाच्या अशा चार सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन्ही सभागृहाचे नेतृत्व करावे आणि केंद्र सरकारकडे मी केलेल्या मागण्यांबाबत आग्रह धरावा. महाराष्ट्राचा समतोल विकास करावयाचा असेल तर आणखी चार स्वतंत्र वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्याच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी.

महोदय, त्या भागातील लोकांनी यापूर्वी आपुलकीने आणि प्रेमाने सर्वकाही स्वीकारले. आमच्या भागातील काही लोक आम्हाला सांगतात की, रेशमी धागा सहज गळ्यात बांधल्यानंतर दुर्दैवाने तो धागा काही ठिकाणी दोन्ही बाजूने ओढण्याचा प्रयत्न सुरु आहे. तशीच ही परिस्थिती आहे. आमची इच्छा एवढीच आहे की, आमच्या भावंडांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने ही विधायक कामे आम्ही केली आहेत. त्यामुळे यापुढील काळात आम्हा तिन्ही भावंडांचा विकास समतोल व्हावयास पाहिजे. तसेच घटनेच्या अनुच्छेद 371 (2) अंतर्गत अन्य चार विभागांमध्ये सुध्दा स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याबाबतचे नेतृत्व माननीय मुख्यमंत्र्यांनी करावे, एवढेच या निमित्ताने सांगतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## सभागृहापुढील कामकाजाच्या वेळेच्या नियोजनाबाबत

**उप सभापती** : मी सभागृहाला विचारु इच्छितो की, सभागृहाचे कामकाज किती वाजेपर्यंत चालवायचे आहे ?

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, डॉ.केळकर समितीच्या अहवालाच्या चर्चेवरील उत्तर आज होणार आहे काय ?

**उप सभापती** : नाही. आज होणे शक्य नाही. मला वाटते आज सभागृहाचे कामकाज सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत चालवू या.

श्री.राजेंद्र मुळक : ठीक आहे. उद्या सकाळी 10.00 वाजता सभागृहाची बैठक घ्यावी.

**उप सभापती** : मला वाटते यावर अधिक चर्चा नको. सभागृहाची बैठक आज सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत चालेल आणि उद्या सकाळी 10.30 वाजता सभागृहाची बैठक घेण्यात येईल.

श्री.संदिप बाजोरिया : सभापती महोदय, मी दिलेली अर्धा-तास चर्चा दिनांक 23 मार्च, 2015 पासून सातत्याने पुढे ढकलली जात आहे. त्यामुळे किमान आज तरी ही अर्धा-तास चर्चा झाली पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : आज अर्धा-तास चर्चा होणार नाहीत. जेव्हा वेळ मिळेल तेव्हा अर्धा-तास चर्चा घेण्यात येतील.

आता सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**सभागृहात नियोजन मंत्री उपस्थित नसल्याबाबत**</u>

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, अतिशय महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरु असताना सभागृहामध्ये पुन्हा कालच्याच सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. सभागृहामध्ये सचिव स्तरावरील एकही अधिकारी लॉबीमध्ये उपस्थित नाहीत. सध्या लॉबीमध्ये जे अधिकारी बसलेले आहेत ते माननीय मंत्र्यांचे खाजगी सचिव आहेत.

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, काल सुध्दा या विषयी सभागृहात चर्चा झाली. त्यावेळी आपण माननीय मंत्र्यांना निदेश दिले होते. महोदय, अशाप्रकारे सभागृह चालणार नाही.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, सभागृहामध्ये माननीय नियोजन मंत्री उपस्थित नाहीत. तसेच सचिव दर्जाचे एकही अधिकारी उपस्थित नाहीत. अशा परिस्थतीत आमच्या मुद्यांची नोंद कोण घेणार आणि आम्हाला कोण न्याय देणार ?

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, आमच्या भावना फेस टू फेस पोहोचल्या पाहिजेत. आम्ही यापूर्वी माननीय मंत्र्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत कधी आग्रह धरला नाही. परंतु सध्या अतिशय महत्त्वाच्या अहवालावर चर्चा होत असल्यामुळे आम्हाला हा आग्रह धरावा लागत आहे.

**उप सभापती** : मला वाटते सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी भाषणास सुरुवात करावी. मी माननीय मंत्र्यांना सभागृहात येण्याविषयी निरोप पाठवितो.

------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** डॉ.विजय केळकर समितीचा अहवाल

**मु.शी.:** डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालासंबंधी सभापतींचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....)

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, डॉ.विजय केळकर समितीने सादर केलेल्या अहवालावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. मी काल उल्लेख केला की, डॉ.केळकर समितीच्या अहवालात मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि उर्वरित महाराष्ट्राची फारशी नोंद घेतलेली नाही. केवळ विदर्भाच्या विकासाच्या संदर्भातच केळकर समितीच्या अहवालात उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे डॉ.केळकर समितीचा अहवाल हा केवळ विदर्भासाठी आहे की काय, अशी शंका वाटू लागली आहे.

सभापती महोदय, माझी अजून एक शंका आहे. नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रत्येक पक्षाने स्वत:चा जाहीरनामा प्रसिध्द केला होता. विद्यमान सरकारचा जाहीरनामा असा होता की, स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण करण्यात येईल. महोदय, डॉ.केळकर समितीच्या अहवालावरील चर्चेच्या माध्यमातून मी प्रथमत: विचारु इच्छितो की, यदाकदाचित स्वतंत्र विदर्भाची घोषणा होणार असेल तर, मराठवाड्यापुरते बोलत असताना आम्ही केळकर समितीचा अहवाल स्वीकारावयाचा काय, हा खऱ्या अर्थाने या सभागृहापुढील प्रश्न आहे.

महोदय, नागपूर कराराची प्रत माझ्याकडे आहे. त्या करारात स्पष्टपणे उल्लेख केला आहे की, ".....परंतु मराठवाड्याचे विकसित क्षेत्र लक्षात घेता त्या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाकरिता मराठवाड्याकडे खास लक्ष पुरविण्यात यावे आणि दरवर्षी मराठवाड्याच्या विकासासंदर्भातील अहवाल विधानसभेच्या अधिवेशनात ठेवण्यात यावा."

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित ....

विदर्भासहित मराठवाडा राज्यात विलीन झाला. आपण मराठवाड्याच्या अनुशेषाच्या संदर्भात सभागृहात चर्चा केली का, आपण आम्हाला आमचे दु:ख, वेदना, अडचणी काय आहेत हे विचारले का, आमच्या संसाराचे काय चालले आहे हे आम्हाला कोणी विचारले का ? हे कधीही घडले नाही. कारण ही चूक आपल्याला करायची नव्हती. आमच्या मराठवाड्यातील काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला तुमची मदत नको, इन्सेंटिव्ह नको. आम्ही फक्त शेती मालाला भाव मागितला आहे. दुर्दैवाने तोही मिळाला नाही. हाताला काम मागितले तर त्याचाही इन्कार झाला. सर्वाधिक लोक स्थलांतरित होण्याचा मराठवाड्यातील जिल्हा बीड आहे. मराठवाड्यातील लोक ते होते. आपण मराठवाड्यातील त्या जिल्ह्यात जाऊन, कोणत्याही खेड्यात जाऊन तपासून पहा. त्या भागातील 7 टक्क्यांपेक्षा अधिक लोक ऊसतोडीला गेले आहेत. मला परवा पिंपरी-चिंचवड मनपाच्या संदर्भातील गृहस्थ भेटले. त्यांनी सांगितले की, आमच्या पिंपरी-चिंचवड मनपामध्ये् साधारणत: 30-35 हजार लोक बीड जिल्ह्यातील आहेत. तेथे स्थलांतरित झालेला मजूर उपजीविकेसाठी आलेला मजूर आहे.

सभापती महोदय, तो मजूर का स्थलांतरित झाला हे सर्वांना माहीत आहे. तेथे पिण्याचे पाणी नाही. शेतीच्या पाण्याच्या संदर्भात तर आम्ही काही म्हणायचेच नाही. आम्हाला अधिकार नाही. मराठवाड्यातील जनतेला शेतीचे पाणी मागण्याचा अधिकार नाही. आम्हाला सांगितले जाते की, तुम्ही शेतीचे पाण्याच्या संदर्भात बोलू नका, पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात बोला. शासनाकडून हा आग्रह आहे. आम्ही या आग्रहासाठी राज्यात सामील झालो का, आमच्या बापजाद्याने काय पाप केले ? आम्ही विना अट तुमच्यामध्ये सामील होण्याचे पाप आमच्या माथी मारलेले असेल तर होय आम्ही ती चूक केली आहे असेच म्हणावे लागेल. आपण या संदर्भात कोणालाही विचारा, आमच्या बापजाद्यांना विचारा, त्या पापामुळे आमच्या पुढील पिढीला हे दिवस भोगण्याची वेळ आली आहे. साधनसंपत्तीचा अभाव असणारा मराठवाडा विभाग आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आपल्या सूचनेप्रमाणे माननीय मंत्री सभागृहात आले. मात्र परत बाहेर गेले. केळकर समितीच्या महत्त्वाच्या अहवालावर सभागृहात चर्चा होत आहे. माननीय जलसंपदा मंत्री सभागृहात येऊन परत बाहेर गेले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्री दरवाजातून वाकून पाहत आहेत. मात्र मराठवाड्याचा विषय असेल तर त्यांना आत येण्याची इच्छा नाही. अजूनही ते तेथून वाकून पाहत आहेत.

(माननीय मंत्री सभागृहात येतात.)

सभापती महोदय, माननीय मंत्री ते मंत्री असल्याचे विसरत आहेत. साधनसंपत्तीचा अभाव असणाऱ्या मराठवाड्याचा उल्लेख केळकर समितीच्या अहवालात कुठेही केल्याचे दिसत नाही. समितीच्या अहवालात सांगितले होते की, मराठवाड्यातील अनुशेषाच्या संदर्भात उल्लेख केला होता. विदर्भाचा अनुशेष 3.51 टक्के आहे, मराठवाड्याचा अनुशेष 2.67 टक्के आहे आणि उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष 2.74 टक्के आहे. अहवालात याचा स्पष्ट उल्लेख केला आहे. केळकर समितीच्या अहवालात तरतुदी केल्या आहेत. मात्र दुर्दैवाने मराठवाड्यातील एकाही प्रकल्पाला एक दमडीचीही तरतुद केलेली नाही. मराठवाड्यात अर्धवट अवस्थेत पडलेले प्रकल्प आहेत. जायकवाडीचा दुसरा टप्पा अर्धवट अवस्थेत पडला आहे, लोअर दुधना प्रकल्प अर्धवट अवस्थेत पडला आहे. बीड जिल्ह्यातील, मराठवाड्यातील अनेक प्रकल्प अर्धवट अवस्थेत पडले आहेत.

सभापती महोदय, आपल्या सोयीने केळकर समितीचा अहवाल करताना वेगवेगळी कारणे दाखवायची आणि सर्वाधिक निधी विदर्भात नेऊन तेथे वेगळे काही करायचे असेल तर परमेश्वर तुमच्या इराद्याला अकिक बळ देवो. परंतु मी सांगू इच्छितो की, तुम्ही विदर्भाचेच नाही तर राज्याचे माननीय मंत्री आहात. आपल्याकडे राजतील आम जनता मोठ्या आशेने पाहत आहे. जलसंपदा विभागाचे प्रकल्प झाले पाहिजेत. आपण असे गृहीत धरा की, केळकर समितीच्या अहवालावर 100 टक्के अंमल केला आहे. मात्र तरीही विदर्भाचा अनुशेष 42 टक्के राहतो, उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष 35.17 टक्के राहतो आणि परत एकदा मराठवाड्याचा अनुशेष 28.75 टक्के राहतो. आपण काय मिळवत आहात, कशासाठी आग्रह आहे ?

सभापती महोदय, केळकर समितीने पुढे असे सुचविले आहे की, काही प्रमुख महत्त्वाची कार्यालये विदर्भाला, नागपूरला स्थलांतरित करावीत. मी निदर्शनास आणतो की, सद्य:स्थितीत नागपूरला राष्ट्रीय स्तरावरील 32 प्रमुख कार्यालये आहेत, पुण्याला राष्ट्रीय स्तरावरील 27 प्रमुख कार्यालये आहेत, नागपूरला आरबीआय आहे, मुंबईला राष्ट्रीय स्तरावरील 40 कार्यालये आहेत.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित ....

परंतु मराठवाड्याला एकही राष्ट्रीय स्तरावरील कार्यालय नाही. आपल्याला बोलण्याचा अधिकार नाही. भले तुम्ही पक्षाच्या पलीकडील असाल. आपण मराठवाड्याच्या जनतेने प्रेम केल्याचे सांगत आहात. आपण त्या मराठवाड्याच्या पदरात काय देणार आहात ? (गोंधळ)

श्री. गिरीष महाजन (बसून) : सभापती महोदय, तुम्ही 50 वर्षे काय केले ?

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी आपल्याला आठवण करून देतो की, आपण माननीय मंत्री आहात. आपण बसून बोलू नये.

श्री. गिरीष महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य अतिशय त्वेषात भाषण करीत आहेत. ते वारंवार सांगत आहेत की, मराठवाड्याला काय दिले आहे. आपणच विचार करावा. आम्हाला येऊन 3 महिने झाले आहेत. तुम्ही इतकी वर्षे काय करीत आहात ? आपण आतापर्यंत काय दिले ते सांगावे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझी हरकत आहे. मी माननीय मंत्र्यांच्या लक्षात आणून देतो की, आपण विद्यमान माननीय मंत्री आहात. आपण बसून बोलू नये. उत्तरात बोलावे. आता केळकर समितीने शिफारस केली आहे की, मराठवाड्यात साधनसंपत्तीचा अभाव असल्यामुळे तेथे स्किल्ड लेबर डेव्हलप करण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर उभे करावे आणि हे डेव्हलप करण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर उभे करायचे असेल तर एम्सची शाखा तेथे घ्यावी, आआयएमच्या संदर्भात विचार करावा, आयआयटीच्या संदर्भात विचार करावा. दरम्यान आघाडी शासनाच्याच काळात एम्सची शाखा नागपूरला आली. आयआयटी नागपूरला आले, आयआयएम नागपूरला आले.

सभापती महोदय, प्राथमिक शाळांना परवानग्या देणार असाल तर सर्व प्राथमिक शाळा तुमच्याकडे घेऊन जाव्यात. आम्हाला तेवढ्या तरी कशाला देता ? आपल्याला असे काय पाहिजे की तुमचे पोट भरेल. आपण उर्वरित महाराष्ट्राच्या, मराठवाड्याच्या संदर्भात विचार करणार की नाही ? भौगोलिकदृष्ट्या औरंगाबाद हे मध्यवर्ती असताना देखील राष्ट्रीय स्तरावरचे एकही कार्यालय औरंगाबादसारख्या ठिकाणी नसावे हे औरंगाबादचे दुर्दैव समजावे. स्पोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडियाची शाखा प्रत्येक विभागाला आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.......

मध्यंतरी औरंगाबादच्या स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या शाखेसाठी 200 एकर जागा माझे सहकारी मित्र सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण व अन्य लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करुन मिळवून दिलेली आहे. औरंगाबादच्या स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या शाखेची मागणी असताना औरंगाबादचा विचार करावयास हवा होता. तसा न करता नागपूरच्या स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडियाची शाखा अपग्रेड करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. औरंगाबादच्या स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या शाखेचा दर्जा वाढवायचा आहे. परंतु, केवळ नागपूर शाखेचा दर्जा वाढविण्याचे काम होत आहे. औरंगाबादच्या शाखेचा विचार केला जात नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी एक मुद्दा मला अतिशय दु:खाने नमूद करावयाचा आहे. या सभागृहाचे एक ज्येष्ठ नेते, आमचे मार्गदर्शक, आदरणीय श्री.शिवाजीराव देशमुख यांना मी एरवीही पितृत्युल्यच मानत आलो आहे. मी साधारणपणे माझ्या वडिलांच्या कार्यकाळापासूनच त्यांच्या संपर्कात आलो. त्यांनी वैधानिक विकास मंडळाच्या संदर्भातील मुद्दा या ठिकाणी मांडला आहे. मी यापूर्वीही दोन-तीन वेळा जाणीवपूर्वक हे निदर्शनास आणून दिले आहे की, मराठवाडा वैधानिक विकास मंडळासाठी अध्यक्षांची नेमणूक शासनाने केलेली नाहीऽ. यापूर्वी औरंगाबाद येथे मंत्रिमंडळाची बैठक होत असे. दुर्दैवाने आता ती बैठकही होत नाही. जणू काही मराठवाड्याचा सर्व अनुशेष भरुन निघाला आहे, नवीन काही विचार करण्याची गरज नाही म्हणून मंत्रिमंडळाची बैठकही औरंगाबादला होत नाही. या वैधानिक विकास मंडळासाठी अध्यक्षांची नेमणूक केली नसल्यामुळे त्या वैधानिक विकास मंडळाकडून निधी कसा मागायचा ? त्या ठिकाणी एक आय.ए.एस.दर्जाचे अधिकारी आहेत. ते शासनाचेच अधिकारी आहेत. अध्यक्ष नसल्यामुळे वैधानिक विकास मंडळाच्या अडचणी शासनाला कशा समजणार आहेत ? हा एक प्रकारचा कट आहे की काय, अशा प्रकारची शंका आम्हाला वाटू लागली आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळासाठी अध्यक्षांची नियुक्ती करणार नसाल तर मराठवाड्यातील विविध प्रकल्पांचा अनुशेष, त्यासाठी लागणारा निधी, त्या भागातील अडचणी आपल्यापुढे कोण मांडणार आहे ? त्या ठिकाणी आय.ए.एस.दर्जाचे अधिकारी आहेत. परंतु, त्यांची मराठवाड्याशी कोणतीही बांधिलकी नाही,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मराठवाड्याशी काही देणेघेणेही नाही. उत्तर भारतातील आय.ए.एस. अधिका-यांना

...2...



श्री.अमरसिंह पंडित.......

मराठवाड्याबद्दल काही प्रेम नाही. असे अधिकारी मराठवाड्याच्या अडचणींचे विषय तुमच्यापुढे कसे मांडणार आहेत ? केवळ अध्यक्षांची नेमणूक केली नाही एवढाच प्रश्न नाही तर मराठवाड्याच्या अनुशेषाच्या प्रश्नावर उद्या यदाकदाचित मराठवाड्यातील सर्वसामान्य लोकांनी बंड पुकारले तर नवल वाटण्याचे कारण नाही. आपण बंड कधी करतो ? ब्रिटिश काळात ब्रिटिशांविरुध्द आपण बंड पुकारले होते. कारण, ब्रिटिशांनी आपल्यावर अतोनात अन्याय, अत्याचार केले होते. मराठवाड्यातील शोषित, पीडित जनता हा अन्याय किती काळ सहन करणार आहे ?

सभापती महोदय, विदर्भातील सन्माननीय सदस्यांना सभागृहात बोलत असताना आम्ही पहात आहोत. ज्यावेळी विदर्भात अधिवेशन घेतले जाते त्यावेळी तेथे विदर्भाचे जास्तीत जास्त पश्न मांडावेत, असा आमच्या नेत्यांचा देखील आग्रह होता. विदर्भात अधिवेशन होत आहे, विदर्भातील जनतेला न्याय मिळाला पाहिजे, या दृष्टीने आम्ही देखील विदर्भाचे प्रश्न त्या ठिकणी मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु, मराठवाड्यात साधी मंत्रिमंडळाची बैठक होत नाही, अधिवेशनाचा तर विषयच नाही. आज औरंगाबाद येथे मंत्रिमंडळाची बैठक होणे दुरापास्त झाले आहे. मग मराठवाड्याच्या अडचणी आपण कशा समजून घेणार आहोत ?

सभापती महोदय, वारंवार या सभागृहात मी मराठवाड्याच्या 18 टी.एम.सी.पाण्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करीत आहे. परंतु, त्या मुद्याला सरकारकडून उत्तर मिळालेले नाही. यासाठी कोणाची जमीन घ्यायची गरज नाही, भूसंपादन करण्याची आवश्यकता नाही, नवीन काही करायचे नाही. एक प्रकल्प जास्तीत जास्त दोन ती अडीच कोटी रुपयांमध्ये पूर्ण होणार आहे. त्या ठिकाणी नैसर्गिक साईट आहे. गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यातील 22 टी.एम.सी.पाण्यामधील 18 टी.एम.सी.पाण्यासाठी आम्ही वारंवार पाठपुरावा करीत आहोत. परंतु, वेगवेगळी कारणे पुढे केली जातात. कदाचित या सरकारला पोलिटिकल लायबिलिटी घ्यायची इच्छा नाही. त्यामुळे या प्रस्तावाकउे जाणुनबुजून डोळेझाक केली जात आहे. राज्यपाल महोदयांची भीती दाखविली जात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आहे आणि प्रस्ताव तसाच प्रलंबित ठेवला जात आहे. या संदर्भात शासन काही विचार करणार आहे की नाही ?

..3....



श्री.अमरसिंह पंडित.......

सभापती महोदय, हे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. परंतु, दुर्दैवाने मराठवाड्यातील प्रकल्पांना निधी मिळालेला नाही. जो काही निधी मिळालेला आहे तो फक्त विदर्भाला आणि उत्तर महाराष्ट्रातील एक-दोन प्रकल्पांना मिळालेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील काही प्रकल्पांना निधी मिळाला असेल तर त्यात नवल वाटण्यासारखे काही नाही. परंतु, मराठवाड्याच्या प्रकल्पांना निधी दिलेला नाही.

सभापती महोदय, माननीय जलसंपदा मंत्री श्री.गिरीश महाजन हे तरुण मंत्री आहेत, कणखर आहेत. त्यांच्याकडून आमच्या काही अपेक्षा आहेत. मराठवाड्याच्या संदर्भात काही वेगळा विचार ते करणार आहेत का ?

सभापती महोदय, टाटा रिसर्च इन्स्टिट्यूटने एक अहवाल प्रसिध्द केला आहे. त्यामध्ये त्यांनी मराठवाड्याच्या दरडोई उत्पन्नाचा उल्लेख केला आहे. मराठवाड्यातील 50 टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्येचे दरडोई उत्पन्न 40 ते 45 हजार रुपयांपेक्षा अधिक नाही. मराठवाड्यातील जमीन नापीक होत चालली आहे. त्या ठिकाणी साधनसुविधांचा अभाव असल्यामुळे भलेही कष्ट करुन पैसे मिळवीत असतील पण शेतीत पैसे गुंतविण्याची कोणाची मानसिकता नाही. शेतीत पैसे घातले तर कोरड्या आडात ढकलून दिल्यासारखे होईल, पदरात काही पडणार नाही, आपल्याकडे असलेला पैसा तसाच ठेवा, असा विचार तेथील लोक करीत आहेत. ही जी उदासिनता आज तेथील शेतकऱ्यांमध्ये आहे, ती दूर करण्याच्या हेतूने प्रामाणिकपणे प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती पाहिजे.

सभापती महोदय, आपल्याला काय दिले नाही या मराठवाड्याने ? विरोधातील दोन खासदार दिले. विधानसभेचीही त्यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही. त्या ठिकाणी नेतृत्त्वाचा अभाव

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आहे, नेतृत्त्व कमी पडत आहे की, काही जुना राग आहे. तो राग जाणुनबुजून उफाळून येतो आहे की काय, अशी शंका आहे. मी जाणुनबुजून सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांचे नाव घेतो. त्यांनी समोरच्या बाकावरील नेत्यांना खाजगीत विचारावे की, तुमचा काय राग आहे, ते

...4....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.......

आपल्याला खुलासा करतील. परंतु, आपण हे खाजगीत विचारले पाहिजे. कदाचित तोच राग असल्यामुळे जाणुनबुजून मराठवाड्यातील शेतकऱ्यांवर, सर्वसामान्य लोकांवर जाणीवपूर्वक आपण अन्याय करीत आहात.

सभापती महोदय, मराठवाड्यातील अजिंठा व वेरूळच्या लेण्या हेरिटेज म्हणून युनेस्कोने घोषित केल्या आहेत. आपले आर्किऑलॉजीकल डिपार्टमेंट तेथे काही कामही करीत आहे. या लेण्यांसाठी केवळ 25 कोटी रूपयांचा निधी मंजूर केला जातो. परंतु, अर्थसंकल्पात या लेण्यांचा कोठेही उल्लेख नाही. साधा उल्लेख या लेण्याचा होऊ नये ? व्याघ्र प्रकल्पाचा उल्लेख केला जातो. चंद्रपूर जिल्ह्याचा एक परिच्छेदभर उल्लेख आहे. मला कळले नाही, कशामुळे हा उल्लेख झाला आहे ? चंद्रपूर जिल्ह्याचा उल्लेख पूर्ण परिच्छेदभर आहे. मी त्या सन्माननीय सदस्यांचे नाव घेणार नाही, ते आता मंत्री आहेत. पण विरोधात असताना ते वारंवार केळकर समितीच्या अहवालाची मागणी करीत होते. हा अहवाल कधी टेबल करणार आहात, असा आक्रोश करीत होते. आज चंद्रपूर जिल्ह्यासाठी वन, पर्यावरण विभाग आणि अन्य विभागांचे सर्व नियम शिथिल करून विकासाची नवीन बाराखडी लिहिली जावी, असा उल्लेख केळकर समितीमध्ये आहे. मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद, औरंगाबाद, परभणी, जालना हे मराठवाड्यातील जिल्हे चंद्रपूर पेक्षा पुढारलेले आहेत, असे आपल्याला वाटले का ? कशाकुळे हा अन्याय होत आहे ? याचे एकच कारण आहे आणि ते म्हणजे राजकीय ईच्छाशक्ती नाही.

सभापती महोदय, या सभागृहात, या सरकारच्या काळात कधीही मराठवाड्यावर विस्तृत चर्चा झालेली नाही आणि मराठवाड्यासाठी आम्ही असे केले आहे, असे करणार आहोत, असेही विद्यमान सरकारकडून कधी सांगितले गेलेले नाही.

सभापती महोदय, आज मला एक संसदीय आयुध कशासाठी वापरावे लागले, याची आपल्याला कल्पना आहे का ? संजय गांधी श्रावणबाळ योजनेचे 600 रूपये वेळेवर मराठवाड्याला द्या, यासाठी हे आयुध मला वापरावे लागले. आमच्या जगण्यावर थू, फास घेऊन मरावे आम्ही, असे आम्हाला वाटत आहे. क्षुल्लक निधीसाठी आम्हाला संसदीय आयुध वापरावे लागत आहे.

...5....



श्री.अमरसिंह पंडित.......

600 रूपये वेळेवर पाठवा, एक तारखेच्या आत पाठवा, यासाठी आम्हाला या सभागृहात भांडावे लागत आहे, यापेक्षा आमचे दुसरे दुर्दैव नाही. तेथील लोक प्रत्येक एक तारखेला सकाळी सहा, साडेसहाला उठतात, तालुक्याच्या गावी जातात, बँकांपुढे रांगा लावतात आणि परत येतात, अशी फरफट त्या निराधार लोकांची आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

हे लोक राष्ट्रीयकृत बॅंकेतून पैसा काढण्यासाठी फरपटत जातात. म्हातारे मायबाप, बायाबापड्या बॅंकेत लाईन लावतात. आज तरी पैसे वेळेवर मिळावे म्हणून हे लोक लाईन लावतात. त्यांचा नंबर आला की, बॅंकेचे अधिकारी सांगतात की, तुमचे पैसे आले नाहीत. सभापती महोदय ही अत्यंत लाजिरवानी व लाच्छनास्पद गोष्ट आहे. संजय गांधी व श्रावण बाळ योजनेचे डिसेंबर 2014 पासूनचे अनुदान मिळालेले नाही. माननीय राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे यांनी सकाळी प्रश्नोत्तराच्या तासात उत्तर देताना सांगितले की, 600 रूपयांचे अनुदान एक तारखेला संबंधितांच्या खात्यावर जमा करण्यात येईल. या लोकांना कोणीही विचारणारे नाहीत. यांच्याकडे कोणीच लक्ष देणार नाही. अशा छोट्या गोष्टीसाठी सभागृहात आयुध वापरण्याची वेळ येत असेल तर ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मराठवाड्यातील रस्ते व तेथील शेतकऱ्यांच्या आत्महत्या यासंदर्भात विचार केलेला नाही. मराठवाड्यात एक दोन आत्महत्या होत नाहीत. मराठवाड्यात 540 आत्महत्या झाल्या आहेत. आमच्यासारख्या लोकप्रतिनिधीला शरम वाटते की, आम्ही मराठवाड्यातील जनतेचे प्रतिनिधित्व करतो. ज्या मराठवाड्यात आम्ही राहतो तेथील लोक आज संसार, लेकराबाळांना, बायाबापड्यांना, मायबापाला सोडून आत्महत्या करीत आहेत. मृत्यूला कवटाळण्याचे काय कारण आहे, त्यांना मरणाची हौस आहे काय ? कोणी पायाला विजेचा करंट देतो. कोणी चालत्या सरणात उडी मारतो, कोणी स्वत:चे सरण रचून त्यात उडी मारुन जीव देतो.

सभापती महोदय, परवा सकाळ वर्तमानपत्र मी उस्मानाबाद येथील फोटो पाहत होतो. विहिरीकडे पाहून 27 ते 28 वर्षाचा पोरगा रडत होता. मोठ्या हौसेने त्यांनी विहिर खोदली व बांधली होती. गेल्या दोन वर्षापासून ही विहिर कोरडी होती. मोटारीच्या पाण्याचा पाईप होता त्याला त्यानी दोरखंड बांधला व गळ्याला फास लावून विहीरीत उडी घेतली होती. त्या दोरखंडाला त्याचे प्रेत लटकत होते. ही बाब अतिशय गंभीर आहे.

सभापती महोदय, खालच्या सभागृहात मंत्री महोदयांनी सांगितले की, केळकर समितीच्या अहवालावर चर्चा होत असताना या चर्चेचे उत्तर होणार नाही. सन्माननीय सदस्यांनी सूचविलेला शिफारशी आम्ही घेऊ त्यावर सरकार विचार करणार. असे खरोखर होणार असेल तर या

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

सरकारकडून आम्ही नवीन काय अपेक्षा करावी. मराठवाड्यात मोठी इंडस्ट्री उभारावी अशी आम्ही मागणी करीत नाही. त्या भागात एक एकर ऊस लावण्यासाठी जवळपास 13 हजार रुपयांचा खर्च येतो. तीन हजार रुपये टनाप्रमाने ऊसाचे बेन मिळते. यासाठी तीन टन बेन लागते. यासाठी जवळपास 19 हजार रुपयांचा खर्च येतो. मी विनंती केल्याप्रमाणे यदाकदाचित त्या बॅरेजमधून पाणी सुटले नाही तर एक वर्ष ऊस लागवडीसाठी नांगरुन काढणे आम्हाला परवडणार नाही. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे शेतीसाठी पाणी मागण्याचा आम्हाला अधिकार नाही. आमचे अवलंबित्व इतके होत चालले आहे की, आमचे शेतकरी वाट पाहतात की आमच्या लेकराबाळांच्या शिक्षणासाठी सरकारकडून कोणते तरी अनुदान यावे. यामध्ये गारपीट, लाल्या, पिवळया किंवा डाळिंबाचे काही तरी अनुदान येईल व आमच्या लेकरा बाळाचे शिक्षण होईल. या अनुदानाची वाट पाहत असताना आमच्या संसाराची राखरांगोळी होत असताना हे सरकार मराठवाड्याच्या जनतेकडे डोळेझाक करणार असेल तर हे सरकार ज्या गतीने वर गेले, त्याच गतीने खाली येईल, परंतु ते तुम्हाला दिसणार नाही. जी गत आमची झाली, आमचा ग्राफ ,खाली येताना आम्हाला कळला नाही. तीच परिस्थिती तुमची झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, डॉ.केळकर समितीच्या अहवालाच्या संदर्भात नम्रपणे मी सरकारला विनंती करतो की, यासंदर्भात उत्तर होणार नसेल तरी देखील मराठवाड्याच्या संदर्भात नव्याने विचार करीत असताना सिंचन, दळणवळण व इतर बाबीं संदर्भात मराठवाड्यातील तुलनात्मक तक्ता मी शासनाकडे दिलेला आहे. आम्हाला दुसरे काही न देता स्कील डेव्हलपमेंट, इन्फ्रास्ट्रक्चरसाठी अपग्रेडेशन द्यावे. मराठवाडयातील औरंगाबाद व इतर सर्व जिल्ह्याचा विचार आपण केला तर स्थलांतरित होणारा मजूर, तरुण वर्ग नाऊमेद होणार नाही. आज तेथील तरुणशेती करीत होता. तो शेती करता करता इतका नाऊमेद झाला आणि तो ढाब्याकडे वळला तर ढाब्याकडून पुन्हा शेताकडे जाणे अतिशय अशक्य कोटीतील गोष्ट होईल. हे पाप या सरकारच्या माथ्यावर फोडले जाईल. मराठवाड्याच्या संदर्भात निर्णय घेताना या सर्व मुद्यांच्या संदर्भात आपण जरुर योग्य तो विचार करावा अशी मी सरकारकडे आग्रहाची विनंती करतो व मला भाषण करण्याची संधी दिली त्याबाबत मी आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, केळकर समितीने 571 पाणी अहवाल सादर केला आहे. अनेक वर्षापासून आपण अनुशेषासंदर्भात चर्चा करतो. ॲडव्होकेट जनरल यांना काही वर्षापूर्वी सभागृहात पाचारण केले होते. यापूर्वी शेतकरी आत्महत्येच्या प्रश्नाबाबत अनेक समित्या नियुक्त केल्या होत्या. डॉ. विजय केळकर समितीच्या अहवालावर सविस्तर चर्चा करु असे नागपूर येथील अधिवेशनात राज्य सरकारने आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे दोन्ही सभागृहात सरकारने सर्व सदस्यांनी मते मांडण्यासाठी संधी उपलब्ध करुन दिली त्याबाबत मी सरकारचे आभार मानते. केळकर समितीचा अहवाल 571 पानांचा आहे. त्याचा अभ्यास सन्माननीय सदस्यांनी केला असेल. या अहवालाच्या तपशीलात आपण गेलो तर असे स्पष्ट दिसते की, अतिशय सखोल अभ्यास करुन वेगवेगळ्या प्रकारचा दृष्टीकोन ठेऊन केळकर समितीने हा अहवाल सादर केलेला आहे.

सभापती महोदय, सुरुवातीला त्यांनी नमूद केले आहे की, समितीच्या सदस्यांनी जे काम केले त्यामध्ये अनेक लोकांची मते एकून घेतली आहेत. अनेक विभागात बैठका घेतल्या आहेत. अनेक विषयांवरील अहवाल आपण पाहतो. संपूर्ण संकलन, कार्यपध्दती पाहिल्यावर मला असे वाटते की, त्यातील काही निष्कार्षाबाबत सर्वाचे एकमत नसेल तरी त्यांनी अनेक मर्मावर बोट ठेवले आहे. त्या सर्व बाबी टाकावू आहे असे म्हणता येणार नाही. इंग्रजीमध्ये अशी म्हण आहे की, "Don't throw away baby with the bath water." लहान मुल जन्मते तेव्हा त्याला आंघोळ घालून ते पाणी टाकून देतो, काही वेळा त्या पाण्याबरोबर त्या बालकाला फेकले जाते काय ? असे मला वाटते, केळकर अहवालाबाबत राजकीय अभिनिवेश न ठेवता त्यांनी स्वत: असे नमूद केले आहे की, कोणती जलद उपाययोजना करायला पाहिजे. राजकीय इच्छाशक्ती, सामाजिक व राजकीय विचारांचे एकमताने जेव्हा प्रयत्न केले जातात, त्यावेळी मनुष्यबळाचा वापर होतो हे त्यावरील उत्तर आहे. आतापर्यंत मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रातून अनेक मंत्री महोदयांनी या राज्याचे नेतृत्व केले आहे. या राज्याला अनेक भागातून मुख्यमंत्री मिळाले आहेत. मराठवाड्यातील दोन थोर नेत्यांपैकी स्व.विलासराव देशमुख व श्री.अशोक चव्हाण यांच्या राजकीय भूमिकेबाबत आपले मतभेद असू शकतात. मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात राज्याला नेतृत्व मिळाले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

होते. विदर्भातून नेतृत्वाची संधी तेथील जनतेला वेळोवेळी मिळाली होती. या सरकारमध्ये स्वत: मुख्यमंत्री महोदय विदर्भाचे आहेत. उत्तर महाराष्ट्रातून माननीय मंत्री श्री.गिरीश महाजन आहेत. अनेक मंत्री महोदय विदर्भातील आहेत. उत्तर महाराष्ट्रातील आहेत, कोकणातून स्वत: राज्यमंत्री आहेत. राजकीय इच्छाशक्ती सिध्द करण्याच्या दृष्टीकोनातून जनतेने जो विश्वास आपल्यावर टाकला त्याला खऱ्या अर्थाने सामारे जाण्याच्या दृष्टीकोनातून केळकर समितीच्या शिफारशीवर तपशीलवार चर्चा झाली पाहिजे. या शिफारशींना आम्ही का टाकावू म्हणत आहोत. यासंदर्भातील काही उदाहरणे मी येथे देणार आहे. त्यांनी ज्या शिफारशी केल्या, त्याबाबत मला खरोखर समाधान वाटते. यामध्ये महत्वाची शिफारस जलखोऱ्यांच्या आधारावर पाण्याचे व्यवस्थापन करावे. याचा उपयोग राष्ट्रीय जलधोरण आराखड्यात होईल. महाराष्ट्र जलनियामक प्राधिकरणाने धोरण पत्रिका तयार करताना कशा पध्दतीने जलनिती आखाणार आहात. याबाबत प्राधिकरण असले तरी अनेक वेळा प्रचंड संघर्ष वेगवेगळ्या खोऱ्यामध्ये होत आहेत. या दृष्टीकोनातून धोरण तयार करावे असे त्यांनी सूचविले आहे. 73 व 74 व्या घटना दुरूस्तीचे पालन आपण करायला पाहिजे.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 4.6.26 मध्ये केंद्रीय वित्त आयोगाप्रमाणे राज्य वित्त आयोग स्थापन करण्यात यावा ही सूचना महत्वाची आहे, याबाबत राज्य सरकारने विचार केला पाहिजे, राज्य वित्त आयोगाची सूचना त्यांनी केली आहे. त्यासाठी कोणाचा विरोध आहे, तो विरोध का आहे हे आपणाला कळले पाहिजे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे........

त्यासाठी कोणाचा विरोध असेल तर त्यांचा विरोध का आहे, हे देखील कळले पाहिजे. त्यांनी तिसरी सूचना केलेली आहे. मला असे वाटते की, त्यावर चर्चा होऊ शकते, मतभेद होऊ शकतात. परंतु, ती सूचना विचार करण्यासारखी आहे. त्यांनी अशी सूचना केलेली आहे की, महापौर थेट निवडून आले असतील तर त्या त्या शहरांच्या विकासासाठी अधिक चालना मिळू शकेल.

सभापती महोदय, केळकर समितीच्या अहवालात त्यांनी वेगवेगळी प्रकरणे दिलेली आहेत. त्या प्रकरणांवर नजर टाकली तर त्यांनी किती अभ्यास केलेला आहे हे स्पष्ट होते. प्रादेशिक विकास, समतोल प्रादेशिक विकासाकडे, विकासाची गती वाढविण्यासाठी प्रादेशिक ध्येयधोरणे, सुशासन, आदिवासी क्षेत्रांची वचनपूर्ती, नवीन शेती पद्धती, औद्योगिकीकरण, जलसंपत्तीचा विकास, आरोग्य, शिक्षणाच्या हक्कापलीकडे आणि संपर्क जाळे विसृत करणे अशा अनेक प्रकरणांमध्ये त्यांनी त्याबाबत ऊहापोह केलेला आहे. त्यांनी 8 प्रारंभिक उपाययोजना सूचविलेल्या आहेत. त्यामध्ये असे म्हटलेले की, मालगुजारी तलावांचे वर्गीकरण करणे, अवघड भूप्रदेश क्षेत्रासह पाण्यासाठी अभाव असलेल्या क्षेत्रांसाठी विशेष तरतूद करणे तसेच, जायकवाडी पाण्याशी संबंधित जलाशयांच्या हक्काबाबतचे वाद मिटविणे. या संदर्भात अनेक वेळा मोठा संघर्ष झालेला आहे. त्यांनी त्या संदर्भात सूचना केलेली आहे. तसेच, प्रादेशिक शासन रचनेची स्वीकृती, निर्णय व घोषणा, हरित बोनस व खनिज यासारखे स्वामित्व धन यांना निर्बंध घालणे, चंद्रपूरचे पुर्नस्थापन, मराठवाड्यासाठी सौर ऊर्जेचा प्रारंभ आणि न करता येणाऱ्या संकोशामध्ये येणाऱ्या वनांशी पाटबंधारे प्रकल्प संबंधीत सध्याचे निव्वळ मूल्य विचारात घेणे.

सभापती महोदय, त्यांनी पर्यटनाच्या संदर्भात देखील अतिशय महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. परंतु, त्या सूचनांची अनेक वर्षे अंमलबजावणी झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. विकासाचा घटक कोणता असावा, या संदर्भात अनेक वादविवाद झालेले आहेत. विकासाचा घटक तालुका मानला गेला तर मराठवाडा किंवा विदर्भ या विभागावर अन्याय होतो, हा एक मोठा वादविवाद आहे. आपल्याला दुसरीकडे असेही चित्र दिसते की, जिल्ह्यांसाठी विशेषतः सांगली किंवा इतर काही जिल्ह्यांसाठी आलेला निधी सर्व तालुक्यांना समन्यायी पद्धतीने मिळालेला आहे

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे........

काय ? जरी शंभर टक्के समन्यायी वाटप करता आले नाही तरी काही तालुके वर्षानुवर्षे योजनांपासून वंचित राहिले आहेत. त्या तालुक्यांपर्यंत पाणी पोहोचलेच नाही. त्यामुळे तेथील जनतेवर स्थलांतराची वेळ आली. म्हणून राजकीय इच्छाशक्ती योग्य आहे किंवा नाही, ती तपासण्याची माध्यमे कोणती, यंत्रणा कोणती, असा प्रश्न निर्माण होतो. आपल्याला असे वाटत असेल की, विकासाचा घटक तालुका नसावा. शेवटी, राज्य शासनाला त्या संदर्भात अधिकार आहेत. विधान सभा आणि विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल की, विकासाचा घटक जिल्हाच असला पाहिजे. मग आता पर्यंत जिल्ह्यांसाठी जो विकास निधी दिला गेला त्याचे योग्य पद्धतीने वाटप झाले किंवा नाही, असा प्रश्न निर्माण होतो. आपल्याला याचे देखील सातत्याने पुनर्विलोकन करावे लागणार आहे.

सभापती महोदय, केळकर समितीच्या अहवालातील पृष्ठ क्र.187 वर 6.6.1 मध्ये सूचना केलेली आहे आणि ती अतिशय महत्वाची आहे, असे मला वाटते. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "विदर्भ व मराठवाडा या प्रदेशांचा नियोजनबद्ध विकास साध्य करण्याच्या दृष्टीने सध्या स्थापन केलेली वैधानिक विकास मंडळे, ही समुचित यंत्रणा असल्याचे दिसून येत नाही." त्यांनी अतिशय गंभीर स्वरुपाचे निरक्षण केलेले आहे. दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी सातत्याने वैधानिक विकास महामंडळाकडील निधी का अखर्चित राहिला, असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या संदर्भात आंदोलने करुन किंवा माननीय राज्यपालांना भेटून सूचना करण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, त्यांनी राजकीय इच्छाशक्ती व्यक्त करण्याच्या दृष्टीकोनातून अहवालातील पृष्ठ क्र.192 वर एक तक्ता दिलेला आहे आणि तो खूप महत्वाचा आहे. त्या तक्त्यामध्ये नागपूर येथील हिवाळी अधवेशनाच्या कालावधीचे दिवस नमूद केलेले आहेत. आपण या संदर्भात अनेक वेळा बोलतो. नागपूर येथे किती कमी कालावधीसाठी अधिवेशने झालेली आहेत, हे त्या तक्त्यावरुन स्पष्टपणे दिसते. मी स्वत: मुंबई येथे राहते. आम्ही मुंबई येथून अधिवेशनासाठी नागपूर येथे येतो. आपण अधिवेशनाचा कालावधी वाढविण्यासंदर्भात अनेक वेळा मागणी केलेली

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे........

आहे. शिवसेना पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सातत्याने नागपूर अधिवेशन गुंडाळू नका, नागपूर अधिवेशनाचा कालावधी जास्त असला पाहिजे, अशी मागणी केलेली आहे. मी डिसेंबर महिन्यात नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सूचना केली होती की, पुणे येथे अनेक संचालनालये आहेत. त्यातील काही संचालनालये नागपूर येथे हलविली तर ते योग्य होईल. त्यांनी असेही नमूद केलेले आहे की, नागपूर कराराची अंमलबजावणी ज्या प्रमाणे व्हावयास पाहिजे होती ती झालेली नाही. त्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यामध्ये निधीचे वाटप कशा प्रकारे करावयाचे हा एक राजकीय इच्छाशक्तीशी संबंधित प्रश्न आहे. संयुक्त महाराष्ट्र असावा अशी भूमिका माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी सातत्याने मांडलेली आहे. आता महाराष्ट्रातील सत्ता विदर्भातून निवडून आलेल्या मुख्यमंत्री महोदयांकडे आहे. तसेच, विदर्भातील अनेक लोकप्रतिनिधी केंद्रात आहेत. पुढील 10 वर्षाच्या काळात चांगल्या प्रकारे राजकीय इच्छाशक्ती व्यक्त करुन विदर्भ, मराठवाडा आणि जो अनुशेषग्रस्त भाग आहे त्यांच्या विकासासाठी ही एक चांगली संधी आहे असे म्हणून या समितीच्या संदर्भात जे मतभेद आहेत ते दुरुस्त केले पाहिजेत आणि या संदर्भात काम केले पाहिजे.

सभापती महोदय, वन हक्कांचा देखील मोठा प्रश्न आहे. विशेषत: जो पेसा कायदा झाला त्या नुसार आदिवासी भागातील जनतेला, ग्रामसभांना अधिकार मिळालेले आहेत. तेथील उत्पादने त्यांना उपजीविकेसाठी वापरता येणार आहेत, या संदर्भात देखील त्यांनी मत व्यक्त केलेले आहे. त्यांनी सांगितले आहे की, आपण त्यांचे सक्षमिकरण करण्याचा प्रयत्न केला. परंतु सक्षमिकरण कोणाचे केले की, ज्यांना स्वत:ला त्या अधिकारांची पुरेशी माहिती नाही आणि म्हणून सन 2006 चा आदिवासींच्या संदर्भातील जो पेसा कायदा आहे त्यासाठी आपल्याला स्थानिक अधिकार आणि शासकीय सहाय्याची गरज आहे. मी सांगू इच्छिते की, काल माननीय सभापतींनी माननीय ग्रामविकास मंत्री, माननीय आदिवासी विकास मंत्री यांच्या समवेत बैठक आयोजित केली होती. आदिवासींना अधिकार मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करावयाची, या मुद्यावर त्या बैठकीत चर्चा झाली.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे........

सभापती महोदय, शेती सुधारणा या संदर्भात केळकर समितीने शासनाला 35 शिफारशी केलेल्या आहेत. मी वेळे अभावी त्या शिफारशी वाचून दाखविणार नाही. परंतु, माझी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या शिफारशींमध्ये काय चुकीचे आहे ? त्या शिफरशींमध्ये प्रत्येक ठिकाणी विदर्भाबरोबर मराठवाडा आणि मागास क्षेत्राचा उल्लेख केलेला आहे. केळकर समिती कोणत्या शासनाने नियुक्त केली हा प्रश्न नाही. परंतु, पुढील काळात आपल्याला राज्याचा विकास करावयाचा असेल तर आपल्याकडे ज्ञानाच्या संदर्भातील एक दस्तावेज उपलब्ध आहे. त्यातील काही शिफारशी किंवा काही दृष्टीकोन आपण नाकरु शकतो. परंतु, ते नाकरत असतानाच आपण त्यांनी केलेली निरीक्षणे गांभीर्याने समजून घेऊ शकतो आणि त्यावर चर्चा करु शकतो.

सभापती महोदय, जलसंपत्तीचे नियमन करण्याच्या संदर्भात तिन्ही प्रदेशांमध्ये पाण्याच्या कमतरतेच्या व्याख्येबद्दल, निधीच्या संदर्भात केळकर समितीने नाराजी व्यक्त केलेली आहे. आमचे समाधान झालेले नाही, कशा पद्धतीने निधीचे वाटप झालेले आहे आणि पुढील 8 वर्षात आपण कशा प्रकारे निधीचे वाटप करणार आहोत यासाठी एक लाँगटर्म ॲरेजमेंट केली पाहिजे, असे त्यांनी सूचविलेले आहे.

सभापती महोदय, मी सांगू इच्छिते की, मुला-मुलींचा जन्मदर या संदर्भात देखील त्यांनी निरीक्षणे नोंदविलेली आहेत. आपण राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात ते मांडत असतो. मी असे मानते की, आर्थिक विकास आणि सामाजिक विकास एकत्रच होत असतो. त्यांनी असे नमूद केलेले आहे की, मराठवाडा व पुणे विभागातील सर्व जिल्ह्यातील मुला-मुलींचे गुणोत्तर प्रमाण 900 पेक्षा कमी आहे आणि नागपूर व कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये मुंबई वगळता मुला-मुलींचे गुणोत्तर प्रमाण 900 पेक्षा अधिक आहे. नाशिक आणि अमरावती विभागात त्याचे कमी अधिक स्वरुप दिसून येते. मृत्यू संख्येच्या संदर्भात देखील त्यांनी चांगल्या प्रकारे निरीक्षणे नोंदविलेली आहेत. म्हणून मला असे वाटते की, जे भाग अनुशेषग्रस्त आहेत त्यांच्यासाठी चांगल्या प्रकारची अंमलबजावणी होत नाही. प्रा.बी.टी.देशमुख, माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी साहेब या

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे........

सभागृहाचे सदस्य होते. माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते साहेब तसेच, माजी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेब, माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी साहेब आपण अनेक वेळा माननीय राज्यपालांकडे गेलेलो आहोत. आता शिवसेना, भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आलेले आहे. अनुशेषाच्या संदर्भात ज्या त्रुटी आहेत त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची शक्ती आपल्या हातामध्ये आहे. म्हणून केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या राजकीय इच्छाशक्तीतून केळकर समितीच्या अहवालातील शिफारशी किंवा तो अहवाल पूर्णतः फेटाळणे किंवा त्या अहवालाच्या संदर्भात पूर्णपणे नकारात्मक भूमिका ठेवण्यापेक्षा त्यांनी जो अभ्यास केलेला आहे त्याचा फायदा करून घेऊन त्या शिफारशींमधून शेतीच्या संदर्भात, जलसंपत्ती नियमन प्राधिकर स्थापन करण्याच्या संदर्भात, राज्य वित्त आयोग स्थापन करण्याच्या संदर्भात त्यांच्या ज्या सकारात्मक शिफारशी आहेत त्याबद्दल आपण जरूर विचार केला पाहिजे.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे......

हे करीत असताना मात्र महाराष्ट्र हा संयुक्त राहिला पाहिजे, एकत्रित राहिला पाहिजे. केवळ ताकाला जाऊन भांडे लपवितो म्हणतात तशा पध्दतीने वेगळे राज्य करण्यासाठी म्हणून केळकर समितीच्या अहवालाचा राजकीय वापर केला जाऊ नये. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भ या प्रदेशाबद्दल आमची भूमिका स्वच्छ आहे. धन्यवाद, जय महाराष्ट्र.

--------------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, केळकर समितीच्या अहवालावर सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. राज्य शासन या अहवालाबाबत बिलकूल गंभीर नाही हे स्पष्ट होते. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये हा अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आला. त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, या अहवालासंबंधी माननीय सदस्यांनी आपली मते मांडावीत, त्यानंतर मंत्रिमंडळाची उप समिती नेमून शासन ॲक्शन टेकन रिपोर्ट तयार करणार आहे. ही कोणती संसदीय पध्दत आहे? सरकारने जर या अहवालाबाबत आपले म्हणणे मांडले नाही तर माननीय सदस्य त्याबाबत काय मत मांडणार? सरकार काय करणार आहे हे माननीय सदस्यांना अजिबात माहित नाही. शासनाने या अहवालासंबंधी एटीआर दिला नाही. तीन महिन्याच्या काळात आम्हाला असे एक तरी उदाहरण दाखवावे. मंत्री महोदयांनी लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन केळकर समितीच्या अहवालातील शिफारशीसंबंधी काय करावे लागेल याबाबत पाहणी केली आहे का? दोन्ही सभागृहातील सदस्यांना एकत्र घेऊन केळकर समितीच्या अहवालात कोणत्या गोष्टी अनुकूल, प्रतिकूल आहेत, आपल्या भागाचा काय विकास करायचा आहे, याबाबत चर्चा करण्याची भूमिका शासनाने घेतली आहे काय?

सभापती महोदय, अर्थमंत्री, जलसंपदा मंत्री किंवा परिवहन मंत्री यांनी मागील तीन महिन्यांच्या काळात या अहवालाच्या अनुषंगाने काय करावे लागेल याबाबत लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन चर्चा केलेली नाही. एकूण 571 पृष्ठांचा हा अहवाल तांत्रिक आहे. या अहवालाबाबत शासनाने आम्हाला पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन करणे अपेक्षित होते. या सभागृहाची अशी पध्दत आहे की, अशा प्रकारच्या गोष्टीबाबत मध्यवर्ती सभागृहात पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे माननीय सदस्यांना माहिती दिली जाते. केवळ अहवाल समोर फेकायचा, तुम्ही तुमचे बघा म्हणून सांगायचे आणि शासन म्हणून आमची काही जबाबदारी नाही असे वागायचे हे बरोबर नाही. या अहवालाबाबत पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे माहिती दिली पाहिजे. संसदीय कार्यमंत्र्यांनी याबाबत दखल घेतलेली नाही. यामध्ये सरकारचे काहीतरी काळेबेरे आहे की काय अशी शंका आल्याशिवाय रहात नाही.

सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाड्याला घटनेच्या कलम 371 अन्वये जो हक्क देण्यात आला आहे त्याबाबत कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही, ही आमची भावना आहे. या अहवालातील पृष्ठ क्रमांक-5 वर जे निष्कर्ष देण्यात आले आहेत त्यात म्हटले आहे की, "इतर

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

5 क्षेत्रीय फलनिष्पत्ती निर्देशांकावरुन गणना केली असता तीन प्रदेशांतील प्रमाणानुसार विकास तूट ही, विदर्भ 39 टक्के, मराठवाडा 37 टक्के आणि उर्वरित महाराष्ट्र 24 टक्के अशी होती." म्हणजे माननीय सदस्य श्री.शिवाजीराव देशमुख म्हणाले ते बरोबर आहे. महाराष्ट्रातील काही जिल्हे दुष्काळग्रस्त असताना सुध्दा मराठवाडा आणि विदर्भामध्ये जवळपास 40 टक्के तूट आहे असे म्हटले आहे ही साधी गोष्ट नाही. आम्ही ते सहन करतो, आमची उदारता आहे. विकासाच्या तुटीच्या संदर्भात असे म्हटले जाते ते योग्य नाही.

सभापती महोदय, केळकर समितीने विदर्भ आणि मराठवाड्यात विकास तूट आहे हे निर्विवाद मान्य केले आहे. दांडेकर समितीच्या अहवालाबाबत या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. दांडेकर समिती म्हणजे प्रमाण मानले गेले आणि तो अनुशेष आमच्या मनातून जात नाही. दांडेकर समिती ऑगस्ट, 1983 मध्ये स्थापन झाली होती. दोन वर्षानंतर त्या समितीने अहवाल सादर केला होता. या समितीचे असे मत होते की, समतोल साधण्यासाठी 65 ते 70 वर्षांचा कालावधी गृहित धरावा लागेल. म्हणजे 2053 साली आम्ही राज्यातील सर्व भागांमध्ये समतोल निर्माण करु शकतो. केळकर समितीचे मत आहे की, हा अनुशेष समान पातळीवर आणण्यासाठी आम्हाला 13 वर्षे लागतील. तुम्हाला 13 वर्षे पाहिजेत की 2053 साल हवे आहे, केळकर समितीचा अहवाल फेटाळायचा का? तुमच्या भूमिकेशी आम्ही सहमत आहोत. मराठवाडा आणि विदर्भाच्या भावनेशी सहमत आहोत. याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे.

श्री.राजेंद्र मुळक : आम्ही तालुका घटक अजिबात खपवून घेणार नाही.

श्री.शरद रणपिसे : आम्ही तुमच्या भावनांशी सहमत आहोत. 13 वर्षांनी जल क्षेत्राबाबत समानता आणण्याचा प्रयत्न करु. दांडेकर समितीने काय केले? सरकारकडे जो प्लॅन एक्स्पेंडिचर निधी उपलब्ध होता त्याचा अनुशेष काढला. 1983 ते 2015 या दरम्यानच्या काळात ज्या घटना घडल्या त्यांचा विचार केला पाहिजे. या काळात गॅट करार झाला, जग बदलले. आज संपूर्ण जग बाजारपेठ झाली आहे. आज आपल्या बाजारामध्ये काश्मीरची सफरचंदे मिळत नाहीत. कॅलिफोर्निया, साऊथ आफ्रिकेची सफरचंदे आपल्या बाजारामध्ये विक्रीसाठी येतात. आज विषय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असा चर्चेला आला की, Dandekar committee has gone beyond its scope. दांडेकर समिती कार्यरत होती तेव्हा गॅट करार झालेला नव्हता. जागतिकीकरणाचे वारे नव्हते. आता

...4...



श्री.शरद रणपिसे....

सन्माननीय मुख्यमंत्री परकीय गुंतवणूक राज्यात यावी म्हणून परदेशात जातात. मग केळकर समितीने परकीय गुंतवणुकीचा विचार करायचा नाही, केंद्र शासनाच्या हिश्श्याचा विचार करायचा नाही? तुमचे आमचे असा वाद न करता आज आपल्या राज्यातून विक्रीकर, आयकर, एक्साईज विभागाच्या माध्यमातून 12.36 टक्के सेवाकर केंद्र सरकारकडे कर भरला जातो. देशभरातून सगळयात जास्त कर आपल्या राज्यातून वसूल होतो. त्यातील वाटा मागण्याचा आम्हाला अधिकार नाही? केळकर समितीने सांगितले असेल, केंद्र सरकारकडून सुध्दा आम्हाला आमचा हिस्सा मिळाला पाहिजे. तो वाईडर स्कोप कसा झाला तो त्यांचा अधिकार आहे. ते त्यांनी सांगितले आहे. या समितीला या संदर्भात आपण दोष देऊ शकत नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक म्हणाले की, तालुका हा घटक आम्ही ग्राह्य धरणार नाही. केळकर समितीने असे काही सुचविलेले नाही.

नंतर 2 टी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे..

डॉ.केळकर समितीने तालुक्यावर कोणतेही भाष्य केलेले नसून निधीचे वाटप कसे करावे याबद्दल आपले मत मांडले आहे. मेहरबानी करून एक गोष्ट लक्षात घ्यावी की, श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या काळापासून आपण जिल्हा नियोजनाचे तत्त्व मान्य केलेले आहे. श्री.वसंतराव नाईक यांनी 1969 मध्ये जिल्हा हाच पायाभूत घटक असेल असे सांगितले आणि आपण डीपीडीसीची कल्पना आणली. श्री.राजीव गांधी यांनी 74 वी घटना दुरूस्ती केली आणि त्यात जिल्हा परिषदेला आणि पंचायत राज समितीला म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेला महत्त्व दिले. या अहवालामध्ये डॉ.केळकर समितीने कुठेही आम्ही तालुक्याला जातो कुठेही म्हटलेले नाही. यात त्यांनी म्हटले आहे की, पाण्याची गंभीर समस्या असलेले 44 तालुके, भूस्तर प्रतिकूल असलेले 85 तालुके, खारपाणपट्टा, मालगुजारी तलाव अशा गंभीर समस्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण चार क्षेत्रांकरिता नियत वाटप करण्यास प्राधान्य देण्यात यावे. डॉ.केळकर समितीने तालुका हा घटक धरलेलाच नाही. त्यांनी शिफारस केली आहे असे आम्हाला वाटते.

जलक्षेत्रासंबंधातील समस्यांवरील उपाय म्हणून अनुक्रमे 27.3 टक्के, 26.3 टक्के, 38.2 टक्के, 8.2 टक्के तुलनात्मक टक्केवारी नियतवाटपाच्या मर्यादित अवधीमध्ये सतत राखली गेली पाहिजे हे त्यांनी सुचविलेले आहे.

आता आपण दांडेकर समितीच्या शिफारशीकडे जाऊ या. त्यांनी विदर्भ आणि मराठवाड्याला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांची शिफारस अशी आहे की, प्लॅन एक्स्पेंडीचरला जो निधी उपलब्ध होतो त्यामध्ये 8.9 टक्के ट्रायबलचा सब प्लॅन आहे. 10.2 टक्के स्पेशन कंपानंट प्लॅन आहे. हे वगळल्यानंतर 80.9 टक्के रक्कम राहते. या प्लॅन एक्सपेंडीचरला 100 टक्के गृहीत धरले तर त्यातील 70 टक्के खर्च हा सर्वसाधारण क्षेत्रावर करावा. डॉ.केळकर समितीने जलक्षेत्रासंबंधी सर्वात महत्त्वाची सूचना अशी केली आहे की, 30 टक्के निधी हा जल क्षेत्रावर खर्च करावा. त्यात त्यांचे काय चुकले आहे. त्यांनी 70 : 30 चा रेशियो सांगितला आहे. त्यांनी किती मोठी रक्कम जलक्षेत्राला दिली आहे ते पहावे. आपणाला मालगुजारी तलाव करायचा नसेल तर तो करू नका. तो आपल्या मंडळाचा अधिकार आहे. त्यांनी तालुका किंवा अन्य दुसरा असा घटक सांगितलेला नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

70 टक्के रक्कम सर्वसाधारण क्षेत्राला देण्यात येणार आहे.  यासाठी त्यांनी अविभाज्य आणि विभाज्य असे दोन भाग केले आहेत. मी सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, सरकारच्या हातामध्ये खर्च करायला पैसे रहात नाहीत.  एवढे मोठे सहकार्य विदर्भ आणि मराठवाड्याला केलेले आहे. या 70 टक्क्यांमध्ये विभाज्य निधी हा 60 टक्के असून अविभाज्य निधी हा 40 टक्के आहे. प्राथमिक शिक्षण, आरोग्य, इत्यादींवर हा 40 टक्के निधी खर्च करता येऊ शकेल.  हा सगळा निधी विदर्भ व मराठवाड्याच्या विकासासाठी दिलेला आहे. याला देखील काही पॅरामीटर्स असून त्यावर मी अधिक बोलून सभागृहाचा वेळ घेणार नाही.

एकंदरीत जो काही पैसा उपलब्ध होणार आहे तो संबंधित वैधानिक विकास मंडळांसाठी उपलब्ध होणार आहे. त्यात त्यांनी जिल्हा स्तरावर 30 टक्के निधी द्यावा हे अनिवार्य केले आहे. तालुका स्तरावर 30 टक्के निधी द्यावा. या अहवालामध्ये या तालुक्याला, या जिल्ह्याला अमूक एवढा निधी द्यावा असे बंधनच नाही.  उगाचच पश्चिम महाराष्ट्राने काही तरी कारस्थान केले आहे असे सांगितले जात आहे. या अहवालात तालुका हा घटक धरलेलाच नाही.  त्यांच्या स्पष्ट सूचना आहेत की, जिल्हा स्तरासाठी 30 टक्के, ब्लॉक लेव्हला 30 टक्के, निधी द्यावा.  येथे विभागीय स्तर निर्माण होण्याचा प्रश्नच येत नाही. राज्यस्तरीय 40 टक्के निधी द्यावा असे सांगितलेले आहे. त्यामुळे डॉ.केळकर समितीने अतिशय चांगल्या अशा सूचना या अहवालात केल्या आहेत असे मी म्हणेन.

सभापती महोदय, यात मूळ प्रश्न कोणता आहे ?  पूर्वी सगळ्या पक्षांमध्ये लीडरशिप होती. तशी संवेदनशील लीडरशीप आता राहिलेली नाही. नागपूर करार झाल्यानंतर श्री.यशवंतराव चव्हाण यांनी सांगितले की, आम्ही विदर्भ आणि मराठवाड्याला वाऱ्यावर सोडणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित म्हणाले ते बरोबर आहे. नागपूर करार झाल्यामुळे विदर्भातील लोकांनी अटी घातल्या.  मराठवाडा संयुक्त महाराष्ट्रामध्ये बिनबोभाट सामील झाला. मग त्यांना आम्ही फसविणार काय ?  आपण कितीही समित्या नेमाव्यात. मी आपणास सांगू इच्छितो की, श्री.यशवंतराव चव्हाण, श्री.वसंतदादा पाटील  हे दिलेला शब्द पाळत होते. श्री.वसंतराव नाईक यांनी हरितक्रांती केली.  या सर्व लोकांनी आपले शब्द पाळले.  श्री.शंकरराव चव्हाण नेहमी खरे बोलायचे. मी त्यांच्या बरोबर काम केले आहे.  त्यावेळी त्यांनी ठामपणे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सांगितले होते की, वैधानिक विकास मंडळे निर्माण केली तर या सभागृहाचे अधिकार जातील. आज सर्व राजकीय पक्षांची एकत्र बसण्याची इच्छा शक्ती आहे काय ? आपण सर्वांनी एकत्र येऊन विदर्भ व मराठवाड्याला न्याय दिला पाहिजे. त्यासाठी दांडेकर व केळकर समितीची आवश्यकताच नाही. आपल्यात एकमत झाले तर विदर्भ आणि मराठवाड्याला न्याय दिल्या शिवाय राहणार नाही. हे मी या निमित्ताने आपणाला सांगू इच्छितो. निधी पळविता असा नेहमी पश्चिम महाराष्ट्रावर आरोप केला जातो. निधी हा बॅकलॉग, स्पेशल कंपोनंट प्लॅन, ट्रायबल प्लॅनचा देखील पळवतात. आम्ही काय त्यात होरपळून नाही काय ? स्पेशल कंपोनंट प्लॅनचा कित्येक वेळा निधी पळविला आहे. आम्ही देखील आपणा सारखे होरपळलो आहोत. जशी शासनाची एक बाजू आहे तशी समाजाची देखील एक बाजू आहे. पद्मश्री विखे-पाटील आपल्या पागोट्यामध्ये भाकरी बांधून पायपीट करीत होते. त्यांनी पायपीट केली नसती तर आज पश्चिम महाराष्ट्रात साखरेची पेरणी झाली असती का ? आपणही तसे करायला पाहिजे होते. आपण देखील विकासाचा एक भाग असतो हे विसरता कामा नये. यासाठी जबाबदारी घेणे आवश्यक असते. आता प्रत्येक लोकप्रतिनिधी हा सीमित झाला आहे. तो फक्त आपल्या मतदार संघाचाच विचार करतो. मंत्री राज्याचे असले तरी देखील ते राज्या पुरते राहिलेले नाहीत. सन्माननीय मंत्री श्री.रावते साहेबांचे आपण सोडून द्यावे. हे सन्माननीय सदस्य असे आहेत की, मंत्री पद असो किंवा नसो ते कायम राज्यभर फिरत असतात. मी यात माननीय मुख्यमंत्र्यांना घेणार नाही. कारण ते राज्याचे मुख्यमंत्री असतात. श्री.रावते साहेब सोडले तर एकही मंत्री विभागाचा दौरा करीत नाही. ते एकही विभागाचा प्रश्न जाणून घेत नाहीत. माननीय मंत्री निघतात आणि मुंबईत येतात आणि पुन्हा मतदार संघामध्ये जातात. त्यामुळे आज मंत्री देखील मतदार संघा पुरता मर्यादित झालेले आहेत. ज्यावेळी विभागाच्या अनुशेषाचा प्रश्न निर्माण होतो त्यावेळी फक्त माननीय मंत्री श्री.रावते साहेब बोलतात बाकीचे कोणीही बोलत नाही ही परिस्थिती आहे. यात जेवढी शासनाची जबाबदारी आहे तेवढीच ती आपली देखील आहे, समाजाची आहे हे मी या येथे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, विकासकामामध्ये किती भ्रष्टाचार होतो याचा आपण कधी विचार केला आहे काय ? पूर्वी या राज्यात अशी परिस्थिती नव्हती. मी श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या चरणी बसून अतिशय लहान वयात राजकारण शिकलो. उच्च पदस्थ अधिकारी आणि राज्यकर्त्यांची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

भ्रष्टाचारासाठी युती झालेली आहे. किती तरी पैसा भ्रष्टाचारामध्ये जात आहे ? आपण गोसीखुर्द प्रकल्पाचे उदाहरण घ्यावे. गोसीखुर्द हा 384 कोटी रूपयांचा प्रकल्प होता. या प्रकल्पाचे काम 1986 मध्ये सुरू झाले. हा प्रकल्प पाच वर्षात पूर्ण होणार होता. कृष्णा खोऱ्याचे देखील तसेच आहे. त्यामुळे हा नियम आपणा सर्वांनाच लागू आहे. नदी व धरणातील गाळ काढणे यामध्ये देखील.......

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** सभागृहाची वेळ 7 वाजेपर्यंत होती परंतु ही वेळ अजून 2/3 मिनिटांनी वाढवून देण्यात येत आहे.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, या भ्रष्टाचारामध्ये किती पैसा मुरतो याचे आपण कधी अवलोकन करणार आहोत की, नाही ? हा पैसा जर विकास कामामध्ये मिळाला तर आपण अधिक काही चांगले करु शकू असे मला वाटते. आता आपण सिमीत झालो असून आपली संवेदनाही गेली आहे. विदर्भामध्ये आत्महत्या होतात, विशेष करुन यवतमाळ येथे मोठया प्रमाणात शेतकरी आत्महत्या करतात. तेथील शेतकऱ्याने आत्महत्या केली तर त्या संदर्भात उर्वरित महाराष्ट्राला किती संवेदना होते ? बेळगावचा सीमा प्रश्न निघाला तर कोकण, पश्चिम महारष्ट्र व मुंबई सोडले तर बेळगाव सीमा प्रश्नाच्या संदर्भात कोणी विचार करीत नाही. विदर्भ आणि मराठवाठयाचा बॅकलॉग काढण्यासाठी कोणतीही समिती नेमली तरी त्याचा उपयोग होणार नाही. या अशा समितीपेक्षा राजकीय इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. ही राजकीय इच्छाशक्ती सरकारने दाखवावी, यासंदर्भात सरकारने सर्व पक्षांना बरोबर घेऊन केळकर समितीमध्ये जे चांगले असेल ते घ्यावे. अहवाल तयार करण्याचे काम तज्ज्ञ मंडळी करीत असतात. तज्ज्ञांचा राजकारणाशी मुळीच संबंध नसतो.

सभापती महोदय, भाषा हे संस्कृतीचे आणि दळणवळणाचे फार मोठे साधन आहे. दोन जर्मनी होते परंतु भाषा आणि संस्कृतीमुळे ते एकत्र आले. महाराष्ट्र एकसंघ ठेवण्याची सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जी विनंती केली ती विनंती फार महत्वाची आहे. रशियामध्ये काही धर्ममार्तंडांनी प्रश्न निर्माण केले होते. गोर्बाचेव्ह यांनी ज्याला जे पाहिजे ते दिले. त्यांच्यामुळे अफगानीस्तानजवळ कजाकिस्तान, उजबेकिस्तान तयार झाला. त्यामुळे याबाबतीत सुध्दा आपण सर्वांनी अतिशय गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. मुंबई, कोकण व उत्तर महाराष्ट्रावर मला खूप काही बोलावयाचे आहे परंतु वेळ कमी असल्यामुळे जास्त बोलता येत नाही. परंतु मुंबई सोडली तर महाराष्ट्र झीरो आहे. आपण मुंबईमुळे वाढलो आहोत. मुंबईचे उपकार आपण विसरु शकत नाही. मुंबईमुळे ठाणे, पुणे, बेलापूर आणि आता नवी मुंबईचे विमानतळ झाले तर मुंबई ते पुणे आणि पुणे ते नाशिक असा उत्तर महाराष्ट्राचा एक पट्टा तयार होईल.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे .......

सभापती महोदय, मी रेल्वेमंत्री श्री. सुरेश प्रभू यांचे अभिनंदन करु इच्छितो की, त्यांनी कोकणाच्या 720 कि.मी. किनाऱ्याच्या विकासाच्या संदर्भात रत्नागिरी ते कराड किंवा कोल्हापूर हा मार्ग तयार करण्याचा निर्णय घेतला असून हा भाग मराठवाडयाला जोडला गेला तर फार चांगले होईल. या सर्वांमुळे मुंबईतील न्हावा-शेवा बंदरावरील ताण सुध्दा कमी होईल आणि मराठवाडा-विदर्भाला चांगल्या प्रकारे रोजगार मिळेल.

सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व कोकणावर अन्याय करु नका. या सर्व विभागाचा समतोल आपण साधू या. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी सांगितले आहे की, मराठवाडा ही संताची भूमी असल्यामुळे ते बिचारे काही म्हणत नाही. ते फक्त "जो दे उसका भला, जो ना दे उसका भी भला." एवढेच म्हणत असतात. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदय श्री. दिवाकर रावते म्हणत असतात की, "तुझ्या भुकेला वरी, नागली आणि कणी कोंडा, वाहन पायी अंगी कांबळी आणि उषाखाली धोंडा" असे विदर्भाला आणि मराठवाडयाला ठेवू नका. तुम्ही आम्ही एक मेका सहाय्य करु, अवघेची धरु सुपंथ या न्यायाने आपण महाराष्ट्राला पुढे नेऊ. राज्य शासनाने यासंदर्भात गंभीर दखल घेतली नसल्यामुळे राज्य शासनाचा निषेध करुन मी माझे दोन शब्द संपवतो.
धन्यवाद.

--

श्री. दिवाकर रावते (परिवहन मंत्री ) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केळकर समितीच्या व दांडेकर समितीच्या अहवालाच्या संदर्भात या ठिकाणी विषय मांडले आहेत. परंतु दांडेकर समितीच्या संदर्भातील अहवाल आपल्याला मान्य नव्हता म्हणून माननीय राज्यपाल महोदयांच्या निर्देषानुसार अनुशेष व पुनर्रमुल्यांकन समिती निर्माण झाली. यासंदर्भात त्यांनी नवीन निर्देष दिले होते त्यावेळी मी अध्यक्ष होतो परंतु तेथे तुम्ही दुर्लक्ष करुन माझ्यावर अन्याय केला एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.
धन्यवाद.

--

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 9 एप्रिल, 2015 रोजी सकाळी 10.30 ते 12.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत सकाळी 10.30 ते 11.15 या वेळेत कोकणातील आंबा पिकाचे नुकसान या विषयावरील महाराष्ट्र विधान परिषद नियम 97 अन्वये चर्चेस माननीय मंत्री महोदयांचे उत्तर व त्यानंतर 11.15 ते 12.45 या वेळेत केळकर समितीच्या अहवालावर चर्चा पुढे सुरु व माननीय मंत्री महोदयांचे उत्तर होईल. सभागृहाची नियमित बैठक उद्या दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 7 वाजून 6 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 9 एप्रिल, 2015 रोजीच्या च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION